कृषि के व्यवसायीकरण का वित्तीय संस्थाओं पर भी प्रभाव पड़ा है। जहॉ एक और व्यवसायीकरण के कारण वित्तीय संस्थाओं के उत्तर दायित्व बढ़े है। दुसरी ओर व्यवसायीकरण के कारण वित्तीय संस्थाओं को आगे बढ़ने और कार्यक्षेत्र का विस्तार करने का अवसर मिला है। वर्तमान में कृषि क्षेत्र की जमा दर बढ़ी है जिससे इस क्षेत्र में पूॅजी निर्माण की दर भी बढ़ी है। वित्तीय संस्थाये अपनी क्रियाओं से विकास के साथ ही वित्तीय संस्थाओं के कार्य का विस्तार होता है। जिससे उनकी आय और साधन बढ़ते है। इसके साथ ही विभिन्न फसलों के प्रति सरकार की नीति तथा निर्यात, कर, रियायतों आदि के बारे में सरकार की नीति सकारात्मक रही है। सरकार कृषि विकास के लिये रियायती दरों पर विविध साधनों को जुटाती है। ताकि किसान उसका लाभ लें सके । स्वतंत्रता के पहले सरकारी नीति का कृषि क्षेत्र में हस्तक्षेप बहुत कम था और फसलों का ढॉचा अन्य कारणों द्वारा निर्धारित होता था । परंतु स्वतंत्रता के बाद सिंचाई सुविधाओं के विकास के बारे में सरकारी नीति वसुली किमतों व समर्थन मूल्यों के बारे मे, उन्नत किस्म के बीजों के आवटन की नीति के कारण किसानों ने गेहूॅ के अधीन क्षेत्र का काफी प्रसार किया।

**भारतीय कृषि के समक्ष चुनौतियॉ एवं संभावनाऍ** :– हरिक्रांती का भारतीय कृषि पर अनुकुल प्रभाव हुआ है। जिसके कारण खाद्यान्न उत्पादन में सतत वृद्धि हुई है। खाद्यान्न उत्पादन जो की 1960–61 में 8.2 करोड टन तथा 2006–07 में बढ़कर 21 करोड टन हो गया। भारत न केवल अपने लोगों के लिए पर्याप्त खाद्यान्न पैदा कर सकता है वरन् इसका निर्यात भी कर सकता है। यह विश्व का संभावित अन्न भंडार बन सकता है। एक ऐसा देश जिसे विश्व अपनी बढ़ती

जनसंख्या के भरण पोषण के लिये देखे। विकसीत देशों की अपेक्षा भारत की वर्तमान फसल पैदावार जापान में 6420 किलो प्रति हेक्टर एवं दक्षिणी कोरीया में 6730 किलो प्रति हेक्टर की तुलना में, भारत में 2900 प्रति किलो हेक्टर थी। पैदावार के इस अंतर को समन्वित राष्ट्रीय कृषि नीति पर जोर देकर मिटाया जा सकता है। भारत खाद्यान्न उत्पाद की दृष्टि से विश्व का सबसे अग्रणी देश बन सकता है। इसीलिए भारत के सन्मुख सबसे बड़ी चुनौती यह है की किस तरह के फसल पैदावार को बढ़ाकर विश्व स्तर तक सतत आधार पर ले जाया जाये। बावजुद प्राकृतिक आपदा यथा सुखा एवं बाढ के जो कि भारत के लिये अभी भी संकटापन्न कारण है।

हाल में किसानों द्वारा आत्महत्याकी घटनाये कृषि में वर्ष दर वर्ष हुये भारी नुकसान के कारण एवं परिणाम आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक एवं केरल में बढ़ती ऋणग्रस्तता के कारण बढ़ी है। इस दृष्टि से भारत सरकार द्वारा इन चारो राज्यों के आत्महत्या प्रभावीत जिलो के लिए 16978.7 करोड़ के राहत पॅकेज को स्विकृत किया गया। भारत में जोत का आकार न केवल छोटा है अपितु यह देश भर में व्यापक रूप से छितरा हुआ है। जिसके कारण सभी तकनीक व मशीनरी का उपयोग नहीं किया जा सकता। भू–स्वामित्व को उपभाग एवं बटवारें के कानुनी तरीकों से रोके जाने की आवश्यकता है। जिसमें ऐसी भूमि जो आगे बॅाटने पर आर्थिक दृष्टि से व्यावहारीक नहीं रह जायेगी के आगे बटवॅारे की इजाजत नहीं दी जानी चाहिये । यद्यपि नीति निर्माता के लिये भू–स्वामित्व की संरचना में ऐसे सुधार लाना एक बड़ी चुनौती है।

उदारीकरण ने भारतीय कृषकों के लिए अपने उत्पादकों के उच्च वैश्वविक किंमतों का लाभ लेने एवं कुछ आगत कम किंमत पर लेने के अवसर खोल दिये है। निर्यात अभिविन्यास में उच्च तकनीकी परियोजनाओं की आवश्यकता एवं निर्यात योग्य वस्तुओं के लिए अंतरराष्ट्रीय बाजार को खोजने का काम किया है। आज ग्रामीण विकास के नियोजकों के सन्मुख एक गंभीर चुनौती यह है की प्राकृतिक संसाधनों एवं पर्यावरणीय गुणवत्ता को ध्यान में रखते हुए विकास की तीव्र दर कैसे प्राप्त की जाये। इसी तरह ग्रामीण और गैर–कृषिगत उपक्षेत्र का विस्तारण तीव्र गती से करना होगा, जो फालतु हुए ग्रामीणों को रोजगार के अवसर प्रदान करेगा। अर्थव्यवस्था में उदारीकरण एवं भू–मंडलीकरण के बढ़ने के परिप्रेक्ष्य में भारत कई अवसरों से लाभ प्राप्त करने की चुनौतियों का सामना कर रहा है। ऐसी चुनौतियों में खाद्यान्न सुरक्षा एवं पर्यावरणीय अखंडता को बनाये रखना और कृषि एवं सहायक गतिविधीयों में संसाधन उत्पादकता बढ़ाना सम्मिलित है। जिससे की यह कम से कम विश्व अनुपात के आस–पास पहुँच सके।

**सुझाव** :– 1. कृषि क्षेत्र में बचत व विनियोग की दर अधिक होने पर देश में बचत व विनियोग की दर अधिक होगी इसलिये आर्थिक विकास में कृषि क्षेत्र के विकास पर अधिक ध्यान देना होगा। 2. कृषि उत्पादन बढ़ाने के लिए देश में दुसरी हरितक्रांती की आवश्यकता है। सरकार ने बजट में कृषि उत्पादन बढ़ाने पर अपना ध्यान केंद्रित करना चाहिए। 3. वित्तीय सुविधा के अभाव के कारण कृषि का अधिक विकास नहीं हो पाया। सरकार ने वित्तीय सुविधा बढ़ाने व सस्ते दर पर ऋण उपलब्ध कराने की ओर ध्यान दिया तो निश्चित कृषि उत्पादन में वृद्धि होगी। 4. कृषि क्षेत्र में निजी विनियोग बढ़ाने के लिये कुछ प्रोत्साहनात्मक कार्यक्रम बनाने होंगे ताकि कृषि उत्पादन में वृध्दि हो सके। 5. कृषि वित्त पूर्ति के लिए औपचारिक संस्था द्वारा दिये जाने वाले ऋण में वृध्दि होना आवश्यक है। सहकार्य वित्त संस्था तथा विभागीय ग्रामीण बॅक द्वारा वित्त पुर्ती को बढ़ाने के लिये केन्द्र सरकार ने कुछ दिर्घकालीन कार्यक्रम अपनाने होंगे। 6. सभी कृषि उत्पाद का बाजार मूल्य निश्चित किया जाये तथा किसानों के लिये वह किंमत घोषित की जाये। 7. सरकार द्वारा घोषित किंमत पर किसानों का माल व्यापारियों ने खरीदना चाहिए तथा उसकी नगद रक्कम उन्हें दी जाये। 8. उन्नत बीज, खाद, औजार सस्ते दर पर किसानों के लिए उपलब्ध करवाये जायें। 9. उन्नत बीज के साथ साथ सिंचाई की व्यवस्था की जाये ताकि किसान वर्ष में दो फसल ले सकें और कृषि की उत्पादकता बढ़ा सकें। 10. अधिक उत्पादन लेने वाले किसानों को प्रोत्साहन दिया जाये। उन्हें भू–सूधार कार्यक्रम, वित्त पूर्ती फसलों को उचित दाम, फसल बिमा, उत्पादन बढ़ानेवालों को इनाम आदि के द्वारा किसानों को प्रोत्साहित किया जाये। 11. कृषि अनुसंधान को प्रोत्साहन दिया जाये वर्तमान में कृषि अनुसंधान का कार्य इंडियन कॉन्सील ऑफ अॅग्रीकल्चर रिसर्च विविध कृषि विश्वविद्यालय व अन्य संस्थाओं के द्वारा किया जाता है। जिससे कृषि उत्पादन बढ़ाने में मदत मिलती है।

**निष्कर्ष** :– समस्त तथ्यों के माध्यम से यह सकारात्मक संकेत प्राप्त होता है की भारतीय कृषि का भविष्य सकारात्मक है। मांग में तीव्र वृद्धि सुनिश्चित है। और भारतीय कृषि को संगठनात्मक परिवर्तन से हम उसे पूर्ण करने में सक्षम होंगे। हमारा अतीत और कृषि का प्राचीन आधार कृषि विकास को आधार देगा तथा तकनीक व वित्त सुविधायें इसे उन्नत आकार प्रदान करेगी । भूमि सुधार, जल संरक्षण की योजनाओं की सफलता कृषि विकास का मार्ग प्रशस्त करेगी । नवीन तकनीक का ज्यादा से ज्यादा उपयोग करके संशोधन करना आवश्यक है।

**संदर्भ ग्रंथ** :–

1. योजना मासिक – सप्टेंबर 2016.
2. अग्रवाल ए.एन. (2009) कृषि अर्थव्यवस्था विश्व प्रकाशन, नई दिल्ली.
3. गुप्ता पी.के. (2010) कृषि अर्थशास्त्र वृंदा पब्लिकेशन हाऊस, जयपुर.
4. मिश्र जयप्रकाश (2007) कृषि अर्थशास्त्र साहित्य भवन पब्लिकेशन्स – आगरा.
5. लाल मीरा रंजन (2010) – भारतीय अर्थव्यवस्था – रीगल पब्लिकेशन, नई दिल्ली.
6. मिश्रा महेन्द्रकुमार (2010) – भारतीय अर्थव्यवस्था सागर पब्लिशर्स, जयपुर.
7. मिश्रा, पुरी, (1995) – भारतीय अर्थव्यवस्था हिमालया पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.
8. अर्थ संवाद – एप्रिल जून 2012.
9. झामरे जी. एन. (2011) – भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र – पिंपळापुरे अॅण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
10. माथुर बी.एल. (2009) – कृषि अर्थशास्त्र – अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.

# राष्ट्र के किसानों की व्यथा को दर्शाता प्रेमचंदजी का साहित्य

**डॉ. मनीष जी. टेंभरे,** कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय, पे.पंप (जवाहरनगर), त.जि. भंडारा

सन् 1943 में बंगाल में अत्यधिक भयानक अकाल पड़ा था, जिसमें तीस लाख से भी अधिक लोग काल का ग्रास बने थे। इस तरह का अकाल फिर दुबारा इस देश में न आये, यह सोच अधिक अन्न उपजाने पर बल दिया गया और इस संघर्ष के चलते आज हमारा देश दुनिया के शीर्ष अनाज उत्पादक देशों की श्रेणी में आ गया। जब भी विश्व में खाद्य सुरक्षा की बात उठती है तो सारा विश्व भारत की ओर निहारने लगता है, किन्तु इस सत्य में कुछ असत्य भी छिपा हैं जो किसी अंधे झरोखें से झांक कर हमारी हंसी उडा रहा है। और वह असत्य है, हमारा खोखला दंभ। वह असत्य है हमारा कृषि संबंधी विकास जो कृषकों के अस्थि–पंजर हुयी देह पर खड़ा हो डींगे हांक रहा है। पूर्ण सत्य की बात यदि करें तो आजादी के 65 वर्ष व्यतीत होने के बाद भी हमारा किसान मुहताज है। भूख से बेहाल, वह और उसका परिवार आत्महत्या को अंगीकार कर रहा है। सरकारी दावे खोखले प्रतीत होते हैं। जब हम यह सुनते है कि अमुक जगह अमुक किसान ने भूखमरी और कर्ज के बोझ को वहन न कर सकने के कारण जहर गटक लिया। तमाम सरकारी दावों के बावजूद हर वर्ष हजारों की संख्या में आत्महत्या करने के लिए मजबूर किसान इस बात का गवाह हैं कि अन्न उत्पन्न करने वाला कृषक वर्ग सुखी नहीं है। उसकी आर्थिक, सामाजिक एवं पारिवारिक स्थिति में विशेष सुधार नहीं आया है।

हरितक्रांति का दौर 1966–67 में चला। इसके बाद खाद्यान्न उत्पादन में क्रमशः वृद्धि आयी। किन्तु अन्न उत्पादक कृषक वर्ग की आय में कोई इज़ाफा नहीं हुआ। नेशनल सैंपल सर्वे ने अभी हाल ही में एक सर्वेक्षण किया हैं और इस सर्वेक्षण में यह स्पष्ट किया गया है कि पांच सदस्यों वाले कृषक परिवार की औसत आय रू. 2400/– मासिक है। कृषि मामलों के विद्वान देवेन्द्र शर्मा के अनुसार – हरितक्रांति की शुरूआत के बाद किसानों से कहा जाने लगा कि अधिक बुधाई करो, अधिक अन्न उपजाओं और खूब कमाओं। लेकिन हरितक्रांति शुरू होने के लगभग 45 साल बाद भी किसानों की माली हालत में खास बदलाव नहीं आया है। अगर 2400 रू. की उस औसत आय को तीन गुना भी करलें तो वह 10,000 रू. से कम बैठती है। जबकि किसी सरकारी महकमे में चतुर्थ श्रेणी कर्मचारी का मासिक वेतन भी करीब 20,000 रू. होता है। श्री देवेन्द्र शर्मा की बातों में वजन है, सत्यता है। किसानों के हक और कर्तव्यों की दुहाई देने वाली हमारी सरकार को छोटे और मझोंले दर्जे के किसानों की आर्थिक स्थिति पर गंभीरता से विचार करने की आवश्यकता है। यह कितना बड़ा दुर्भाग्य और हास्यास्पद बात है कि जो किसान अन्न उपजाकर दूसरों का पेट भरता है वही किसान अपना और अपने बच्चों का पेट भरने में दाने–दाने के लिए मोहताज हो आत्महत्या करने के लिए मजबूर है। यह विचारणीय है कि यदि हमारे कृषक एक के बाद एक आत्महत्या करते चले गये तो कृषि का क्या होगा ? संम्पूर्ण भारतवासियों का क्या होगा ? और दुनिया के लोग क्या हमारा मजाक नहीं उड़ाएंगे ? मेरा यहा स्पष्ट मत है कि सरकार छोटे और मझोंले वर्ग के कृषकों को केश सब्सिड़ी देने के विषय में विचार करे।

आज विज्ञान ने तरक्की किया है। नहरों का जाल बिछा हुआ हैं। बड़े–बड़े बांध बनाये गए हैं किन्तु नहरे और बांध सूखे हैं। इसका मूल कारण वर्षा की कमी है। अकाल, अतिवृष्टि, ओलावृष्टि के चलते कृषकों के खेत उजड़ते जा रहे हैं। बिते कुछ वर्षो के सर्वे के अनुसार महाराष्ट्र मे कृषि उत्पादन में पहले से ही 1.4 प्रतिशत घटने की संभावना थी, लेकिन इसके अलावा 2.1 प्रतिशत घाटा और बढ़ गया है। इससे पिछले वर्ष की तुलना में अनाज उत्पादन में 18 प्रतिशत की कमी आई है। रिपोर्ट के उक्त आंकड़े इस बात को सिध्द करते हैं कि भीषण अकाल के चलते राज्य में कृषि उत्पादन बुरी तरह प्रभावित हुआ है। वर्षा की अनियमितता के कारण कृषि का बुरा हाल हो रहा है।

कृषकों की बढ़ती बदहाली को परिलक्षित कर 'कृषि ऋण माफी' योजना पर केन्द्र सरकार ने ध्यान दिया है। केन्द्रीय कृषि राज्य मंत्री ने सांसदों के सवालों के लिखित जवाब में कहा है कि – सरकार ने कृषि ऋण माफी योजना सन 2008 में शुरू की थी और कैग ने इस योजना का लेखा परिक्षण किया है। कैग ने 7 मार्च 2012 को बाह्य सम्मेलन का आयोजन किया था। सम्मेलन के दौरान प्राप्त फीड बैक के आधार पर सरकार ने इस वर्ष 11 जनवरी को बैंक तथा नाबार्ड को सलाह दी कि वे कैग द्वारा की गई टिप्पणियों पर कार्रवाई करें।

सम्पूर्ण भारतवर्ष का किसान वर्षा की अनियमितता के कारण परेशान है। सरकारी ऋण का बोझ उसपर सतत बढ़ता जा रहा है। ऋण की वसूली सरकार एवं बैंक शक्ति से करते हैं जिस कारण ऋणग्रस्त किसान परेशान हो आत्महत्या करने की ओर प्रवृत्त होता है। अतिवृष्टि, अनावृष्टि एवं ओलावृष्टी से त्रस्त वर्तमान काल का किसान सरकार से राहत की अपेक्षा किये हुए हैं। इसी विचारधारा के चलते देश के 14 राज्यों के किसानों ने गांधी की समाधि राजघाट पर 20 मार्च 2013 को धरना दिया। बिना खाद के उत्तम उत्पादन की कल्पना करना व्यर्थ है। अतएव सरकार को चाहिए कि वह किसानों को किफायती दरों पर रासायनिक खाद, डीज़ल एवं बिजली मुहैया कराए। इसका परिणाम यह होगा कि किसान उत्पादन बढ़ाकर अपनी गरीबी दूर कर सकेगा। उसपर अनावश्यक ऋण भार का मानसिक तनाव नहीं होगा तथा वह अधिक अन्न उत्पन्न कर अपने परिवार एवं बच्चों का विकास कर सकेगा।

आज किसान बढ़ी हुयी रासायनिक खाद की कीमत से त्रस्त है। वह पर्याप्त मात्रा में इसका उपयोग कर सकने में अक्षम है। रासायनिक खाद का उपयोग करने के बाद पौधों को पर्याप्त मात्रा में पानी दिया

जाना आवश्यक है। इस सिंचाई के लिए कृषक वाटर–पंप का उपयोग करता है किन्तु पर्याप्त बिजली एवं डीज़ल के अभाव में मध्यम या साधारण वर्ग के किसानों को वाटर–पंप का पर्याप्त उपयोग असुविधाजनक है। इस कारण वे रासायनिक खाद का उपयोग करने से हिचकिचाते हैं।

रासायनिक खाद के बदले गोबर और जानवरों के मुत्र का उपयोग करके भी उत्पादन लिया जा सकता है। किन्तु भारतीय किसानों के पास पर्याप्त मात्रा में मवेशी अर्थात गाय, बैल, भैंस नहीं है। जो जानवर उनके पास हैं वे अत्यधिक दुर्बल हैं। जानवरों की संख्या के अभाव में भी किसान गोबर–खाद का संतोषजनक उपयोग नहीं कर पाता। उसके पास जानवरों को पौष्टिक आहार देने के लिए धन का अभाव है। वह केवल अपनी फसलों से प्राप्त सूखा घास (तनस) अथवा वृक्षों की हरी पत्तियाँ, हरा चारा खिलाकर जानवरों का पालन–पोषण करता हैं। यह उसकी मर्यादा है कि किसान के घर के सामने गाय–बैल बंधे होने चाहिए अतएव अपनी मर्यादा पूर्ति भर के लिए वह जानवर पाल रहा है। उनसे पर्याप्त गोबर–खाद की अपेक्षा व्यर्थ है।

आज भी हमारे देश के अधिकांश मजदूर घीसू और माधव ही हैं। सरकारी उदारवादी नीति के अंतर्गत दो रूपये किलो का अनाज पाकर ग्रामीण मजदूर उसी तरह अकड़ने लगा है जिस तरह घीसू और माधव। घर में अनाज है तो वे किसी के यहां काम करने नहीं जाते। दुगनी मजदूरी की मांग करते हैं। शराबखोरी की लत में बंधे वे कर्ज के बोझ तले दबे जा रहे हैं पर काम करने से कतराते हैं। घीसू और माधव की तरह रात में किसानों के खेत से ईख, आलू, मटर आदि उखाड़ लाते है और चैन से खाते हैं। बेचारे किसान! उन्हें मजदूरों की आवश्यकता कृषि कार्यो के लिए होती हैं। असहाय दुगनी मजदूरी देकर अपना काम चलाते हैं।

भारतीय ग्रामों में आलस्यग्रस्त मजदूरों की कमी नहीं हैं। इन मजदूरों के भरोसे गाँव में शराब के ठेके चल रहे हैं। अपने इन्हीं आलसी मजदूर पतियों से तंग आकर स्त्रियों ने शराब की दुकाने बंद करवाने हेतु अनेकों बार आंदोलन भी किया हैं। ऐसे मजदूरों से निम्न एवं मध्यमवर्गीय कृषक परेशान हैं।

अधिक धन कमाने की लालसा सभी में होती है। प्रत्येक व्यक्ति चाहता है कि उसे कुछ अधिक धन की प्राप्ति हो जिससे उसका परिवार सुखपूर्वक चल सके। बाल–बच्चों के खान–पान एवं अन्य आवश्यक वस्तुओं की पूर्ति होती रहे। उनकी शिक्षा–दीक्षा, दवा एवं उत्तम वस्त्रों पर अर्जित धन व्यय किया जाए। गांवों में अपेक्षाकृत कम मजदूरी मिलने के कारण कर्मठ एवं मेहनती मजदूर शहरों की ओर पलायन कर रहे हैं। मिलों एवं फैक्ट्रियों से उन्हें उनकी मनोवांछित मजदूरी प्राप्त होती है और उनके मेहनत की प्रशंसा भी होती हैं।

ईमानदारी से किये गए परिश्रम के कारण गरीबी को व्यक्ति का दामन छोड़कर जाना ही पड़ता है बशर्ते कि कोई शोषक अपनी चालबाजियों का जाल फैलाकर मेहनती भोले–भाले किसानों को लूटने का प्रयत्न न करें। यदि ऐसा होता है तो किसान अधिक परिश्रम करने के बाद भी 'गोदान' उपन्यास के पात्र होरी की तरह ही अपना जीवन समाप्त कर देगा।

'गोदान' उपन्यास का होरी महतो एक ऐसा ही किसान है जिसमें समस्त मानवीय गुण दृष्टिगत होते हैं। वह मर्यादाओं का कायल है। कृषक होने के नाते गौ पालने की इच्छा उसमें है। महाजन, पंडित, जमींदार और अपने परिवार के सदस्यों, भाइयों के प्रति प्रेम, आदर एवं सम्मान है। वह परिश्रमी है और परिश्रम करके अपने खेतों में अधिक से अधिक अन्न उत्पन्न करता है किन्तु उसकी मर्यादा भोलापन, ईमानदारी और नैतिकता को नजरअंदाज कर शोषक वर्ग उसके उत्पादन को हड़प लेता है। होरी टूट जाता है। उदरपोषण की चिंता में डूबा वह किसान से मजदूर बन जाता है। और एक दिन परिश्रम करते–करते ही वह दुनिया से उठ जाता है।

प्रेमचंद–उपन्यास–'गोदान' में हम देखते है कि अत्यधिक श्रम करके होरी अन्न उपजाता है और सारा का सारा अनाज बनिया, साहूकार और पं. दातादीन–मातादीन के हवाले हो जाता है। कारण कुछ भी नहीं। भावनात्मक बातें, अस्पृश्यता, हुक्का–पानी एवं पिछले कर्ज का सूद–दर–सूद ये ही सब बातें होरी को महतो से मजदूर बना देती हैं। शोषणग्रस्त होरी के खेत बिक जाते हैं। मकान गिरवी हो जाता है और दाने–दाने को मुहताज हो वह एक दिन काल के गाल में समा जाता है। धार्मिक शोषण का घिनौना रूप तो तब सामने आता है जब सुतली के बीस आने भी धनिया पं. मातादीन के हाथ में रखकर पति होरी का गोदान कराती है।

वर्तमान समय में भी न जाने कितने कृषक इसी तरह के विप्रों के शिकार बने हैं। जो कृषकों के उत्पादन पर अनाधिकृत अधिकार जता कर सब कुछ हड़प लेते हैं। आज भी किसान की पूरी फसल खलिहान में ही हड़पनीतिज्ञ लोग उठा रहें हैं। सरकारी नुमांइदे, बनिया–महाजन, सूदखोर और धार्मिक पंडे अपनी चालबाजियों से उनकी फसलों पर अपना अधिकार जताते हैं। तथा उन मेहनतकश किसानों के हाथ कुछ भी नहीं आ पाता।

**संदर्भ :–**

1. प्रेमचंद रचनावली–6, गोदान–प्रेमचंद, डॉ. रामविलास शर्मा, जनवाणी प्रकाशन, दिल्ली, द्वितीय संस्करणः 2006.
2. प्रेमचंद की सर्वश्रेष्ठ कहानियाँ, सवा सेर गेहूँ–प्रेमचंद, डॉ. दुर्गाशंकर मिश्र, विश्वभारती प्रकाशन, नागपुर, संस्करण : 2006.
3. प्रेमचंद रचनावली–5, कर्मभूमि–प्रेमचंद, डॉ. रामविलास शर्मा, जनवाणी प्रकाशन, दिल्ली, द्वितीय संस्करण : 2006.
4. प्रेमचंद की सर्वश्रेष्ठ कहानियाँ, कफन–प्रेमचंद, डॉ. दुर्गाशंकर मिश्र, विश्वभारती प्रकाशन, नागपुर, 2006.
5. प्रेमचंद रचनावली–14, पूस की रात–प्रेमचंद, डॉ. रामविलास शर्मा, जनवाणी प्रकाशन, दिल्ली, द्वितीय संस्करण : 2006.

# नासिरा शर्मा के साहित्य में शिल्प विधान एवं पात्र योजना का अतुल्य संगम

**हरगोविंद सी. टेंभरे,** शोधछात्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर (महा.)
शोधकेंद्र :– वसंतराव नाईक शासकिय समाज विज्ञान संस्था नागपूर. Cell-9673178424, Email :- hargovindtembhare@gmail.com

नासिरा शर्मा के साहित्य के पात्र बहिर्मुखी और अन्तर्मुखी दोनो ही तरह के हैं। उनके पात्र भावुक, प्रबुद्ध, विचारक, और संवेदनशील हैं। नासिराजीने असाधारण, साधारण, कुंठित तथा हीनभावना से ग्रसित, पलायनवादी इत्यादी पात्रों का चयन कर अपनी कृतियों मे देशकाल और वातावरण के अनुकूल स्थान पर रखा है।

विस्तार भय से इस अध्याय मे मैने नासिरा शर्मा की लगभग साठ कहानियों एवं चार उपन्यासों में प्रयुक्त पात्रों मे से कुछ चुनिंदा पात्रों को ही लिया हूँ। सभी पात्रों पर चर्चा करना, विषय को अनावश्यक विस्तार देना है। उद्देश्य केवल इतना है कि साहित्यकार नासिरा शर्मा की पात्र योजना मे कौशल्य और हेतु का जायजा लेना तथा प्रसंगानुरूप पात्रों के चयन मे उनकी दक्षता पर दृष्टिक्षेप करता है।

नासिरा शर्मा का साहित्य मुस्लिम पात्रों के चरित्र को दर्शाता है जो समाज मे व्याप्त अनेकानेक समस्याओं से सतत जूझते नजर आते हैं। उनमे उन करोड़ों मुस्लिमों मे व्याप्त पीड़ा के प्रति सजगता है। समाज का दर्द उन पात्रों का दर्द बन एक उत्कृष्ट मानवता को रेखांकित करता है।

नासिरा शर्मा के उपन्यासों एवं कहानियों मे प्रयुक्त पात्र तमाम जातिगत एवं धर्मगत हीन भावनाओं को उखाड़ फेंकने के लिये कृत संकल्तिप प्रतीत होते हैं। प्रमुख स्त्री और पुरूष पात्र अपनी विकासशील भावना के माध्यम से जर्जर समाज मे परिवर्तन लाने के पक्षधर हैं तथा परंपरागत अंधश्रद्धा एवं रूढ़ीगत कार्य व्यापार को आधुनिक वैज्ञानिक युग के तर्क की कसौटी पर सच्चा और खरा नहीं पाते अतएव उन्हें विवके के आधारपर त्याग देने का परामर्श देते है। नासिरा शर्मा ने हिंदू पात्रों को भी अपने साहित्य में स्थान देकर धर्मगत भेद–भाव को नष्ट करने का प्रयत्न किया है। लेखिका की भावना के मूल मे मानव और मानवता ये दो ही तत्व प्रधान हैं। अतएव धार्मिक या साम्प्रदायिक टकराव अथवा संघर्ष को उन्होंने अपने साहित्य मे रंचमात्र भी स्थान नहीं दिया है। मानवता का विकास सर्वोपरी होने के कारण उन्होंने (लेखिकाने) अपने पात्रों को एक नये परिवेश मे अवतरित किया है जहां भाईचारा, प्रेम, विश्वास और सादगी तथा इन्सानियत की शीतल, सुगंधित वायु प्रवाहमान है।

कहानी के मध्य मे यही रेहान मानवमात्र को प्यार करने लगता है। वह अपनी ही बिरादरीवालों से एक हिंदू लड़की को बचाता है। वह मुस्लिम हमलावरों को, जो उस लड़की की जान लेना चाहते थे, कहता है– ''इस वक्त मेरे तन–बदन मे उतनी ही आग लगी है जितनी तुम्हारी बहन को किसी हिंदू के घर मे इस हालत मे देखकर लगती।'' रेहान अपनी जान पर खेलकर उस हिंदू लड़की को बचाता है और उसे उसके घर तक पहुँचाता है। उसके मन मे अपने देश के प्रति प्रेम है। वह कहता है– ''यह मेरा वतन है, मेरा वतन। देखता हूँ, कौन मुझे जीने से रोकता है? हिम्मत है तो आओ, निकलो। एक एक का सिर फोड़ डालूँगा।'' इस तरह नासिरा शर्मा ने रेहान के चरित्र को एक सच्चे देशप्रेमी के रूप में चित्रित कर यह दर्शाने का प्रयत्न किया है कि 'उपद्रव, दंगा, फसाद आदि किसी एक धर्म या समुदाय के न होकर सभी मे इस तरह की दूषित भावना को पैदा करते हैं। जितने दोषी मुस्लिम है उतने ही हिंदू। अत एव इस भावना से ऊपर उठकर मानवता की तलाश करना ही हमारा सच्चा धर्म है। मनुष्य से बड़ा कोई मजहब या धर्म नहीं होता।

किताबत करना अक्रम मियाँ का पुश्तैनी पेशा है। किंतु इस पेशे से वे अपने घर का खर्च पूरा नहीं कर पाते फिर भी इसी पेशे से जुड़े हुए हैं। वे इस पेशे मे इतने कुशल एवं दक्ष हैं कि उनकी बराबरी करनेवाला कोई नहीं। लोग उनसे अपना उल्लू सीधा करवा लेते हैं किंतु जब पैसे देने की बात उठती है तो उन्हें धोखा दे देते हैं अथवा टालमटोल करते हैं। कहानी के अंत मे लेखिका ने दर्शाया है कि अक्रम मियाँ को किताबत करने की कला पर दृढ़ आत्मविश्वास है, गर्व है। परंतु दगाबाज, स्वार्थी और चापलूस वर्ग उन्हें उनकी आर्थिक आवश्यकता पर अंगूठा दिखा देता है। वह कहते हैं– ''इनसान को सबसे खूबसूरत चीज खुदा ने जो दी है वह है उसके हाथ, जिनके जरिए वह अपने दिल व दिमाग का इज़हार करता है, अपने को दूसरों के सामने बेनकाब करता है। इन्हीं हाथों से इनसान दूसरों का हक छीनकर भागता है और जालिम कहलाता है। ज बवह इन हाथों से कुछ गढ़ता है तो फनकार कहलाता है।''

मजदूर युनियन के प्रमुख कार्यकर्ता के रूप मे कमाल 'जहाँनुमा' कहानी का प्रमुख पात्र है। वह मजदूरों का हितैषी है और उनके हक के लिये जी जान से कडा संघर्ष करता है। किंतु उसका चलायमान मन एक दिन परिवर्तित हो जाता है और ऐसोआराम का जीवन बिताना चाहता है। अतएव वह अपनी पत्नी नबीला से अलग हो जाता है और शहर के नामी उद्योगपति की बहन उजमा से विवाह कर लेता है। उसे धन, रूपया पैसा आकर्षित करता हैं। वह पूर्व पत्नी नबीला से कहता है– ''पैसे मे बहुत ताकत होती है। उसके दुनिया का हर आराम हर खुशी खरीदी जा सकती है। तुम भी एक दिन जिंदगी के किसी मोड़ पर पहुँचकर मेरी बात को समझोगी'' इस तरह वह एक झटके मे अपना संबंध विच्छेद कर, उजमा के धन से आकर्षित हो उससे विवाह कर लेता है। समय बीतता जाता है और उजना के साथ रहते वह तीन बच्चों का पिता बन जाता है। यहाँ रहते हुए उसे सारे भौतिक सुख तो मिलते हैं पर मन को शांति नहीं मिलती। वह उस घर मे सजावट की एक वस्तु सा बनकर जीवन जीता है। उसके बच्चे भी नाना और मामा

की राह पर चलने लगते हैं। उसे प्रतीत होने लगता है कि उन बच्चों को अब उसकी जरूरत नहीं। इसे उपेक्षित जीवन से तंग आकर वह अपनी पूर्व पत्नी नबीला के पास आता है और अपने मन की पीड़ा को सुनाते हुए कहता है– नबीला, मेरे दुःख को समझो, मै सच कह रहा हूँ। उस आराम, उस खामोशी से मै थक गया हूँ। ... इस हिमशिला के नीचे दबा–दबा मै पागल होता जा रहा हूँ। ... मेरी दिमागी जरूरतों को उजमा नहीं समझ पाती है। मै अब यह जिंदगी ज्यादा नही झेल सकता हूँ...।'' इस तरह वह नबीला के समक्ष अपनी लाचारी दर्शाते हुए जीवन के शेष दिन उसके साथ बिताना चाहता है जिसे नबीला नाकारते हुये कहती है– ''तुम किसी के पति हो। तीन बच्चों के बाप हो। ऐसी हालत मे तुमको यहाँ से जाना होगा। ... इस घर मे तुम्हारी याद तो रह सकती है मगर तुम नहीं।'' इस तरह कमाल दोनो तरह के जीवन से दुखी है। पहले नबीला की गरीबी, बाद मे उजमा की अमीरी से वह ऊबा हुआ प्रतीत होता है। नासिरा शर्मा ने पुरूष के इस चरित्र को रेखांकित कर सुझाया है कि हमारी सोच मे संतोष और परिस्थितियों से समझौते का भाव होना आवश्यक है। जमशेद के मन मे अपने परिवार के प्रति प्रेम है। वह एक कमरेवाले मकान मे दो परिवारों को देख सोचता है– ''इस कमरे मे कुछ न होने पर भी बहुत कुछ है जो उन्हें गरम रखे हुये है।'' और संतोष की स्वांस भरता बच्चों का मुख देखता सो जाता है। लेखिका ने जमशेद के माध्यम से प्रत्येक मध्यमवर्गीय परिवार को संदेश दिया है कि जहाँ आपसी प्रेम पनपता है वहाँ अभाव की पीड़ा अपने आप समाप्त होती जाती है।

त्यागीजी के अकेले पन का यही कारण था। पुलिस विभाग मे रिश्वत, शराब मांस–मछली और परनारी गमन, छल–प्रपंच, कपट व्यवहार तो आजकल एक आदर्श के रूप मे व्यवहृत है। सीधे–सरल और संस्कारी व्यक्ती को कोई भी नहीं पूछता। उनके इस आचरण को देख उनका पुत्र धूरेंदर कहता है– ''आपको देखकर, पापा कोई जल्द विश्वास नहीं करेगा कि आप पुलिस जैसे महक में रहकर इतने संस्कारी हैं।'' आज का युग संस्कारों से दूर होता जा रहा है। नासिरा शर्मा ने राममनोहर त्यागी के माध्यम से समझाने का प्रयत्न किया है कि संस्कारों के माध्यम से मनुष्य का जीवन उदात्त गुणों से परिपूर्ण हो आत्मा को सुख एवं शांति प्रदान करता है वहीं कुसंस्कार पर पीड़ा के लिये कारणीभूत है। संस्कार ही हमारे जीवन का संबल बनता है।

लेखिका नासिरा शर्मा ने अपनी कहानियों मे सहायक पुरूष पात्रों को प्रसंगानुकूल स्थान देकर कथा सौंदर्य को बढ़ाया है। इन्हीं पात्रों के कारण कहानियों मे सजीवता एवं प्रभावोत्पादकता दोनों एक साथ देखने को मिलती है। कहानी के प्रमुख पात्र इन सहायक पात्रों के कारण अपने चरित्र मे निखार ला सके हैं और वे सजीव हो सके हैं। कथन की सत्यता को प्रमाणित करने के लिये नासिरा शर्मा की कुछ कहानियों के सहायक पुरूष पात्रों पर प्रकाश डालना उचित होगा। नासिरा शर्मा ने काज़िम के चरित्र के माध्यम से यह दर्शाने का प्रयत्न किया है कि एक नारी पर अत्याचार केवल परिवार के वरिष्ठ सदस्य ही नहीं बल्कि पति भी करते हैं और नारी शबाना की तरह चुपचाप सहन कर लेती है। नासिरा शर्मा की अन्य कहानियों मे इसी तरह सहायक पात्रों का समावेश हुआ है। विस्तार भय से उन सभी पर प्रकाश नहीं डाला गया है। किंतु संक्षेप मे इतना अवश्य कहा जा सकता है कि वे सभी पात्र मानवता की उदात्त भावनाओं से तथा अपनी कर्तव्यपरायणता से परिपूर्ण हैं।

नासिरा शर्मा ने गौण पुरूष पात्रों के माध्यम से अनेक महत्त्वपूर्ण बातों पर प्रकाश डाला हैं। किताबत करनेवाले अकरम मियाँ का आर्थिक शोषण करने वाले प्रो. जमाल साहब 'कातिब' कहानी के गौण पात्र हैं। उसी तरह 'सरहद के उसपार' कहानी के रेहान को पागलपन से रोकने वाले शकूर चाचा गौण पात्र हैं। वे रेहान को हर समय उल्टे सीधे व्यवहार से रोकते हैं। रईस मिर्जा और मीर साहब ये दोनो अपनी–अपनी जिद पर अडे रहनेवाले गौण पात्र हैं। जिनका उल्लेख 'बंद दरवाजा' कहानी मे हुआ है। इब्ने मियाँ 'कच्ची दिवारें' का महत्त्वपूर्ण गौण पात्र है।

**संदर्भ :–**


1. नासिरा शर्मा – सरहद के इस पार – संग्रह – पत्थरगली
2. नासिरा शर्मा – इब्ने मरियम – इब्ने मरियम
3. नासिरा शर्मा – इनसानी नस्ल – अपराधी
4. नासिरा शर्मा – शामी काग़ज़ – मिस्त्र की ममी
5. नासिरा शर्मा – सात नदियाँ एक समंदर/बहिश्ते जहरा

# डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद

**डॉ. अनिल नितनवरे,** मराठी विभाग, एम. बी. पटेल महाविद्यालय, साकोली जि. भंडारा

गतशतकापासून भारतीय लोकजीवनाला विलक्षण प्रभावित करणारे एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर ओळखले जातात. प्रकांड पांडित्य, निरलस ज्ञाननिष्ठा, समष्टिनिष्ठ चिंतनदृष्टी आणि व्यापक लोकहिताची तळमळ ही आंबेडकरांच्या संघर्षशील व्यक्तिमत्त्वाची प्रमुख वैशिष्ट्ये होत. तसेच त्यांच्या ज्ञानगंभीर व्यक्तिमत्त्वाला भारतीय समाजव्यवस्थेचे मूल्यभान आणि प्रखर राष्ट्रनिष्ठेचे मनोज्ञ अधिष्ठानही लाभले होते. परंतु भारतीय समाजमनातील तेव्हाच्या आणि आजच्याही दुराग्रही अपसमजांमुळे डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा 'विवेकनिष्ठ 'राष्ट्रवाद' हा महनीय विशेष बराच काळ दुर्लक्षित राहिला आहे.

सामान्यतः एकोणिसाव्या शतकापासून 'राष्ट्रवाद' या संकल्पनेचा प्रभाव जगभर जाणवू लागला आहे. 'राष्ट्रवाद' ही केवळ एक मानसिक संकल्पना असल्याचे पाश्चात्य अभ्यासक प्रो. झिरमन यांनी म्हटले आहे. अनेक देशांमधील विचारवंतांना धर्म, शिक्षण कला साहित्य, संस्कृती व इतिहासाच्या पुनर्मांडणीसाठी 'राष्ट्रवाद' हे प्रभावी साधन वाटत आले आहे. 'राष्ट्रवाद' या संकल्पनेला देशकाल स्थितीनुसार अनेक परिमाणे आणि अर्थच्छटा लाभल्या आहेत. भारतीय संदर्भात बोलायचे तर राष्ट्रवादाचे तीन अंतःप्रवाह आपल्याला जाणवतात. समृध्द भूतकाळ, श्रध्दा आणि अस्मिता यांची धर्मनिष्ठ गोळाबेरीज मांडणारा अरविंद घोष, स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, सावरकर, गोळवलकर या मंडळींचा हिंदुत्वाच्या दिशेने निघलेला राष्ट्रवाद हा एक प्रवाह होय. देशभरातील विविधतेतील एकतेवर विशेष भर देणारा उदारमतवादी वळणाचा गांधी–नेहरूंचा राष्ट्रवाद हा भारतीय राष्ट्रवादाचा दुसरा प्रवाह होय. तर जोतीराव फुले, आगरकर आणि डॉ. आंबेडकरांच्या विचारमंथनातून प्रकटलेला 'विवेकनिष्ठ राष्ट्रवाद' हा भारतीय राष्ट्रवाद तिसरा अन् महत्वाचा अंतःप्रवाह मानला जातो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय समाजव्यवस्थेच्या विषमतोलांची आणि गुण–मर्यादांची प्रगाढ जाण होती. भारतीय समाजजीवन, इतिहास, कला, संस्कृती, विद्याक्षेत्रे या सर्वांचे सर्वस्पर्शी आकलन त्यांना होते. त्यांच्या मते, ''केवळ भौगोलिक आकार असलेला 'देश' म्हणजे 'राष्ट्र' नव्हे. उलट 'राष्ट्र' ही एक वस्तुनिष्ठ समूहभावना आहे...... ती सद्सद् विवेकशक्तीची भावना आहे.'[1] वंश, भाषा, भूगोल व संस्कृती या गोष्टी निव्वळ राष्ट्रीयत्वाच्या प्राथमिक गरजा नव्हेतच हे त्यांनी 'पाकिस्तान' ग्रंथात अनेक तऱ्हांनी पटवून सांगितले. त्यांनी 'राष्ट्र' संकल्पनेचे अनेक धर्मांध व श्रध्दांध पाश तोडून या संकल्पनेला विशुध्द जीवनचिंतनाची विवेकनिष्ठ अर्थवत्ता बहाल केली. मानवी समूहजीवनातील एकत्वाची व आपलेपणाची भावना हाच राष्ट्रवादाचा मुलाधार आहे असे ते मानत. देशभरातील विविध जाती, धर्म, भाषा, श्रध्दा यांच्या विरेचनातून प्रकटलेली एकत्वाची भावना हे राष्ट्रवादाचे केंद्रक आहे असे ते म्हणत.

डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रवादाला सर्वकष शोषणमुक्तीचा संदर्भ होता. देशातील शोषित समूह शोषणमुक्तीशिवाय राष्ट्रीय प्रवाहात समरस होणारच नाहीत हे सत्य ते ओळखून होते. भारतीयांच्या स्वातंत्र्य चळवळीच्या मर्यादा त्यांना ज्ञात होत्या. सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य वगळता 'स्वातंत्र्य' संकल्पनेत असलेला मर्यादित अर्थावकाश ते ओळखून होते. त्यांना राष्ट्रवादातील धर्मसत्तेचे अधिष्ठान अमान्य होते. त्यांची राष्ट्रवादाची संकल्पना धर्मातीत, धर्मविहीन, इहवादी स्वभावाची होती. ''शेकडो, हजारो जातींनी विभागलेले लोक हे एक 'राष्ट्र' कसे होऊ शकतील असा धर्मनिष्ठ राष्ट्रवाद्यांना त्यांचा निर्णायक सवाल होता. भारतीय जातिसंस्थेचे उच्चाटन ही भारतीय राष्ट्रवादाची पहिली पायरी असे ते म्हणत.

डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रवादाला बुध्दीप्रामाण्यवादाचे तत्वगंभीर अधिष्ठान होते. प्राचीन संस्कृती, परंपरा, धर्म, वंश इत्यादींच्या भाबडया व अतिरंजित गौरवातून असहिष्णेतेचा, अविवेकाचा जन्म होतो. अशा एकारलेल्या असहिष्णू राष्ट्रभावनेतून राष्ट्राचे अकल्याण होते असे त्यांचे मत होते. जुन्या संचिताची व नव्या मूल्यांचीही विवेकशक्तीच्या निकषावर कठोर चिकित्सा झाली पाहिजे यासाठी ते आग्रही होते. त्यांना सांस्कृतिक पुनरूज्जीवनवादी राष्ट्रमीमांसा अमान्य होती.

डॉ. आंबेडकरांच्या विवेकनिष्ठ राष्ट्रवादाला जोतीराव फुलेंच्या राष्ट्रचिंतनाची पार्श्वभूमी लाभली होती. जोतीरावांनी सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथात म्हटले आहे. '...... यावरून या बळीस्थानातील एकंदर शुद्रातिशुद्रांसह भिल्ल, कोळी वगैरे लोक विद्वान होऊन विचार करण्यालायक होईतो ते सर्व सारखे एकमय लोक झाल्याशिवाय होऊ शकत नाही.'[2] जोतीरावांच्या या अवतरणात त्यांचा समताधिष्ठित राष्ट्रवाद प्रतिबिंबित झाला आहे. 'एकमय लोक' म्हणजेच खरे राष्ट्रनिर्माण अशी जोतीराव फुल्यांची धारणा होती. जोतीरावांच्या या राष्ट्रमीमांसेचे व्यापक विकसन पुढे डॉ. आंबेडकरी राष्ट्रवादात झाले. ब्रिटीश साम्राज्यवाद, स्वातंत्र्याची चळवळ, जगभरातील फॅसिस्टांची आंदोलने, मानवमुक्तीचे लढे अशा सगळया जळत्या वास्तवाच्या पार्श्वभूमीवर आंबेडकरांनी विवेकनिष्ठ समाजवादी राष्ट्रवादाची उभारणी केली.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या राष्ट्रवादाच्या मीमांसेत राष्ट्रवादाच्या अवरोधांचीही चिकित्सा केली आहे. देशभरातील विविध भाषांच्या स्मितासोबतच अवघे राष्ट्र एका भाषेतून बोलले आणि व्यक्त झाले पाहिजे असा त्यांच आगंह होता. भाषिक, वांशिक, धार्मिक अहंकारापासून राष्ट्र वाचविले पाहिजे असे ते म्हणत. आपल्या देशातील व्यक्तिपूजेचे अविवेकी कर्मकांड हा भारतीय राष्ट्रवादाच्या निकोप घडणीतील एक

प्रमुख अवरोध असल्याचे ते मानत. भारताच्या सांस्कृतिक इतिहासात पराक्रमाच्या व शौर्याच्या क्षणांपेक्षा तथाकथित महात्म्याच्या व्यक्तिपुजनांचे सोहळेच अधिक आढळतात. राजकारणासह जीवनाच्या सर्वच क्षेत्रात व्यक्तिपुजेची स्तोत्रे अधिक उंच स्वरात आळवली जात आहेत. डॉ. आंबेडकरांचा व्यक्तिपुजेपेक्षा व्यक्तिचिकित्सेवर अधिक भर होता. राष्ट्रापेक्षा कुणीही महात्मा वा व्यक्ती मोठी नाही असे ते म्हणत. रानडे, गांधी, आणि जीना यांच्या व्यक्तिपुजेच्या उत्कर्षपर्वात डॉ. आंबेडकरांनी त्यांची तर्ककठोर व्यक्तिचिकित्सा केली हे विशेष. राष्ट्रनिर्माणाच्या उदात्त कार्यातील एक प्रमुख अडसर ठरणाऱ्या व्यक्तिपुजेपासून भारतीयांना सावध करतांना त्यांनी लिहले होते, ''व्यक्तिपुजा करतांना आपल्याला अधिक सावध राहिले पाहिजे. कारण आज आपल्या देशात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, ज्याप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी जागोजागी 'खिसेकापूपासून सावधान' असे फलक लावलेले जातात तसेच आता 'महापुरूषापासून सावधान' असे फलक लावण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.[3] व्यक्तिपुजनाचे सोहळे अनेक पटींनी वाढलेल्या आजच्या काळात डॉ. आंबेडकरांचा 'महापुरूषापासून सावधान' (Beware of Great men) हा इशारा अधिकच अन्वर्थक व निर्वाणीचा ठरलेला दिसतो.

डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा विवेकशील, मानवतावादी, इहवादी स्वभावाचा होता. त्यांनी अध्यात्माऐवजी सामाजिक नीतीला, धर्मनिष्ठेपेक्षा विवेकनिष्ठेला, वंश, जन्म, भाषा, अस्मिता या खुज्या घटकांऐवजी उदात्त मानवनिष्ठेला महत्व देणारा इहवादी राष्ट्रवाद मांडला. विषमतेला, फॅसिस्ट प्रवृत्तींना, वंशश्रेष्ठत्वाला, भाषिक अंहकारांना समूळ नकार देत समाजातील सकळांच्या कल्याणाला गती देणारा उदात्त राष्ट्रवाद मांडला. समकालीन काळातील वैचारिक, सांस्कृतिक अराजकांच्या काळात त्यांचे राष्ट्रवादी चिंतन सर्वांसाठीच विलक्षण निर्णायक व प्ररणादायी ठरले आहे.

संदर्भ :-

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे खंड 3 पृ. 308-9
2. म. जोतीराव फुले : समग्र वाङमय, पृ. 494
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रानडे, गांधी आणि जीना, पृ. 47-48.

# भारतापुढील शैक्षणिक आव्हाने

**प्रा. डॉ. सरोज आगलावे,** सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख, महिला महाविद्यालय, नागपूर.

पूर्वी भारतीय समाजात शिक्षणाचा अधिकार काही विशिष्ट वर्गाने आपल्यापूरताच मर्यादित ठेवला होता. बहुसंख्य समाजाला हेतूपूरस्पर शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते. 19 व्या शतकात ब्रिटिशांच्या काळात ब्रिटिशांनी नविन शैक्षणिक धोरण सुरू केले. त्या काळातील शिक्षणाचे विदारक सत्य जोतिराव फुले यांनी हंटर कमिशनला कळविले. शुद्र अतिशुद्र आणि स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी फुले दांपत्यांनी आजन्म अविरत प्रयत्न केले. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने शिक्षणाची संधी सर्वांना उपलब्ध करून दिली. भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानूसार चौदा वर्ष वयाच्या आतील सर्व मुलांमुलींना शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याचे अभिवचन दिले. भारत सरकारने एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या 6 टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करण्याचे आणि त्या रकमेच्या अर्धा टक्के रक्कम प्राथमिक शिक्षणावर खर्च करण्याचे जाहीर केले. परंतू प्रत्यक्षात मात्र तसे झाले नाही. 1951–52 साली शिक्षणावर केवळ 0.7 टक्के खर्च झाला तो 1999–2000 मध्ये वाढून 3.90 टक्के झाला. साक्षरता दराचे प्रमाण जरी वाढले तरी त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील दोष कमी झाले नाहीत. भारत सरकारने 1985 मध्ये प्रसिध्द केलेल्या "Challenges of Education" या दस्तऐवजात शिक्षण क्षेत्रातील वास्तव परखडपणे मांडले होते. शिक्षणक्षेत्रात सुधारणा सूचविण्यासाठी वेळोवेळी विविध आयोग नेमलेत. पण या सर्व आयोगांचे अहवाल धूळ खात पडले. त्यातील कोठारी आयोग महत्वाचा होता. या आयोगाने शैक्षणिक गुणवत्ता व राज्यहिताला महत्व दिले होते. पण त्यांच्या सूचना दुर्लक्षिल्या गेल्यात.

1991 मध्ये भारतात जागतिकीरणाला सुरवात झाली. 1995 मध्ये WTO च्या स्थापनेनंतर गॅट्स कराराच्या अंतर्गत डंकेल प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर भारतीय शिक्षणव्यवस्था ही जागतिक उदारीकरणाच्या धोरणामूळे जागतिक बाजारासाठी खुली करण्यात आली. मुक्त आर्थिक धोरणानूसार शिक्षण क्रयवस्तू ठरले. शिक्षणावरील खर्च अनुत्पादक समजल्या गेला. शिक्षणावरील खर्चात कपात करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर भारताने स्विकारलेल्या कल्याणकारी योजनेला व भारतीय संविधानातील कलम 29 (1) च्या शिक्षणाचा हक्क (Right to Education) या मुलभूत अधिकाराला मूठमाती देणारी शैक्षणिक धोरणे स्विकारली व आजही राबविली जात आहेत. संविधानातील 14, 15, 16 व 17 या कलमांना बाजूला सारून, शिक्षणाचे खाजगीकरण करून शैक्षणिक भेदभावाला सुरवात झाली. त्याचा परिणाम बहूजन समाजावर झाला. शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे बहूजन समाजाचे उच्च शिक्षणातील प्रमाण कमी होत आहे. दुसरीकडे जागतिक स्तरावरील एलपीजी चा परिणाम भारतीय शिक्षणव्यवस्थेवर झाला. भारताने 1991 मध्ये मुक्त आर्थिक धोरण स्विकारले. या धोरणाचा परिणाम असा झाला की, भारतीय संविधानातील कल्याणकारी राज्याची, ज्ञानदानाची संकल्पना मागे पडली व ज्ञानाच्या व्यापाराची संकल्पना पुढे आली. जागतिक स्तरावरील शैक्षणिक स्पर्धेत भारताचा टिकाव लागावा, यादृष्टीने भारताने शैक्षणिक धोरण बदलले. आजपर्यंतची भारतातील शिक्षणपध्दती पाहिली तर असे लक्षात येते की भारताने शिक्षणसंस्थाच्या संख्यात्मक वाढीवर भर दिला. पण गुणात्मक वाढीकडे मात्र दुर्लक्ष केले. आजच्या शिक्षणप्रणाली बद्दल महाराष्ट्राचे माजी विधानपरिषद सभापती प्रा. ना.स. फरांदे म्हणाले होते, ''निश्चित दिशा नसल्याने शिक्षणाची दशा झालेली असून राजकारणात शिक्षण कमी आणि शिक्षणात राजकारण जास्त अशी आजची स्थिती झालेली आहे.''

शिक्षणाची सद्यस्थिती जाणून घेणे, बदलत्या शैक्षणिक धोरणांचा समाजावरील परिणाम जाणून घेणे, वंचित समूहा समोरील शैक्षणिक आव्हानांचा परामर्श घेणे, शैक्षणिक गुणवत्तेचा विचार करणे आणि जागतिक स्तरांवरील बदलत्या शैक्षणिक परिणामांचा भारतीय शिक्षणव्यवस्थेच्या परिप्रेक्षामध्ये विचार या शोधनिबंधातून करण्यात आला आहे. सद्याच्या परिस्थितीत शिक्षणक्षेत्रासमोरील आव्हाने पुढीलप्रमाणे आहेत.

**शिक्षणातील मरगळ** : – ब्रिटिश काळापासून आजपर्यंत आम्ही लॉर्ड मेकॉले यांनी घालून दिलेली कारकून निर्माण करणारी शिक्षणप्रणाली राबवित आहोत. त्यात बदल करण्यात आले नाहीत. शिक्षणक्षेत्रात बरेच बदल अपेक्षित होते परंतू या बदलानुरूप नविन इंफ्रास्ट्रक्चर उभारण्यात आले नाही. तोच जूना अभ्यासक्रम, जून्या इमारती, जूने ग्रंथालय, प्रयोगशाळा, शिक्षकांची उदासिनता यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण होऊ शकत नाही. आवड निर्माण न होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे हे शिक्षण विद्यार्थ्यांना रोजगाराची हमी देण्यात अपयशी ठरले आहे. शैक्षणिक सोयी सवलतींच्या अभावामुळे एकूणच शिक्षणव्यवस्थेत ठराविक साचलेपणा आला आहे. या शिक्षणव्यवस्थेने विद्यार्थ्यांना केवळ परीक्षार्थी केले आहे, ज्ञानार्थी बनविले नाही. त्यामुळे शिक्षणव्यवस्थेला एक प्रकारची मरगळ आली आहे. ही मरगळ काढून शिक्षणक्षेत्राला गतिमान करण्याची गरज आहे.

**शिक्षणाचे खाजगीकरण आणि गुणवत्तेचा प्रश्नः** – 1991 नंतर भारताने स्विकारलेल्या खाजगीकरणाच्या धोरणाचा परिणाम शिक्षणक्षेत्रावरही झाला. WTO, IMF आणि WB ने अनेक अटी भारतावर लादल्यात. या अटीनूसार शिक्षणावरील खर्चात कपात करण्यात आली. हळूहळू शासनाने शिक्षणक्षेत्रातून आपला सहभाग काढून घेतला. शिक्षण ही क्रयवस्तू ठरली. शिक्षणशुल्क आकारण्याचा अधिकार शिक्षणसंस्थांना दिला. संस्थाचालकांनी भरमसाठ प्रवेश शुल्क आकारले. त्याचा परिणाम गरीब पण हुशार विद्यार्थ्यांवर झाला. खर्चिक उच्च शिक्षण गरिबांना परवडणारे नाही. पैशाअभावी गरीब विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे. उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाबद्दल

'University News' मध्ये प्रसिध्द झालेल्या 'Privatization of Higher Education' या लेखात शेख सलिम म्हणतात, ''उच्च शिक्षण हे श्रीमंतासाठी राहील आणि गरीब उच्च शिक्षणापासून वंचित होतील'' शेख सलिमने काढलेला हा निष्कर्ष पूर्णतः खरा ठरला आहे. ''शिक्षण हे मानवी विकासाचे महत्वाचे सक्षम साधन आहे.'' असे न्युरेरे यांचे मत आहे. पण हे सक्षम साधन गरीब होतकरू हुशार विद्यार्थी प्राप्त करू शकत नाही. दुसरीकडे श्रीमंतांची मुले जास्त पैसा देऊन उच्च शिक्षण घेतील. बुध्दिहिन उच्चशिक्षितांचा एक नवा वर्ग तयार होईल. पैसे मोजून पदव्या घेणाऱ्यांची गुणवत्ता काय असेल? शिक्षणासाठी केलेला अवाढव्य खर्च आणि नोकरी मिळविण्यासाठी दिलेली लाखो रूपयांची देणगी वसूल करण्यासाठी बुध्दिहिन उच्चशिक्षित नोकरपेशा वर्ग समाजाची फसवेगिरी करून, भ्रष्टाचार करून शिक्षण व नोकरी मिळविण्यासाठी केलेला खर्च वसूल करेल. त्याकरिता उच्च शिक्षणाच्या व्यापारीकरणाला आळा बसणे आवश्यक आहे.

**विदेशी शिक्षण बिलाचा (Foreign Education Provider Bill) भारतीय शिक्षणावर परिणामः –** या बिलानुसार पाश्चिमात्य देशातील अनेक विद्यापीठे भारतात येणार, या विद्यापीठांना हव्या असलेल्या सुविधा शासन पुरविणार. या पाश्चात्य विद्यापीठातून दिल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमात भारतीय समाजव्यवस्थेतील समस्या जाणून घेण्याची व त्या समस्या सोडविण्यासंबंधीची तरतूद असेल का? त्या विद्यापीठातून कोणत्या प्रकारचे विचार, तत्वज्ञान भारतीय विद्यार्थ्यांना दिले जातील? विद्यार्थ्यांना रोजगार मिळेल का? दर्जेदार उच्च शिक्षण मिळेल का? विदेशी विद्यापीठे जर भारतात आली तर विद्यार्थ्यांचा कल या विद्यापीठाकडे अधिक असेल. त्याचा परिणाम भारतीय विद्यापीठांवर होईल का? या विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता तपासण्याचा अधिकार 'NAAC' या स्वायत्त संस्थेला राहील काय? या सर्व प्रश्नांची उत्तरे जर नकारात्मक असतील तर मग या बिलावर पूर्नविचार होणे गरजेचे आहे.

**पुरवठा आणि मागणी धोरणाकडे दुर्लक्षः –** बदलत्या बाजारीकरणाच्या युगात प्रत्येक गोष्ट मार्केट लक्षात घेवूनच करावी लागते. मार्केटच्या अनुकूल अभ्यासक्रम आखला जावा. परंतु उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम पुरवठा आणि मागणी (Supply and Demand) यांच्याशी मेळ खात नाही. भारतीय बाजारपेठ आणि जागतिक बाजारपेठेचा विचार अभ्यासक्रमात दिसत नाही. प्रकल्पाधारीत शिक्षणाकडे दुर्लक्ष झाल्याने तसेच मार्केटला जे कौशल्य हवं आहे त्यानुसार शिक्षित, प्रशिक्षित मनुष्यबळ तयार नसल्याने लाखो विद्यार्थी उच्चशिक्षण घेऊन बेकार आहेत. पुरवठा आणि मागणी लक्षात घेऊन कौशल्य आधारीत (Skill based) शिक्षणाचा समावेश अभ्यासक्रमात करावा लागेल.

**डिजीटल साक्षरता मिशन** (Digital Literacy Mission) **राबविणे आवश्यक :–** 21 व्या शतकात जगाची विभागणी साक्षरतेच्या आधारावर 'Have's and Haves not' अशा दोन गटात झाली आहे. (तंत्रज्ञान अवगत असलेले देश आणि तंत्रज्ञान अवगत नसलेले देश) तंत्रज्ञान अवगत असलेले देश जगावर राज्य करीत असल्याचे दिसते. Social Transformation च्या युगात जनसंवाद, संगणक, नेटवर्क आणि ज्ञान (Communication, Computer, Network and Knowledge) अत्यावश्यक आहे. या चारही बाबींसाठी भारताला बरीच पावले उचलणे आवश्यक आहे. आज भारतात संगणक साक्षरता दर केवळ 6.15 टक्के आहे. नेटवर्कचे चे जाळे भारतभर पसरलेले नाही. जनसंवादाच्या (Communication) साधनांचा वापर वाढवावा लागेल. तांत्रिक प्रगती करणे ही काळाची गरज आहे, हे ओळखून डिजिटल लिटरसी मिशन राबविणे आवश्यक आहे.

**मुलभूत संशोधनावर भर नाही :–** उच्च तंत्रज्ञानयुक्त ग्रंथालये (High Tech Libraries) आणि प्रयोगशाळा (Laboratories) यांच्या अभावामुळे भारत मूलभूत संशोधनात मागे आहे. भारतात मौलिक चिंतन होत नाही. भारतात संशोधन केवळ डिग्री प्राप्त करण्यासाठी केले जाते. त्या संशोधनाचा दर्जाही निम्न असतो. शैक्षणिक गुणवत्ता संशोधनाच्या माध्यमातून वाढविता येईल हा आशावाद ठेवून युजीसी प्रकल्पाकरीता अनुदान देत असते. परंतु संशोधनाला दर्जा नसतो. मूलभूत संशोधन करणारे नोबेल पारितोषिक विजेते ठरतात. भारतात असे मूलभूत संशोधन होत नसल्याने नोबेल पारितोषिक विजेत्यांची संख्या फारच कमी आहे. जागतिक आव्हानांवर उत्तरे शोधण्याची क्षमता भारतीय संशोधनामध्ये नाही हे सत्य आम्ही स्विकारले पाहिजे. भारतात 44 पेक्षा जास्त राष्ट्रीय प्रयोगशाळा आहेत. परंतु अप्लाईड फिल्ड (Applied Field) मध्ये काहीच करण्याची संधी नसते. या समजूतीने विद्यार्थी मुलभूत संशोधनात रूची दाखवत नाही. म्हणून मूलभूत संशोधनात मौलिक चिंतन भारतात होतांना दिसत नाही.

**प्रतिभा पलायन (Brain-Drain) ची समस्या : –** भारतीय शिक्षणव्यवस्थेतील एक अडथळा म्हणजे प्रतिभा पलायनची (Brain-Drain) समस्या होय. बिल क्लिंटनने 'Brain-Drain' वर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला राष्ट्रासाठी राष्ट्रीय सेवा देणे बंधनकारक केले. त्यामुळे Brain-Drain रोखल्या गेले. परंतु भारतात प्रतिभा पलायन रोखण्याचा कायदा नाही. नेहरूंनी काही प्रमाणात प्रयत्न केला होता. परंतु अमेरिकेने भारतावर दबाव आणला. भारतातील 'Best Brain' स्वस्त किंमतीत मिळावे म्हणून अमेरिकेने भारतात IIT'S स्थापन करण्यावर भर दिला. IIT या अभ्यासक्रम अमेरिकेला लक्षात घेऊनच केला गेला असे मत युजीसीचे माजी अध्यक्ष प्रो. यशपाल यांनी व्यक्त केले होते. भारतातील व्यवसाय डॉक्टर इंजिनियर, वकिलापूरतेच मर्यादित असल्याने तसेच भारतात जागतिक संधी (Global Opportunities) नसल्याने बुध्दिमान (talented) युवा वर्ग परदेशात जात आहे. त्यांच्या बुध्दिमतेच्या आधारे आपण भारताला बौध्दिक आणि आर्थिक महासत्ता बनवू शकलो नाही. ते काम फ्रान्समध्ये बेअर्डने केले. ''सरकारच्या दबावामूळे मी दुरदर्शन निर्माण करू शकलो.'' असे मत त्यांनी व्यक्त केले. कारण फ्रान्स सरकारने शास्त्राज्ञांवर दबाव

आणला होता, की फ्रान्सला विचारांची नाही यंत्राची गरज आहे. असा दबाव भारतीय विद्यार्थी आणि संशोधकावर नाही. त्यामुळे ते उच्च शैक्षणिक संधी प्राप्त करण्यासाठी विदेशात पलायन करतात.

**सार्वजनिक खाजगी सहभागाबाबत उदासिनता : –** सार्वजनिक–खाजगी सहभाग (Public-Private-Participation) ही संकल्पना 1994 मध्ये चीनने राबविली. चीनमध्ये मीन बॅन ही संकल्पना उदयास आली. त्यामुळे उच्च शिक्षण संस्थांमध्ये स्थानिक लोकांचा सहभाग वाढला. भांडवलदार आपला बाजाराभिमूख अभ्यासक्रम 1300 संस्थांना देतात आणि त्या संस्था कमी किंमतीत प्रोग्राम कोर्स तयार करून देतात व त्यानुसार विद्यार्थी तयार केले जातात. बाजाराभिमूख अभ्यासक्रम केल्याने विद्यार्थ्यांना सहज रोजगार उपलब्ध होतो. बेकारीचा प्रश्न मिटतो. भारतात मात्र चित्र उलट आहे. येथे खाजगी क्षेत्राचे उद्दिष्ट निव्वळ नफा कमविणे हे आहे. शिक्षण क्षेत्राच्या चाव्या सरकार समारंभपूर्वक खाजगी क्षेत्राच्या हातात देत आहेत. या खाजगी क्षेत्राला उच्च शिक्षणाशी काही देणे घेणे नाही. 2002 मध्ये वाजपेयी सरकारच्या काळात बिर्ला–अंबानी यांची एक समिती नेमली होती. या समितीने शैक्षणिक मॉडेल सादर केले होते. परंतू त्यावर बरेच आक्षेप घेण्यात आले होते.

**अभ्यासक्रमात नैतिक मूल्यांचा अभाव :–** स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाहीचा स्विकार केला. स्वातंत्र्य, समता, बंधूता न्याय ही मानवतावादी मूल्ये संविधानात अंतर्भूत आहेत. खरी लोकशाही राबवायची असेल तर अभ्यासक्रमात नैतिक मूल्ये असावित. संविधानाच्या उद्येशिकेतील धर्मनिरपेक्षता व्यक्तिला इतर धर्माचा आदर करण्याची शिकवण देतो. नैतिक मूल्ये आणि धार्मिक मूल्ये ही वेगवेगळी आहेत. त्याची सरमिसळ होता कामा नये. परंतू भारतात मात्र अभ्यासक्रमात नैतिक मूल्यांच्या नावावर धार्मिक मूल्ये रूजविण्याचा प्रयत्न केला जात आहे. विशिष्ट एका धर्माचे तत्वज्ञान अभ्यासक्रमातून नैतिक मूल्यांच्या नावावर दिल्यास, नविन युवा पिढीमध्ये सहिष्णूतेची भावना निर्माण होण्यास बाधा निर्माण होते. एकाच धर्माची तत्त्वे राष्ट्रीय सद्‌भावनेस बाधक ठरतात. देशात अस्थिरता आणि फुटिरता निर्माण होऊ शकते. शिक्षणक्षेत्रात धर्माचा शिरकाव झाल्यास त्याचा परिणाम मागास जातीच्या विद्यार्थ्यांना भोगावा लागतो. याची काही उदाहरणे अलिकडच्या काळात स्पष्टपणे आढळून आलीत. त्यामुळे जागतिक पातळीवर देशाची प्रतिमा देखील मलीन झाली. म्हणून धर्म आणि शिक्षण हे दोन्ही क्षेत्र वेगवेगळी असावित. अभ्यासक्रमात नैतिक मूल्ये निश्चित असावित. परंतु ती धर्मनिरपेक्ष असावी.

**आर्थिक महासत्ता की बौध्दिक महासत्ता :–** संविधानाच्या कलम 21 (14) नुसार शिक्षणाचा हक्क (Right to Education) हा मूलभूत अधिकार म्हणून मान्य केला आहे. मार्गदर्शक तत्त्वाच्या 15 (अ) तसेच कलम 45 नुसार 14 वर्षाच्या मुला–मुलींना शिक्षण सक्तीचे आणि मोफत देण्याचे वचन संविधानाने दिले आहे. प्राचीन काळी जगामध्ये भारताची ओळख बौध्दिक महासत्तेच्या बळावर होती. कारण भारतात जागतिक दर्जाची विद्यापीठे होती. देश–विदेशातील हजारो विद्यार्थी भारतात शिकायला येत असत. स्वातंत्र्योत्तर काळात आणि स्वातंत्र्यानंतर भारताने जरी शिक्षणावर भर दिला असला तरी ज्या शिक्षणनितीमुळे अल्पावधित जपानने जगात शिक्षण क्षेत्रात नाव लौकिक मिळविला. त्या प्रकारचे यश भारताला मिळविता आले नाही. विद्यापीठ रॅकींग अहवालानुसार दर्जेदार विद्यापीठात भारताच्या एखाद्या विद्यापीठाचा कधीच समावेश झालेला आढळून आला नाही. भारताचा साक्षरता दर 74.5 टक्के आहे. संगणक साक्षरता दर 6.15 टक्के इतका आहे. 30 मिलियन दशलक्ष शिक्षित असूनही ते बेकार आहेत. भारतात आर्थिक विकासावर भर दिला जातो. पण शैक्षणिक विकासाकडे दुर्लक्ष केले जात आहे. कारण शिक्षण हे अनुत्पादक समजल्या जाते. आणि जागतिक पातळीवर सर्वात मोठी बाजारपेठ समजल्या जाणाऱ्या भारताकडे युवा मनुष्यबळ सर्वाधिक आहे. या मनुष्यबळाला जर शिक्षित–प्रशिक्षित केले, तरच देशाचा विकास होईल. त्याकरिता शासनाने देशाच्या आर्थिक विकासावरच भर न देता बौध्दिक विकासावरही भर द्यावा. त्यासाठी शिक्षण व्यवस्थेत संविधानाच्या अनुषंगाने बदल अनिवार्य आहे.

आज भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रापुढे बरीच आव्हाने आहेत. 'भारत 2020 मध्ये आर्थिक महासत्ता बनेल.' असे भाकित करणाऱ्या डॉ. अब्दूल कलाम यांच्या स्वप्नातील भारत जर प्रत्यक्षात आणायचा असेल तर शिक्षण क्षेत्रातील आव्हाने विचारपूर्वक दूर करावे लागतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या म्हणण्यानुसार, 'शिक्षणाचा उद्देश आदर्श लोकशाही समाज निर्माण करणे हा असावा. सामाजिक सक्षमता निर्माण करणारा असावा. समान सामाजिक संधी उपलब्ध करून देणारा असावा. हीच शिक्षणप्रणाली भारताला सक्षम व स्वावलंबी बनऊ शकेल आणि भारत महासत्ता बनू शकेल.


संदर्भ :

1. Behara Mayur, 'Digital India'.
2. Chahal Mukesh, 'Higher Education in India: Emerging issues,Challenges and Suggestions'.
3. Chakrabarty K.C., 'Indian Education System : Issues and Challenges'.
4. Ipsitu M.S..& Others, 'A Brief View to Digital Devide in Indian Scenario'
5. Kumra Pooja, 'Problem of Brain Drain in Developing Countries Like India and Its Socio Economic Impact'.
6. Link-India today –in today.in/education/story/education Policy-2016/1/848652html
7. Link-https://Maharashtratime:Indiatimes Com/Editorial/Articleshow/9487946
8. महाजन पियुष –'भारत की प्रतिभा पलायन समस्या'
9. Niaz Sahil & others, 'Project on Privatisation of Education'.
10. Saini Anupama, 'Basic Vs. Applied Research'.
11. Shaikh Salim, 'Privatisation of Higher Education.
'.

# वृद्धाश्रमातील वृद्धांच्या सामाजिक समस्या आणि त्यांच्या पुर्नसामाजीकरणात येणा–या अडचणी

**डॉ. प्रमिला भुजाडे**, सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, शासकीय ज्ञान–विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

**प्रस्तावना** : महाराष्ट्रातील औरंगाबाद शहरात मातोश्री वृद्धाश्रम आहे. मातोश्री वृद्धाश्रम अत्यंत उत्कृष्ट असून विना अनुदानित आहे. औरंगाबाद येथील श्री. जुगलकिशोर तापडिया आणि सुविद्य सौ. पद्माताई तापडिया हा वृद्धाश्रम चालवितात, 'मातोश्री' वृद्धाश्रम 1996 ला स्थापन केला. तो 1998 ला कार्यान्वित झाला. सर्व सोयीनी सज्ज या वृद्धाश्रमात 50 आजोबा आणि 62 आजी असे 112 लाभार्थी जीवन जगत आहे. एकूण शासकीय अनुदानावर 92 वृद्धाश्रम स्थापन करण्यात आले. पण आता केवळ दोन वृद्धाश्रम शिल्लक आहे. एक पूणे, दूसरे औरंगाबाद येथे. ज्येष्ठ नागरिकांची संख्या भारतात 11.50 कोटी, महाराष्ट्रात 1.15 कोटी असून दरवर्षी त्यात 3 लाखाने भर पडत आहे. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांना कौन्सलिंग करण्यासाठी 'ज्येष्ठ नागरिक संघ' स्थापन करण्यात आले आह. आज समाजात दोन प्रकारचे वृद्ध दिसतात 1) पेन्शन धारक 2) पेन्शन नसलेले.

वृद्ध म्हणजे काय? तर जी व्यक्ति शरीराने, मनाने थकलेली असेल, खचलेली असेल, जी व्यक्ति पूर्णतः परावलंबी, असहाय्य व निराधार असते.

औरंगाबाद पैठण रोड, नक्षत्रवाडी रोडवरील हे वृद्धाश्रम प्रदूषणरहीत वातावरणात, मनोहर अशा निसर्गाच्या सान्निध्यात, निसर्गाचे सौंदर्य जरी नैसर्गिकरित्या लाभलेले असले तरी व्यवस्थापनानेही ते वृद्धाश्रम जोपासले आहे. मुबलक पाणी, समोर व मागील बाजूस दोन मोठे हिरवीगार लॉन्स, वृद्धांना बसण्यासाठी बाकांची व्यवस्था, नारळी, नारळासारखीच शोभेची झाडे, गुलमोहर, आंबा, चिंच, जांभुळ, चिकू, निलगीरी उंचच उंच झाडं, हिरवा उंबर, चाफा, पांढरा चाफा, गुलाब, जास्वंद, शेवंती, मोगरा अशा फुलांनी बहरलेली फूल झाडे आहेत. त्यामुळे हा वृद्धाश्रम रमणीय बनला आहे. रेस्टहाऊस टाईप निवासाच्या खोल्या, व्हीआयपी खोल्या, प्रशस्त किचन, टेबल, खुर्च्या यांनी मुक्त असे दोन भव्य डायनिंग हॉल, (एक पुरुषांकरीता–एक स्त्रियांकरीता) प्रशस्त सभागृह, दुमजली कार्यालयाची इमारत, त्यात वाचनालय, व्यवस्थापकाचे कार्यालय, कर्मचारी निवासस्थान, दवाखाना, स्वतंत्रखोल्या, मनोरंजन व ज्ञानवृद्धिसाठी वृत्तपत्रे, पुस्तके ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, सभागृहात, टी. व्ही. भरपूर फर्निचर, रुंद सरळ रस्ते, निवास व्यवस्थेत कॉटस, मच्छर दान्या, कपाट, खुर्च्या, पंखे, ट्युबज, संडास, बाथरूम, नळ यांची सोय. बागकामासाठी स्वतंत्र कर्मचारी, झाडझुड व स्वच्छतेसाठी कर्मचारी, स्वयंपाक करणे व वाढणे यासाठी कर्मचारी, लाभार्थी व कर्मचारी यांची व्यवस्था पाहण्याकरीता विद्याविभूषित व्यवस्थापक अशी व्यवस्था आहे. छत्रपती शाहू महाराज स्पेशलिटी हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, कांचनवाडी या संस्थेतील डॉक्टर व त्यांचा परिचारिका संच, आठवड्यातून एक दिवस गुरुवारी वृद्धांच्या आरोग्य तपासणीसाठी येऊन मोफत औषधी पुरवठा करतात. तसेच काही खाजगी डॉक्टर्स भेटी देऊन मोफत रोग निदान करून औषधी पुरवितात. सेवाभावी संस्थामार्फत दंत, डोळे तपासणी, मधूमेह, बी.पी. तपासणी कॅम्प घेऊन ऑपरेशन करतात. आजारी माणसावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र ब्रदरची व्यवस्था सकाळी सात वाजता चहा–दूध, नऊ वाजता नाश्ता, 12 वाजता भोजन, 5 वाजता, दुस–या वेळचे चहा–दूध, रात्री 7 वाजता भोजन अशी व्यवस्था आहे. ते सर्व ठरलेल्या वेळीच होत असते. व्यवस्थापकाचा सकाळी व कार्यालय सोडण्यापूर्वी सर्व खोल्यांमध्ये राऊंड, परिसरात राऊंड घेतात.

महाराष्ट्र शासन व जीवनबाई तापडिया चॅरिटेबल ट्रस्ट संचालित मातोश्री वृद्धाश्रम आहे. महाराष्ट्र शासनाने समाजातील अपत्यहीन निराधार निराश्रीत वृद्ध व्यक्ति करीता "मातोश्री वृद्धाश्रम" ही नवीन योजना कार्यान्वित केली आहे. या करीता 'मातोश्री' वृद्धाश्रम ही योजना औरंगाबाद जिल्ह्याकरीता "जीवनबाई तापडिया चॅरिटेबल ट्रस्ट" या स्वयंसेवी संस्थेच्या मार्फत वृद्धांना त्यांचा वृद्धपकाळ सुखी समाधान व चांगल्या प्रकारे व्यतीत करीता यावा यासाठी त्यांना सर्व सोयी, सवलती, सेवा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. हे वृद्धाश्रम निवासी वृद्धाश्रम म्हणून चालविले जाणार आहे. या करीता येथे डॉरमेटरी 8 व एक इमारत ज्यात 12 खोल्या असून प्रत्येक खोलीत संलग्न प्रसाधनगृहाची सोय आहे. याशिवाय स्वतंत्र इमारत ज्यामध्ये स्वंपाकगृह, भोजनकक्ष, कोठी घर वगैरेची सोय आहे. तसेच एक दोन मजली इमारतीमध्ये कार्यालय, मनोरंजन कक्ष, वैद्यकीय सेवा, वाचनालय, बाग बगिचा तसेच संबंधीत कर्मचा–यासाठी निवास स्थान वगैरे सोय केली आहे.

येथे प्रत्येक राहणा–या वृद्धास झोपण्यासाठी पलंग, सतरंजी, गादी, उश्या, बेडशीट, चादर, कपाट, ब्लॅकेट, शिवाय ताट–वाटी, कप–बशी, तांब्या, बादल्या वगैरेची सोय पुरविण्यात येणार आहे.

ज्या निराधार, निराश्रीत वृद्ध पुरुषाचे 60 वर्ष किंवा महिलांचे वय 55 वर्ष पूर्ण आहे. अशांना प्रवेश दिला जातो. ज्या प्रवेशाकरीता वार्षिक उत्पन्न रु.12,000 पेक्षा जास्त असेल अशा प्रवेशिता कडून रु. 2000 दरमहा, दरडोई शूल्क आकारले जातात.

**मातोश्री संस्थेचे काही नियम** : 1. ही संस्था जाती, धर्म पक्ष निरपेक्ष अशी आहे. 2. या आश्रमात दाखल होणा–या वृद्धांनी परस्परांशी समानतेच्या भावनेने, प्रेमाने व सहकार्याने राहिले पाहिजे. 3. या आश्रमात धार्मिक अथवा जातीय अगर प्रादेशिक उच्च–नीच भावनांना स्थान दिले जात नाही. 4. आश्रमात कोणतेही दुर्व्यसन दारू, ताडी, चरस अगर इतर मादक पदार्थाचे सेवन आचरता येत नाही. 5. आश्रमाच्या सर्व नियमांचे पालन आवश्यक आहे. 6. आश्रमाच्या व्यवस्थापकाच्या आज्ञा पालन आवश्यक आहे. 7. व्यवस्थापकाच्या परवानगीशिवाय आश्रमातून बाहेर जाता येणार नाही. 8. रजेवर जाणे असल्याच (4 रजा) पेन्शन, घरी जाणे, आरोग्य तपासणी, इतर महत्त्वपूर्ण व्यवस्थापकांचे परवानगी घेऊन स्वखर्चाने जावे व यावे लागते. 9. आश्रमात राहताना शरीर

प्रकृतीप्रमाणे व्यवस्थापक सांगतील ते काम करावी लागतील. 10. आश्रमातील कालक्रमाना आश्रमाच्या नियमाप्रमाणे करावे लागते. 11. नियमाप्रमाणे न वागल्यास आश्रमातून केंव्हाही घालवून दिले जाईल. 12. आश्रमात शाकाहारी भोजन मिळेल. मांसाहारी भोजन आश्रमात मिळणार नाही व कोणालाही स्वतः करु दिले जाणार नाही. 13. स्वतःची भांडी धुवून साफ ठेवणे तसेच स्वतःचे कपडे धूणे स्नान करणे अगर इतर स्वतःच्या जरूरीचे कामे स्वतःच करावी लागतील. (अपवाद आजारी पणात दुस–याची योग्य व शक्य ती मदत दिली जाईल.) 14. संस्थेमध्ये दाखल झाल्यानंतर कोणते ही संस्थेकडून अगर कोणत्या व्यक्तीकडून मदत मागणार नाही व मदत घेणार नाही.

**वृद्धांचे कुटुंबातील समायोजन करण्याचे उपायः** 1. भौतिक सुखाबाबतची आसक्ती कमी करावी. भौतिक वस्तू ह्या उपायोगासाठी आहेत, उपभोगासाठी नाही. अशी धारणा झाली म्हणजे आपोआपच आसक्ती कमी होण्यास सुरुवात होते. 2. निवृत्ती आणि मृत्यु या दरम्यानचे आयुष्याचे दिवस बोनस समजून ती ईश्वरी देणे आहे. असे समजून हसत जगण्याचा प्रयत्न करावा. विचार सकारात्मक असावेत म्हणजे नैराश्य येत नाही. 3. शरीर निवृत्तीबरोबरच मनानेही निवृत्ती स्वीकारली पाहिजे. अपेक्षा भंगाचे दुःखही पचविणे कठीण असते. त्यासाठी अपेक्षांना आळा घालणे आवश्यक आहे. अपेक्षाच नसतील तर त्याचा भंग ही होणार नाही आणि अपेक्षाभंगाच दुःखही सहन करावं लागणार नाही. 4. जीवन दुःखी होण्यामागे अपेक्षा बाळगणे, भौतिक सुखाबाबत आसक्ती असणं ही जशी कारणे आहेत. तसेच अहंकार हे ही कारण आहे. त्याचा त्याग करणे आवश्यक आहे. कारण अहंकार हा मानवाचा शत्रू आहे. 5. कर्मयोगा प्रमाणे फळाची अपेक्षा न ठेवता कर्म करत राहणे. 6. जीवनाच्या सुरुवातीपासून संतोष आणि समाधान मिळविण्याचा प्रयत्न केल्यास वृद्धापकाळ सुखी व आनंदी होईल. 7. सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन, तन, मन, धन, यापैकी शक्य असणा–या मार्गानेच ती पार पाडण्याचा प्रयत्न करावा. 8. जीवनातील आनंद ओळखून जीवन जगावे. 9. शरीर व मन तंदुरुस्त राहण्यासाठी स्वावलंबनाचा अवलंब करावा. स्वतःची काम वेळेवर करणे म्हणजे शरीर आणि मन यांना शिस्त लागेल. 10. वर्तमानकाळात जीवन जगण्याचा प्रयत्न करणे. 11. निवृत्तीनंतरचे व वृद्धापकाळाचे जीवन सुखी व आनंदी बनवायचे असेल तर सुरुवातीपासूनच आर्थिक नियोजन करावे लागेल. 12. मौनामुळे सर्व साध्य होते. मौनात राहायला शिकणे, ऐका जास्त, बोला कमी. 13. चिंता आणि चिता यात अनुस्वराचा फरक आहे चिंतेमुळे चिता जवळ येण्याची शक्यता आहे, म्हणून ज्या कारणाने आपण चिंता करतो ते दूर करण्यासारखे असल्यास करणे. 14. हास्य हे आरोग्याचे टॉनिक आहे. 15. गरजा कमी करुन स्वतः हसणे इतरांना हसविणे. 16. आहार कमी व सात्विक घ्या. 17. साखर, मीठ, मैदा या वस्तूंचा त्याग, शक्य असेल तर आहारात त्याचा कमीत कमी वापर करावा. 18. चहा, कॉफी वर्ज्य करुन वृद्धापकाळातील शारिरीक हानी पासून स्वतःला दूर ठेवणे. 19. दोन पिढीतील अंतर लक्षात घेऊन मुलांशी वागल्यास संघर्ष टाळता येतो. 20. वृद्धांनी मुलांवर जसे संस्कार करणार तसे ते त्यांच्या नातवंडावर करतील. 21. वृद्धपकाळात घरातील व्यक्तींना व इतरांना मागितल्याशिवाय सल्ला देऊ नका. 22. आपल्या स्वभावातील दोषांचा विचार करुन स्वभावातील दोषांमुळे घरचे व आजूबाजूचे दुःखावले गेले आहे, त्यांचा विचार करुन आपल्या स्वभावाला मुरड झाला. 23. आपल्या दुःखाचा विचार न करता इतरांची दुखः पहा, ती ही अनुभवून स्वतःचे दुःख कमी करा. 24. शरीराची व मनाची काळजी घेऊन, अभिरुची जोपासणे. 25. वृद्धांनी आपल्या जीवन काळात मृत्यूपत्र तयार करावे म्हणजे आपल्या मागे कुटुंबात मालमत्तेवरुन कलह होणार नाही. 26. स्वतः शक्य तेवढे कार्यमग्न ठेवणे वृत्ती सकारात्मक ठेवणे. 27. कधीही स्वतःला एकटे न समजता, सर्वासोबत मिळून मिसळून राहणे. 28. राग माणसाचा शत्रू आहे, रागावणे कमी करणे. 29. बाटलीतील मादक पेय व रासायनिक शीतपेय टाळणे. 30. तेलकट, तुपकट पदार्थ टाळणे. 31. व्यायाम, योगासने नित्य करणे. 32. चांगल्या सवयी स्वतःला लावणे. 33. वृद्धाश्रमात गेलेल्या व्यक्तिने स्वतःचे चित्त वाचन, मनन, चिंतन याद्वारे अध्यात्माकडे वळविले तर तो त्या ठिकाणी स्वस्थ चित्ताने राहु शकतो. 34. कौटुंबिक संबंधात जिव्हाळ्यात ताण निर्माण होणार नाही याची दक्षता पाल्य आणि पालक या दोघांनीही घेतली पाहिजे.

**वृद्धांचे वृद्धाश्रमातील समायोजन :** वृद्धांनी वृद्धाश्रमात एकदा प्रवेश घेतला की, त्यांचा निवास, भोजन, औषध पाणी, कपडे, मनोरंजन कार्यक्रम याची जबाबदारी तर येतेच पण त्याचबरोबर पुढील जबाबदा–या पार पाडाव्या लागतात.

1. वृद्धाश्रमात बरेचसे मनाविरुद्ध आलेले असतात ते पळून जाण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी 24 तास नजर ठेवण्याची व्यवस्था असावी. 2. जीवनाच्या शेवटच्या टप्यातील जीवन जगणारे कोणत्या ना कोणत्या आजाराने पछाडलेले, घरुन वैतागून आलेले किंवा मनाविरुद्ध पाठविल्यामुळे वैतागलेले असे वृद्ध असल्यामुळे शांत वृत्तीने काम करणारे व्यवस्थापक व कर्मचा–यांची नियुक्ति असावी. 3. वृद्धांना वृद्धाश्रमात आणून सोडले की अनेक लोक, नातेवाईक, कुटुंबकीय त्यांना भेटण्याचे टाळतात. अशा वेळी शरीरानेनव्हे तर मनानेही ते खचतात. निराशेपोटी ते स्वतः ला मृत्यूच्या जवळ आणतात. अशा वेळी केवळ जुजबी औषधोपचार करण्याऐवजी त्यांचे आयुष्य कसे वाढेल या करीताचे प्रयत्न घेणे गरजेचे आहे. 4. वृद्धाश्रम चालविण्यासाठी एनजीओ, सेवाभावी संस्था, दानवीर लोक यांचे सहकार्य असणे उपयुक्तच असते. 5. संचालक, व्यवस्थापक कर्मचारी, लाभार्थी या चार घटकांमध्ये सहकार्य व समन्वय असणे आवश्यक असते. 6. 90 टक्के वृद्धांचे निधन वृद्धाश्रमात होत असते. मृत्युनंतरचे विधी वृद्धाश्रमातच करावे लागतात. त्यामुळे ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, पोलिस कार्यालय, दवाखान्यातील अधिकारी, एखादा वकील यांचेशी चांगला संपर्क असणे आवश्यक असते. कुठलाही वाद न होता. 'मृत्यूपत्र' मिळणे आवश्यक असते. 7. प्रवेश देताना आवश्यक ती कागदपत्र द्यावी लागतात. हा एक प्रकारचा वृद्धाश्रमाचे संचालक आणि लाभार्थी यांच्यातील करारच असतो.

आणि त्यानुसार दोघांवर काही जबाबदा–या येतात, त्या पार पाडाव्या लागतात नसता करारभंग होण्याची शक्यता असते. 8. वृद्धाश्रम चालवित असतांना देणगीदाराकडून मिळणा–या देणग्या, लाभार्थीकडून मिळणारे शुल्क, करावा लागणारा खर्च यासारखे पैशासंबंधीचे व्यवहार घडत असतात. त्यामुळे रेकॉर्ड ठेवणे आवश्यक असते. त्यासाठी व्यवस्थापक आणि कर्मचारी जाणकार असून स्वच्छ पत्रव्यवहार, स्वयंसेवाभावी संस्थेशी सौहाद्रयतेचे संबंध, असणे आवश्यक असते.

**निष्कर्ष** : संयुक्त कुटुंब पद्धती हळूवारपणे लोप पावत आहे. 'हे विश्वची माझे घर' हे विचार नजरेआड जात आहेत. जीवन स्वकेंद्रीत बनत चाललं आहे. सुखी जीवनाची संकल्पना बदलत चालली आहे. संस्काराची गरज असताना ते मूलांवर करण्यासाठी आई–वडिलांना वेळ नाही. अनावश्यक गरजा वाढल्या आहेत. जीवनात ताण–तणाव वाढले आहेत. याचा परिणाम मानसिक रोग जडण्यात होत आहे. असे मानसिक रोग जडलेल्या व्यक्ति कुटुंबात नको म्हणून त्यांना वृद्धाश्रमात पाठविले जाते. आज वृद्धाश्रमांची संख्या वाढत आहे, त्यांच्या सुरक्षेच्या समस्या वाढणारच. त्यासाठी शासन, जिल्हा परिषदा, सेवाभावी संस्था, महानगरपालिका, विकास मंडळ, सहकारी संस्था, अशासकीय संस्था, कंपन्या या सारख्या संस्थांनी पुढे येऊन वृद्धाश्रमाकरीता सेवाभावी वृत्तीने कार्य करणे आवश्यक आहे. तसेच संस्थेचे संचालक, व्यवस्थापक, कर्मचारी, लाभार्थी यांच्या सहकार्य आणि समन्वयातून वृद्धाश्रमाची कार्यक्षमता वाढविता येते. तसेच शिक्षण प्रणालीही बदलावी लागेल. आजच्या शिक्षण प्रणालीत संस्कारक्षम शिक्षणाची गरज आहे. अतिव्यवहारिकतेमुळे घरातील रक्ताचं नात असलेले वृद्ध त्यांना ओझे वाटू लागतात. घरी संस्कार करु शकणारे आजी–आजोबा सदनिका संस्कृतीमुळे नाही. आई–वडिलांना मुलांना संस्कार घडविण्यासाठी वेळ नाही, आजी–आजोबाच्या प्रेमाला वंचित पिढी 'स्वकेंद्रीत' झाली. माणूस म्हणून जगतांना माणूसकीपासून दूर चाललेल्या माणसांमुळे माणूसकीविरहीततेतून 'वृद्धाश्रम' निर्माण झाली. वृद्धांसाठी शासनाच्या फौजदारी प्रक्रिया संहिता 125 अंतर्गत मुलांकडे (नौकरी करणा–या) पोटगी मागणे, कौटुंबिक हिंसचार प्रतिबंधक कायदा 2005 अंतर्गत आर्थिक मदत घेणे, अन्नपूर्णा योजना, मोफत कायदेविषयक सुविधा, सूट, रिबेट, सवलती, भत्ते, मेडीक्लेम, आरोग्यविमा, राजीव गांधी जीवनदायी योजना, श्रावणबाळ योजना अशा ज्या योजना आहेत, परंतु 90 टक्के पुरुष 90 टक्के महिलांना या योजनांचा लाभ मिळत नाही. 'निर्वाह खर्च' पाल्याकडून वृद्धांना असून भावनिक आणि आर्थिक परिस्थितीमुळे वृद्धांना वृद्धाश्रमाचा आधार घ्यावा लागतो. 1990 साली 9.2 टक्के, 2013 साल 11.7 टक्के तर 2050 साल 21.1 टक्के वृद्धांचे प्रमाण असणार असा 'वर्ल्ड पाप्युलेशन एजिंग खण्ड 2013' चा अहवाल आहे.

समुपदेशन केंद्राच्या माध्यमाने कुटुंब आणि वृद्धांच्या मधील समायोजन वाढविले गेले तर वृद्धाश्रमात येणा–यांची संख्या कमी होऊ शकते. तसेच व्यवस्थापन आणि वृद्ध यांच्यातील समायोजन वाढविल्यास वृद्धाश्रमात कौटुंबिक वातावरण निर्माण होऊन वृद्ध शेवटचा श्वास आरामात घेऊ शकतात. तसेच वृद्धांशी संबंधीत येणा–या घटकांशी त्यांनी स्वतःच समायोजन केले तर वृद्धाश्रमात जाण्याची वेळच येणार नाही. समायोजनाचा मार्गच नसेल तर "वृद्धाश्रम" अंतिम पर्याय आहे.

**संदर्भ** :

शैक्षणिक भेटीच्या आधारावर, प्रत्यक्ष तथ्य संकलनावर आधारीत संशोधनपर लेख.

# जीवन कौशल्य आणि ज्ञानरचनावादाचा परस्पर संबंध

**कु. दिशा माणिकराव गेडाम**, संशोधक विद्यार्थीनी, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**प्रस्तावना :–** मानवी जीवनाचा प्रवास हा निरंतर चालू आहे. बुध्दीमत्तेच्या बळावर मनुष्य दिवसेंदिवस प्रगती करत आहे. कुठे तो रानावनात कंदमुळे, कच्चे मांस खाणारा, नग्न फिरणारा आदिमानव अन कुठे आजचा मंगळग्रहावर जाणारा प्रगत मानव ! ही सारी प्रगती मानवाने आपल्या बुध्दीच्या बळावर केली. ज्यावेळी इतर प्राण्यांनी आपली हुशारी, शक्ती, धूर्तपणा, लबाडी, आहार, निद्रा, भय आणि मैथून या चाकोरीत खर्च केली, त्यावेळी मानवाने स्वतःभोवती सांस्कृतिक, सामाजिक पर्यावरण निर्माण करुन स्वतःला सर्वात बुध्दीमान व शक्तीशाली बनविले. पूर्वीच्याकाळी पशुप्रमाणे जीवन व्यतित करणारा, रानोमाळ फिरणारा आदिमानव आणि आज अंतराळात वास्तव्य करण्याच्या गोष्टी करणारा सर्वशक्तिमान मानव हयाच्यात अक्षरशः जमीन अस्मानाचे अंतर पडले आहे. त्याला कारण म्हणजे शिक्षण होय. शिक्षणातून संस्कृति, संरक्षण, संवर्धन आणि संस्कृति संक्रमण होते. व्यक्ती व समाज यांना मार्गदर्शन करणारी शिक्षण एक शक्ती आहे. मानवाचे जीवन विकसित करणारी व समाज जीवन नियंत्रित करणारी शिक्षण ही एक प्रणाली आहे. शिक्षणाचे मानवी जीवनात खूप महत्व आहे.ष्व्यक्तीमध्ये सुयोग्य दिशेने होणाऱ्या वर्तन–परिवर्तनास शिक्षण असे म्हणतात.'

**जीवन कौशल्यः–** शिक्षण म्हणजे जीवनष असे शिक्षणाच्या बाबतीत म्हटले जाते. जीवन जगण्यासाठी लागणारी विविध कौशल्ये शिक्षणातून प्राप्त व्हावीत ही शिक्षणाकडूनच खरी अपेक्षा. परंतु आजच्या शिक्षणाचा विचार केला तर परिस्थिती वेगळीच दिसते. जीवनातील अपयश, नैराश्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाढत जाणारुया आत्महत्या, व्यसनाधिनता, त्यांच्यामध्ये वाढत जाणारी हिंसक प्रवृत्ती इ. समस्यांचे उगमस्थान काल–परवा पर्यंतच्या दोषपूर्ण शिक्षणपध्दतीत असल्याचे दिसून येते. मुळात शिक्षण कोणासाठी, कशासाठी? याचे सरळ साधे उत्तर आजच्या लहान मुलाला भविष्यात उभे राहता यावे यासाठी, 15 ते 20 वर्षात त्याला भविष्यात उभे करण्यासाठी कोणकोणती जीवन कौशल्ये हवीत? त्यांच्या गरजा कशा असतील? माणूस म्हणून त्यात कोणत्या मूल्यविचारांची रुजवणूक झाली पाहिजे, कोणत्या प्रकारची पिढी आणि समाज आपल्याला तयार करावयाचा आहे, त्याच्याकडून आपण कोणत्या अपेक्षा करतो हा विचार डोळयासमोर ठेवून शिक्षणाची रचना होण्याची गरज आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, 'दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या विविध समस्या व गरजांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी व्यक्तीने स्वतःच्या वर्तनात स्वीकारात्मक तसेच सकारात्मक बदल घडवून आणण्याची क्षमता म्हणजे जीवन कौशल्य होय.'

देशातील विविध राज्यांमध्ये विविध प्रकारच्या सरकारी, खाजगी शाळांमध्ये वेगवेगळे अभ्यासक्रम राबविले जातात. हे राबविले जात असताना समाज आणि राष्ट्राच्या काही अपेक्षांची पूर्तता व्हावी, जीवन जगण्यासाठी लागणारी विविध कौशल्ये शिक्षणातून प्राप्त व्हावी असे अपेक्षित आहे. तेव्हा या अपेक्षा लक्षात घेवून काळानुसार भारतीय शिक्षण पध्दतीत कराव्या लागणाऱ्या संभाव्य बदलांवरभर देण्यात आला. त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 मध्ये महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक वर्ष 2009 पासून प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात दहा जीवन कौशल्यांचा समावेश करण्यात आला. ते पुढील प्रमाणे आहेत– 1. स्व ची जाणीव 2.सहानुभूती 3. समस्या निराकरण 4. निर्णयक्षमता5.परिणामकारक संप्रेषण 6. व्यक्ती व्यक्तींमधील सहसंबंध 7. सर्जनशील विचार 8. चिकित्सक विचार 9. भावनांचे समायोजन 10. ताणतणावांचे समायोजन.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाने युक्त अशा आधुनिक युगात व्यक्तीला प्रभावीपणे जीवन जगण्यासाठीचे कौशल्ये देण्याचे काम या जीवन कौशल्यातून करण्यात आले आहे. जीवन यशस्वी करण्यासाठी जीवन कौशल्यांची गरज असते. जीवनातील महत्वाच्या घटना ओळखणे, इतरांच्या भावना जाणणे, समस्यात्मक परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी आखणी करणे यासाठी जीवन कौशल्ये उपयोगी पडतात. ज्ञान, वर्तन, दृष्टिकोन आणि मूल्ये यांच्या एकीकरणाद्वारे ध्येयाची प्राप्ती कशी करावी याचे आकलन व्यक्तीला ज्या कौशल्याद्वारे होते ती कौशल्ये म्हणजेच जीवन कौशल्ये होय. या जीवन कौशल्यांच्या आधारे व्यक्ती शांततापूर्ण भावी जीवन जगू शकते. ही केवळ पुस्तकातून शिकायची नसतात तर अनुभवाद्वारे आत्मसात करावयाची असतात. मानव हा हेतूपूर्ण ज्ञानप्राप्ती करणारा प्राणी आहे. त्यामुळे विद्यार्थी हा केवळ ज्ञानाचा स्वीकारकर्ता न होता ज्ञान निर्मिती करणारा व त्या ज्ञानाचा वापर करता येणारा होणे गरजेचे आहे. याच बरोबर एकविसाव्या शतकाची आव्हाने लक्षात घेता जीवन कौशल्यांचा विचार करावाच लागतो. अशावेळेस विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांचा सामाजिक आणि भावनिक विकास होणे गरजेचे आहे.

**ज्ञानरचनावादः–** प्राचिन काळापासून तर आजपर्यंत आपण शिक्षण व्यवस्थेचा अध्ययन केल्यास असे दिसून येते की, त्यात अनेक बदल व परिणाम घडून आलेले आहेत. मानवी अध्ययन प्रक्रियेत सुधारणा व्हावी म्हणून विविध संशोधने झालेली आहेत. यामुळे अध्ययनासंदर्भात विविध दृष्टीकोन निर्माण झाले आहेत. यापैकी एक दृष्टीकोन म्हणजे 'अध्ययनाच्या फलितापेक्षा अध्ययनाच्या प्रक्रियेवर भर देणारा व अध्ययन ही बौध्दिक व सामाजिक प्रक्रिया आहे असे मानणारा ज्ञानरचनावाद.'

'पूर्वज्ञानाच्या आधारे किंवा पूर्वानुभवाआधारे जेव्हा व्यक्ती नवीन संकल्पनांची रचना करतो तेव्हा त्यातून अध्ययन घडते, यास ज्ञानरचनावाद असे म्हणतात.' ज्ञानरचनावाद हा शब्द शिक्षणप्रक्रियेत अनेक वेळा वापरला जातो. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 हा याचा पाया आहे. शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 मधील कलम 29

मध्ये याज्ञानरचनावादाची तत्वे आढळतात. त्यामुळे त्याची ओळख करून घेणे व वर्गअध्यापनात त्याचा उपयोग करणे प्रत्येक शिक्षकांचे आदय कर्त्यव्य आहे. ज्ञानरचनावादी शिक्षण प्रक्रियेसंदर्भात प्रामुख्याने पियाजे, जॉन डयूयी, ब्रुनर, वायगोटस्की आणि यांच्या विचारांशी साम्य असलेल्या आणखी काही शास्त्रज्ञानी आपले विचार मांडलेले आहेत.2005 च्या आराखडयात ज्ञानरचनावादाचा पुरस्कार करण्यात आला आहे. त्या नुसार मार्गदर्शक तत्वे पुढीलप्रमाणे –

1. ज्ञानाची रचना होणे म्हणजेच अध्ययन होय. 2. विद्यार्थी हा ज्ञानाची रचना करणारा घटक होय. 3. जे अनुभव मिळतात त्यांचा अर्थ लावणे म्हणजे अध्ययन होय. 4. पुर्वानुभावाचा आधार घेवून विद्यार्थी ज्ञानाची रचना करतो. 5. वातावरणात घडणाऱ्या ज्या आंतरक्रिया आहेत त्यांचे निरिक्षण करून विद्यार्थी ज्ञानाची रचना करतो. 6. स्थानिक परिस्थितीचा व माहितीचा ज्ञानरचनेत मोठा सहभाग आहे.

ज्ञानरचनावादाच्या कार्यपध्दतींमध्ये प्रयोगिकता, पृच्छा, प्रकल्प पध्दती, विश्लेषण, चित्रण, शब्दजाल, मुक्तप्रश्न, चर्चा, समस्या निराकरण, सहकार्यातून अध्ययन, वर्गीकरण यांचा समावेश होतो. ज्ञानरचनावादात शिक्षक विशिष्ट अशी अध्यापन पध्दती निवडण्यामागील कारणांची चर्चा करू शकतो, तसेच त्यामागील तात्विक भूमिका काय ? या मागील स्वतःची विश्लेषणात्मक भूमिका मांडून चर्चा करू शकतो. यावर ज्ञानरचनावाद्यांचा विश्वास आहे. यामुळे विद्यार्थी स्वतःच्या अध्ययनाची जबाबदारी स्वीकारतो. न कळत तो अध्ययन प्रक्रियेत गुंतला जातो. दिलेले कार्य उत्तम प्रकारे पार पाडतो. ज्ञानरचनावादामुळे शिक्षक केंद्रित शिक्षण पध्दती दूर जावून विद्यार्थी केंद्रित किंवा बाल केंद्रित शिक्षण पध्दती पुढे येण्यास सहाय्य झाले आहे. ज्ञानरचनावादात शिक्षक फक्त मार्गदर्शक दिशादर्शक सुविधाप्राप्त करून देणारा या भूमिका पार पाडणारा असतो. ज्ञानरचनावादात शिक्षकाने विद्यार्थ्यांना प्रबलण देणे आवश्यक आहे. विद्यार्थी चुकला असला तरी त्याला नकारार्थी न उल्लेखता सकारात्मक भूमिकेतून त्याला समजावून देणे होय. साधारणपणे परीक्षा ही स्पर्धा, तणाव, चिंता नैराश्य इत्यादीशी जोडली गेली पण ज्ञानरचनावादात परीक्षा ही बालकाची ओळख करून देणारी असते. यामध्ये समस्या निराकरण व उपाययोजनेसाठी ज्ञानाचे उपयोजन करण्याची विद्यार्थ्यांतील क्षमता तपासली जाते.

**जीवन कौशल्य शिक्षण आणि ज्ञानरचनावादाचा परस्पर संबंध : –** राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 मध्ये महाराष्ट' राज्यात शैक्षणिक वर्ष 2009 पासून प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात 10 जीवन कौशल्यांचा समावेश करण्यात आला. या जीवन कौशल्यांचा वज्ञानरचनावादाचा परस्पर संबंध पुढील प्रमाणे सांगता येईल –

**1. स्व जाणीव व ज्ञानरचनावादः–** स्वतःबद्दलचे रचनाबध्द संवेदन जे आपल्या बोधाअवस्थेला अवगत होते यालाच श्स्वश जाणीव असे म्हणतात. स्वतःच्या कौशल्य, अभिरूची, भावभावना, आंतरिक प्रेरणा स्वतःतील सर्व गोष्टीची जाणीव ठेवणे, स्वतःच्या गुणदोषासह स्वतःस ओळखण्याची क्षमता ज्याच्यात असते ती व्यक्तीं एक यशस्वी जीवन जगतो. विद्यार्थी आजूबाजूच्या घटना, दृश्ये, भाषा इत्यादींमधून आपल्या पूर्व अनुभवांशी ताळमेळ जुळणाऱ्या नवीन गोष्टीचे आकलन करुन मिळणारुया नवीन ज्ञानाची रचना करत असतो.अशा प्रकारे स्व जाणिवेतून प्राप्त केलेले ज्ञान हे दिर्घ काळ लक्षात राहत असते. हे लक्षात घेवूनच विद्यार्थ्यांने स्वतःला पूर्णपणे ओळखावे, स्वतःची बलस्थाने, मर्यादा, इच्छा, सवयी, आवडी–निवडी, भावना, अभिवृत्ती यातना, स्वभाव वैशीष्ट्ये विविध छंद इत्यादी विषयी स्पष्ट जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी, यां घटकांच्या आधारे स्वतःची ओळख करून देण्याचा प्रयत्न करावा याकरिता ज्ञानरचनावादाची मदत होत असते.

**2. सहानुभूती व ज्ञानरचनावादः–** कल्पनेने दुसऱ्याच्या अंतःकरणात शिरून त्याच्या भावना जाणून घेण्याची कुवत म्हणजे सहानुभूती होय. सहानुभूती आपणास इतरांना समजण्यास व त्यांचा स्वीकार करण्यास मदत करीत असते जे आपणापासून वेगळे असतात. यामुळे आपल्या सामाजिक आतंरक्रियांचा विकास होतो. पारेपारिक एखादी व्यक्ती ही आपणाशी निगडीत असो अथवा नसो तिच्या ठिकाणी आपण आहोत असे समजून तिच्या सुख–दुःखात समरस होऊन तिला जाणून घेण्याचे कौशल्य निर्माण करण्याचे काम ज्ञानरचनावादी शिक्षणातून विद्यार्थ्यांना प्राप्त होत असते.

**3. समस्या निराकरण व ज्ञानरचनावादः–** शिक्षणाचा उद्देश हा विद्यार्थांना जीवन जगण्यासाठी तयार करणे हा आहे. सामान्य समस्या व्यक्ती सूचना, सराव हया सहज क्रियांव्दारे सोडवतो परंतु कठिण समस्या सोडविण्यासाठी समस्येच्या विविध महत्वपूर्ण घटकांना समजून घेणे आवश्यक असते.हे लक्षात घेवूनचआज शिक्षणात शिकविण्याच्या नव्हे तर शिकण्याच्या अंगाने विचार ज्ञानरचनावादी पध्दतीमध्ये होऊ लागला आहे. अधिक क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल अशी शक्ती शिक्षणाच्या आशयात व पध्दतीत निर्माण होत आहे.आपल्या सर्वोत्तम भाषाज्ञान, निरिक्षण, पुर्वानूभव, उपयोजन याव्दारे समस्या दूर करण्याचा प्रयत्न स्वतःच करतो. अशाप्रकारेज्ञानरचनावादामुळे विद्यार्थ्यांच्या समस्या निराकरण क्षमतेचा आणि कौशल्यांचा विकास घडून येतो.

**4. निर्णयक्षमता व ज्ञानरचनावादः–** दैनंदिन जीवनात व्यक्तींस वेळोवेळी निर्णय घ्यावे लागतात.निर्णय घेतांना तर्क करणे, कृतीची योजना निश्चित करणे, उपलब्ध असणाऱ्या पर्यायापैकी योग्य पर्याय कोणता ते ठरविणे आवश्यक असते यामधुन विद्यार्थ्यांत निर्णय क्षमता विकसित होण्यास मदत होते. योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याचे कौशल्य विकसीत करण्यासाठी ज्ञानरचनावादी अध्ययन पध्दती फार उपयुक्त ठरत असते.

**5. परिणामकारक संप्रेषण व ज्ञानरचनावादः–** आज आपण पाहतो की, ज्या शिक्षण संस्थाकडून फार मोठया बदलाची अपेक्षा आहे. त्या केवळ परिक्षा घेणे व पदव्या वाटप करणे या दोन कामापुरतीच उरलेली दिसत आहेत. पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांला दैनंदिन जीवनात कुटुंबामध्ये, मित्रांमध्ये व समाजामध्येचारचौघांसमोर स्वतःचे विचार प्रभावीपणे मांडता येत नाहीत, स्वतःच्या विचारांची शाब्दिक किंवा अशाब्दिक पध्दतीने अभिव्यक्ती करता येत नाही. नोकरीसाठीचा साधा अर्ज देखील त्याला स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिता

येत नाही स्वतःच्या क्षमतेवर विश्वास नसणारा, स्वतःची बलस्थाने, उणिवा माहीत नसणारा विद्यार्थी आजच्या शिक्षण पध्दतीतून घडवला जात आहे. हे लक्षात घेवूनच ज्ञानरचनावादी अध्यापन पध्दतीतविद्यार्थ्यांच्या अनुभव विश्वासी संबंधित आवडीच्या विषयावर गप्पा मारून मुलांना बोलते करतात. तसेच बोलण्याची भीती नाहीशी करतात. मुले. स्वयंप्रेरणने बोलू लागतात. उदा. गप्पा गोष्टी, स्वानुभव कथन, घटनाक्रम पूर्ण करणे, संवाद नाटयीकरण, स्वतःच्या भाषेत कथा करणे, विनोद सांगणे, मुलाखत घेणे. याद्वारे एकमेकाशी हितगुज करतात. आपले विचार भावना मोकळेपणाने मांडतात. भीती नाहीशी होऊन कुतुहल निर्माण होते, एकमेकांचे अनुभव, गोष्टी आवडीने ऐकतात. या सर्वांमुळे विद्यार्थ्यांत परिणामकारक संप्रेषण कौशल्ये निर्माण होते.

**6.व्यक्तीं–व्यक्तीं मधील संबंध व ज्ञानरचनावाद :–** ज्ञानरचनावाद अध्ययनाच्या फलितापेक्षा अध्ययनाच्या प्रक्रियेवर भर देणारा व अध्ययन ही बौध्दिक व सामाजिक प्रक्रिया आहे असे मानते. म्हणून यामध्ये सहकार्यात्मक अध्ययन पाठपूरावा करतो. सहकार्यात्मक अध्ययन म्हणजे गटातीलअसे संबंध होय की, जे काही करावे ते एकसाथ प्रत्येकाला सहकार्य, नेतृत्व निर्णय, संघर्ष निवारण इत्यादी. ज्ञानरचनावादातील याअध्ययन प्रक्रियेमुळे चागले अध्ययन होते, सामाजिक कौशल्याचा विकास होतो, सहकार्यत्मक वृत्ती वाढते आणि आपआपसातील संबंध चांगले होतात.

**7. सर्जनशील विचार व ज्ञानरचनावाद :–** सर्जनशिलता म्हणजे नवनिर्मिती की जी बुध्दिमत्तेच्या बरेच पलीकडे आहे सर्जनशीलता अनेक घटकांचे वैशीष्टये पूर्ण संकलन आहे. की त्यात कल्पना शोधवृत्ती आणि मौलिकता या गुणांकडे विशेष लक्ष दिले जाते.कला, साहित्य, विज्ञान, व्यापार, अध्यापन जीवनातील सर्व क्षेत्रांमध्ये नवनवीन कल्पना निर्माण होवून सामाजिक आणि सांस्कृतिक बदल घडून येतात. म. गांधी, अब्राहम लिंकन, शेक्सपिअर, जमशेटजी टाटा, रविंद्रनाथ टागोर या वेगवेगळया क्षेत्रांमध्ये सर्जनशील व्यक्ती म्हणून ओळखल्या जातात.सर्जनशीलतेच्या मुक्ताविष्कारातच ज्ञानरचनावादी मूल्ये आहेत. व्याखानेऐवजी हसत खेळत विचार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या कलाकृतीमंधून अप्रत्यक्षरित्या अध्ययन होते. याकरिता अभ्यासक्रमातील इतर विषयाचे शिक्षणच नव्हे तर, बहुदिश विचारातून येणारी सर्जनशीलता आणि तिची भयमुक्त अभिव्यक्ती ज्ञानरचनावादाचे वैशिष्टये आहे. विद्यार्थ्यांना कलांची किमान ओळख व्हावी, त्यांचे सुप्त कलागुण वाढवून कलेचा निखळ आनंद घेता यावा, भावनांच्या आविस्कारातून ताणमुक्त होता यावे, शिक्षणातून भाषिक कौशल्ये, निरिक्षण शक्ती, वक्तृत्व, शब्दसंग्रह याचा विकास व्हावा तसेच सुप्त गुण जागृत होऊन प्रतिभेच्या आविष्कारातून नवनिर्मिती व्हावी याकरिता ज्ञानरचनावादी शिक्षणाची मदत होत असते.

**8. चिकित्सक विचार व ज्ञानरचनावाद :–** ज्ञानरचनावादी अध्यापन पध्दतीत विद्यार्थ्यांना आपल्या परिचयातील वस्तू, सूत्र, संबोध, संकल्पना यांविषयी प्रश्न विचाराले जातात, माहितीचे वर्गीकरण करण्यास सांगूनआवश्यक माहिती हवी आहे का ? अनावश्यक माहिती कोणती ? या विषयी चर्चा केली जाते, विषयाशी संबंधीत उदाहरणे व्याख्या, विचार, चित्र विद्यार्थ्यांने स्वतः आकलनाप्रमाणे तयार करण्यास सांगितले जाते,विद्यार्थ्यांना चिकित्सक विचार करण्यासाठी मुक्त प्रश्न विद्यार्थ्यांना विचारले जाते. अशाप्रकारे ज्ञानरचनावादी शिक्षणातून विद्यार्थी मिळविलेल्या माहिती व अनुभवांचे स्वतःच्या क्षमतेनुसार वस्तुनिष्ठ स्वरूपात सुक्ष्मपणे विश्लेषण आणि परिक्षण करीत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चिकित्सक विचार प्रक्रियेचा विकास करण्यास चालना मिळते.

**9. भावनांचे समायोजन व ज्ञानरचनावादः–** व्यक्तिमध्ये ज्या विविध भावना असतात व प्रसंगानुसार ज्यांचे प्रगटीकरण होत असते त्यांचे योग्य समायोजन होणे आवश्यक असते. या भावनांचे प्रकटीकरण होतांना आपल्या समतोलाची जी माणसे असतात ज्यांच्यांशी आपले संबंध असतात, त्यावर कोणता परिणाम होणार याची काळजी घेणे आवश्यक असते. ज्ञानरचनावादी शिक्षणातून विद्यार्थ्यांस स्वतःच्या व दुसऱ्या व्यक्तींच्या भावना जाणून घेण्यास तयार करण्यात येत असते.

**10.ताणतणावांचे समायोजन व ज्ञानरचनावादः–** जीवनात अनेक गोष्टींमुळे जेव्हा संघर्ष निर्माण होतात व ताणतणाव येतो तेव्हा कराव्या लागणारुया तडजोडीलाच ताणतणावांचे समायोजन म्हणतात. ताणतणावांचा शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेवून त्यांचे समायोजन करता यावे यासाठी,संघर्ष सोडविण्यासाठी ज्ञानरचनाचवादी शिक्षणतून शिक्षण प्रक्रिया आनंददायी बनविण्यात येत असते. या प्रक्रियेचा त्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर चांगला परिणाम होवून विद्यार्थी ताणतणावांचे समायोजन करण्यास सक्षम होत असतात.

**सारांश :–** वरील सर्व माहितीवरून लक्षात येते की, मुलांना ज्ञानरचनावादी पध्दतीने अध्यापन करताना जीवन आणि शिक्षण यांचा घनिष्ठ संबंध आहे याचे भान असायला हवे शिक्षण जीवनानुसार व शिक्षणासाठी असायला हवे. जीवन चांगले घडविणे हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट असते. मानवी जीवन हे प्रवाही असते. शिक्षणाने जीवनाचा वेग पकडावा अशी शिक्षणाकडून अपेक्षा केली जाते. शिक्षणात शिकविण्याच्या नव्हे तर शिकण्याच्या अंगाने विचार रचनावादी पध्दतीमध्ये होऊ लागला आहे. ज्ञानरचनावादाने मुले स्वतः ज्ञानाची रचना करू शकतात. विद्यार्थी तर्क, सर्जनशील विचार, ज्ञानाचे उपयोजन, अर्थनिर्णयन व अनुमान इत्यादींच्या सहाय्याने स्वतः विचार करून शिकण्यास व जगाविषयी मत प्रकट करण्यास सक्षम होतात आणि विद्यार्थ्यांमध्ये विविध जीवन कौशल्यांचा विकास घडून येत असतो.


**संदर्भ ग्रंथ :–**

1. सोनवाने भारती (2013), जीवन कौशल्य विकास, Global Online Electronic International Interrdicipilinery Reserch journal
2. ज्ञानसंरचनावाद : संकल्पना, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियान प्रशिक्षण (2010–011), यशदा
3. रामराजे अ.अ. (2015), ज्ञानरचनावाद, Global Online Electronic International Interrdicipilinery Reserch journal
4. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम 2004 शिक्षक मार्गदर्शिका, भाषा व सामाजिकशास्त्रे, महा. रा. शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे 30
5. बालभारती, इयत्या 8 वी, म. राज्य पाठयपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे
6. ज्ञानरचनावाद प्रशिक्षण मार्गदर्शिका, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, फलठण, www.kundanmalake.in/p/blog-page- 89.html
7. Life Skills Education & CCE, Class IX, X, Central bord of Secondary education,www.cbse.nic.in/cce/life_skill_cce.pdf
8. Life skills education For children and adolescents In schools, Programme on mental health, world health organization, Geneva ,1997
9. Global Evaluation of Life Skills Education Programmes Final Report,United Nations Children's Fund Three United Nations Plaza New York, New York 10017, Aug-2012

# मद्यपान : आधुनिक काळातील नवे आव्हान

**डॉ. किशोर उत्तमराव राऊत,** समाजशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

**प्रस्तावना :–** भारतीय समाजाचा विचार करता एकीकडे भौतिक सुखसोई, साधन संपन्नता, प्रगतीकडे वाटचाल, मानवी विकसाकरीता होत असलेले प्रयत्न महत्वपूर्ण ठरतात. रस्ते, वाहतूक, संचार साधने, शाळा, कॉलेज, विद्यापीठे, जोडीला माहिती तंत्रज्ञान खुली स्पर्धा, वाढती बाजारपेठ, सोयीयुक्त नागरी वस्त्या आढळतात. नागरी जीवनच मुळात मोठमोठी घरे, कार्यालये, कंपन्या, कारखाने अत्याधुनिक साधने या सर्व बाबी पाहता आपण विकसित राष्ट्र होण्याकडे अग्रेसर आहोत. तर दुसरीकडे कित्येक समस्या विकास प्रक्रियेत अडथळा ठरत आहे. त्यामध्ये वाढती लोकसंख्या, गुन्हेगारी, बालगुन्हेगारी, मद्यपान, भिक्षावृत्ती, भ्रष्ट्राचार, आत्महत्या, महिलावरील वाढते अन्याय, अत्याचार अशा समस्या उग्र रूप धारण करीत आहे. आदिवासी व ग्रामीण जनता आजही आवश्यक व मुलभूत गरजापासून वंचिताचे जीवन जगतांना आढळतात. विकास प्रक्रियेपासून बराच दूर असलेला व राज्यकर्त्यापासून दुर्लक्षित असलेली कोटयावधी जनता आजही मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. या विविध समस्यामध्ये ''मद्यपान : आधुनिक काळातील नवे आव्हान'' या विषयावर वस्तुनिष्ठ मांडणी केली आहे.

**अध्ययनाची उद्दिष्टये :–** अध्ययनातील काही उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत. – 1. मद्यपान वाढण्याच्या परिस्थितीचे अध्ययन करणे. 2. मद्यपान वृध्दीच्या कारणांचे विश्लेषण करणे. 3. मद्यपान नष्ट करण्याच्या समस्येवर उपाय सुचविणे. या उद्देशाला अनुसरून मद्यपान या समस्येचे विश्लेषण केले ज्यामुळे या समस्येची गंभीरता लक्षात येते. आदिवासी, ग्रामीण व नागरी अशा सर्वच क्षेत्रात दारू वा मद्यपानाची समस्येचे तीव्र रूप धारणी केली असून युवापिढी याचा सर्वाधिक प्रमाणात बळी पडत असल्याचे चित्र आहे.

**मद्यपानाची पार्श्वभूमी :–** मद्य, मदिरा, सोमरस असे शब्दप्रयोग मानवी उत्पत्तीपासून आढळतात. जसे पूर्वी साधू संत, महात्मे, राजे महाराजे यांच्याकडे अशा प्रकारचे मद्य चालत असत. यामध्ये विविध कंद मुळे, फळ, पाने इत्यादीचा समावेश केला जात होता. परंतु असा प्रयोग सिमीत वा उच्चवर्णीयांपर्यंतच होता परंतु नंतरच्या काळात विशेषतः भारतीयांचा परकीयांशी संबंध आला. जसे हुन, शक, पोर्तुगीज, ब्रिटीश या देशानी केलेली आक्रमणे विशेषतः भारतात आल्यानंतर मद्याचे प्रयत्न अधिक वाढले. राज्यकर्त्यांपासून तर सामान्य व्यक्तीपर्यंत दारू वा मद्याचे प्रमाण वाढले. यातुनच पुढे सुधारणात्मक कार्य देखील झाले. जसे 1912 मध्ये गोखले यांच्या अध्यक्षतेखाली समितीने दारूबंदीची मागणी केली. पुढे कॉग्रेसचे नेतृत्व महात्मा गांधीकडे आल्यानंतर 1921 मध्ये कॉग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात ठराव पास झाला. पुढे 1937 नंतर दारूबंदीला गती प्राप्त झाली. वेगवेगळया ठिकाणी दारूबंदीचे प्रयत्न कमी अधिक प्रमाणात झाली. परंतु खऱ्या अर्थाने भारत स्वतंत्र झाल्यानंतर (15 ऑगस्ट 1947) आणि विशेषतः संविधान लागू झाल्यानंतर (26 जानेवारी 1950) दारूबंदीला विशेष कार्यक्रमाचा दर्जा देण्यात आला. कॉग्रेस सरकारने या दृष्टीने बरेच भरीव कार्य केल्याचे दिसून येते. पंचवार्षिक योजनेत दारूबंदीला स्थान देण्यात आले. पुढे न्या. टेकचंद यांच्या अध्यक्षतेखाली 1963 मध्ये समिती तयार करण्यात येवून 1978 मध्ये भारतभर दारूबंदी कार्यक्रम जाहीर केला. त्यानंतर राज्य व केंद्र सरकारने वेळोवेळी देशभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करून दारूबंदी वा मद्यपान बंदीवर निर्बंध लावले असून कडक कायद्याद्वारे प्रयत्न केले जात आहेत.

**मद्यपानाची वास्तविकता :–** दारू वा मद्यपान ही आधुनिक काळातील वाढती समस्या होय. ज्याचा प्रचार–प्रसार तरूण मुला मुलींमध्ये मोठया प्रमाणात आहेत आहे. यासंबंधी अनेकांनी वेळोवेळी अध्ययने केली. जसे ख्रिस्तोफर स्मीता (1989) डॉ. आर.एन. त्रिपाठी (2012) जी. बेरी व एल जुलिया (1987) अलिकडे राम आहुजा (1998) अनेक विचारवंत, अभ्यास करीत आहेत. ही समस्या अधिकाधिक वाढत असली तरी याकरीता कोणती कारणे कारणीभूत आहेत की ज्यामुळे मद्य वा दारूचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. दारू एकदा सुरू केली की तिला सोडणे कठीण जाते. यासंबंधी राम आहुजा लिहितात की, ''मद्यपान वह स्थिती है जिसमें एक व्यक्ती मदिरा लेने की मात्रा पर नियंत्रण खो बैठता है। जिसमे कि वह, पीना आरम्भ करने के पश्चात उन्हे बंद करने से सदैव असमर्थ रहती है।'' (आहुजा 1994:260) दारू वा मद्याच्या एकदा आहारी गेला की व्यक्ती पुन्हा त्यातून बाहेर येणे फारच कठीण काम आहे. खरं तर हा एक आजार असून मानसिक, शारीरिक परिणाम तर होतोच परंतु त्याच्या व्यक्तीगत जीवनावर गंभीर परिणाम होतात. हातपाय थरथरणे, चिडचिडेपणा, नेत्रदोष, यकृत, मेंदू, जठर, मज्जातंतू, वजन कमी होणे. शरीरावर सर्व बाबतीत परिणाम जाणवतो असे असले तरीही दारू वा मद्याची दुकाने गल्लोगल्ली आढळतात. त्यामध्ये तरूणांची गर्दी मोठया प्रमाणावर दिसून येते.

**आधुनिक जीवनशैली :–** मद्यपान समस्या वाढल्यामध्ये आधुानिक जीवनशैली मोठया प्रमाणावर प्रभावीत आहे. नागरी विकसित देशातील संस्कृतीच्या मोठया प्रमाणावर प्रचार–प्रसार झाला आहे. आज सर्वच जगातील कडक व महागडी दारू मिळते. त्याचा मनसोक्त आनंद घेणारी मंडळी आहेत. तरूण वा कॉलेज मंडळीमध्ये सिगारेट व दारू न पिणारे म्हणजे मागास समजले जाते. इतर त्याला नावे ठेवतात आणि कळत न कळत न पिणाराही पिणाऱ्याच्या गटात ओढला जातो. दुसरे असे की, आजुबाजूचे वातावरणाची पुरक पोषक आहे. टि.व्ही, चॅनेल्स, चित्रपट, नागरी भडक व भावूक जीवनप्रणाली, पोषाख पध्दती, फॅशन यातून वाढता चंगळवाद, मद्यपानाला पोषक ठरत आहे. ही नागरी वा भौतिक संस्कृती मद्यपान वृध्दीस कारणीभूत होत आहे. या बरोबर आदिवासी व ग्रामीण क्षेत्रातून स्थानांतरीत झालेले लोक नगरात आल्यावर स्वच्छंद जीवन जगतात. मिळालेली कामे, धंदे करून, वा

शिक्षण नोकरी निमित्ताने आलेली त्यांना असे वाटते की, नगरात कोणी पाहणारे नाही, ओळखीचे नाही, त्यामुळे हे लोक याकडे कळत नकळत ओढले जातात. तसेही नागरी क्षेत्राला चेहरा हरविलेली माणसे म्हटल्या जाते. ही स्वच्छंद व स्वैरपणाची भावनेमुळे ही दारूच्या आहारी गेल्याची उदाहरणे आहेत.

**मद्यपानची कारणे :–** दारू वा मद्यपान ही सर्वव्यापक समस्या झाली आहे. त्याची वेगवेगळी कारणे ही सांगितली जातात त्यामध्ये – 1) अज्ञान, 2) अंधश्रध्दा, 3) मैत्री वा संगत, 4) फॅशन, 5), 6) निराशा, 7) प्रेमभंग, 8) गरिबी, 9) बेरोजगारी, 10) कामधंद्यातील नुकसान, 11) सुखदुःखाचे प्रसंगी, 12) आजारपण, 13) कौटुंबिक कारणे इत्यादी आढळतात. दारू वा मद्यपान हे विविध कारणाचा परिणाम असले तरी त्याची तीव्रता आधुनिक काळात मोठया प्रमाणावर आढळते.

**मद्यपानाचे दुष्परिणामः–** मद्यपान ही अत्यंत घातक व जीवघेणी समस्या होय. ज्याचे बरेच दुष्परिणाम आहेत. जसे वैयक्तीक, कौटूंबिक, शारीरिक, मानसिक, आर्थिक, उत्पादन प्रक्रिया शरीर क्षमता, बौध्दीक क्षमता, सामाजिक संबंध इत्यादी. शेवटी जीवन एकांत व त्यातूनच आत्महत्या सारखे प्रकारही पाहायला मिळतात. या बरोबर वर्तमान जीवन प्रणालीच एवढी धावपळीची झाली आहे की, माणसे माणसापासून दूर जात असून प्रेम, आपुलकी, जिव्हाळा कमी कमी होत आहे. फक्त पैशालाच महत्व मानून त्यातून येणारा एकटेपणा, त्यातून मद्यपानाच्या विळख्यात अडकण्याची उदाहरणे बरीच आहे.

**मद्यपान व गुन्हेगारीचा परस्पर संबंध :–** आधुनिक काळातील जीवनशैली पाहता मद्यपान व गुन्हेगारी यांचा अगदीच जवळचा आंतरसंबंध आढळून येतो. विविध विद्याशाखामधून शिक्षण घेणारे हजारो तरूण तरूणी, नोकरी, कामधंदा मिळत नाही. त्याच्या हातांना काम नाही, आई वडीलांवर अवलंबून रहावे लागते. एका विशिष्ट वयापर्यंत ठिक आहे परंतु पुढे मात्र मुलाला वेगळेपणा जाणवतो असे असले तरी त्याचा वैयक्तीक खर्च वाढलेला असतो. अशावेळी आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी मग ते वेगवेगळे मार्ग अवलंबितात. जसे चोरी करणे, खिसे कापणे, चैन व मंगळसुत्र पळविणे, इत्यादी. दुसरे असे की, याच तरूण सुशिक्षित मंडळीचा राजकारणी गैरफायदा घेतात. आतंकवाद, नक्सलवाद, सांप्रदायिक दंगे, जाती–धार्मिक दंगे, मोर्चे, सभा, संमेलने यामधून या तरूणांना वापरतात. सुशिक्षित तरूण बेकारांची फौज कमी दराने सहज उपलब्ध होते. त्यामुळे राजकरणात गुन्हेगारीकरण वाढतांना आढळते आणि हेच पुढे वेगवेगळया यंत्रणेमार्फत दिसतात. ही वाढती गुन्हेगारी आदिवासी, ग्रामीण व नागरी अशा सर्वच समुदायात आढळते. ज्यामध्ये नागरी क्षेत्रात गुन्हेगारीचे प्रमाण सातत्याने वाढल्याचे वास्तविक चित्र आहे.

**मद्यपान नष्ट करणे हे नवे आव्हान :–** आधुनिक समाजव्यवस्थेचा विचार करता सर्व क्षेत्रात गुंतागुंत वाढविली असून यामध्ये पैशाचा मागे धावतांना व स्वयंकेंद्रीत होत असलेली दिसतात. नागरी संस्कृती व भडक व भावूक पोषाखात वावरतांना आढळते. यामध्ये तरूण मंडळी सातत्याने पुढे असतात. नागरी संस्कृतीचे आकर्षण वाढत असून वेगळेपणा, प्रतिष्ठा, जपण्याची चढाओढ आहे. नगराचा विचार करता गलोगल्ली दारूची दुकाने असून येथे येणाऱ्यांची प्रचंड गर्दी आहे. मग ते दुकाने कोणत्या दिशेला आहे, वास्तुशास्त्राप्रमाणे बांधली आहे की नाही याचा काहीही संबंध नाही. दारूचे दुकान कुठेही असले तरी माणसाची गर्दी राहणारच हे पक्के ठरलेले. दारू वा मद्याचा वापर सर्रास हॉटेल, बियरबार इ. ठिकाणी आढळतो. ''मद्यामध्ये असे पदार्थ असतात की, त्याचेच अधिराज्य शरीरावर राहते. मद्यामध्ये तांदुळ, गहू, बार्ली, मोट यासारखे धान्य, द्राक्षे, काजू, फणस कलिंगड, यासारखी फळ, मोहासारखी फुले, द्राक्षे, ताड, शिंदी, गोरभा या झाडापासून काढलेली ताडी, शिंदी, गोरगा, फ्रेन्च पॉलीस, स्पीरिट, छांग किंवा लढढा यासारखी रसायने व उसांच्या मळीपासून काढलेली देशी दारू किंवा गुळ, नवसागर यापासून काढलेली हातभटटी, रम, विस्की, ब्रान्डी यासारख्या विदेशी दारू किंवा बियर इत्यादी सर्वच मद्यात अभिप्रेत आहे. (कऱ्हाडे 2009 : 425) याबरोबर चरस, गांजा, अफू, कोकन, हेरॉईन, ब्राउनशुगर, मार्फीन, एल.एस.डी. यासारखे द्रव पदार्थ तरूणामध्ये लोकप्रिय आहेत. एवढेच नव्हे तर हुक्का सेंटरही शहरभर आढळतात. अर्थात या सर्व सवयी श्रीमंत व मोठया अधिकारी वा उच्चपदस्थ मंडळींच्या मुलांमध्ये आढळतात.

एकूनच मद्यपान हे आधुनिक काळातील मोठे आव्हान आहे. मद्यपान संपुर्ण संपविल्याशिवाय निकोप, समृध्द व सक्षम युवापिढी निर्माण करता येणार नाही.

**सारांश :–** 'मद्यपान' ही वर्तमान काळातील सर्वात मोठी समस्या आहे. जी आदिवासी, ग्रामीण व नागरी अशा सर्वच क्षेत्रात कमी अधिक प्रमाणात आढळून येते. या जीवघेण्या समस्येला वेळीच आवर घातल्याशिवाय या देशाच्या विकासाला अर्थ राहणार नाही. देशातील भावी पिढी बलवान, सशक्त व सामर्थ्यवान बनवायचे असेल तर त्याच्या मनगटात वा बाहूत सामर्थ्य हवे. शरीर सुदृढ व निरोगी असल्याशिवाय हे शक्य नाही. याकरीता राज्य व केंद्र सरकारने फक्त मिळणाऱ्या कराचा विचार न करता 'शरीराला हानीकारक' एवढे लिहल्यावरच न थांबता कठोर व कडक कायदे करून अंमलबजावणी करावी व जेणेकरून मद्यपान समस्येला आळा घालता येईल व एक चांगला निरोगी समाज व विकसित देश निर्माण करणे शक्य होईल.

**संदर्भ :–**


1. Chiristopher J. Smita (1989) : Alcholism and Alcohol control: Policy in American City, Oxford Univeristy Press.
2. Tripathi: R. N. (2012) Drug Abuse and Youth Crime, DPS Publishing House New Delhi.
3. Borry G. and Julia L.C. (1987) : Druges in Adolesen World, Macmillian Press Ltd. London.
4. आहुजा राम (2000) सामाजिक समस्याएँ, रावत पब्लिकेशन जयपूर, पृ. 260.
5. कऱ्हाडे बी.एम. (2009) भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे ॲन्ड पब्लिशर्स नागपूर, पृ. 425.

# ग्रामीण महिलांच्या विकासामध्ये स्वंय सहायता समुहांचे योगदान

**डॉ. नलिनी बोरकर,** समाजशास्त्र विभाग, कला, वाणिज्य पदवी महाविद्यालय, पे. पं., जवाहरनगर, भंडारा.

कोणत्याही देशाच्या विकासात पुरूषांच्या बरोबरीनेच स्त्रियांचे योगदानही अत्यंत महत्वपूर्ण आहे. स्त्रिया समाजाचा अभिन्न अंग आहेत त्यामुळे आर्थिक विकास आणि सशक्तीकरण या संकल्पना स्त्रियांशिवाय अर्धवट वाटतात. तरीही विकसीत, अविकसीत, विकसनशिल आणि आर्थिकदृष्टया गरीब देशांमध्ये स्त्रियांची स्थिती चिंताजनक आणि दयनीय आहे. पुरूष आणि स्त्रियांच्या मध्ये आर्थिक सामाजिक, राजकीय, शैक्षणिक सर्वच क्षेत्रात फार मोठी तफावत आढळते. पंडीत जवाहरलाल नेहरू म्हणतात, ''जर तुम्हाला विकास करावयाचा असेल तर स्त्रियांचे उत्थान करणे आवश्यक आहे. स्त्रियांचा विकास झाला तर समाजाचा विकास स्वतःच होईल'' स्त्रियांच्या या परिस्थितीवर अधिक प्रकाश टाकण्यासाठी एका अहवालात असे म्हटले आहे की, ''स्त्रिया संपूर्ण जगात केलेल्या कामात 60 टक्के पेक्षा जास्त योगदान करतात परंतु त्यांना जगाच्या एकुण मिळकतीच्या फक्त 10 टक्के प्राप्त होतो आणि स्त्रिया केवळ 1 टक्के संपत्तीच्या मालकीन असतात'' (अनिता मोदी – 2009)

या भेदभावाचा परिपाक पुढे शिक्षण, धर्म, मृत्युदर, पोषण व शारिरीक तंदुरूस्ती यांमध्ये होतांना दिसतो. शिक्षणाचे प्रमाण पुरूषांपेक्षा स्त्रियांमध्ये कमी आहे. मुलींच्या मृत्युदरात दिवसेंदिवस वाढ होत आहे. स्त्रियांनी पुरूषापेक्षा अधिक काम केले तरी त्यांच्या कामाचे मुल्य कमीच ठरवले जाते. या मापदंडाशिवाय भारतात स्त्रियांना घरेलु हिंसा, भेदभाव, प्रताडणा इत्यादींचा सामना करावा लागतो. भारताला खेडयांचा देश म्हणतात कारण भारतातील 70 टक्के लोकसंख्या खेडयात राहाते. खेडयामध्ये स्त्रियांची अवस्था अधिक वाईट आहे. लहानपणापासून मुलीला मुलांपेक्षा कमी दर्जा दिला जातो. तिच्या शिक्षणाकडे व भरणपोषणाकडे जाणूनबुजुन दुर्लक्ष केले जाते. शेती व्यवसायात स्त्रियांच्या मदतीचा 60 टक्के भाग आहे. परंतू तिच्या या सहकार्याची दखल घेतली जात नाही. शेती व्यवसायात बीज पेरणे, रोवणे, निंदन, कापणी इत्यादी आर्थीक क्रिया केवळ स्त्रिया करतात तरीही स्त्रियांची सामाजिक, आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची आहे. महात्मा गांधीनी ग्रामीण स्त्रियांच्या संदर्भात म्हटले आहे की, ''ग्रामीण स्त्रिया दिवस रात्र केवळ घरकामातच गुंतजेल्या असतात तर घरेलु हिस्सा व गुलामगीरीच्या शिकार होत असतात. याशिवाय ग्रामीण स्त्री जर मजुरी करीत असेल तर पुरूषांपेक्षा जास्त काम करूनही तीला मजूरी मात्र कमी दिली जाते. ग्रामीण स्त्रियांजवळ कौशल्य, दक्षता, शिक्षण व संपत्ती चा अभाव असल्यामुळे त्या संघटीत व औपचारिक क्षेत्रामध्ये रोजगार मिळवू शकत नाही या शिवाय त्यांना बलात्कार, स्त्रि–भृणहत्या, लैंगिक भेदभाव या समस्यांचा सामना देखील करावा लागतो. (अनिता मोदी – 2009)

**स्त्रियांच्या विकासासाठी शासकीय योजना :–** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय संविधानामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र स्त्रियांना न्याय मिळवून दिला आहे. संविधानाच्या 14 व्या अनुच्छेदानुसार स्त्रियांना व पुरूषांना सर्वच क्षेत्र जसे राजकीय, आर्थिक, सामाजिक इत्यादीमध्ये समान अधिकार व समान संधी प्रदान केलेली आहे. अनुच्छेद 39 नुसार समान काम – समान वेतनाचे प्रावधान केलेले आहे. स्त्रियांन शोषण व अत्याचारमुक्त करण्यासाठी अनेक कायदे बनविण्यात आले आहेत. हिंदू विवाह कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा 1961, सती प्रथा बंदी कायदा 1987, अनैतिक व्यापार निवारण कायदा 1956, प्रसूती पूर्व गर्भ निदान कायदा 1964, यौन उत्पीडनापासून संरक्षण कायदा 2005 पारित केले आहेत. जवळपास 42 कायदे आहेत जे महिलांच्या विकासासाठी तयार केलेले आहेत. यानंतर महिलांच्या हितांच्या संरक्षणासाठी, संवर्धनासाठी कायदेविषयक अधिकारांची रक्षा करण्यासाठी ''राष्ट्रीय महिला आयोग'' ची स्थापना 1992 ला केलेली आहे.

वर्ष 1974 ला ''आंतरराष्ट्रीय महिला वर्ष'' म्हणत साजरा करण्यात आला. स्त्रियांच्या स्थितीत अधिक सुधारणा करण्याच्या हेतूने शासनाने 73 वी घटना दुरूस्ती करून 'पंचायत राज' संकल्पना अंमलात आणली त्यामुळे स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढला. स्त्रियांना आरक्षण देण्यात आले. 'महिला व बालविकास विभाग' या नावाने एक स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, ''कोणत्याही समाजाची प्रगती तेथील महिलांच्या प्रगतीवरून मोजता येते. व महिलांना प्रगत करावयाचे असेल तर त्यांना शिक्षण देणे आवश्यक आहे.'' शासनाने स्त्रियांच्या शिक्षणासाठी विविध योजना कार्यान्वीत केल्या आहेत. राष्ट्रीय साक्षरता मिशन महिला सामाख्या कार्यक्रम, सर्व शिक्षा अभियान राजस्थान सरकारने लोक जुंबीश, शिक्षाकर्मी व गार्गी पुरस्कार योजना यांची सुरूवात केली आहे. याच क्रमाने पुढे सरकारने 'राष्ट्रीय महिला कोष' चे गठन केले आहे. याचा प्रमुख उद्देश निर्धन स्त्रियांना उत्पादन कार्यासाठी कर्ज उपलब्ध करून देणे आहे. बालीका समृध्दी योजना, समेकित बाल विकास कार्यक्रम, स्त्रियांकरीता रोजगारासह आयोत्पादक एकक स्थपित करणे, स्वशक्ती परियोजना, स्त्री शक्ती पुरस्कार, इंदिरा महिला योजना इत्यादी योजनांचा उद्देश स्त्रियांना आत्मनिर्भर करणे हाच आहे याशिवाय वर्ष 2001 ला राष्ट्रीय सक्षमीकरण वर्ष म्हणून साजरा करण्यामागे हाच उद्देश आहे की स्त्रियांच्या क्षमता व कौशल्याचा विकास करून त्यांना अधिक सक्षम बनवणे व त्याच्या स्थितीमध्ये सुधारण करणे. (अनिता मोदी – 2009)

**स्त्रियांचे स्वंय सहाय्यता समूह :–** याच दिशेने पावले टाकतांना सरकारने 'स्वंय सहायता समुह कार्यक्रम' साकारण्यामागे स्त्रियांना सक्षम व सबल बनविने हाच उद्देश आहे. स्वंय सहायता समुह ग्रामीण अर्थव्यवस्थेचे एक अभिन्न अंग बनून स्त्रियांसाठी वरदान ठरत आहे. स्वंय सहायता समुहांच्या माध्यमातून लघु स्वरूपात भांडवल प्राप्त करून

स्त्रियांनी दारिद्रय, बेरोजगारी आणि निरक्षरता या चक्रव्यहातून स्वतःची सुटका करून घेऊन त्या सक्षमीकरणाकडे पावले टाकत आहेत. मागील दहा वर्षापासून औदयोगिकरण व उदारीकरणामुळे लघुउद्योग व शेती सारखे उदयोग नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत ज्यामुळे दारिद्रय रेषेखालील येणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ झाली आहे. विश्व बॅंकेने लघुक्रेडीट समुह हा रामबान उपाय दिला आहे ज्याला सामन्य भाषेत स्वंय सहायता गट किंवा बचत गट असेही म्हणतात. स्त्रियांसाठी आर्थिक सहाय्यता करणारे बचत गट त्यांच्या विकासात अत्यंत महत्वपूर्ण भूमिका बजावित आहेत. विशेषतः ग्रामीण भागात स्त्रियांना रोजगार व आर्थिक प्राप्तीसाठी मोलाच हातभार या गटांनी दिला आहे.

1992 मध्ये स्त्रियांसाठी स्वंय सहायता समुह नाबार्ड व्दारा प्रायोजित सरकारी कार्यक्रमाच्या स्वरूपात सुरू करण्यात आले. (वृंदा करात – 2008) आज त्याची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. नाबार्डचे 2007 पर्यंत दहा लक्ष स्वंयसहायता गट स्थापीत करण्याचे लक्ष पूर्ण झालेले आहे. आपल्या देशात स्वंय सहायता समुहाच्या बॅंक संपर्क मॉडल ला कार्यान्वीत केले गेले आहे. (अनिता मोदी – 2009) स्वंय सहायता समुहांचा प्रसार उत्तर, पूर्व आणि मध्य भारतातील राज्यांमध्ये नगण्य असले तरी 2007 मध्ये पश्चिम बंगाल व ओरीसा मध्ये या गटांचा विस्तार वाढल्याचे लक्षात येते. दहा लक्ष समुहांपैकी एकटया आंध्र प्रदेशात 4.5 लक्ष समुह आहेत त्यापैकी चार दक्षिणी राज्यांचा हिस्सा 75 टक्के आहेही जगातील सर्वात मोठी लघु वित्तीय योजना आहे. ज्यात 90 टक्के ग्रामीण स्त्रिया सहभागी आहेत. (वृंदा करात – 2008)

**स्वंय सहायता गटाची निर्मिती प्रक्रिया :–** स्वंय सहायता गट निर्माण करण्यासाठी 10–12 स्त्रिया ज्या समान सामाजिक, आर्थिक परिस्थितीशी संबंधीत असतील त्यांची विचारधारा सारखी असेल त्या एकत्र येतात व आपल्या लहान लहान बचतींना एकत्र करून एक कोष बनवितात. या कोषातील राशी सुरक्षित ठेवण्याकरिता राष्ट्रीयकृत बॅंकेत गटाच्या नांवे खाता उघडला जातो. सर्व सदस्य, अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव यांच्या स्वाक्षरीने या बचत खात्याचे कामकाज चालते. या खात्यातील पैशाचा उपयोग सदस्याव्दारा आपल्या उत्पादक आणि उपयोगासबंधी आवश्यकतांच्या पूर्तीकरिता केला जातो. निश्चित कालावधीनंतर बॅंक या खातेदारांना कुटीर उद्योग, कशिदाकारी उद्योग, छोटा व्यवसाय, कृषी सबंधीत लघु व्यवसाय इत्यादी साठी कर्ज प्रदान करते. या समुहांना 'सामाजिक गिरवी' च्या स्वरूपात स्विकार केल्यामुळे लघु वित्तीय संस्था, बॅंक व अन्य वित्तीय संस्थाच्या साठी कर्जाची जोखीम कमी होते.(अनिता मोदी – 2009) गटाचे अन्य सदस्य सुध्दा कर्ज फेडण्यासाठी उत्प्रेरकाची भूमिका बजावतात. ग्रामीण स्त्रियांमध्ये उदयोजकता, कौशल्य व दक्षता निर्माण करण्यासाठी त्यांना प्रशिक्षणाची गरज भासते. यासाठी स्वंय सहायता बचत गटांचा सहभाग महत्वाचा आहे. याच तथ्यावर प्रकाश टाकतांना लघु वित्त विशेषज्ञ श्री क्रिस्टीलो म्हणतात की, ''दारिद्रय निर्मूलन व क्षमता विकासाचा सरळ संबंध आहे. क्षमता विकासाच्या अभावामुळे पैशाचे संवर्धन होत नाही. कारण व्यक्ती किंव समूह कर्जाच्या चक्रव्युहामध्ये फसत जातो.'' (अनिता मोदी–2009) दिलेले कर्ज योग्य ठीकाणी गुंतविले जावे म्हणून सरकारने स्त्रियांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था सुध्दा केली आहे. या प्रशिक्षण केंद्रामध्ये कशिदाकारी, त्वचा व स्वास्थसंबंधीत ज्ञान, फळे व भाजीपाल्याचे प्रसस्करन, कपडे व बॅगा सिलाई, लोणची व मुरब्बा बनविण्याचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षण प्राप्ती नंतर ग्रामीण स्त्रियांमध्ये आत्मविश्वास व आत्मनिर्भरता वाढते. या व्यवसायांची निर्मीती करून ग्रामीण विकासात मोलाचे सहकार्य त्या करू लागतात. उदा. छत्तीसगड राज्यातील दुर्ग जिल्हयातील भारदा ब्लाक मधील स्त्रियांना स्वंय सहायता गटाच्या माध्यमातून कर्ज काढून स्वतःचे जिवनमान उंचावले आहे. त्यांनी बॅंक ऑफ बडोदा मधुन 'लक्ष्मी' या बचत गटाच्या मार्फत कर्ज काढून अगरबत्ती बनविण्याचा व्यवसाय सुरू केला. या व्यवसायाला सफलतेने संचालीत करीत बॅंकेचे कर्ज व्याजासहीत परत केले व मोठया प्रमाणात नॅा ही कमावला. यामुळे आजूबाजूच्या गावातील स्त्रिया सुध्दा प्रेरीत झाल्या आहेत.

**स्वंय सहाय्यता गटाचे फायदे :–** स्वंय सहाय्यता गटाचे खालील प्रमुख फायदे आहेत.

1. लघु वित्ताचे उत्पादन व उपयोग झाल्यामुळे ग्रामीण स्त्रियांची सामाजिक आर्थिक स्थिती सुधारत आहे ज्यामुळे त्या देशाच्या मुख्य धारेशी जोडल्या जात आहे. 2. विविध अध्ययनावरून हे सिध्द झाले आहे की, स्वंय सहाय्यता गटाशी जोडल्या गेल्यामुळे ग्रामीण महिलांमध्ये बचत, कर्जाचा सदुपयोग, वित्त प्रबन्धन व वित्त अनुशासन या सारखे महत्वपूर्ण प्रवृत्ती निर्माण होते. 3. ग्रामीण स्त्रियांमध्ये शिक्षण, आरोग्य पोषण संबंधी जागरूकता निर्माण होते ज्यामुळे त्यांच्या कुटुंबावर आरोग्य, जिवनस्तर व गुणवत्ता निर्माण होते. 4. स्वंय सहाय्यता गटाच्या निर्मितीनंतर महिला पूर्वीपेक्षा अधिक जागरूक, साक्षर व सक्रीय होतात. 5. वरिल परिवर्तनाशिवाय स्त्रिया महिला विकास संबंधीत कार्यक्रमामध्ये अधिक प्रभावी भूमिका निभावू लागल्या आहेत. 6. स्वंय सहाय्यता समुहांना कर्ज प्राप्त होत असल्यामुळे स्त्रियांमध्ये बचत, उत्पादकता, परिसम्पति निर्माण क्षमता वाढलेली आहे. 7. याशिवाय ग्रामीण स्त्रियांमध्ये क्रयविक्रय शक्ती, सहभागीता, निर्णयाधिकारांमध्ये वाढ घेण्यामुळे ग्रामीण विकास प्रक्रियेमध्ये त्याचे योगदान उत्तरोत्तर वाढत आहे. ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारत आहे. 8. स्वंय सहाय्यता समुहांमुळे शाळांमध्ये मुलींची संख्या वाढत आहे. मुलींची गळती कमी झाली आहे. व मूली शाळेत शिक्षण घेण्यास प्रवृत्त होत आहेत. 9. अनेक गावातील बेरोजगारी कमी झालेली आहे. ज्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा स्त्रियांना होत आहे. 10. या सकारात्मक परिवर्तनासोबतच ग्रामीण महिला स्थानीक राजनिती, पंचायत आणि सामुदायिक विकासाच्या कार्यक्रमात सक्रीय सहभाग नोंदवित आहेत. 11. स्वंय सहाय्यता समुह गावातील वाईट प्रथा बाल–विवाह, हुंडा प्रथा, पडदा प्रथा इत्यादींचे उन्मुलन करण्यासाठी योगदान देत आहेत. 12. स्वंय

सहाय्यता गटांमुळे स्त्रिया आर्थिक स्वावलंबी बनून स्वतःच्या पायावर उभ्या राहत आहेत. आणि त्यांच्यावर होणारे अत्याचार, शोषण, उत्पीडन यांना लगाम लागला आहे. 13. विविध सर्वेक्षणाव्दारे हे सिध्द झालेले आहे की, स्वंय सहाय्यता गटांमुळे स्त्रियांची क्रम शक्ती, आवक व जिवनस्तरांमध्ये सुधारणा झालेली आहे. 14. स्वंय सहाय्यता समुहांना सशक्त–सुध्दृढ बनवून विभिन्न दारिद्रय निर्मुलन कार्यक्रम जसे सुवर्ण जयंती ग्रामीण रोजगार योजना इत्यादी व्दारे महिलांचा ग्रामीण पंचायती मध्ये योगदान व निर्णय क्षमतेला वाढवित आहे.

अशा प्रकारे स्त्रियांना सक्षम, स्वावलंबी बनवून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांचा आर्थिक विकास व जिवनमान उंचावण्यासाठी स्वंय सहाय्यता गटांचे योगदान महत्वपूर्ण आहे. स्त्रिया कुटुंब, समाज व देशाचा पाया असतात. जर पाया मजबूत असेल तर इमारत भव्य, सृदृढ बनेल ही कल्पना स्वंय सहाय्यता गटांच्या माध्यमातून साकार केली जात आहे. स्त्रियाच नव्हे तर ग्रामीण भागातील पुरूषही आता स्वंय सहाय्यता गटांच्या माध्यमातून आपला विकास करू पाहतो आहे. हा या गटांचा ग्रामीण समाजावर झालेला फार मोठा परिणाम होय.

**संदर्भ ग्रंथ :–**


1. अनिता मोदी, (2009), 'पंचायत राज एवं महिला सशक्तीकरण', जयपूर, बुक एनक्लेव.
2. वृंदा करात, अनु. (2008), 'भारतीय नारी – संघर्ष और मुक्ती', ग्रंथ शिल्पी (इंडीया) प्रा.ली.
3. मदन, जी. आर., (2011), परिवर्तन एवं विकास का समाजशास्त्र, दिल्ली, विवेक प्रकाशन..
4. वी.एन. सिंह, जनमेजय सिंह, (2013), 'नारीवाद', दिल्ली, रावत पब्लिकेशन.
5. अरूण कुमार, (संपदीत), (2009), 'उदारीकरण, भूमण्डलीकरण एवं दलित', दिल्ली, रावत पब्लिकेशन.

# लोकशाहीत राष्ट्रीय एकात्मता – एक आव्हान

**डॉ. संपदा एस. कुल्लरवार**, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, विमेन्स कॉलेज, न्यू नंदनवन, नागपूर.

प्रत्येक राष्ट्राला इतिहास असतो, परंपरा असतात, संस्कृती असते. ती त्या राष्ट्राची वैशिष्ट्ये असतात.या सर्वांचा समन्वय म्हणजे एकात्मता होय. एकात्मता म्हणजे व्यक्तिची भावनिक मने जोडण्याची प्रक्रीया होय. राष्ट्रातील समान घटक राष्ट्राच्या सुखदुःखात सहभागी होत असतात. आणि म्हणूनच राष्ट्रीय एकात्मता म्हणजे फक्त घटनात्मक व कायदेशीर एकात्मता नसून ती मनाची एकात्मता असते. एकी असते. विविधतेत एकता हे म्हणूनच भारताचे वैशिष्ट्य मानले जाते.

**राष्ट्रीय एकात्मता** :– राष्ट्रीय एकात्मतेला पोषक वातावरण तयार करण्यासाठी राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला सात प्रकारचे स्वातंत्र्य दिलेले आहे. त्यात भाषणस्वातंत्र्य, जमावस्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य, व्यवसायस्वातंत्र्य, संचारस्वातंत्र्य, निवासस्वातंत्र्य. हे स्वातंत्र्य दिल्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेचे वातावरण निर्माण होईल पण त्याचबरोबर नागरिकांमध्ये देशाबद्दल आपुलकी, जिव्हाळा व एकात्मता वाढीस लागली पाहिजेण

भारतात राहणाऱ्या सर्व नागरिकांमध्ये राष्ट्रीय भावनेतून मनोमिलन घडून आणणे व त्यांच्यात भावनात्मक ऐक्य निर्माण करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय. भारतीयांमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय एकात्मता प्रकर्षाने दिसून आली. धर्म, वंश, भाषा, परंपरा इ. बाबतीत विविधता असली तरी भारतीय नागरिक म्हणून आपण एक आहोत अशी भावना प्रत्येक भारतीयांमध्ये आहे. चीन, पाकिस्तान युद्धाच्या वेळी ही भावना दिसून आली. असे असले तरी राष्ट्रीय एकात्मतेबद्दल अनेक गैरसमज निर्माण झाले आहेत.

राष्ट्रवादामुळे अनेक देशात राष्ट्रीय एकात्मता निर्माण होते परंतु राष्ट्रवादाचे स्वरूप उदारमतवादी असेल तर ही एकात्मता आंतरराष्ट्रवादाला पोषक ठरते. परंतु जर संकुचितपणा असेल तर त्या एकात्मतेपासून आंतरराष्ट्रवादाला धोका निर्माण होतो म्हणून राष्ट्रीय एकात्मतेचे स्वरूप विधायक असायला हवे.

राष्ट्रीय एकात्मता म्हणजे कोणत्याही तऱ्हेच्या सर्वंकष समाजवादापासून मुक्त असणारे ऐक्य होय. तसेच विशिष्ट भूभागावर सहकार्याच्या भावनेने एकत्र राहण्याची इच्छा व भविष्यातही लोकशाही शासनाखाली राहण्याची इच्छा म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय.

अर्थात आज राष्ट्रीय एकात्मता निर्माण होणे हे भारतापुढे एक आव्हान आहे. कारण वंशिक, भाषिक, आर्थिक, जातीय व धार्मिक भेद हे राष्ट्रात एकात्मता निर्माण करण्याच्या कार्यात अडथळा निर्माण करतात.

ब्रिटिशकाळात हा देश स्वातंत्र्यप्राप्तीसाठी एकात्म झाला होता. सर्वांमध्ये एकी होती. पण स्वातंत्र्य प्राप्त होताच देशात संकुचितता निर्माण झाली. संकुचिततेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढीवर आहे. आज राष्ट्रसंघटनेऐवजी राष्ट्र विघटनाची प्रवृत्ती दिसून येत आहे. जात, भाषा, धर्म, प्रादेशिकता, पक्षीय राजकारणाला मोठया प्रमाणावर महत्त्व प्राप्त होत आहे व यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण झालेला आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गात खालील अडथळे निर्माण झालेले आहेत.

**राष्ट्रीय एकात्मतेतील अडथळे** : –

1. धार्मिकता – भारताने धर्मनिरपेक्ष राज्याची संकल्पना मान्य केलेली असली तरी राजकारणासाठी मोठ्या प्रमाणावर धर्माचा वापर केला जात आहे. त्यामुळे संघर्ष निर्माण होण्यास प्रोत्साहन मिळत आहे.

2. जातीयता – सामाजिक बाबतीत जरी काही प्रमाणात जातीयतेला आळा घातला जात असला तरी राजकीय बाबतीत जातीला फार मोठया प्रमाणावर उपयोग करून घेतला जात आहे. राजकारणासाठी जातीय दंगली घडवून आणल्या जातात. आंतरजातीय विवाह होत असले तरी राजकारणात जातीला महत्व दिले जात आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे.

3. भाषिक अभिमान – भाषेचा राजकीय फायद्यासाठी उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने जनतेच्या भावना प्रेरीत केल्याने राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते.

4. प्रादेशिक असमतोल – देशाच्या निरनिराळया भागात आर्थिक विकासाच्या दृष्टीने असमतोल निर्माण झाला तर आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विभागातील जनतेच्या मनात आपल्यावर अन्याय होत असल्याची भावना निर्माण होते व त्यातूनच प्रादेशिकवाद निर्माण होतो.

5. प्रदेशवाद – प्रादेशिकतेमुळे देशात संकुचित वृत्ती निर्माण होते. प्रादेशिक हितसंबंधांच्या रक्षणासाठी राष्ट्रहिताला तिलांजली दिली जाते व त्यामुळे राष्ट्रहिताला धोका निर्माण होतो.

या प्रदेशवादातूनच प्रादेशिक पक्ष व संघटना निर्माण होतात. या संघटना व पक्ष आपला प्रभाव वाढविण्यासाठी प्रादेशिक विविधता, प्रादेशिक विकासाकडे दुर्लक्ष, प्रांतीय निष्ठा, जातीय स्वरूप, भाषेत अस्मिता इत्यादींना महत्त्व देऊन आपला प्रभाव निर्माण करतात. तसेच पक्षीय राजकारणापासूनही प्रादेशिक पक्षांची निर्मिती होते. पक्षातील घुमसट, नाराजी, तिकीट नाकारणे इ. गोष्टींमुळे प्रादेशिक पक्ष निर्माण होतात. उदा. राष्ट्रीय कॉंग्रेस – राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्यातील गटबाजी, शिवसेना–मनसे, रिपब्लीकन पक्ष व त्यांच्यातील इतर गट या गोष्टी राष्ट्रीय एकात्मतेला धोका पोहोचवितात.

प्रादेशिक पक्षांच्या वाढीतून व प्रादेशिक असमतोलातून नवीन राज्याची मागणी पुढे येते. धार्मिकवादी, जातीयवाद, पृथ्यकतावाद उदयास येतो त्यातूनच विभक्तीकरणाची प्रक्रिया व भावना वाढीस लागते. लहान राज्ये स्वतंत्र होण्याची मागणी करतात, त्यातूनच प्रादेशिक विकास होतो पण राष्ट्रीय भावना कमजोर होते. भारतात

परप्रांतीयाबाबत मतभेद केल्या जातो. मुठभर लोकांच्या म्हणण्यानुसार प्रादेशिक वाद निर्माण करून राष्ट्रीय एकात्मता धोक्यात आणणे योग्य नाही. त्याचबरोबर आंतरराज्य संबंध, सघर्ष, सीमावाद, नदी–पाणी वाटप वाद, नोकरभरती इ. गोष्टी राष्ट्रीय एकात्मतेला धोका पोहोचवतात.

राजकारणातील संकुचित प्रवृत्तीमुळे राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान देण्याची प्रवृत्ती निर्माण झालेली आहे. राष्ट्रीय एकात्मता, बंधूता, अखंडतेची भावना यांचा बळी दिल्या जात आहे. तसेच मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार व हिंसाचार वाढला आहे.

प्रादेशिक पक्ष व प्रादेशिक वाद यामुळे देशाला गंभीर प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे. यातून देशाला सोडवायचे असल्यास पुढील उपाय अमलात आणणे आवश्यक आहे.

**राष्ट्रीय एकात्मता टिकविण्यासाठी उपाय :–**

1. आर्थिक विकास – भारतात अनेक मागासलेले प्रदेश, संस्कृती, उपसंस्कृती व वन्य जातीजमाती आहेत. सर्वांचा विकास समान होण्यासाठी त्यांची गरज लक्षात घेवून आर्थिक सहकार्य करावे.

2. भाषिक विकास – देशात अनेक भाषा बोलल्या जातात. हिंदी ही राष्ट्रभाषा आहे. दक्षिणेकडील राज्यांचा त्याला विरोध आहे. त्यामुळे भाषिक वाद निर्माण होतात. त्यास

3. अमेरिकेप्रमाणे सर्व राज्यांना वरिष्ठ सभागृहात समान प्रतिनिधित्व द्यावे जेणेकरून असंतोष निर्माण होणार नाही.

4. राज्याराज्यातील नद्यांच्या पाणी वाटपावरून व सीमावादावरून निर्माण झालेले वाद समझोता करून त्वरीत सोडवावेत.

5. सर्व नागरिकांसाठी समान धोरण आखावे

6. संप्रदाय व प्रादेशिकतावादाला प्रोत्साहन देणाऱ्या राजकीय पक्षांसाठी कडक कायदे करावेत व त्या कायद्याचे पालन कसोशीने करावे.

7. राष्ट्रीय पक्षांवर राजकीय जागृतीची व धोरणाची जबाबदारी असते. ती त्यांनी राष्ट्रहीत डोळयासमोर ठेवून पार पाडावी. केवळ सत्तेसाठी राजकारण करू नये.

8. थोर पुरूषांचे पुतळयांचा किंवा नावाचा वापर करून समाजकारण किंवा राजकारण करण्यावर बंदी आणावी.

9. जातीच्या किंवा धर्माच्या आधारावर पक्ष किंवा संघटना निर्माण करू देवू नये. असे होत असल्यास त्या संघटना किंवा पक्षांवर कायमची बंदी आणावी.

10. आपल्या देशात राष्ट्रीय शिक्षणाचा अभाव जाणवतो. राष्ट्रीय एकात्मता टिकविण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण देण्यात यावे.

राष्ट्रीय एकात्मता टिकविण्यासाठी वरील उपाययोजना अमलात आणण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी समाजप्रबोधन होणे गरजेचे आहे. राष्ट्रीय एकात्मता टिकविण्यासाठी पारतंत्र्य काळातील थोर पुरूषांचे आदर्श लोकांनी डोळयासमोर ठेवावेत. सर्वांमध्ये निःस्वार्थी भावना निर्माण झाल्यास राष्ट्रीय एकात्मतेचा मार्ग सुलभ होईल व खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना पूर्ण होईल.


संदर्भ ग्रंथ –

1. भारतीय शासन व राजकारण – डॉ.भा.ल.भोळे
2. राष्ट्रीय एकात्मता – डॉ. सुरेन्द्र बारलिंगे
3. भारताची जडणघडण – पन्नालाल सुराणा
4. राष्ट्रीय व भावनात्मक एकता – प्र. द. पुराणिक

# साहित्यनिर्मितित पाश्चात्य प्रवासकांचे योगदान

**डॉ. राजेश दिपटे**, मराठी विभाग, मनोहरभाई पटेल महाविद्यालय, साकोली जि. भंडारा.

फार प्राचीन काळापासून जग जिकण्यासाठी, ज्ञानासाठी, तीर्थयात्रेसाठी, बौध्द धर्माचे ज्ञान मिळवून घेण्यासाठी इ. स. पूर्व काळातही काही अनेक परदेशी पांथस्थ भारतात येवून गेल्याचे दाखले दिसून येतात ''चिनी प्रवासी फाहियान, आणि हयु–एन–त्संग यांनी आपल्या प्रवासवर्णनात गुप्तकाळाविषयी माहिती लिहून ठेवली आहे.''[1]

हयु–एन–त्संग हा तीव्र बुध्दीमत्ता व धार्मिक प्रवृत्तीचा चिनी प्रवासी असून लहानपणी त्याने मठात शिक्षण घेतले वयाच्या 13 व्या वर्षी तो भिक्खू झाला. बौध्द मठात बौध्द साहित्याचा अभ्यास केल्यांनतर संपूर्ण चीनभर त्याने प्रवास केला त्यात त्याला अनेक अनुभव व काही शंका–कुशंका आल्या. त्याचे निरसन करण्यासाठी तसेच बौध्द साहित्याचा अभ्यास करण्यासाठी, बुध्दाच्या जन्म व कर्मभूमीला भेट देण्यासाठी तो भारतात आला. यात काश्मिर, पंजाब, मथुरा, प्रयाग, कोशंबी, सारनाथ व अनेक मोठया शहरांना व स्थळांना त्याने भेटी दिल्या. भारतीय पोशाख, राहणीमान, विवाहसंस्था, वस्त्रे, विणकाम यांचे सुरेख वर्णन त्याने करुन ठेवले आहे.

कोलंबस हा महत्वाकांक्षी समुद्र खलाशी होता. ॲटलांटिक महासागराच्या त्याच्या प्रवासाने अमेरिकन महाद्विपाविषयी युरोपात माहिती पोहचली. त्याने अमेरिकेचा चार वेळा प्रवास केला. त्याचे वडीलही खलाशी होते. तो भारताच्या शोधात निघाला पन सहका–र्याच्या असहकार्यामुळे त्याला हा बेत रद्द करावा लागला. यानंतर युरोपातील पहिला युरोप शोधक प्रवासी महणून बेजांमिनच नाव घेतल जातं. या फिरस्त्याने युरोप, उत्तर आफ्रिका आणि आशियातील अनेक भागांना भेटी दिल्या असून त्याने अनेक अनुभव डायरीत लिहून ठेवले आहेत. ''12 व्या शतकातील ज्यू समुदायाविषयी अभ्यास करण्यासाठी ही डायरी एक महत्वाचा दस्तावेज बनली.''[2]

**आशियाई जीवनाची ओळख करुन देणारा मार्कोपोलो :** मार्कोपोलो या इटालियन प्रवासाने अशिया खंडातील चीनपर्यंत प्रवास करुन तिथल्या लोकजीवनाची उर्वरित जगाला ओळख करुन देण्याचे महत्वाचे काम केले. चीनमधील तत्कालीन शासक उल्लाखान याचा विश्वास व मर्जी संपादन केल्यामुळे सतरा वर्षे चीनमध्ये वास्तव्य करण्याची संधी त्याला मिळाली. या संधीचा पुरेपूर फायदा घेवून आशियाई भागातील निसर्ग, समाजजीवन, सांस्कृतिक जीवन व व्यापार याविषयी त्याने बारीक सरिक माहिती मिळविली. या माहितीच्या आधारामुळे युरोपीयनांचा आशियाई लोकांशी संवाद व व्यापार सुरु झाला ''म्हणूनच जग जवळ येण्याच्या प्रक्रियेत मार्कोपोलो या शोधक प्रवासाचा महत्वाचा वाटा आहे''[3]

**युरोपात शोधमोहिमांचे सुवर्णयुग आणणारा राजुपत्रे हेन्री द नेव्हीगेटर :–** या पोर्तुगीज राजपुत्राने पंधराव्या शतकात युरोपातील अज्ञात प्रदेशात प्रवास करण्यास प्रोत्साहन देवून शोधमोहिमचे सुवर्णयुग सुरु केल''[4] याने अटलांटिक महासागरातून प्रवास करुन 'मदिरा' 'अशोरस' या ठिकाणांचा शोध लावला, 1446 मध्ये हयाने आफ्रिकन गुलाम आणि सोने युरोपात आणण्यास सुरवात केली. याने कधीही जलप्रवासात भाग घेतला नाही.

**पोर्तुगीज दर्यावर्दी बातालोम्पो डायस :–** याने सर्वप्रथम 1488 साली आफ्रिकेला यशस्वी वळसा घातला. पोर्तुगीजला आल्यावर त्याचे चांगले स्वागत झाले. आपल्या मोहिमेचा वृत्तांत त्याने दुसऱ्या जान राजाच्या कानावर टाकला'. आफ्रिकेच्या दक्षिण टोकाचे 'केंप ऑफ स्टॉर्मस' हे नाव बदलून पुढील काळाची आशा' या अर्थाने राजाने 'केप ऑफ गुड होप' अस नामकरण केल''[5] 1947 मध्ये त्याच्याऐवजी भारताच्या मोहिमेवर वास्को–द–गामा ची कमांडर म्हणून नेमणूक केली. 1500 मध्ये झालेल्या वादळानंतर डायस कुठे गेला हे अज्ञातच राहिल.

**वास्को–द–गामा :–** ''नव्या भूमीच्या शोधात विविध राजाच्या प्रोत्साहानामुळे पंधराव्या शतकात जोरदार मोहिमपर्व चालू होत. याच दरम्यान पोर्तुगालमधल्या वास्को–द–गामाने त्याची स्वप्नवत वाटणारी मोहिम पुढे केली, पण भारतासारख्या मसाल्यांचा मार्ग शोधून युरोपीय देश व भारत यांच्यातला व्यापारी संबंधाचाही झेंडा रोवला. भारताच्या मोहिमेची जबाबदारी वास्को–द–गामाकडे सोपविण्यात आली. तेव्हा वास्कोच्या बरोबर तीन जहाजे व तीन वर्षे पुरु शकेल एवढे धान्याचे साठे व सुधारित नकाशा देण्यात आला''

**न्युझीलंडचा शोध लावणारा युरोपियन लेखक एबल यानझून टासमनः–** सोळाव्या शतकात अज्ञात असणाऱ्या ऑस्ट्रेलीया खंडाच्या शोधात असताना टासमन या डच खलाश्याने टांगो, फिजी टास्मानिया व न्यूझीलंड बेटाचा शोध लावला. न्युझीलंडवर पोहोचणारा तो पहिला युरोपीय शोधक होता.''[6] गव्हर्नर जनरल व्हौन डायमेनच्या आदेशानुसार 1692 साली टॉसमन याच मोहिमेसाठी निघाला त्याने प्रथम सरळ दक्षिणेकडे 49 अंशापर्यत प्रवास केला. नंतर उत्तर व पूर्व दिशेला वळल्यांनतर त्याला अज्ञात खंड लागला पुढे त्याच्या गौरवार्थ या भागाला टास्मानिया म्हटल गेल.''[7]

**फ्रेंच दर्यावर्दी लूई ॲव्टोनी दे बोगनविले :–** संपूर्ण जगाला प्रदक्षिणा करणारा हा पहिलाच फ्रेंच दर्यावर्दी असून आपल्या प्रवासाचे वर्णन करणारे 'टहायजेस अराउन्ड द वल्ड' हे पुस्तक त्याने 1771 मध्ये लिहल''[8]

**पश्चिम ऑफ्रिकेत शोधकार्य करणारा मंगोपार्क :–** ''दक्षिण ऑफ्रिकेचा बराच प्रदेश मंगोपार्क याने शोधला पश्चिम ऑफ्रिकेतील 'नायजर' नदीचा मार्गाचा त्याने शोध घेतला. मंगोपार्क हा स्कॉटलॅंडचा रहिवासी होता. आशियाकडे जाणाच्या जहाजावर त्याने शल्यचिकित्सक म्हणून काम केल होत. 1775 मध्ये आफ्रिकेच्या पश्चिम किनारपट्टी पासून त्याने घोडयावरुन प्रवास करुन 'नायजर नदी' व तिचा

पूर्वेकडील भाग शोधला या प्रवासात त्याला अनेक हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या. खडतर प्रवासाला तोंड द्याव लागल. 1805 मध्ये तो पुन्हा दक्षिण आफ्रिकेच्या मोहिमेवर आला. नायजर बोटीतून प्रवास करण्याची त्याची योजना होती. मात्र स्थानिक लोकांनी त्याच्या नौकेवर हल्ला चढविला''[9] पळून जाण्याच्या प्रयत्नात मंगो पार्क याचा नदीत बुडून मृत्यू झाला.

**अमेरिकेतील आदिवासींचा अभ्यास करणारा मेरिवेदर लेविस :–** ''या अमेरीकन शोधकाने पश्चिम उत्तर अमेरिकेचा बराचसा प्रदेश शोधला या प्रदेशातील आदिवासींच्या जीव शैलीच्या नोंदी याने केल्या. लेविस याने आपल्या सहकाऱ्यासह मिसूरी नदीमधून प्रवास केला. मंदान या आदिवासी जामातीचा अभ्यास केला. डोंगर प्रदेशातून प्रवास करीत ते कोलंबिया नदीपर्यंत पोहचले व तिथून 1805 मध्ये पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यावर आले''[10]

**ऑस्ट्रेलिया शोधून काढणारा शोधक मॅथ्यूफिलंडर्स :–** ऑस्ट्रेलिया खंडाचा शोध घेणारा हा ब्रिटीश शोधक असून लॅटीन भाषेतील 'ऑस्ट्रेलिया' (दक्षिण) या शब्दावरुन त्याने या प्रदेशाच 'ऑस्ट्रेलिया' अस नामकरण केल. ''ऑस्ट्रेलियातील फिलंडर नदी, फिलंडर पर्वतरांगा बेट त्याच्या नावाने प्रसिध्द आहेत.

**भारतातील पुरातत्वशास्त्राचे जनक अलेक्झांडर कनिंगॅथ :–** भारतातील उत्तरप्रदेश, पंजाब, हिमाचल, लदाख असा परिसर पालथा घालून त्याची भौगोलीक माहिती व ऐतिहासिक व धार्मिक स्थळे यांची नोदं घेत विस्तृत लेखन करणारे हे लेखक होत. फा–हियान व युआन च्वांग या चिनी प्रवाशांनी भारताविषयी केलेल्या वर्णनाचा सखोल अभ्यास करुन प्राचीन स्थळ व नगरी याचा त्यांनी शोध घेतला''[11]

**एव्हरेस्ट शिखर सर्वप्रथम सर करणारे गिर्यारोहक शेर्पा तेनसिंग व एडमंड हिलरी :–** ''जगातील सर्वोच्च पर्वत शिखरावर चढून जाण्याचा पहिला मान एडमंड हिलरी व शेर्पा तेनसिंग नॉगे (भारत) या गिर्यारोहकाकडे जातो. एव्हरेस्ट चढून जाण्याचे स्वप्न अनेक गिर्यारोहकांनी उराशी बाळगल होत. सुमारे एकोणवीस हजारफुंटावर असलेल्या या शिखरावर चढाई करण्याच्या अनेक मोहिमा फसल्या''[12] अत्यंत कठीण व असहय प्रवास करणारे म्हणून या दोघांच नाव इतिहासात नोंदल गेल आहे!

मूळ तंत्रज्ञानाचा फारसा विकास न झालेल्या काळात ध्येयासाठी प्राणाची बाजी लावून विहीत काळ, परिस्थिती यांच्याशी सतत संघर्ष करणारे कोलंबस, तेनसिंग अशी कितीतरी नावे या मालिकेत घेण्यासारखी आहेत. एका बाजूला केवळ आपल्या ध्येयासाठी जगणारा माणूस आहे. आजच्यासारखी कुठलीही वैज्ञानिक पार्श्वभूमी नसलेला समाजही वेगवेगळया शोधांचा भोक्ता होता. याची दखल नंतरच्या पिढयांनीही घेतल्याचे दिसते.

अश्या संघर्षात मरण पावलेल्या लोकांची इतिहास दखल घेतोच असेही नाही. तरीही चौदाव्या पंधराव्या शतकात ऐतिहासिक प्रवासकांनी हा पाया मजबूत करुन ठेवला. आज प्रवासाच्या दिशा, गरजा, बदलल्या असून धर्म, विवाह, व्यापार, क्रिडा, शिष्यवृत्ती, संशोधन अश्या कारणामुळे ही संख्या वाढतच आहे.

**निष्कर्ष** : 1) प्राचीन काळात प्रवास केवळ नवीन संदेश, सोना, व्यापार, लढाया, साम्राज्यविस्तार यासाठीच केला जात होता. 2) प्राचीन प्रवासकांकडे आजच्यासारखी वैज्ञानिक आधुनिक साधने उपलब्ध नव्हती. 3) काळानुसार प्रवासी संख्या, गरजा, व साधने बनलेली आहेत.

संदर्भ :–


1. प्रभा गाणोरकर, एम. षब्बीर, 'भारताचा इतिहास' मदन मार्डीकर संपादित (प्राचीन व मध्ययुगीन भारत) इ. स. पूर्व ते 1707. प्रकाशक एस. चंद्र आणि कंपनी प्रथम आ. 1994. पृ. 263
2. तत्रैव – पृ. 284
3. संपा. सुहास कुळकर्णी, मिलिंद चंपानेरकर, ''यांनी घडवल सहस्त्रक'' रोहन प्रकाशन, प्रकाशक, प्रदिप चंपानेरकर, पुणे तृ. आ; 26 नोव्हेंबर 2003 पृ. 3
4. तत्रैव – पृ. 7
5. तत्रैव – पृ. 8
6. तत्रैव – पृ. 8
7. तत्रैव – पृ. 12
8. तत्रैव – पृ. 19
9. तत्रैव – पृ. 22
10. तत्रैव – पृ. 22
11. तत्रैव – पृ. 23
12. तत्रैव – पृ. 36

# विपश्यना साधनेच्या प्रभावाने कारागृहातील कैद्यांचे सामाजिक व मानसिक परिवर्तन

**डॉ. दिपक कृष्णराव पवार**, सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र–विभाग प्रमुख, विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट अॅन्ड कॉमर्स,
310–ब, नविन नंदनवन, नागपूर–09. Email:profdipakpawar@rediffmail.com Mob. : 9423405816, 8983314468

**प्रस्तावना** :– विपश्यना, म्हणजे जे जसे खरोखरी आहे, तसे त्याला पाहणे. विपश्यना ही भारतातील अतिप्राचीन ध्यानपध्दतीपैकी एक आहे. सुमारे 2560 वर्षापूर्वी गौतम बुध्दांनी तिला पुन्हा शोधून काढली आणि सार्वत्रिक रोगांसाठी, सार्वत्रिक उपाय, अर्थात जीवन जगण्याची कला हया रुपात सर्वांसाठी सुलभ अशी बनविली. या असांप्रदायिक ध्यानपध्दतीचे मुख्य लक्षण म्हणजे मानसिक अशुध्दता पूर्णतः काढून टाकणे आणि परिणामी संपूर्ण मुक्तीचा सर्वोच्च आनंद मिळविणे हे आहे. निरोगीपणा, अर्थात फक्त रोग निवारण नव्हे, तर मानवाला सर्व दुःखापासून मुक्त करणे हाच त्याचा उद्देश आहे.

विपश्यना ही स्व–निरीक्षणातून, स्व–परिवर्तन घडवणारी जीवनशैली आहे. मन आणि शरीर यांच्यावर क्षणोक्षणी होणाऱ्या परिवर्तनशील घटनांवर तटस्थपणे निरीक्षण करता करताच होणाऱ्या चित्तविशोधनाच्या अभ्यासामुळे आपल्याला सुखशांतीचे जीवन जगण्यास मदत होते. आंतरिक शांती आणि सामंजस्याचा अनुभव येतो, मनाची अशुध्दी समाप्त होते परिणामी मन संतुलित होऊन प्रेम आणि करुणा यांनी परिपूर्ण होते.

आपले विचार, भावना निर्णय आणि संवेदना ज्या वैज्ञानिक नियमानुसार चालतात ते सिध्दांत स्पष्ट होऊ लागतात. आपल्या प्रत्यक्ष अनुभवाने आपल्याला समजते की, विकार कसे उत्पन्न होतात, बंधने कशी बांधली जातात आणि त्यापासून कशी मुक्तता मिळू शकते, जागृतता, भ्रांतीमुक्तता, स्व–नियंत्रण आणि शांतता हे जीवनाचे गुणधर्म बनून जातात.

कारागृहातील कैदयांवर विपश्यना साधनेचा प्रयोग करण्यात आल्याने त्यांच्यात आमुलाग्र परीवर्तन झाल्याचे निरीक्षणाअंती दिसुन आले आहे. सुडाच्या भावनेत अहोरात्र पेटलेल्यांचा सुडाअग्णी शांत करण्यात. आणि वाटचुकलकल्यांना जीवण जगण्याची दिशा देण्यास. तयांच्यात सामाजिक व माणसिक परिवर्तन घडवून आणण्यात तथागत गौतम बुध्दाची विपश्यना साधना अतयंत प्रभावी ठरली आहे.

तथागत गौतम बुध्दाच्या काळापासून आजपर्यंत आचार्यांच्या एका अखंडीत साखळीद्वारे विपश्यना साधना चालत आली आहे. या साखळीतील विद्यमान आचार्य श्री. सत्यनारायण गोयनका हे मुळ भारतीय वंशातले असले त्यांचा जन्म व पुढील पंचेचाळीस वर्षाचा काळ ब्रम्हदेश (म्यानमार) येथे व्यतीत झाला. तेथे असतांना त्याकाळी बर्मा शासनामध्ये वरिष्ठ हुद्दयावर कार्यरत असलेले त्यांचे आचार्य सयाजी 3 बा खिन यांच्या कडून विपश्यना साधना शिकण्यास मिळाले. आचार्यांकडून मिळालेल्या चौदा वर्षाच्या प्रशिक्षणानंतर गोयन्काजी भारतात आले आणि स्थायिक झाले आणि त्यांनी सन 1969 पासून विपश्यना साधना शिकविण्यास सुरुवात केली. त्यांनी स्वताच्या नातेवाईकापासुन विपश्यना साधना शिकवायला सुरूवात करून तिचा संपुर्ण भारतभर प्रसार केला.विपश्यना साधनेचया शिबिराचा चांगला प्रभाव सामान्य माणसापासुन तर अट्टल गुन्हेगार असणाऱ्या कारागृहातील कैदयांवर पडला आहे. असेही म्हणता येईल की वाट चुकलेल्या, कुप्रवृतीने ग्रासलेल्या, शिक्षा होऊन कारागृहाच्या चार भिंतीत खितपत पडून नैराश्याचे जीवन जगणाऱ्या कैदयांमध्ये त्यांच्यातील माणुस जागवून माणूसपनाचे बिजारोपन करून स्वताकडे आणि समाजाकडे चांगल्या दृष्टीने बघण्याची दृष्टी देणारा ठरला आहे.

ऐतिहासिक अनेक कारणांमुळे भारतातून तसेच जगातून ही विद्या लुप्त झाली. फक्त शुध्द स्वरूपात ब्रम्हदेशामध्ये गुरु–शिष्य परंपरेद्वारे ही विद्या शुध्द स्वरुपात टिकवून राहिली आहे. आचार्य, सयाजी 3 बा खिन यांनी जून 1969 मध्ये गोयनका गुरुजींना आचार्य पद देवून भारतात पाठविले व त्यांना म्हणाले. ही भारताची विद्या आहे. भारताचे ऋण आपल्यावर आहे. बर्माद्वारे विपश्यनेचे अनमोल रत्न भारताला परत केले. आज खऱ्या अर्थाने भारताच्या ऋणामुक्त होवून, पुन्हा भारतात हया विद्येचा प्रसार होवून भारत पुन्हा सर्व जगभर हया विद्येचा प्रसार करेल असे आचार्य सयाजी 3 बा खिन गोयनका गुरुजींना म्हणाले. त्याचप्रमाणे आज जगभर विपश्यनेचा प्रचार आणि प्रसार मा. सत्यनारायण गोयनकाच करीत आहेत. गुरुजी जून 1969 मध्ये भारतात आले. नंतर त्यांनी प्रथम आपल्या आईवडिलांना व इतर आप्तेष्ठ मित्रनातेवाईकांचे पहिले शिबीर 3 ते 14 जुलै 1969 ला मुंबईला पंचायतवाडी धर्मशाळा येथे घेतले.दुसरे शिबीर 24 जुलै 1969 मध्ये मद्रास (चेन्नई) अग्रवाल धर्मशाळा येथे लागले.तिसरे विपश्यना शिबीर मुबईला नेमाजी धर्मशाळा येथे लागले. अशाप्रकारे विपश्यनेचे शिबीर भरत गेले. सर्व भारतभर विपश्यनेचे शिबीर आयोजित केले नंतर भारताच्या बाहेर जगात विपश्यनेचा प्रसार सुरु झाला.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत किती खरे ठरले की हा धर्म जगात जाईल आणि भारत बौध्दमय होईल. म्हणूनच आज म्हणतात ''युध्द नको बुध्द हवा'' जगाला शांतीचे तत्त्वज्ञान देणाऱ्या बुध्दाची खरी गरज निर्माण झाली आहे.बुध्दाचे तत्त्वज्ञान जगात लोकप्रिय ठरले. प्रेमाणेच प्रेम निर्माण होते. द्वेशाने द्वेश हे वैशिक प्रेम. मैत्रीचे तथा शांततेचे तत्त्वज्ञान तथागत बुध्दाच्या तत्त्वज्ञानाच्या आणि विपश्यनेच्या माध्यमातून अखिल विश्वात पोहचत आहे. रुढी–परंपरा नाकारुन विज्ञानवादाचा मुलभूत पाया आणि विचार स्विकारुन विपश्यना हा मार्ग जगातील लोकांनी स्विकारला आहे. समग्र मानवी जीवनाला बाहय आणि अंतरंगाला बदलवून टाकण्याचे सामर्थ्य भारतीय संस्कृतीतील विपश्यना या प्राचीन विद्येत आहे.

**विपश्यना म्हणजे काय**? – विपश्यना या शब्दाला पाली भाषेत विपश्यना असे म्हटले आहे. विपश्यना या शब्दात वि. आणि पस्सना असे

दोन शब्द आहेत. वि म्हणजे विशेष रुपाने आणि पस्सना म्हणजे जानने–पाहणे. अनुभूती घेणे किंवा अनुभव घेतलेले. म्हणून विपश्यना म्हणजे स्वतः विषयीचे सत्य. सत्य जाणण्याविषयीची विशेष अशी दृष्टी. जे साधक विपश्यनेचे दहा दिवसीय शिबीर पूर्ण करतात अशा साधकांनी विपश्यना ही ध्यानविधी शिकतांना मानवी शरीर आणि मनाचे संपूर्ण सत्य स्वतः साधक अनुभूतीच्या पातळीवर समजून घेवू शकतो. विपश्यना साधनेचा नियमित अभ्यास केल्याने मनातील राग, द्वेष, मत्सर, मोह, तृष्णा, वासना, लोभ हे विकार नष्ट होवून मनात समता, संवेदना, प्रेम, एकाग्रता प्राप्त होते.

विपश्यना साधना विधी समग्र मानवी कल्याणासाठी कोणत्याही एका जातीची किंवा संप्रदाय लोक समुह प्रदेश किंवा विशिष्ट बोलीभाषा बोलणाऱ्या व्यक्तीसाठी नाही आपल्या देशाला बुध्दिवादाची आणि बुध्दि प्रामाण्यवादाची एक दिर्घ परंपरा आहे. जे लोक तर्काच्या बुध्दीच्या सद्सद्विवेकाच्या आणि निसर्ग नियमाच्या आधारावर बोलतात त्यांना तत्कालीन भाषेमध्ये बुध्द, भगवान, तथागत, तपस्वी असे शब्द वापरुन ओळखले जात असे. अंधश्रध्दा, कर्मकांड नाकारुन अनुभवाच्या पातळीवर प्राप्त होणारी वैज्ञानिक विपश्यना साधना 2600 वर्षापूर्वी तथागत गौतम बुध्दांनी शोधून काढलेली साधना विधी आहे. तथागत गौतम बुध्द हे आजच्या विज्ञानाच्या भाषेत सांगायचे झाले तर ते एक वैज्ञानिक किंवा संशोधक होते. तथागत बुध्दानी अखिल मानवाला दुःखमुक्त करण्यासाठी चार आर्य सत्य आणि आठ अष्टांगीक मार्ग यांची शिकवण दिली. चार आर्यसत्यामध्ये दुःख, दुःखसमुदाय, दुःखमुक्ती आणि दुःख नष्ट करण्याचा अनुषंगीक मार्ग यामध्ये शिल (चारित्र्य), समाधी (साधना विपश्यना) प्रज्ञा (प्रत्यक्ष ज्ञान किंवा अनुभवाच्या पातळीवरील ज्ञान)

विपश्यना म्हणजेच मनोविश्लेषणाची मन पवित्र, शुध्द करण्याची साधना होय. याप्रमाणे प्रत्येक व्यक्ती आपले शरीर निरोगी ठेवण्यासाठी शारीरिक व्यायाम करुन शरीर निरोगी ठेवतो. त्याप्रमाणे मनाला निरोगी ठेवण्यासाठी मनाचा व्यायाम करणारी साधना विधी म्हणजेच विपश्यना होय.

जागतीक आरोग्य संघटनेने व्याख्या करतांना असे नमूद केले आहे की जो व्यक्ती शरीराने व मनाने निरोगी आहे अशा व्यक्तीला सुदृढ किंवा सक्षम असे म्हटले आहे.

विपश्यना या साधनेमध्ये मानवी मन प्रमुख आहे. शरीरावर होणाऱ्या प्रतिक्रिया या मनावर होणाऱ्या माध्यमातून निर्माण होतात. कोणतीही कृती करतांना मनात असलेला भाव हा कृतीतून व्यक्त होतो. तो भाव मनातून नसेल तर आपण त्या व्यक्तीला नाटकी ठरवतो. राग व्यक्त करणे, मारण्याची क्रिया करणे किंवा आपुलकी दाखविणे, सद्भावना दाखविणे आधी मनात निर्माण व्हावे लागते. नंतर ती शरीराच्या माध्यमातून प्रकट होत असते.

अंधश्रध्दा ठेवण्यास बौध्दधम्म सांगत नाही. स्वतः विचार करा प्रतिती पहा. खात्री करुन हया आणि मग स्वतःच्या अनुभवाने. जगता दुःख आहे. त्या दुःखाचा नाश केला पाहिजे तो नाश करण्याचे उपाय मनुष्याच्या हातात आहे. हे दुःख नाहिसे करण्यासाठी दहा दिवस साधना करण्यासाठी शिबीरात भाग घेतला पाहिजे. पहिले तीन दिवस आता पान सतिचा अभ्यास करावा लागतो. हा अभ्यास म्हणजे सहपणे येणारा नाकाद्वारे श्वास. शुध्द श्वासाने मन एकाग्र होण्यास मदत होते. श्वास हाच आता पान सति मध्ये प्रमुख असतो. चौथ्या दिवशी विपश्यना साधना शिकविली जाते. या विधीमध्ये कायानुपश्यना, वेदनानुपरस्पना, चिंतानुपरस्पना आणि धम्मानुपरसन्ना म्हणजेच टाळूपासून पायाच्या टोकापर्यंत शरीरात काय अनुभव होत आहे तो तटस्थपणे पाहणे. त्यावर कोणतीही प्रतिक्रिया न देता जसे आहे ते पाहत राहणे. दहाव्या दिवशी मंगल मैत्री शिकविली जाते. मंगल मैत्री म्हणजे मनुष्य असो कि प्राणी पृथ्वीवरील असंख्य जीव–जंतू बद्दल मैत्रीभाव निर्माण करणे हा मुख्य हेतु या विधीचा आहे. दहा दिवस पूर्ण आर्यमौन पालन करावे लागते.मंगल मैत्री झाल्यानंतर दहा दिवस मौन पाळलेले ते सुटते. साधकांसोबत गप्पा मारण्याची अनुमती मिळते. प्रत्येक साधक आलेला अनुभव कथन करतो. अगदी हलक–हलक वाटते. पूर्ण शांती मिळते. विपश्यनेच्या माध्यमातून मनावर संस्कार होतात. दहा दिवसात पाच शिलाचे पालन होत असल्याने साधना बळकट होते. ही पाचशिल साधनांचा पायाच आहे. ही पाच शिले म्हणजे 1) मी खोटे बोलणार नाही 2) मी हत्या करणार नाही 3) मी चोरी करणार नाही 4) मी व्यभिचार करणार नाही 5) मी नशापत्ता करणार नाही. या पाच शिलाचे मौन असल्यामुळे व तेथील वातावरण प्रसन्न असल्यामुळे कोणतेही शिल भंग होत नसल्याने साधनेला बळ प्राप्त होते ज्या ठिकाणी विपश्यना केंद्र आहेत त्या ठिकाणी निःशुल्क साधकाला शिबिरकाळात मोफत निवासव्यवस्था, मोफत भोजन सुविधा पुरविल्या जातात. जे साधक शिबीर संपल्यानंतर दान देतात अशा साधकाच्या दानातून हे शिबीर भरविली जातात. शासन किंवा सेवाभावी संस्था अशा कोणत्याही संस्थेकडून आर्थिक मदत घेतली जात नाही.

**विपश्यना शिबिर केल्यानंतर साधकांवर होणारे परिणाम** : 1) मनावरचा ताण कमी होऊन मोठया प्रमाणावर मनःशांती मिळते. 2) शारीरिक, मानसिक स्तरावर बदल होतो. शारीरिक, मानसिक विकार नष्ट होण्यास मदत मिळते. रोगापासून मुक्ती मिळते. 3) विपश्यना साधने मुळे सत्यप्रिय होतात. 4) भुतकाळ, भविष्यकाळाची चिंता सोडून साधक वर्तमानकाळात लक्ष केंद्रित करतात. 5) नशेपासून सुटकारा मिळतो. 6) विपश्यनेमुळे कार्यकुशलतेमध्ये वाढ होते. स्मरणशक्ती, अनुशासन व आत्मविश्वास या गुणामध्ये वाढझालेली दिसून येते. 7) साधनामुळे विकारांचे क्षय होत जातो. दुषित स्वभावामुळे, तृष्णा, अहंकार, आसक्ती, कामना, अतृप्तीमुळे दुःखाचे कसे संवर्धन होते त्यामुळे शरीरावर कोणत्या प्रकारच्या संवेदना निर्माण होतात त्या उमटलेल्या संवेदनाप्रती सजक राहून समता ठेवून विकारापासून कसे दूर राहता येईल हे शिकल्यामुळे दुःखाचे निवारण होते. 8) विपश्यना साधना वस्तुस्थितीचा सामना करण्याचे शिकविते. क्रोध अथवा दुसरा विकार आला तर त्याला यथाभूत पाहायचे, पाहत राहिल्याने तो विकार त्याची शक्ती क्षीण होत जाते, मन स्वतः शांत होते. प्रकृतीचा एक नियम आहे

की जेव्हा–जेव्हा मनात विकार जागेल तेव्हा आपण अंशात होतो. हया विकारापासून छुटकारा होताच अशांती आपोआप नष्ट होते. मनात काही विकार आले तर स्वाभाविक श्वासाची गती तेज होते. त्यामुळे शरीरावर, अंग प्रत्ययावर  सुक्ष्म स्तरावर कुठल्या न कुठल्या प्रकारचा जीव रासायनिक प्रक्रियाजन्य संवेदना निर्माण होते. हया दोघांकडे तटस्था भावाने बघितल्याने मनातला विकार कमी होण्यास मदत होते. हे विपश्यना साधनेमुळे लक्षात येते. त्यामुळे दुःख होत नाही. 9) विपश्यनेमुळे राग, द्वेष, मोह पासून उत्पन्न होणाऱ्या चित्ताला निर्मळ बनविते. 10) विपश्यनेमुळे नशा बंद होते. पंचशिलाच्या पालनामुळे जीवनात शांतीचा अनुभव येत जातो.

11) जुआ–पत्ते या व्यतिरिक्त भांग, गांजा, तंबाखु, मादक पदार्थाचे व्यसन मुक्त होतात. बुध्दांच्या सहवासात आल्याने बदल घडतो. बुध्दांच्या सान्निध्यात व त्यांच्या सहवासात आल्याने क्रुर माणसांमध्येही बदल घडतो.

**कारागृहात विपश्यना कशी आली**? :– मा. आचार्य सत्यनारायणजी गोयनका भारतात आल्यानंतर जवळपास एक वर्षानंतर ''राष्ट्रभाषा प्रचार समितीचे मानद मंत्री श्री. रामेश्वरलाल दुबे यांना भेटायला वर्धा येथे गेले. कारण त्यांनी बर्मा मध्ये लिहिलेल्या पुस्तकांना मान्यता मिळावी. वर्धा येथील गांधीच्या सेवाग्राम आश्रमात गुरुजींना ते घेवून गेले. तिथे गांधीजीच्या सुन श्रीमती निर्मला गांधीला भेटून विचार–विनिमय केला. त्यांनी पवनार आश्रम येथील विनोबा भावे यांना भेटण्याचा कार्यक्रम ठरविला.गुरुजी व विनोबाजी मध्ये बातचीत झाली. अर्थातच चर्चेमध्ये महामानव गौतम बुध्दानी शोधून काढलेली विद्या विपश्यपने संदर्भात चर्चा झाली. ती म्हणजे विपश्यना प्रत्येक मानवाला कशी फायदेशिर आहे

सुख–शांती चा अनुभव येतो. क्रोध नष्ट होतो. विनोबाजी म्हणाले विपश्यना विद्येची उपयुक्तता पडताळून पाहण्यासाठी जे मुल अनुशासन पाळत नाही. जे आहेत त्यांना सुधारता येईल का? आणि जेलमधील खुंखार कैदी यांचे हृदय परिवर्तन होईल का? तेव्हाच मी खऱ्या अर्थाने विपश्यना हया ध्यान विधीला मानेल. हे आव्हान गुरुजींनी स्विकारले व त्यांना सांगितले तुम्ही शिबीर लावा. मी शिबीर घेवून परिवर्तन घडवून आणेल. काही कारणांमुळे व काही नियमांमुळे जेलमध्ये त्यावेळी शिबीर घेता आले नाही.परंतु बिहार मधील बोधगया येथील बगहागांव मध्ये समन्वय आश्रम द्वारा समन्वय विद्यापीठ येथील मुलांचे शिबीर घेतले. शिबीर घेतल्यानंतर मुलांमध्ये आश्चर्यकारक परिणाम आले. यातून महात्मा गांधीजींची सुन श्रीमती निर्मला गांधी प्रभावित झाल्या. त्यांनी सेवाग्राम मध्ये गांधीजींच्या सहयोगीसाठी एक शिबीर लावले. त्यामुळे ते सर्व संतुष्ट व प्रसन्न झाले.

सन 1976 मध्ये राजस्थान सरकार हया विपश्यना विद्येच्या परिणामाने प्रभावित होवून जयपूरच्या राजस्थान पोलीस अकादमीने पोलीस कर्मचाऱ्यांकरिता 27 जानेवारी ते 6 फेब्रुवारी 1976 ला एक शिबीर लावले. त्यामध्ये 93 पोलीस अधिकाऱ्यांनी भाग घेतला. विपश्यनेमुळे सर्व अधिकारी प्रभावित झाले. त्यानंतर सरकारला जेलमध्ये विपश्यना करण्यासाठी उत्साह झाला. त्यामुळे जेलमध्ये शिबीर लावण्याकरिता मंजुरी मिळविणे सोपे गेले. 9 एप्रिल 1975 ला जयपूर मध्ये सवाई मानसिंग स्टेडियम मध्ये शिबीर लावले. त्या शिबीरात राजस्थान सरकार मधील तत्कालीन गृहसचिव श्री. रामसिंग सपत्नीक सामील झाले. त्यांना वाटले की, ही विद्या अपराधी कैदयांना त्यांच्या मनावर मोठया प्रमाणावर प्रभाव पाडू शकतो. त्यामुळे त्यांनी उच्च स्तरावर बोलणी करण्याची जबाबदारी स्वतः घेतली. त्याचा परिणाम म्हणून जयपूर च्या सेंट्रल मध्ये पहिले शिबीर 4 जानेवारी 1977 ला लागले. त्याचा परिणाम म्हणून इतर जेल मध्ये शिबीर लावणे सोपे गेले.. भारतातच नाही तर विदेशी जेलमध्ये सुध्दा शिबीर लावण्यात आले.

**भारतातील कोणकोणत्या कारागृहात विपश्यना शिबीर घेण्यात आले**? :– 1994 हे वर्ष महत्त्वाचे मानले जाते. किरण बेदीच्या नेतृत्वात दिल्ली मध्ये तिहार जेल मध्ये एक हजार कैदयांनी दहा दिवसाच्या शिबीराचा अभ्यास केला. त्यामध्ये आतंकवादी, उग्रवादी सुध्दा होते. कैदयासोबतच 23 जेल कर्मचारी अधिकाऱ्यांनी शिबीराचा लाभ घेतला. दहा दिवस शिबीराचे नियमाप्रमाणे पालन केल्यामुळे कैदयाच्या व्यवहारावर मोठया प्रमाणात मानसिक परिवर्तन घडून आले. तेथील प्रशासनाला हा फरक तात्काळ जाणवला. त्यामुळे तिहार कारागृहात एक विपश्यना केंद्र सुरु केले. गुरुजींनी त्या केंद्राला ''धम्मतिहार'' हे नाव दिले.

जेलमधील कैद्यांनी दहा दिवसाचे शिबीर केल्यामुळे त्यांच्यात अभुतपूर्व बदल दिसून आला. त्यामुळे मध्य प्रदेशातील रतलाम जेल, तसेच भोपाळ आणि जबलपूर सेंट्रल जेल मध्ये शिबीर लावण्यात आले. गुजरात मधील बहुतेक जेल मध्ये शिबीराचे आयोजन करण्यात आले. त्याचा चांगला परिणाम दिसून आला. अहमदाबादची साबरमती जेल, बडोदा, सुरत व राजकोट या जेलमध्ये शिबीर घेण्यात आले. पंजाब मधील संगरुर सेंट्रल जेल मध्ये 14 ते 25 मार्च 2001 ला ला शिबीर घेण्यात आले.

महाराष्ट्रात प्रथम नाशिक रोड सेंट्रल जेल 1994 मध्ये स्वतः गुरुजींनी प्रवचन देवून जागेची पाहणी करुन त्यांनी जागा निवडून तिथे विपश्यना केंद्राची स्थापना केली. त्या केंद्राला 'धम्मवटी' हे नांव दिले. अनेक कैद्यांनी विपश्यनेचा लाभ घेवून ते सन्मार्गाने लागले. त्या जेलमधील कैद्यामध्ये आमुलाग्र बदल दिसून आल्याने महाराष्ट्र कारागृह विभागातील प्रमुख कारागृह महानिरीक्षक यांनी दि.27.03.1996 रोजी एक परिपत्रक तयार करुन सर्व जेल अधिक्षकांना पाठविली. त्यात त्यांनी म्हटले की, नाशिक जेलमधील कैदयांनी विपश्यना केल्यावर त्यांच्यामध्ये आमुलाग्र बदल दिसून आला. त्यांचे मन निर्मळ व शुध्द करणारी विपश्यना साधना विद्येच्या अभ्यासाने त्यांच्यामध्ये मोठया प्रमाणावर बदल दिसून आला. त्याचा परिणाम प्रशासनावर मोठया प्रमाणावर जाणवला. प्रशासनाकडे कोणत्याही तक्रारी येत नव्हत्या. त्यामुळे प्रत्येक जेलमध्ये विपश्यना शिबीर लावण्यात यावे व तसा रिपोर्ट सादर करावा. त्यामुळे पुण्याच्या येरवडा जेलमध्ये 1999 ला 105

कैदयांचे शिबीर लावण्यात आले. तिथेही बरेच शिबीर लावले. प्रत्येक सेंट्रल जेल ला येरवडा, पुणे, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या ठिकाणी शिबीर घेण्यात आले. बँगलोर, कर्नाटकच्या सेंट्रल जेल अधिक्षकांनी 7.2.97 ला गुरुजींना पत्र लिहून सांगितले की 17.11.94, 25.1.95 व 10.11.95 असे तीन लावण्यासाठी विनंती केली. प्रत्येक शिबीरामध्ये 60 कैदयांनी भाग घेतला. शिबीर झाल्यानंतर त्यांच्या चाल–चलन व व्यवहारात व प्रशासनात मोठया प्रमाणावर परिवर्तन झाल्याचे दिसून आले. हैद्राबाद सेंट्रल जेलमध्ये नियमित शिबीर लागत होते, त्याचप्रमाणे जयपूर, तामिळनाडूच्या जेलमध्ये शिबीर लावण्यात आले. विदेशामध्ये सुध्दा नेपाळ, ताईवान, इग्लंड व अमेरिका या जेलमध्ये विपश्यनेचे प्रयोग सुरु आहेत.

विपश्यनेचा अनेक चांगले परिणाम दिसू लागल्यावर महाराष्ट्र सरकारने आपल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना शासनाच्या वित्त विभागाद्वारे 10.05.1996 ला एक आदेश प्रस्थापित झाला. तयामध्ये सरकारी अधिकारी, सचिव, उच्च श्रेणीय अधिकाऱ्यांना, कर्मचारी विपश्यना ध्यान केंद्रात बसतील त्यांना 14 दिवसांची विशेष रजा दिली जाईल. बरोबर जाण्या–येण्याचाही खर्च दिला जाईल. याच प्रकारचा निर्णय, मध्यप्रदेश, कर्नाटक, राजस्थान, आंध्रप्रदेश सरकारने जी.आर. काढून कर्मचारी व अधिकाऱ्यांना विपश्यना ध्यानविधीचा लाभ मिळवून दिला. या ध्यान विधीचा लाभ चांगल्या प्रकारे मिळाला. त्यांच्या कार्यक्षमतेत वाढझाल्याचे दिसून आले.

जेव्हा शिक्षण विभागामध्ये विपश्यनेचा प्रयोग झाला, शिक्षणक्षेत्रामध्ये अद्भूत क्रांती झाली. शिक्षकांच्या कार्यकुशलतेमध्ये वाढझाली. विद्यार्थ्यांमध्ये स्मरणशक्ती अनुशासन व आत्मविश्वास या गुणांमध्ये वाढझाली. त्यांच्यात चिंतन–मनन मध्ये वाढझाली. छोटया वयात विद्यार्थ्यांमध्ये नैतिकतेचे बीज पडले. त्यामुळे मानवजातीची भावी पिढी सुख–शांती व सौदार्याने जीवन जगतील. तसंच रोगी व्यक्तींना विपश्यनेच्या शिबीरातून खूप लाभ मिळाले.

**कारागृहात विपश्यना साधना विधीची खरी गरज** : कारागृहात येणारे कैदी हे व्यसनी असतात. एखादा व्यसनी नसेल तर त्याला व्यसन लागण्याचे ठिकाण म्हणजे कारागृह. अंमली पदार्थाचा दुरुपयोग किंवा मादक पदार्थाचे सेवन व्यक्तीला खात्रीने गुन्हेगाराच्या मार्गावर घेवून जाते. मादक पदार्थाच्या सेवनामुळे मनावर ताबा राहत नाही. त्यामुळे कामातले कौशल्य आणि विचारशक्ती नष्ट झाली तर किंवा आपली व्यसनाची सवय चालू राहण्यासाठी त्या व्यक्तीला हमखास गुन्हयाकडे वळावे लागते.

तुरुंगात येणाऱ्या कैद्यांपैकी बहुसंख्य कैदी समाजातल्या आर्थिकदृष्टया दुर्बल, गरीब वर्गातून आलेले असतात. या लोकांजवळ कोणतेही कौशल्य नसते. त्यामुळेच ते समाजात कोणतेच स्थान निर्माण करु शकत नाही. त्यांच्यात नकारात्मक आणि गुन्हेगारी वृत्ती ताबडतोब वाढीस लागल्यामुळे ते अतिक्रुर–वाईट मार्गाकडे जातात. तुरुंगात जाणारा त्यांचा काळ चांगला गेला नाही तर ते पुन्हा मोठे गुन्हेगार होतील. प्रत्येक गुन्हेगाराचे निरीक्षण करुन त्यांच्या केसेस समजून... सराईत गुन्हयाकडे वळतील. कारागृहात आल्यावर त्यांना कायदयाचेही भरपूर ज्ञान मिळते. बरेच कलमे त्याची पाठ होतात. त्यामुळे तो सराईत गुन्हेगार होवू शकतो हे वेळीच टाळायचे असेल तर कारागृहात त्यांच्या मनावर संस्कार करणारे केंद्र निर्माण करणे गरजेचे आहेत. हे संस्कार चांगल्या प्रकारे मनाची मशागत करणारी साधना फक्त विपश्यना हे कार्य करु शकतील.

कैदयांना शिक्षण, आत्मविकास आणि इतर कौशल्याची संधी सर्वात प्राधान्याने उपलब्ध करुन देणे हे कोणतयाही सरकारचे व तुरुंग व्यवस्थापनाचे आद्य कर्तव्य आहे. कारागृहात कैदी जो काळ व्यतीत करतात तो चांगला तऱ्हेने जावा ही कारागृहाची व शासनाची जबाबदारी आहे. हा काळ जर सुधारणांसाठी माणुसकीने वापरला गेला नाही तर निश्चितच कैदयांच्या मनाचेही गुन्हेगारीकरण होवून जाईल. अंमली पदार्थ सेवना पाठोपाठ गुन्हेगारी येते किंवा गुन्हेगारी पाठोपाठ अंमली पदार्थाचे सेवन येते याची जाणीव झाली तर गुन्हेगारी रोखण्यास खूप मदत होईल.कारागृहात दुसरा महत्त्वाचा प्रकार म्हणजे धुम्रपानाचा, कारागृहात विरंगुळा म्हणून वेळ जावा म्हणून जास्तीत जास्त बंदी धुम्रपानाचे बळी होतात. या सर्व प्रकारातून मुक्त व्हायचे असेल तर प्रत्येक कारागृहात विपश्यना सेंटरची आवश्यकता आहे. विपश्यनेमुळे हे बदल शक्य झाले. हळुहळू कैदयांची देखील 'माणस' झाली आणि आज ते भयमुक्त जगत आहेत. महात्मा गांधींनी तर गुन्हेगारास रोगीच मानले. त्याचा रोग बरा करणारे दवाखाने कारागृहात असावे. कारागृह हे सुधारालय व्हावे अशी भूमिका ज्ञानपीठ विजेते कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांनी म्हटले आहे. तुरुंग ही अशी जागा आहे जेथे भुतकाळ विसरायचा असतो आणि भविष्यकाळ बांधायचा असतो.

कारागृहात विपश्यना केंद्र निर्माण केल्याने त्यांच्या मनावरील रोग दूर करणारे दवाखानेच निर्माण होतील तसेच कुसुमाग्रज यांच्या म्हणण्यानुसार कारागृह सुधारालय होण्यासाठी व भुतकाळ विसरण्यासाठी एकमेव विपश्यना साधनाच हे काम करु शकते हे प्रयोगातून सिध्द झालेले आहे.कैदयातील माणुसकीची भावना जागृत व्हावी असे वातावरण तुरुंगात असावे, गुन्हेगार कुणी राक्षसी वृत्तीचे प्राणी नाहीत आणि अपराधाची कारणे अनुवंशिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय बेकारी असू शकतात म्हणून गुन्हेगारांबद्दल सहानुभूती व प्रेम भाव बाळगला पाहिजे. त्यांच्याशी चांगुलपणा जोपासून त्याला विधायक मार्गाला जोडला पाहिजे असे वातावरण कारागृहात निर्माण केले तर येणारी पिढी निश्चितच चांगली निर्माण होईल.

विपश्यना साधना वस्तुस्थितीचा सामना करण्याचे शिकविते. क्रोध अथवा दुसरा विकार आला तर त्याला यथाभूत पहायचे. पाहत राहिल्याने तो विकार त्याची शक्ती क्षीण होत जाते. मन स्वतः शांत होते. प्रकृतीचा एक नियम आहे की जेव्हा केव्हा मनात विकार जागेल तेव्हा आपण अशांत होतो. हया विकारापासून छुटकारा होताच अशांती आपोआप नष्ट होते. मनात काही विकार आले तर स्वाभाविक श्वासाची

गती तेज होते. त्यामुळे शरीरावर अंग प्रत्ययावर सुक्ष्म स्तरावर कुठल्या न कुठलया प्रकारच्या जीव रासायनिक प्रक्रियाजन्य संवेदना निर्माण होते. हया दोघांकडे तटस्थ भावाने बघितल्याने मनातला विकार कमी होण्यास मदत होते. विकार जेवढा जास्त तेवढे अधिक दुःख विपश्यनेमुळे राग, द्वेष, मोह पासून उत्पन्न होणाऱ्या चित्ताला निर्मळ बनविल्याने मनात आलेला कोणताही विकार नष्ट होतो.कोणतीही क्रिया करण्याअगोदर मनात क्रिया उत्पन्न होते. मनातूनच गुन्हयाला सुरवात होते. ही सुरवातच मन नाकारल्याने पुढील घटना घडत नाही. त्यामुळे विपश्यनेमुळे अनेक गुन्हे कमी होतील एवढे मात्र निश्चित.

व्यसनामुळेच अनेक गुन्हे घडतात. नविन–नविन गुन्हे जन्म घेतात. त्यामुळे व्यसनमुक्तीसाठी 'विपश्यना;चीच खरी गरज आज आहे. आजच्या जागतीकीकरणात व गतिशील स्पर्धात्मक युगाच्या जीवन पध्दतीत ताणतणाव मुळे व्यक्ती नेहमी क्रोधीत होतो. या क्रोधामुळे आरोग्यामध्ये बाधा निर्माण होते. प्रकृतीचा नियम आहे की क्रोध निर्माण करणारा व्यक्ती क्रोधचा पहिला शिकार स्वतःच होतो. क्रोधमुळे बैचेनी निर्माण होते. म्हणून ताणतनावापासून निर्माण होणाऱ्या क्रोधाला साधक तटस्थपणे बघितल्याने क्रोध कमी होवून नविन संस्कार बनवत नसल्यामुळे सुखशांती निर्माण होते.

आजच्या धावपळीच्या जगात मुख्य आवश्यकता आहे ती म्हणजे मनाची शांती जी सर्वांना पाहिजे जो स्वतःला हिंदु म्हणो, मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, जैन वास्तविक शांती तेव्हाच मिळेल जेव्हा विकार नष्ट होतील. मन निर्मळ शुध्द होईल. अन् हे विकार शुध्द करण्यासाठी विपश्यचनेची नितांत गरज आहे.

अंगुलीमाल सारखा खुनी व्यक्ती सुध्दा बुध्दाच्या सान्निध्यात आल्याने व विपश्यनेच्या माध्यमातून तो स्वतःला बदलतो. हा इतिहास आहे. प्रत्येक गुन्हेगाराला वाटते की आपण तर एवढे खुनी नाहीत. तो बदलू शकतो आपण का नाही? तिथूनच त्यांच्यात बदलण्याची प्रक्रिया सुरु होते. त्यामुळे तो बाहेर जावून सुखाचे आयुष्य जगतो. त्यामुळे भारतातच काय पण जगातील गुन्हेगारांची संख्या नक्कीच कमी होईल. हे कैदयांच्या अनुभवाने सांगता येईल.विपश्यना साधनेने अंमली पदार्थाचे सेवन, व्यसन हे नक्कीच कमी होत असल्यामुळे गुन्हे कमी होतील. आज खरी गरज प्रत्येक कारागृहात विपश्यना केंद्र स्थापन करुन त्यांच्या मनावर संस्कार करुन गुन्हे, गुन्हेगारापासून भारत मुक्त होईल.

**निष्कर्ष** : विपश्यना साधना ही भारतील प्राचीन तथा वैज्ञानिक साधना विधी आहे. या साधनेचा दहा दिवसीय शिबीरातून साधकाला श्वासाच्या माध्यमातून मन आणि शरीर या वरील संस्कार यांचा प्रत्यक्ष अनुभव घेता येतो. तथागतांच्या अष्टांग मार्गामध्ये साधक समाधी या तत्त्वात विपश्यनेचा समावेश होतो. भौतिकशास्त्रात कार्यकारणभावाचा एक सिध्दांत आहे. कोणतीही क्रिया कारणाशिवाय होत नाही. मनात निर्माण होणारे राग, द्वेश, मोह, तृष्णा यांचे हे विकार मानवाच्या दुःखाचे मुळ कारण आहे. आजच्या चंगलवादी आणि भौतिक जगात मानवाने निर्माण केलेली हव्यासाची प्रवृत्ती मानसिक ताण–तणाव वाढविणारे आहे. त्यामुळे भारतात मनोरुग्णांचे प्रमाण वाढत आहे. हृदयरोग आणि मधुमेही रुग्णांची भारत राजधानी होवू पाहत आहे. अश्या परिस्थितीत विपश्यना साधना प्रत्येक मानवाला वाढत्या ताण–तणावाचे व्यवस्थापन सांगणारी साधना शिकविते. मनाची स्थिरता आणि अनित्यवाद या साधनेतून प्राप्त होतो. मनाची स्थिरता म्हणजे मनाची समता होय. आजच्या अनैतिक जगाला मानवाला सदाचारी बनविण्यासाठी नैतिक चरित्र संपन्न तथा गतीशील होण्यासाठी विपश्यना साधना हा महत्त्वपूर्ण तथा सम्यक मार्ग आहे. आज जगासमोर उपासमारी, कुपोषण, जातीयवाद, गरीबी, हिंसाचार, गुन्हेगारी, हुकूमशाही, दहतशावादाचा नाईनाट करायचा असेल तर या विश्वातील चराचराचा विचार करणारी विपश्यना साधनाविधी महत्त्वाची आहे. प्रत्येक मानव हे एक राष्ट्र आहे असे समजून फक्त भारतातच महासत्ता न करता प्रत्येक मानवाला सुखी, समृध्दी कसा होईल यासाठी विपश्यना साधना एक सहाय्यक मार्ग आहे.

कारागृहात विपश्यना शिबीर आयोजित केल्यानंतर बहुतेक कैदयांमध्ये लक्षणीय फरक दिसून आला. बहुतेकांनी धुम्रपान सोडले. महत्त्वाचे म्हणजे त्यांची विचार करण्याची प्रवृत्ती बदलली. त्यांच्यापैकी अनेकांनी गुन्हयाची कबुली दिली. त्यांच्या गत आयुष्याबद्दल ते खरे बोलले. यापुर्वी ते कधीही म्हणाले नव्हते आता मात्र ते म्हणतात. त्यांना त्यांच्या पापाचे क्षालन करायचे, त्यांना प्रायश्चित घ्यायचे. ताण आणि वैफल्य यातून मुक्तता झाली आहे. आता खूप मोकळे वाटते. जे आमच्या मनावर ओझे होते ते रिकामे झाल्याने मनावरील बोझ उतरल्यासारखे वाटते. कारागृहात आल्याने कुणामुळे आलो, कुणी जबानी दिली या संदर्भात दिवसरात्र विचार करुन बाहेर जावून त्याला धडा शिकवायचा. त्याने खोटी साक्ष केल्याने मला शिक्षा झाली त्यामुळे त्याचा काटा काढायचा हेच मनन आणि चिंतन व्हायचे. त्या संदर्भात विपश्यना केल्याने मनात प्रेम निर्माण झाले. ज्याच्याविषयी घृणा होती, तिरस्कार होता, बदला घेण्यासाठी इच्छा होती या सर्वांविषयी आपुलकीची, प्रेमाची भावना निर्माण झाली. त्यामुळे एवढया वर्षापासून आम्ही तणावात होतो त्या तणावातून मुक्त झाल्याने हलकं–हलकं वाटतं. शारीरिक, मानसिक बदल झालेत, अनेकांची डोकेदुखी, पित्त, प्रकृती नाहीसे झाल्याने आजारावर औषध मिळाले. बऱ्याच कैदयानी भुतकाळ, भविष्यकाळबद्दल विचार सोडून वर्तमानात जीवन जगायला लागले. बरेच कैदी नियमित ध्यान करायला लागल्याने त्यांच्यात आमुलाग्र बदल दिसून आला.


संदर्भ

1. https:/www.dharma.org/mr..../vipassana.
2. गायकवाड लक्ष्मण – बुध्दाची विपश्यना
3. पवार एस. डी. –विपश्यना : काय सत्य काय असत्य?
4. डॉ. सी. फयान ज्याम – विपनश्यना
5. आर. ए. खिल्लारे – अनुवादक–प्रकाशक : भिक्कु विशुध्दानंद बोधी, प्रज्ञा प्रसार धम्म संस्कार केंद्र, बुध्दलेणी, औरंगाबाद.

# पक्षांतराचे लोकशाहीवर होणाऱ्या परिणामांचे अध्ययन'

**डॉ. दीपक दत्तराव कोटुरवार**, प्राचार्य, शिवशक्ती महाविद्यालय बाभुळगांव, जि. यवतमाळ

**प्रस्तावना :–** 15 ऑगस्ट 1947 रोजी जरी भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले असले तरी खऱ्या अर्थाने 26 जानेवारी 1950 पासून लोकशाहीचा उदय झालेला आपणास दिसून येतो. 1952 साली सर्वप्रथम लोकांनी निवडणूकीच्या माध्यमातून आपले लोकप्रतिनीधी निवडून दिले व 1952 रोजी लोकप्रतिनीधीचे शासन बनले आणि तेव्हापासून भारतीय राजकीय व्यवस्थेनी लोकशाही विचारसरणीचा स्विकार केला. राजकीय व्यवस्थेचे संचलन हे लोकनिर्वाचित प्रतिनीधीकडे आले. पुढे लोकप्रतिनीधीच्या हया संघटनांना राजकीय पक्षाचे स्वरूप प्राप्त झाले आणि लोकमताचा कौल जाणून घेण्याकरीता राजकीय पक्ष हे प्रभावी माध्यम म्हणून पुढे आले. भारतीय लोकशाही राजकीय व्यवस्थेचा विचार केला तर राजकीय पक्ष हे आत्यंतीक महत्वाचे ठरतात. कोणतीही लोकशाही राजकीय व्यवस्था ही राजकीय पक्ष विरहीत असूच शकत नाही. लोकमताला अभिव्यक्त करण्याचे महत्वाचे कार्य हे राजकीय पक्ष करीत असतात. स्वराज्याचे रूपांतर सुराज्यात करण्याची शपथ घेणाऱ्या राजकीय मंडळीने वेगवेगळया विचारसणीच्या आधारावर राजकीय पक्षांची उभारणी केली परंतु लवकरच राजकीय भूमिकांचा वैचारीक पायाच मुक्त झाला. विचारसरणी व भुमिका यांच्यातील तारतम्य हरपून वैयक्तिक महत्वाकांक्षा, वैयक्तिक लाभाला महत्व आले. पद, प्रतिष्ठा, व सत्तेस अतोनात महत्व द्यायला लागले. पुढे याचाच एक परिणाम म्हणून लोकप्रतिनीधीच्या घोडेबाजाराला सुरूवात झाली. अर्थातच पक्षांतर प्रवृत्ती बळावू लागली. आज घडीला पक्षांतर हे मनोरंजनाचा व कुतुहलाचा विषय बनला आहे. कोणीही, केव्हाही आणि कोणत्याही पक्षात जावे व त्याचप्रमाणे स्वतःच्या मनाप्रमाणे त्या पक्षात घडामोडी घडत नसतील व निर्णय प्रक्रियेत आपल्याला सहभागी करून घेतले जात नसेल तर अशावेळी तत्व, विचार, ध्येय आणि निष्ठा यांचे काडीमात्र सोयरसुतुक न बाळगता दुसऱ्या पक्षाचा मार्ग स्विकारवा अशी एकुण परिस्थीती निर्माण झाली. मार्च 1967 ते मार्च 1971 या कालावधीत एकुण 32 सरकारे कोसळली. मार्च 1971 नंतर शेकडा 50 प्रतिनिधींनी आपल्या पक्षाची लेबले बदलली. राजीव गांधी यांच्या कार्यकाळात पक्षांतरबंदी कायदा केला. त्या कायद्यानुसार व्यक्तीगत पक्षांतरावर बंदी घातली गेली असली तरी पक्षातील 1/3 पेक्षा जास्त लोकांनी पक्षांतर केल्यास ती फुट समजण्यात आली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पक्षांतरास चालना मिळाली. वास्तविक पाहता पक्षांतराच्या माध्यमातून सामान्य जनतेच्या व मतदारांच्या भावनांची व आशा आकांक्षेची खिल्ली उडविली जाते. याचाच अर्थ या पक्षांतर प्रवृत्तीचे मानवी जीवनावर जेवढे परिणाम वाईट पडतात तेवढेच परिणाम लोकशाही शासन व्यवस्थेवर सुद्धा पडतात.

**लोकशाही शासन व्यवस्थेवर पक्षांतराचा परिणाम :–** पक्षांतरामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा परिणाम हा लोकशाहीवर पुढीलप्रमाणे होतो.

**अ) गुन्हेगारी करणाऱ्याला प्रोत्साहन :–** लोकशाही शासनव्यवस्थेत लोकनिर्वाचीत प्रतिनीधी निवडणूकीच्या माध्यमातून निवडून येऊन शासन कारभार करतात. लोकशाहीचा वापर स्वबुद्धीनुसार करून गुंडप्रवृत्तीचे प्रतिक लोकांना दर्शवितात. पैसा मिळविण्याच्या छंदामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीने लोकशाहीत वावरतात. एकुणच लोकशाहीमध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना गुन्हे करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे काम पक्षांतर प्रवृत्तीचे लोक करतात.

**ब) राज्यपालाचा राजकारणातील हस्तक्षेप वाढला :–** लोकशाहीच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या माध्यमातून जे लोकप्रतिनीधी निवडून येतात त्यांच्यातील बहुमताच्या आधारे जेव्हा सरकार बनते तेव्हा जर पक्षांतर प्रवृत्ती बळावली अशावेळेस राज्यसरकारचा घटनात्मक प्रमुख असलेला राज्यपाल हा नेहमी राज्यस्तरीय सरकारांवर पक्षांतर प्रवृत्तीच्या परिस्थितीत हस्तक्षेप करीत असतात. याच पक्षांतरामुळे राज्यात राजकीय अस्थिरता निर्माण होते. ती स्थिर करण्यासाठी राज्यपाल नेहमी राजकीय हस्तक्षेप करीत असतात.

**क) धर्मनिरपेक्षता हे मुल्य संकटात येतेः–** भारताने भारतीय राजकारणात धर्मनिरपेक्षता अंगिकारली आहे. परंतु लोकशाही शासनव्यवस्थेत असलेली धर्मनिरपेक्षता ही पक्षांतर प्रवृत्तीमुळे धोक्यात येत असते आणि त्यामुळे लोकशाहीच्या कारभारावर याचा मोठा परीणाम होतो.

**ड) निवडणुकांच्या प्रमाणात वाढ होतेः–**लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या लोकप्रतिनीधी मार्फत जर वारंवार पक्षांतर प्रवृत्तीचे वर्तन होत असेल आणि अस्तित्वात असलेले सरकार जर अल्पमतात येत असेल त्यामुळे वारंवार निवडणूका हया घ्याव्या लागतात, निवडणूका घेणे हे निवडणूक आयोगाचे काम असल्यामुळे हया निवडणुकांच्या प्रमाणात वाढ होते. निवडणुकींच्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे लोकशाही व्यवस्थेत व लोककल्याणकारी कामे होत नाहीत. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेवर ताण निर्माण होतो.

**इ) राजकीय अस्थिरता निर्माण होते :–** मुळात पक्षांतर करणे म्हणजे लोकशाहीला खिळ बसविणे होय. लोकमताच्या आधारावर निवडून आलेले सरकार जर पक्षांतराच्या प्रवृत्तीमुळे अल्पमतात येत असेल तर अशावेळेस राजकीय अस्थिरता निर्माण होते. अस्तित्वात असलेल्य शासनाला अर्थात सरकारला बहुमत सिद्ध करावे लागते. त्यामुळे शासनाच्या कार्याला अस्थिरता येते.

**फ) भ्रष्टाचाराला वाव मिळतो :–** पक्षांतर प्रवृत्तीचे लोकप्रतिनीधी हे नेहमी भ्रष्टाचार प्रवृत्तीला बळ देतात जर सरकार अल्पमतात येत असेल तर प्रत्येक राजकीय पक्ष हा बहुमत सिद्ध करण्यासाठी लोकप्रतिनीधींना विकत घेण्याचा, किंवा पैसे देऊन आपणाकडे आणण्याचा प्रयत्न केल

जातो. पक्षांतर प्रवृत्ती ही मुळात भ्रष्टाचार वाढविणारी प्रवृत्ती आहे. ही प्रवृत्ती वाढीस लागते व भ्रष्टाचार शिष्टाचार बनतो.

**पक्षांतराचा लोकांवर होणारा परिणाम :–** पक्षांतर हे फक्त राजकीय अस्थिरता निर्माण करते असे नव्हे तर त्या पक्षांतराचा परिणाम त्या देशातील जनतेवर अथवा लोकांवर सुद्धा होत असतो.

**1) लोकप्रतिनीधीच्या प्रामाणिकतेवर जनतेचा विश्वास राहत नाही :–** सार्वत्रिक निवडणूकीच्या माध्यमातून प्रत्यक्ष जनतेकडून लोकप्रतिनीधी हे निवडलेले असल्यामुळे त्यांच्यावर जनतेनी विश्वास दर्शविला आहे आणि जनतेने विश्वासाने निवडून दिलेले लोकप्रतिनीधी जर निवडून गेल्यानंतर केवळ स्वार्थी दृष्टीकोनातून किंवा आर्थिक लालसेपोटी पक्षांतर करीत असतील तर लोकांच्या त्यांच्यावरील विश्वास उरत नाही. एकवेळ लोकप्रतिनीधीबाबत जनतेचा विश्वास राहीला नाही तर जनता त्या प्रतिनीधीला तुच्छ लेखते व नंतरच्या निवडणूकीत त्याला मत देत नाहीत.

**2) राजकारणाप्रती जनता उदासिन :–** लोकशाही शासन व्यवस्थेतील प्रत्येक निवडणूक ही जनतेला उत्साह निर्माण करणारी असते. परंतु राजकारणात जर पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनीधीची संख्या जास्त असेल आणि राजकारणातून लोकांच्या समस्या सोडविल्या जाणार नसतील अशावेळी जनता राजकारण यांच्यापासून कोसो दूर जातात म्हणजे राजकारणाबाबत उदासिन बनते. त्याचा परिणाम मानवी जीवनावर व राजकीय परिस्थितीवर पडतो.

**3) लोकांचा राजकारणातील अल्प सहभाग :–** राजकारणात लोकप्रतिनीधी जनतेचा विश्वास नसेल तर सदैव अस्थिरता निर्माण होत असेल तर तेव्हा जनता राजकारणात पाहिजे त्या प्रमाणात सहभागी होत नाही. किंवा ''राजकारणाविषयी न बोलणे चांगले'' या उक्तीप्रमाणे जनता वागते. लोकांचा राजकीय सहभाग नसेल तर लोकशाही व्यवस्था ही डळमळीत होते. त्यामुळे लोकांचा राजकारणात अल्प सहभाग असतो.

**4) सामाजिक हिताकडे दुर्लक्ष होते. :–** प्रत्येक शासनाचा मुख्य हेतू हा समाजहित असाच असतो. परंतु राजकीय अस्थिरता ही पक्षांतर प्रवृत्तीमुळे वाढीस लागते. लोकप्रतिनीधी हे जनतेच्या कामाकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे शासनाच्या मुळ उद्देशाला बगल दिली जाते. समाजहितासाठी सरकारने कार्य करावे यासाठीच सरकारे निर्माण केली जातात. परंतु या प्रवृत्तीमुळे समाजहिताकडे दुर्लक्ष होते.

**5) जनता निवडणूकीला कंटाळते :–** पक्षांतर प्रवृत्तीमुळे वारंवार ज्या निवडणूका होतात त्या निवडणूकांना आज जनता कंटाळलेली आहे. त्यामुळे जनता निवडणूकीपासून दूर राहण्याचा प्रयत्न करते. याचाच परिणाम निवडणूकीत मतदानाची टक्केवारी कमी झालेली आहे.

**6) कुरघोडीच्या राजकारणाला बळ आले :–** पक्षांतराचा सर्वात मोठा धोका राजकारणाला निर्माण झाला आहे. एक पक्ष दुसऱ्या पक्षावर बहुमताच्या आधाराकरीता कुरघोडी करीत आहे. जसे महाराष्ट्रातील मा. श्री. राणेसाहेब यांना भाजपामध्ये होणारा प्रवेश व दिले जाणारे मंत्रिपद हे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या राजकारणावर भाजपाने केलेली कुरघोडीच आहे. याचाच अर्थ कुरघोडीच्या राजकारणात वाढ झाली आहे.

वरील सर्व बाबींचा प्रामुख्याने पक्षांतर प्रवृत्तीमुळे परिणाम झालेले दिसून येतात.

**निष्कर्षः–** एक राज्यशास्त्राचा अभ्यासक म्हणून जेव्हा विविध पुस्तकांचे व राजकीय व्यक्तींच्या प्रवृत्तीचे संदर्भातील मुद्यांवर वाचन केले, जे अवलोकन केले, त्यावरून जे सखोल अध्ययन केले, त्या आधारे पुढील निष्कर्ष निघाले. 1. पक्षांतरामुळे लोकशाही शासनव्यवस्था खिळखिळी झालेली दिसून येते. 2. पक्षांतर प्रवृत्तीच्या लोकप्रतिनीधीमुळे भ्रष्टाचारात वाढ झाली. 3. लोकप्रतिनीधीवरील जनतेचा विश्वास कमी झालेला दिसून आला. 4. भारतीय अर्थव्यवस्थेवर निवडणुकांचा भार वाढला. 5. पक्षांतर प्रवृत्तीमुळे राजकारणावरील लोकांचा विश्वास राहिलेला नाही. 6. लोककल्याणकारी कामांना खिळ बसली.


**संदर्भग्रंथ :–**

1. प्रा. रा. ना. घाटोळे, ''समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती'' मंगेश प्रकाशन, नागपूर
2. प्रा. डॉ. व्ही. एस. इंगळे, ''भारतीय राजकारणाचे दिशाहीन स्वरूप'' विश्वभारती रिसर्च सेंटर, लातूर.
3. शितोळे यशवंत, ''ग्रामविकासाची दिशा अणि पंचायत राज प्रशासन'' यशदा प्रकाशन पूणे.
4. डॉ. दीपक कोटुरवार (प्राचार्य), ''संशोधनाची मूलतत्वे'' लातूर प्रकाशन.
5. डॉ. श. गो. देवगांवकर, ''सामाजिक संशोधनाची पद्धती'' नागपूर प्रकाशन.
6. डॉ. मोहन दिवाण, प्रा. जयंत देवधर, ''भारतातील राज्यांचे राजकारण'' विद्या प्रकाशन नागपूर.

# महाराष्ट्रतील मराठा मुक मोर्चा व बहुजन क्रांती मोर्चाची एक चिकित्सा

**प्रा. डॉ. प्रदीप एच गजभिये**, नगर परीषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड त. नरखेड जि. नागपूर मो. 9421803410

**पार्श्वभूमी :–** महाराष्ट्रामध्ये जुलै 2016 ते ऑगास्ट 2017 या कालावधी मध्ये मराठा समाजातील व बहुजन समाजातील लोंकानी संघटीत होऊन अनेक मोर्चे लाखोच्या संख्येत काढले. या मोर्चांमुळे संपूर्ण महाराष्ट्रतील जनजीवन ढवळून निघाले होते. शासकीय यंत्रणेची सुध्दा दमछाक झालेली होती. विशेषतः या दोन्ही प्रकारच्या संघटनांनी जी मोर्चे काढली. ती शिस्तप्रिय कायद्याचे पालन करणारे होते. कुठलीही अनुचीत घटना घडलेली नाही. मराठयांनी काढलेली मुक मोर्च होती. तर बहुजन समाजातील अनेक संघटनांनी एकत्र येऊन जी मोर्य काढली ती बोलके मोर्चे होते. दोन्ही संघटनांनी मोर्चाचे नीवेदने जिल्हाधिकाऱ्या मार्फत शसनाला दिली यामध्ये कोपर्डी येथील बलात्काराची घटना, आरक्षण व ॲट्रासिटी या सारख्या अनेक मागण्यांचा समावेश होता. लोकामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामध्ये मोठया प्रमाणात जनजागृती झाल्यामुळे महाराष्ट्रातील वातावरण शांतप्रीय व सुरक्षात्मक राहील्यामुळे या वर्षभरातील निघालेल्या मोर्चांचे चिकीत्सक अध्ययन व्हावे या दृष्टीकोनातुन हा संशोधनात्मक लेख लिहीत आहो.

**उदीष्टये :–** कोणत्याही प्रकारचे संशोधनात्मक निबंध सादर करीत असतांना उदीष्टाशिवाय त्या संशोधनाला गती मिळत नाही. महाराष्ट्रात तीन संघटनांनी जी मोर्चे काढली त्या मध्ये जवळपास अनेक मागण्या वेगवेगळया स्वरूपाच्या होत्या. काही महत्वाच्या मागण्या त्या संघटनांनी उचलुन धरल्या होत्या. मोर्च्याची उदिष्टये – 1) मोर्चाद्वारे सरकारवर दबाव आणणे. 2) दबावाद्वारे मागण्या मंजूर करून घेणे. 3) लोकांचा जास्तीत जास्त सहभाग नोंदवीणे. 4) संविधानामध्ये दुरूस्ती करण्यास भाग पाडणे. 5) संविधानातील ॲट्रासिटी कायद्याच्या दुरूस्तीला विरोध करणे व 6) गुन्हेगाराला शिक्षा देणे. इत्यादी अनेक उदि्ष्टे निश्चित करण्यात आली.

**संघटनात्मक आधार :–** महाराष्ट्रामध्ये अहमदनगर जिल्हातील कोपर्डी या गावात जुलै 2016 मध्ये एका शाळकरी मुलीवर अनुसूचीत जाती मधील युवकांनी बलात्कार करून तीचा खुन केला यामुळे त्या परीसरातील लोकांनी गुन्हेगारांना फाशीची शिक्षा व्हावी म्हणून मोर्चा काढला गुन्हेगारांना एका आठवडयाच्या आत पकडण्यात आले होते. तरी सुद्धा राजकिय लोकांच्या दबावाने मराठा समाजातील अनेक सामाजिक संघटना, राजकीय नेते, युवक युवतींनी एकत्र येऊन पक्षभेद बाजुला सारून मराठा मुक मोर्चा काढण्याचे ठरविण्यात आले. यासाठी मराठा समाजातील लोकांनी संघटन स्थापन केले.

मराठा समाजातील लोकांनी स्थापन केलेल्या संघटनामध्ये सर्व पक्षातील आमदार, खासदार पदाधिकारी व राजकीय नेत्यांचा विशेषतः समावेश होता. यामुळे एक मोठी संघटन शक्ती निर्माण झाली. त्याचा प्रभाव विशेषतः अनुसूचीत जातीवर नंतर जमाती व ओबीसी समाजातील लोकांवर पडु लागला. लाखोच्या संख्येत मराठयांनी मुक मोर्चे काढल्यामुळे त्याचा तीव्र प्रभाव मराठेत्तर अशा अनुसूचीत जाती जमाती या समाजावर मोठया प्रमाणात पडला. लोकांमध्ये भीतीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे बहुजन समाजातील अनेक संघटनांच्या नेत्यानी, बुद्धिजीवी लोकांनी एकत्र येऊन पुणे येथे 'बहुजन समाज क्रांती मोर्चा' या संघटनेची स्थापना केली या संघटनेद्वारे महाराष्ट्रात कलुशीत व भीतीदायक वातावरण निर्माण झाले आहे. ते नाहीसे करण्यासाठी चांगल्या वातावरणाच्या निर्मीतीसाठी, शांतता प्रस्थापीत करण्यासाठी या संघटनेद्वारे मोर्चा काढण्याचे निश्चित करण्यात आले. बहुजन क्रांती मोर्चा मध्ये कुठल्याही राजकीय पक्षाचा, नेत्यांचा, खासदार, आमदाराचा समावेश नव्हता तर राज्य व स्थानिक पातळीवरील लोकांनी एकत्र येऊन या संघटनेची स्थापना केलेली होती.

तसेच काही आजी–माजी आमदारांनी, खासदारांनी एकत्र येऊन संविधान बचाव सन्मान मुक मोर्चा काढण्यासाठी संघटन निर्माण केले होते. त्यानी सुध्दा काही मुक मोर्चे काढले ते संविधानाच्या सन्मानार्थ होते. याचा जास्त प्रभाव पडलेला नव्हता. अशाप्रकारे तीन संघटनांनी मोर्चे करण्यासाठी संघटनांची निर्मिती केली.

**मोर्चे काढण्याची कारणे:–** महाराष्ट्रात यापूर्वी सुध्दा अनेक अन्याय अत्याचार झालेत. आरोपीला पकडण्यापुरते व त्याला शिक्षा व्हावी यासाठी निदर्शने, बंद, मोर्चे काढण्यात आले होते. परंतु कोपर्डी येथील घटनेमुळे लोकांच्या मनातील राग व्यक्त करण्यासाठी, अन्यायाच्या विरोधात मोठया प्रमाणात संपूर्ण जनजीवन ढवळून निघाले

**अ)** मराठा समाजातील 'मराठा मुक मोर्चे' काढण्यासाठी काही कारणे पुढील प्रमाणे आहेत. 1) कोपर्डी प्रकरणातील आरोपीला लवकरात लवकर फाशीची शिक्षा देण्यात यावी. यामध्ये मुलगी मराठा जातीतील तर आरोपी अनुसूचीत जाती मधील युवक होते. 2) अनुसूचीत जाती, जमाती अन्याय, अत्याचार प्रतीबंधक कायदा (ॲट्रासिटी) ला प्रथम समाप्त करण्यासाठी व नंतर यात सुधारणा करण्यासाठी राज्यात ॲट्रासिटी कायद्याचा दुरूपयोग होऊन राहीलेला आहे. 3) मराठयांना आरक्षण मिळण्यासाठी. 4) मराठा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, वस्तीगृहे निर्माण करूण देण्यात यावी. इत्यादी महत्वाच्या कारणांसाठी मराठयानी 'मराठा मुक मोर्चे' काढले.

**ब)** बहुजन समाजातील अनेक संघटनानी एकत्र येऊन बहुजन क्रांती मोर्चाद्वारे मोर्चे काढण्यात आले त्यातील काही महत्वाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत. ही मोर्चे प्रबोधनात्मक अशी बोलकी मोर्चे होती. 1) कोपर्डी सारख्याच अक्षम्य अपराध करणाऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी. 2) ॲट्रासिटीचा कायदा अधिक कडक करण्यात यावा. ॲट्रासिटी कायद्यासाठी स्वतंत्र न्यायालय व स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात यावी. 3) जे लोक एस.सी., एस.टी लोकांचा वापर करून ॲट्रासिटी ॲक्टचा गैरवापर करून खोटे गुन्हे दाखल करीत आहेत. त्यावर ॲट्रासिटी

ॲक्टचा (कायद्यानुसार) गुन्हे दाखल करण्यात यावे. 4) ओबीसी आरक्षणाला हात न लावता मराठयानां आरक्षण देण्यात यावे. 5) ओबीसी ची जाती निहाय जनगणना करण्यात यावी. 6) सच्चर कमीशन लागु करण्यात यावे. 7) धनगर, माना, कोष्टी व गोवारी जातीची स्वतंत्र सूची बनवून लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना आरक्षण देण्यात यावे. 8) समाजात मराठा व अनुसूचित जाती, जमाती व ओबिसी बांधवामध्ये एकता व बंधुता निर्माण व्हावी या करीता मोर्चे काढण्यात आले.

क) संविधान सन्मान मुक मोर्चा'' काढणाऱ्यानी सुध्दा वरील प्रमाणेच अनेक मागण्याचे कोरणे घेऊन मोर्चे काढली आहेत. 'बहुजन क्रांती मोर्चा' द्वारे अनेक मागण्या घेऊन मोर्चे काढण्याचे महत्वाचे कारण म्हणजे लोकांच्या मनातील संशय, संभ्रम, भितीचे वातावरण नाहीसे करण्यासाठी तसेच मराठा समाजात व अनुसूचित जाती जमाती व ओबिसी व भटक्या, अल्पसंख्याक बांधवामध्ये एकता बंधुता व समता निर्माण व्हावी म्हणून मोर्चे काढण्याचे निश्चित करण्यात आले होते.

**5) मोर्चाची व्याप्तीः–** महाराष्ट्राच्या इतिहासातील अविस्मरणीय, अशी मोर्चे होती त्याची व्याप्तीही एका जातीपूरती मर्यादीत स्वरूपाची नव्हती. तर संपूर्ण महाराष्ट्र या मोर्चाने व्यापलेला होता त्याचा प्रभाव संपूर्ण देशावर जाणवला असल्याचे दिसून येते. मराठा जातीच्या लोकांनी काढलेले 'मराठा मुक मोर्चा' मराठयापूरता मर्यादीत होता तर त्याच्या दबावाने अनुसूचित जाती जमाती व ओबीसी, भटके–विमुक्त अल्पसंख्याक समाजातील लोकांना प्रभावित केले एवढेच नाही तर दबावात ठेवले होते. शासनाला सुद्धा लाखोंच्या संख्येने दबावात आणले होते.

बहुजन क्रांती मोर्चा ने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मराठयांच्या मुक मोर्चा नंतर अहमदनगरला मोर्चा काढला तेथील प्रबोधनाने मराठयांनी जो दबाव निर्माण केला होता. तो दबाव व भितीचा वातावरण नाहीसा व्हायला मदत झाली. एकीकडे मराठा समाज सुद्धा बहुजन क्रांती मोर्चा मुळे दबावात आला. त्याच्या कार्यकर्त्यामध्ये सुध्दा वेगळा विचार निर्माण होऊ लागला. अशा प्रकारे संपूर्ण महाराष्ट्रतील जनता मोर्च्याव्दारे प्रभावीत व समाविष्ट झालेली होती. या मोर्चामध्ये महीला, पुरूष, वृद्ध, बालक युवक युवती तसेच मराठा समाजातील काही बुद्धीजीवी, राजकीय सामाजिक नेते सहभागी झाले. या मोर्चाची व्याप्ती संपूर्ण समाज व महाराष्ट्रावर होती तसेच नेतृत्व सुद्धा बहुजन समाजातील लोकांनी विशेषतः भारत मुक्ति मोर्चा यानी पुढाकार घेतला व इतर सामाजिक संघटनांनी सक्रिय सहभाग दर्शविला.

**6) मोर्चाचे नियोजनः–** कोणतेही कार्य करण्यासाठी नियोजनाची आवश्यकता असते. नियोजन केल्याशिवाय कार्य होऊ शकत नाही. म्हणून मराठा समाजातील लोकांनी व बहुजन समाजातील लोकांनी मोर्चे काढण्यासाठी नियोजन करून मोर्चे यशस्वी केले.

**अ)** 'मराठा मुक मोर्चा चे नियोजन' मराठा जातीतील अनेक लोंकानी एकत्र येऊन राज्यस्तरीय समन्वय समितीची स्थापना केली त्या अंतर्गत 1) एक प्रसिध्द समिती 2) वित समिती 3) देखभाल समिती 4) प्रसार प्रचार समिती 5) परवानगी समिती इत्यादी प्रकारच्या अनेक समित्यांची स्थापना केलेली होती. विशेषतः मराठा मुक मोर्चा मध्ये सर्व पक्षीय सर्व पक्षीय राजकिय नेते, आमदार, खासदार मंत्री स्थानीक नेते व सामान्य लोक सहभागी झाल्यामुळे त्यांना पैशाची कुठल्याही प्रकारे अडचण निर्माण झालेली नव्हती. त्याच्यांकडे मोठया प्रमाणात पैसा, गाडया व सत्ता असल्यामुळे 10–15 लाखांच्या लोकांचा समावेश प्रत्येक मोर्चात झालेला होता. उदा. सोलापूर येथे मोर्चा काढण्याकरीता जी मिटींग घेण्यात आली त्या मिटींगमध्ये अर्ध्या तासात 9 लाख रूपये जमा झाल्याची माहीती प्राप्त झाली. त्यामुळे एका मोर्चासाठी कमीत कमी 50 ते 60 लाख रूपये खर्च झालेला असावा असा अंदाज वर्तविण्यात आलेला आहे.

**ब)** बहुजन समाजातील लहान लहान संघटनांच्या लोकांनी ''बहुजन क्रांती मोर्चा'' ची स्थापना केली संपूर्ण महाराष्ट्रातील मोर्चाचे नियोजन करण्यासाठी राज्यस्तरावर एका समन्वय समितीचे स्थापन करण्यात आली या संमिती अंतर्गत 1) एक जिल्हा समन्वय समिती 2) प्रसिध्द समिती 3) प्रसार प्रचार समिती 4) देखभाल समिती 5) वित्त समिती 6) परवानगी समिती इत्यादी समित्यांची स्थापना करण्यात आलेली होती.

बहुजन क्रांती मोर्चा या समन्वय समिती कडे आर्थिक अडचन प्रामुख्याने भेडसावत होती. जास्तीचा व अंधाधुदपणे खर्च न करता काटेकोरपणे कमी रक्कमेत खर्च करून यांनी सुध्दा 5 ते 10 लाखांच्या लोकांचे मोर्चे काढण्यात आले. काही जिल्हयातील मोर्चात 10 ते 15 लाख लोक असल्याची शक्यता होती. यांनी काढलेले मोर्चे सुध्दा यशस्वी झाले.

विशेषतः मराठा मुक मोर्चे व बहुजन क्रांती मोर्चे लाखोच्या संख्येत यशस्वी झालेत यांनी शिस्तप्रीय कायद्याच्या चाकोरीत, प्रशासनाला मदत केली तसेच शासनाला सुद्धा सहकार्य केले. कुठलाही अनुसूचीत प्रकार घडला नाही.

**7) मोर्चाचे नेतृत्व :–** या मोर्चाचे नेतृत्व सामुहीक स्वरूपाचे होते. वरवर नेतृत्वहीन असल्याचे वाटत होते परंतू त्यांच्या समाजातील राजकीय सामाजिक नेत्याचे नेतृत्व व मार्गदर्शन मिळाले होते.

मराठा मुक मोर्चाचे नेतृत्व त्यांच्या जातीतील राजकीय नेत्यानी केले होते. मोर्चाच्या समोर युवती, महीला, युवक, वृद्ध आणि शेवटी आमदार, खासदार, मंत्री होते. या मोर्चाचे आकर्षक बॅनर, नारे लावलेल्या पट्टया घेऊन लोक एकत्र गोळा झालेले होते नंतर दोन–दोन च्या रांगेमध्ये मोर्चा काढला जात होता. निवेदन देण्यासाठी पाच मुली फेटे बांधुन असायच्या व मुलीच शासनाला निवेदन देत होत्या. त्यामुळे ही एक आणखी वेगळी पद्धती प्रथम लोकांनी बघीतली संपूर्ण मुक मोर्चा असायचा. त्यामुळे कुठलेही प्रबोधन लोकांचे झाले नाही. नवीन नेतुत्व निर्माण करता आले नाही. प्रबोधन नसल्यामुळे मोर्चातील सामान्य मराठा जातीतील लोकांच्या बोलण्याची विचारांची संधीच मिळाली नाही. त्यामुळे बहुजन समाजातील लोकाबद्दल काय वाटत आहे याची माहीती

लोकांना फक्त मागण्याद्वारे, पेपर मिडीयाद्वारेच कळत होती त्यांचा प्रमुख नारा '**एक मराठा लाख मराठा**' हा होता.

बहुजन क्रांती मोर्चा हा बहुजन समाजातील एस.सी, एस.टी, ओबीसी, भटके–विमुक्त, अल्पसंख्याक लोकांनी काढला होता. हा मुक मोर्चा नव्हता तर बोलका मोर्चा होता. त्यामुळे लोकांच्या मनातील उद्रेक विचारांच्या माध्यमातून सर्व जनतेला एकायला मिळाला. या मोर्चाचे नेतृत्व 'भारत मुक्ती मोर्चा', बहुजनातील विद्यार्थी संघटना, व विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधीनी केलेला होता. या मोर्चामध्ये संपूर्ण बहुजन समाजातील व मराठा समाजातील काही लोकांचा समावेश होता. या बहुजन क्रांती मोर्चामुळे नविन नेतृत्व निर्माण झाले. हा मोर्चा सुद्धा संघटीत होता. युवती, महीला, मुले, तरूण, वृध्द यांचा समावेश होता. नाऱ्यांच्या माध्यमातून मोर्चाची दिशा व मागण्या तसेच नेतृत्व लोकांना कळून येत होते. कमी आर्थिक शक्ती असली तरी हा मोर्चा यशस्वी झाला. या मोर्चाचे नेतृत्व मा. वामन मेश्राम व इतर संघटनांच्या प्रतिनिधीने केले. त्यानी मोर्चाला मार्गादर्शन केले. त्यामुळे हा खऱ्या अर्थाने बहुजन समाजाचा मोर्चा होता. त्यामध्ये बहुजन समाजातील अनेक मागण्यांचा व मराठा समाजाच्या मागण्यांचा समावेश केला होता. मोर्चाला मार्गदर्शन केल्यानंतर मोर्चा काढला जाऊन शासनाला निवेदन दिले जात होते. या मोर्चाला सुध्दा पेपर व टिव्ही ने काही प्रमाणात प्रसिद्धी दिली. या मोर्चात 'एकत्र पर्व, बहुजन सर्व', 'जय जिजाऊ, जय शिवराय' अशाप्रकारच्या घोषणा देण्यात आल्या.

**मोर्चाचे परीणाम :–** मराठा जातीने काढलेल्या मराठा मुक मोर्चाची जी कोपर्डीची मागणी होती. ती जलद गतीने न्यायालयाद्वारे सुरू करण्यात आली. मराठयांच्या आरक्षणाबद्दल शासनाने संमती दर्शविली पंरतु ॲट्रासिटी कायद्यात कुठलाही बदल करण्याचे सरकारने मान्य केले नाही. त्यामुळे जाती संघर्ष पेटण्याची शक्यता होती ती बहुजन क्रांती मोर्चाने उधळून लावली. उलट मराठा आरक्षणाला, कोपर्डी घटनेतील पिडीतेला जलद न्याय मिळविण्याच्या मागणीला समर्थन दिल्यामुळे बहुजन क्रांती मोर्चाचा सरकारवर मोठा प्रभाव पडला. सरकारने ॲट्रासिटी कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्यात येऊन कुठल्याही प्रकारे बदल केला जाणार नाही. याची ग्वाही दिली. त्यामुळे मोठया प्रमाणात लोकांना बहुजन क्रांती मोर्चाचा चांगला प्रभाव दिसून आला असल्याचे आढळून आले. बहुजन क्रांती मोर्चाने तालुका पातळीवर सुद्धा मोर्चे काढुन बहुजनांना मोठया प्रमाणात सहभागी करून व सक्रिय केले बहुजन क्रांती मोर्चाने बहुजनांच्या मागण्या सोबत मराठा समाजातील अनेक मागण्यांचा समावेश केला होता त्यामुळे खऱ्या अर्थाने या बहुजन क्रांती मोर्चा चा प्रभाव महाराष्ट्रातील लोकांवर पडला.

**मूल्यमापनः–** महाराष्ट्रात जुलै 2016 ते ऑगस्ट 2017 या कालावधीत मराठा समाजाने मराठा मुक मोर्चा प्रत्येक जिल्याच्या ठिकाणी काढले. त्यांच्या काही मागण्या शासनाने मंजूर केल्या. पंरतु त्यांची ॲट्रासिटी कायद्यात बदल करण्याची व या कायद्याचा दुरूपयोग मोठया प्रमाणात होत आहे, अशी जी मागणी होती ती निव्वळ दोन समाजात जातीय तेढ निर्माण करणारी होती. ती राजकिय स्वरूपाची होती.आतापर्यत 5 टक्के मराठयांनी 95 टक्के आपल्या गरीब बांधवांचा कल्याणाचा विचार केला नाही. त्यामुळे या मोर्चाच्या माध्यमातून त्यांच्यात सामान्य लोकांमधुन नेतृत्व निर्माण करता आले नाही. या मोर्चाला अप्रत्यक्ष सरकारचा व राजकिय पक्षाचा पांठिबा असल्याचे दिसून आले. तसेच तो एक जातिपूरता मोर्चा होता.

महाराष्ट्र पोलिसांनी राज्य सरकारला सांगितले आहे की, अनु. जाती, जमाती समूहासाठी असलेला संरक्षण कायदा ॲट्रासिटीचा दुरूपयोग केल्या गेला नाही. याचा तपशिलवार रीपोर्ट आकडेवारीसह प्रस्तुत करण्यात आलेला आहे. खटला चालविण्याचे प्रमाण 5 ते 6 टक्के होते. या कायद्यातंर्गत गुन्हा नोंद करण्याच्या दरात घसरण आल्याचे दर्शविते. पोलिसांच्या अनुसार 2015–16 मध्ये या कायद्यातंर्गत शिक्षेचा दर सात टक्केपेक्षाही कमी होता. सन 2015 मध्ये अन्याय अत्याचार कायद्यातंर्गत 2304 गुन्हे नोंद केले होते. जेव्हा की 2016 मध्ये ही संख्या कमी होऊन 2149 वर आली होती असा शासनाचा गृह विभागाचा अहवालात आढळून आले.

बहुजन क्रांती मोर्चे 35 जिल्हयात तसेच संपूर्ण तालुक्यामध्ये काढण्यात आले आहे. खऱ्या अर्थाने हे बहुजन समाजातील लोकांनी काढलेले मोर्चे असल्यामुळे ते एक जातीय मोर्चा ठरले नाहीत. लोकांच्या समस्यांना वाचा फोडण्यात आल्यामुळे समाजातील समस्या सोडविण्यासाठी एकजुटीने कार्य केल्यास सामाजिक परीवर्तन करणे शक्य आहे. तसेच जाती–जातींमधील असलेली दरी कमी करता येऊ शकते. सामान्य जनतेमधुन नविन नेतृत्व निर्माण करता येऊन नविन विचार करण्याची शक्ती निर्माण करता येते. जातीय संघर्ष टाळता येऊन समाजाला जोडता येऊ शकते. सरकारी संपत्तीचे नुकसान न करता शांततेच्या मार्गाने मोर्चे काढल्या जाऊ शकतात हे मराठा मुक मोर्चा व बहुजन क्रांती मोर्चा यांनी संपूर्ण देशाला दाखवून दिले आहे.

बहुजन क्रांती मोर्चांनी मराठयांच्या अनेक मागण्यांचा व मराठा बांधवाना समाविष्ट करून राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव निर्माण करता येऊ शकतो हे दाखवून दिले आहे. म्हणुन बहुजन क्रांती मोर्चा सर्वस्वी यशस्वी ठरल्याचे आढळून येते.

---

संदर्भः–


1. दैनिक मुलनिवासी नायक, पुणे आवृती, दिंनाक 29 नोंव्हे. 2016, 4 डिसेंबर 2016, 6 जुलै 2016.
2. दैनिक लोकमत, नागपूर आवृती.
3. दैनिक पुण्यनगरी, नागपूर आवृती.
4. दैनिक सकाळ, नागपूर आवृती.

# भारतातील संघटनात्मक दबावगटांची भुमिका

**प्रा. अविनाश मा. फाळके**, सहा. प्रा. (राज्यशास्त्र), कला, वाणिज्य महाविद्यालय, राळेगाव जि. यवतमाळ

**प्रस्तावना :–** लोकशाहीत अंतर्भूत असलेल्या तत्वानुसार लोकमतांना प्राधान्य ही बाब सर्वश्रूत आहे. लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी लोकशाही संकेतानुसार काम करणे आवश्यकच नाही तर अनिवार्य अशी बाब ठरते. लोकशाहीत लोकांचे राज्य असते व लोकप्रतिनिधी हे अंतीमतः लोकांना जबाबदार असतात. त्याचबरोबर जनतेचे हे कर्तव्य ठरते की लोकप्रतिनिधीवर त्यांनी अंकुश ठेवावा. दर पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणूकीच्या माध्यमातून जनता असा अंकुश ठेवित असते. साधारणतः दर पाच वर्षानी हव्या त्या उमेदवाराला आपला प्रतिनिधी म्हणून निवडू शकतात.

लोकप्रतिनिधी जनतेचे प्रतिनिधीत्व करीत असले तरी समाजात असलेले विविध गट जसे जातीगट, धर्मगट, व्यावसायीकांचा गट, नोकरदारांचा गट, कामगारांचा गट इत्यादीचे हितसंबंध सुरक्षित ठेवतोच असे नाही. कारण प्रत्येक गटांचे हितसंबंध वेगवेगळे असतात व कधी कधी परस्पर विरोधीही असतात. अश्याप्रसंगी गटांचे हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी शासन प्रक्रियेवर प्रभाव निर्माण करुन आपले हितसंबंध सुरक्षित राखणे अपरीहार्य ठरते. आपले हितसंबंध जोपासले जावे या जाणिवेतून दबावगट निर्माण होत असतात. "दबावगट असे माध्यम आहे की, ज्यामूळे गटातील लोकांचे हितसंबंध, शासन प्रक्रियेवर आपला प्रभाव निर्माण करुन जोपासले जातात" (फादिया 644).सदस्यांच्या मागण्यांचे संकलन करुन त्यांच्या जाणीवा संपन्न करीत असतांना राजकीय सहभाग ते वाढवित असतात त्यामुळे त्यांची भुमिका राजकीय व्यवस्थेत महत्वाची ठरते. आजच्या आधुनिक लोकशाहीच्या काळात त्यांचे महत्व अनन्य साधारण आहे. दबाव गटांना नाकारुन आज लोकशाहीची कल्पना केलीच जाऊ शकत नाही.

**अर्थ :–** "समाजातील समान हितसंबंध असणारा असा गट की जो राजकीय पक्षापासून वेगळा असतो. राजकीय पक्षाप्रमाणे सत्ता संपादनाच्या स्पर्धेत सहभागी न होता सत्ताधारी आखीत असलेल्या धोरणावर आपला प्रभाव निर्माण करतात व जास्तीतजास्त हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करतात. त्याला साधारणतः दबावगट म्हणता येइल".

हितसंबंधी गट, दबावगट, व लॉबी असे तीन शब्द साधारणतः या संबंधात अनेकदा वापरले जातात. यातील महत्वाचा फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. समाजात अनेक हितसंबंधी गट असतात व ते साधारणतः असंघटीत असतात उदा. जातीजातीचे गट. हे हितसंबंधी गट शासनावर आपला प्रभाव निर्माण करु शकतात असे नाही. हितसंबंधी गट हा दबाव गट असतोच असे नाही पण प्रत्येक दबाव गट हा हितसंबंधी गट असतोच असतो. (तिजारे 277). जेव्हा हितसंबंधी गट शासनावर आपला दबाव निर्माण करतो तेव्हा त्याचे रुपांतर दबाबगटात होत असते. अनेक लोकशाही जसे अमेरीका, ब्रिटन, जर्मनी, स्विस, भारत इत्यादी देशात असे दबावगट कार्यरत आहे. अमेरीकेत दबावगटाचे प्रस्थ फार मोठ्या प्रमाणात आहे. दर दहा पैकी सात अमेरीकन हे कुठल्यातरी संस्थेशी सबंधित असतात (अर्थबोध पत्रिका 20). भारतातही अनेक दबावगट कार्यरत आहे उदा. इंटक, आयटक, कामगार सेना असे कामगारांचे दबाव गट त्याचप्रमाणे अखिल भारतीय विद्यार्थी परीषद, विद्यार्थी सेना, इत्यादी विद्यार्थ्यांच्या संघटना, शिक्षकांच्या संघटना त्याचप्रमाणे व्यापाऱ्यांच्या संघटना देशात कार्यरत आहे. लॉबी ह्या शब्दाचा अर्थ मात्र वेगळा आहे. लॉबी म्हणजे असा गट की जो केवळ कायदेमंडळाच्या प्रक्रियेवर प्रभाव निर्माण करतो. ज्यावेळेस असा एखादा दबावगट आपल्या हितसंबंधाचे संरक्षण करण्याच्या हेतूने कायदेमंडळाची कार्यवाही प्रभावित करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तो दबावगट लॉबी म्हणून कार्य करीत असतो. कायदेमंडळात मंजूर होणारे कायदे आपल्या बाजूचे असावे या साठी काही गट सक्रिय असतात. अमेरीकेत अश्या लॉबीचे प्रस्थ फार मोठ्या प्रमाणात आहे. संयुक्त राष्ट्रसंघातही आपल्या देशाचे हित जोपासण्यासाठी महासभेची कार्यवाही प्रभावित करण्यासाठी अनेक देश लॉबीच्या माध्यमातून प्रयत्न करतात.

**प्रकार :–** साधारणतः ठळक चार प्रकारचे हितसमूह प्रत्येक लोकशाही देशात आढळतात. 1) संस्थात्मक दबावगट : यात राजकीय पक्ष, धर्मपीठ इत्यादी हे संस्थात्मक दबावगट म्हणून ओळखले जातात. 2) संघटनात्मक दबावगट : यात मजूर संघटना, कर्मचारी संघटना, व्यापारी संघटना, छोटेमोठे व्यवसाय करणाऱ्या संघटना इत्यादींचा समावेश होतो. 3) असंघटीत दबावगट : काही खास कारणास्तव असे गट तयार होत असतात व उद्देश समाप्ती नंतर ते विसर्जित होतात उदा. धर्म, वंश, भाषा या आधारावर काही गट तात्पुरते निर्माण होतात व उद्देश समाप्ती नंतर नष्ट होतात. 4) अतिचारी गट : मोर्चे काढणे, निदर्शने करणे, दंगली घडवणे, लूटमार करणे इत्यादी कृत्य करणाऱ्या गटांना अतिचारी दबावगट असे म्हणतात. थोडक्यात सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करुन शासनावर दबाव निर्माण करणे व आपले हेतू साध्य करणे हे या गटाचे महत्वाचे उद्दिष्ट असते. असे गट संघटीत असतात असे नव्हे तर अश्या गटांचा उपयोग काही हितसबंधी गट स्वतःच्या फायद्याकरीता उपयोग करुन घेत असतात. भारतात असे अतिचारी गट अनेक आहे उदा. ऑल आसाम स्टुडंटस् फेडरेशन, दल खालसा, जम्मू काश्मिर लिबरेशन फ्रंट, इत्यादी.

**भारतातील दबावगटाची निर्मिती :–** भारतात दबावगटाच्या वाढीस अनेक घटक कारणीभूत आहे. एकतर 19 व्या शतकात तंत्रज्ञानाच्या विकासामूळे जलद असा औद्योगिक विकास घडून आला आणि या विकासातून अनेक प्रश्न व गरजा निर्माण झाल्या. एकंदरीत परिस्थितीतील बदलामुळे समाजासमोर आव्हान उभे राहीले व यातून अनेक हितसमूह निर्माण झाले. दुसरे असे की शासनाने स्विकारलेल्या

लोककल्याणकारी भुमिकेमुळे शासनाच्या कार्यात अतोनात वाढ झाली. राजकीय प्रश्न हे गुंतागुंतीचे बनले. विकासाचा लाभ आपल्यालाही मिळावा या उद्देशाने अनेक हितसमूहांच्या निर्मितीला चालना मिळाली. त्यातही संघटनात्मक हितसमूहाच्या निर्मितीला विशेष चालना मिळाली. वास्तविक पाहता भारतात निरक्षरता, अज्ञान व सामाजिक संसूचनाचा अभाव असून सुद्धा हितसमूहाची निर्मिती थांबली नाही हे वैशिष्ट्यं आहे. अमेरीकेच्या तुलनेत भारतात हितसमूह किंवा दबाव गटांची संख्या जास्त नाही व तेथिल दबावगटाप्रमाणे सक्रियही नाही याचे महत्वाचे कारण म्हणजे काँग्रेस पक्षाची विचारधारा, ही अनेक विचारधारेला सामावून घेणारी असल्यामुळे स्वतंत्र असे दबावगट निर्माण होवू शकले नाही. असे जरी असले तरी भारतातील दबावगटांची भुमिका महत्वाची राहीलेली आहे. गटपातळीवर व राष्ट्राच्या आधुनिकीकरण प्रक्रियेत दबावगटांची भुमिका महत्वाची राहिली आहे. मुळात भारतात दबावगटांचे आधार हे पारंपारीक आहे उदा. जाती, धर्म, वंश असे जरी असले तरी त्यांची कार्ये मात्र आधुनिक स्वरुपाची आहे. समाजात खऱ्या अर्थाने लोकशाहीला अभिप्रेत असलेले परीवर्तन गतीमान करण्यास भारतातील दबावगटाने हातभार लावलेला आहे. कामगार संघटनेच्या दबावामुळे कामगारांना चांगले वेतनमान मिळाले. त्याचप्रमाणे शिक्षकांच्या दबावामुळे आज शिक्षकांना चांगले वेतन मिळत आहे. भारतातील दबावगट लोकशाहीला आवश्यक असलेले समाजाचे एकात्मीकरण आणि दुसऱ्या बाजूला व्यक्ती व राजसत्ता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात. (भोळे 261)

**भारतातील संघटनात्मकदबावगटांची भुमिका :–**

1) **शेतकऱ्यांच्या संघटना :–** भारत हा शेतीप्रधान देश आहे. असे असूनही येथे मात्र अखिल भारतीय शेतकऱ्यांचा दबावगट निर्माण होवू शकला नाही. याचे महत्वाचे कारण म्हणजे प्रदेशपरत्वे शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे वेगळेपण होय. यात काही शंका नाही की काळाच्या ओघात लहानसहान शेतकऱ्यांचे हितसमूह निर्माण झाले. परंतू त्याचं नेतृत्व हे बाहेरील असल्यामुळे ते गट फारसा प्रभाव दाखवू शकले नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात गांधीजी व सरदार पटेल यांच्या नेतृत्वात अनेक शेतकरी चळवळी झाल्या उदा. चंपारण्य सत्याग्रह, बार्डोली सत्याग्रह, खेडा सत्याग्रह इत्यादी. 1936 साली अखिल भारतीय किसान सभा स्थापन करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर मात्र असे अनेक प्रयत्न झाले. त्यातही उत्तर प्रदेश व हरीयाणा राज्यात 90 च्या दशकात भारतीय किसान संघाचे आंदोलन महेंद्र सिंह टिकैत यांच्या नेतृत्वात चरमसीमेवर होते. टिकैत यांची ओळख ही भारतातील किसान नेता म्हणून झाली होती. भारतातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य त्यांनी केले. परंतू 1911 साली झालेल्या त्यांच्या मृत्यूनंतर मात्र किसान आंदोलनाची धार बोथट झाली. आज मात्र भारतीय किसान संघाचे शेतकरी आंदोलन चर्चेतही आढळत नाही. महाराष्ट्रात शरद जोशींनी स्थापन केलेल्या शेतकरी संघटनेने सुरवातीच्या काळात भरीव कार्य केले. 1980 मधे नाशिक भागातील ऊसाचे आंदोलन व त्यानंतर कापुस व कांदा यांच्या भाववाढीसाठी केलेल्या आंदोलनाला महाराष्ट्रात भरीव प्रतिसाद मिळाला. याशिवाय ग्रामीण शेतकरी महिला आघाडी स्थापन केली. हा देशात एकमेव अपवाद असावा. परंतू या संघटनेची कच्ची बांधणी या कारणामुळे ही संघटना आपला खास प्रभाव निर्माण करु शकली नाही. शरद जोशींच्या निधनानंतर ही संघटना नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. खासदार राजू शेट्टी यांनी पश्चिम महाराष्ट्रात उसाच्या पट्यात स्वाभिमानी शेतकरी संघटना स्थापन केली. ही संघटना शेतकरी संघटनेची एक शाखा आहे. परंतू ती पश्चिम महाराष्ट्रापुरती मर्यादित राहिल्यामुळे उर्वरीत महाराष्ट्रात तीला फारसा प्रतिसाद मिळतांना दिसत नाही. भारतातील शेतकरी हा असंघटीत असा मोठा समूह असून तो कोणत्यानकोणत्या पक्षाशी संलग्न आहे. पक्षाच्या शेतकरी प्रश्नांवर विचार व कृती करण्यासाठी शाखा अस्तित्वात असल्यातरी त्यांचे प्रश्न सोडविण्यापेक्षा पक्षाला पाठींबा सतत कसा राहील या सबंधातच पक्ष कार्यक्रमाची आखणी करतांना दिसतात. 1936 साली स्थापन झालेल्या किसान सभेचे अध्यक्ष आचार्य नरेंद्र देव आपली भुमिका स्पष्ट करतांना म्हणतात की, काँग्रेस अंतर्गत असलेली किसान सभा ही वेगळी असायला पाहिजे. पक्षाशी सबंधीत असलेली सभा आपले प्रश्न प्रभावीपणे मांडू शकणार नाही आणि घडलेही तसेच येथील शेतकरी चळवळी पक्षाशी निगडीत राहिल्यामुळे फारसा प्रभाव निर्माण करु शकल्या नाही व शेतकऱ्यांची दुरावस्था झाली. विदर्भ व मराठवाडा या भागातील शेतकरी आत्महत्या हा त्याचा ठळक पुरावा आहे.

2) **विद्यार्थी संघटना :–** विद्यार्थी वर्गाच्या जाणीवा प्रगल्भ असल्यामुळे विकसनशील देशात विद्यार्थी संघटना निर्माण होणे अपरिहार्य ठरतात. कारण स्वातंत्रलढ्याची पार्श्वभुमि त्याला असते. भारतातही स्वातंत्र लढ्यात विद्यार्थ्यांचे योगदान फार मोठे राहिलेले आहे. त्यातुनच 1936 साली पहिली विद्यार्थी संघटना 'अखिल भारतीय विद्यार्थी फेडरेशन' भारतात निर्माण झाली. स्वातंत्र्यानंतर मात्र अनेक विद्यार्थ्यांच्या संघटना निर्माण झाल्या. भारतात अश्या संघटनेची संख्या बरीच आहे. विद्यार्थ्यांचा स्वतंत्र असा दबावगट असण्यापेक्षा पक्षाने निर्माण केलेल्या विद्यार्थी संघटना भारतात पहावयास मिळतात. उदा. काँग्रेस पक्षाच्या नियंत्रणाखाली असलेली 'नॅशनल स्टुडंटस् युनियन', भारतीय जनता पक्षाशी संलग्नित 'अखिल भारतीय विद्यार्थी परिषद', साम्यवादी पक्षाच्या अधिन असेलेली 'ऑल इंडिया स्टुडंटस् फेडरेशन' तर महाराष्ट्रातील शिवसेना या पक्षाशी सबंधीत असलेली 'विद्यार्थी सेना' इत्यादी. आपले हित जोपासण्यापेक्षा पक्षाचे हितसंबंध जोपासण्याकडे जवळपास सर्वच विद्यार्थी संघटनांचा कल आहे. विद्यार्थ्यांची असलेली स्फोटक शक्ती लक्षात घेवून राजकीय पक्ष त्यांचा उपयोग मोर्चे, हिंसक आंदोलने, निदर्शने इत्यादी अतिचारी राजकारणासाठी करुन घेत असलेले दिसतात उदा. महाराष्ट्रात मराठवाड्यात कृषी विद्यापीठाची मागणी आणि विद्यापीठ नामांतराचे आंदोलन ही त्याची ठळक उदाहरणे आहेत. सध्या विद्यार्थी संघटना ह्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नाला प्राधान्य देण्यापेक्षा राजकीय पक्षाचे कार्यकर्ते म्हणवून घेण्यात धन्यता मानतांना

दिसतात. विद्यार्थी संघटनेत असलेली वैचारीक दिवाळखोरी, एकजिनसीपणाचा अभाव व दिशाहिनता त्यामुळे विद्यार्थी संघटनेचा फारसा प्रभाव दिसून येत नाही.

**3) कामगार संघटना :–** कामगार संघटनाबाबत जवळपास अशीच परिस्थिती आहे. भारतात कामगार संघटनांचे कमालीचे राजकीयीकरण झालेले आहे. कामगार संघटना ह्या राजकीय पक्षाशी संलंग्न असल्यामूळे असे घडणे अपरिहार्य आहे. साम्यवादी पक्षाच्या नियंत्रणात असलेली 'अखिल भारतीय कामगार संघ सभा' त्याच प्रमाणे काँग्रेस पक्षाच्या वर्चस्वाखाली असलेली 'भारतीय राष्ट्रीय कामगार संघ सभा' तसेच समाजवादी पक्षाशी संलंग्नीत असलेली 'हिंद मजदूर सभा' व मार्क्सवादी साम्यवादी पक्षाशी सबंधीत असलेली 'संयुक्त कामगार सभा' या चार मोठ्या कामगार संघटना भारतात अस्तित्वात आहे. या संघटने अंतर्गत इतर सर्व लहान मोठ्या संघटना समाविष्ट झालेल्या आहे. मोठ्या कारखान्यातील कामगाराच्या ह्या संघटना असल्यामुळे ग्रामीण भागातील लहान उद्योगातील असंघटीत असलेल्या कामगार वर्गाचे प्रतिनिधीत्व करतांना दिसत नाही. ह्या संघटना स्वतंत्र कामगारांचा दबावगट म्हणून कार्य करण्यापेक्षा पक्षाशी बांधीलकी असल्यामुळे जवळपास परिणामशुन्य ठरल्या आहे. डॉ. भा. ल. भोळे म्हणतात त्याप्रमाणे "राजकीय पक्षाचे सतत बदलत असलेले मध्यमवर्गीय नेतृत्व, त्यांच्यात माजलेली गटबाजी, पक्षांनी आपला हेतू साध्य करण्यासाठी त्यांचा सतत केलेला गैरवापर, तुटपुंजे आर्थिक स्त्रोत व संघटनेच्या कार्यात सरकारकडून वारंवार होणारा हस्तक्षेप त्यामुळे भारतातील कामगार चळवळ कायमची दुबळी ठरली आहे." असे जरी असले तरी त्यांच्या दबावामुळेच आज कामगाराच्या वेतनमानात सुधारणा झालेली दिसून येते. सामाजिक सुरक्षिता त्यांना प्राप्त झाली आहे. त्यांचे जीवनमान उंचावण्यात कामगार चळवळीचा वाटा फार मोठा आहे हे आपल्याला नाकारता येत नाही. परंतू हेही सत्य नाकारता येत नाही की, अमरीकेतील दबावगटा प्रमाणे येथिल दबावगट पक्ष व शासन यापासून वेगळी अशी संघटना निर्माण करु शकले नाही.

सन 1990 नंतर जागतिक रेट्यामुळे भारताला खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण यावर आधारीत नवी आर्थिक निती स्विकारावी लागली. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या तत्वावर आधारीत अर्थव्यवस्थेने असे स्वप्न दाखविले की, परकीय भांडवल भारतात येईल व त्याचा परीणाम म्हणून औद्योगीकीकरणाला चालना मिळेल. भारतात परकीय उद्योग येऊन रोजगाराच्या संधी वाढेल. सर्वत्र संपन्नता प्रस्थापित होईल. प्रत्येकाच्या हाताला काम मिळेल. गरीबी जवळपास नष्ट होईल. परंतू झाले मात्र उलट परदेशी कंपन्या स्थापन होण्याऐवजी त्यांची उत्पादने विक्रीसाठी भारतात आली याचा एकंदरीत परीणाम असा झाला की, भारतातील उत्पादने त्यांच्या उत्पादनाशी स्पर्धा करु न शकल्यामुळे जवळपास लहान उद्योग बंद पडले किंवा डबघाईस आले. त्याच बरोबर उद्योगात आलेल्या नविन तंत्रज्ञानाने कामगार कपात फार मोठ्या प्रमाणात व्हायला लागली लहानमोठ्या गिरण्या बंद पडायला लागल्या. मुंबई सारख्या महाराष्ट्राची आर्थिक राजधानी असेलेल्या शहरात अनेक कारखाने बंद झाले त्याच बरोबर अहमदाबाद, कानपूर, कोईबतूर याही ठिकाणच्या गिरण्या बंद झाल्या. या सर्वाचा एकंदरीत परिणाम म्हणून लाखो कामगार बेकार झाले व ज्या कोणाचे रोजगार टिकले त्यांच्या नोकरीचे स्वरुप हंगामी किंवा अस्थाई असे राहिले. (भागवत 131). आज ही परिस्थिती आहे की गिरणी मालक गिरणी चालू ठेवण्याऐवजी गिरणीच्या जमिनी विकण्यास प्राधान्य देत आहे. त्यामुळे आजच्या घडीला कामगार वर्गासमोर फार मोठे आव्हान उभे ठाकले आहे. असे असून सुद्धा कामगार संघटना सुस्त आहे. तुरळक आंदोलनाशिवाय फारसे त्यांच्या कडून काही घडतांना दिसत नाही.

**5) उद्योगातील संघटना :–** भारतात औद्योगिक क्षेत्रात अनेक लहानमोठ्या संघटना कार्यरत आहे. त्यापैकी 'फेडरेशन ऑफ इंडियन चेम्बर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री' ही सर्वात मोठी संघटना असून या संघटनेशी जवळपास पन्नास हजाराच्या वर लहानमोठे कारखानदार संलग्न आहे. या संघटनेची 'ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रियल एम्प्लॉयर्स' ही शाखा कार्यरत आहे. ही शक्तिशाली संघटना म्हणून ओळखली जाते. या शिवाय इंडियन चेम्बर ऑफ कॉमर्स, ओरिएन्टल चेम्बर्स ऑफ कॉमर्स, याही संघटना कार्यरत आहे. इतर क्षेत्रातील दबावगटाच्या तुलनेत या क्षेत्रातील दबावगट पैसा, सत्ता, आणि शिस्तबद्ध संघटन यामुळे अधिक संघटित व शक्तिशाली आहे. आपले हेतू साध्य करण्यासाठी विविध मार्गाचा अवलंब करतात जसे राजकारणी व मोठे अधिकारी वर्गासोबत व्यक्तीगत सबंध स्थापन करणे व लाच देवून आपली हेतू साध्य करणे, राजकीय पक्षांना भरमसाठ देणग्या देणे इत्यादी. एकंदरीत समाजाचा यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण फारसा चांगला नाही. याचे महत्वाचे कारण म्हणजे समाजाने स्विकारलेल्या मुल्याशी ज्यांची उद्दिष्ट्ये मिळतीजुळती नाही हे आहे. असे असले तरी औद्योगिक प्रगतीत त्यांचे योगदान नाकारता येत नाही.

**निष्कर्ष व उपाय :–** लोकशाहीत दबाबगटाचे महत्व अनन्य साधारण आहे. भारताच्या आधुनिकीकरणात त्यांचे योगदान नाकारता येत नाही. गटपातळीवर काहीप्रमाणात भारतातील संघटनात्मक दबावगट यशस्वी झाले असले तरी एक बाब निश्चित आहे की येथील दबावगट पक्ष आणि शासन या पासून दुर जाऊ न शकल्यामुळे शासनावर कायमस्वरुपी दबाव निर्माण करण्यास यशस्वी होवू शकले नाही. शासन व पक्ष त्यांचा उपयोग केवळ पक्षहितासाठी करुन घेतांना दिसतात. राजकीय पक्षांना कार्यकर्ते उपलब्ध करुन देणे याच भुमिकेत दबावगट सध्यातरी आहे. त्याच बरोबर समान हित साध्य करण्यासाठी संघटनात जो समन्वय असायला पाहिजे तो अभावानेच आढळतो. शिस्तीच्या अभावामुळे त्यांच्या मागण्या त्यांना जोरकसपणे मांडता येत नाही. परिणामतः प्रश्न सुटण्याऐवजी तसेच राहतात आणि ही बाब शासनाच्या पथ्यावर पडते. दबावगटांचे आंदोलन दडपण्याकडे शासनाचा कल दिसून येतो. व्यक्ती व सत्ता यांना जोडणारा दुवा म्हणूनही त्यांची

भुमिका फारशी प्रभावी राहिली नाही. जनताही या गटांकडे वेगळ्या भुमिकेतून पाहतात त्यांना असे वाटते की हे गट संघटित शक्तीचा वापर करुन अतिरीक्त लाभ पदरात पाडून समाजाचे नुकसान करीत असतात व स्वतःच्या आर्थिक स्वार्थासाठी समाजाला वेठीस धरतात.

उपरोक्त निष्कर्षासाठी काही उपाय सुचविता येतात. एक तर स्वातंत्र्यपूर्व काळात किसान सभेबाबत आचार्य नरेंद्र देव यांनी जी भूमिका मांडली म्हणजे काँग्रेस पक्षापासून किसान सभा वेगळी होणे गरजेचे आहे तेच इतरही गटाबाबत म्हणता येईल. दबावगट पक्षापासून विलग झाल्यास त्यांना आपला अपेक्षित प्रभाव शासनावर निर्माण करता येईल. त्याचबरोबर गटाचे नेतृत्व हे राजकीय नसावे. ते गटातील लोकांचे ठेवण्यात यावे. प्रभावीपणे व्यक्त होण्यासाठी संघटनेत समन्वय व शिस्तीला प्राध्यान्याने प्रस्थापीत करणे आवश्यक आहे. गटाचे हित साधत असतांना समाजाचे पर्यायाने राष्ट्राचे अहित होणार नाही याचीही काळजी घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. फादिया बी. एल., "इंडियन गव्हर्नमेंट अँड पॉलिटिक्स्" दहावी आवृत्ती, साहित्य भवन सी–17, साईट–सी, सिकंदरा इंडस्ट्रीअल एरीया, आग्रा (उत्तर प्रदेश)
2. तिजारे रा. अ., पांढरीपांडे प. श्री., पेशवे व. मा., "आधुनिक राजकीय विश्लेषण" प्रथम आवृत्ती, प्रकाशकः प्रसन्न मुजुमदार श्री मंगेश प्रकाशन, 23 नवी रामदास पेठ नागपूर.
3. "अर्थबोधपत्रिका" मार्च 2000 अंक 8, प्रकाशकः भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, अर्थबोध 968/21–22 सेनापती बापट मार्ग पुणे.
4. भोळे भा. ल., "भारतीय राज्यव्यवस्था" प्रकाशकः मनोहर पिंपळापुरे, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, 85 कॅनॉलरोड, रामदास पेठ नागपूर.
5. भागवत विष्णू, "जागतिकीकरण नवीन गुलामगिरी" प्रकाशकः प्रदीप गायकवाड, समता प्रकाशन, समता सैनिक दल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डानपूल, लष्करीबाग, नागपूर.

# सामाजिक पर्यावरण व राजकीय उदासिनता एक चिकित्सक अध्ययन

**प्रा. शशीकांत जे. चवरे,** रिसर्च स्कॉलर, सहाय्यक प्राध्यापक, (राज्यशास्त्र विभाग) न. मा. द. महाविद्यालय, गोंदिया
**मार्गदर्शक : डॉ. शारदा आय. महाजन,** राज्यशास्त्र विभाग प्रमुख, न. मा. द. महाविद्यालय, गोंदिया

**संशोधनाचा उद्‌देश्य :–** सामाजिक पर्यावरणावर राजकीय सक्रीय सहभागीतेचा स्तर अवलंबून असतो. प्रस्तुत संशोधन विषयाचा उद्‌देश पुढील प्रमाणे आहे. 1. राजकारण हा मनुष्य जीवनाशी संबंधित विषय आहे. याची समज निर्माण करणे. 2. राजकारणाच्या वास्तविक अर्थाची जाणीव जागृती करणे. 3. सामाजिक, शैक्षणिक, मानसिक, आर्थिक इत्यादी घटकांच्या पार्श्वभूमीचा प्रभाव राजकीय उदासीनता वाढविण्यास पडतो. याबाबत समज निर्माण करने.

**संशोधनाचे गृहीतकृत्य :–** संशोधन विषयाला दिशा देण्याचे कार्य गृहीतकृत्याच्या माध्यमातून होत असते. संबंधीत संशोधन समस्येचे परिकल्पना, अनुमान किंवा संभाव्य उत्तर पुढील प्रमाणे आहेत. – 1. राजकीय उदासीनता वाढविण्याकरीता सामाजिक पर्यावरण जबाबदार नाही. 2. निवडक राजकीय पक्षातच गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या लोकप्रतिनिधींचा समावेश आहे.

**संशोधनाचे महत्व व सामाजिक उपयुक्तता :–** मनुष्य जीवन जगत असतांना त्याला अनेक अनुभवातून जावे लागते. अनेकविध समस्यांचा सामना करावा लागतो. परंतू निर्माण झालेल्या समस्येची उकल करण्याचे सामर्थ्य बहुतांश जनात नसते. राजकीय उदासीनतेरूपी समस्येने भारतीय लोकशाहीला ग्रहन लावले आहे. अथक परिश्रमाने मिळविलेल्या स्वातंत्र्याचे मोल हरविले आहे. खऱ्या स्वातंत्र्याची जान निर्माण करून गणतंत्रात्मक लोकशाहीला प्राणवायू देणे हा प्रस्तूत संशोधन विषयाचा मुख्य गाभा आहे आणि तीच संशोधन समस्येची सामाजिक उपयुक्तता आहे. राजकीय उदासीनतेच्या ग्रहणातून भारतीय लोकशाहीला दूर सारून मतदारांमध्ये नवा श्वास फूकंने हीच प्रस्तूत संशोधन विषयाची सामाजिक उपयुक्तता आहे.

**प्रास्ताविक :–** सुमारे अडीज हजार वर्षापूर्वी 'ॲरिस्टॉटलने क्मउवबतंबल या शासन प्रणालीला निर्धन, अज्ञानी व निरक्षर लोकाचे शासन संबोधले होते.[1] ॲरिस्टॉटलच्या वरील विधानाच्या समकालीन संदर्भाचा विचार केल्यास त्यांनी केलेल्या कटाक्षात सत्यांक्ष आढळतो. ॲरिस्टॉटलच्या क्मउवबतंबल च्या परिभाषेतील निर्धन लोकांचे शासन यांचा समकालीन संदर्भ जुळत नाही. सध्याची लोकशाही ही श्रीमंतांनी श्रीमंताकडून श्रीमंताकरीता चालवलेले शासन असल्याचे जाणवते. अज्ञानी व निरक्षर या बाबतीत विचार केल्यास समकालीन परिस्थितीशी मिळते जुळते वाटते. लोकसभा व विधानसभा अशा महत्वपूर्ण स्तरावर कार्यरत असलेल्या लोकप्रतिनिधिच्या शैक्षणिक पात्रतेच्या व लोकप्रतिनिधिकरीता आवश्यक असलेल्या गुणांचा मागोवा घेतल्यास त्याचा अभाव आढळतो. कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशात असलेल्या नागरीकांच्या गुणवत्तेवर आधारीत असते. 'मैकियावली' ने श'द प्रिंस' मध्ये तत्कालीन इटलीतील मनुष्य स्वभावाचे जे चित्रण केले होते.[2] त्याचे प्रकट रूप दुर्देवाने अद्यापही भारतीय नागरीकात आढळून येते. स्वार्थी, संधीसाधु व सद्‌गुणांचा अभाव अशा अलंकारांनी युक्त असणाऱ्यांची संख्या भारतीय लोकशाहीत बऱ्याच प्रमाणात आढळून येते.

भारताने संसदीय शासनप्रणालीचा स्वीकार केला आहे. भारतीय घटनाकारांनी या शासनप्रणालीवर प्रचंड विश्वास दाखविला. संसदीय शासन प्रणाली म्हटले की, निवडणूका आल्याचं! राजकीय अधिकाराच्या समानतेमुळे अशा निवडणूकात सामान्यातील सामान्य मनुष्य नशीब आजमावू शकतो. स्पर्धकांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ व सत्तेचा हव्यास यामुळे राजकारण एक घाणेरडी शिवी ठरू पाहत आहे. राजकारणी व्यक्तीकडे लोक संदेहाने बघतात त्यांच्यावर विश्वास टाकीत नाही. निवडणूका पुरताच त्यांचा संबंध येत असल्यामुळे भारतीय मतदार राजकारणाकडे दूषित भावनेने बघतात. भारतीय तरूण मतदारामध्ये डॉक्टर, इंजिनियर, प्रशासकीय अधिकारी होण्याची ओढ आवर्जून दिसून येते. परंतु जनसेवेचे माध्यम म्हणून लोकप्रतिनिधी होण्याचा विडा उचलणारे शोधून सापडत नाही. राजकारण म्हटल्याबरोबर प्रचार सभा, नारेबाजी निवडणूका जिंकण्याच्या युक्त्या व तंत्र, लाठी चार्ज, भ्रष्ट राजकारण खोटी आश्वासने, धोकेबाजी, गुप्तहेरपणा, व्यक्तीगत चिखलफेक इत्यादी दुषित प्रकार डोळयासमोर येतात. एखाद्याला राजकारणी म्हटल्यास दगड मारल्यासारखे वाटते. आम्ही राजकारण करीत नाहीत, तसल्या भानगडीत पडत नाही, आम्ही सामान्य मनुष्य असा सुर राजकारणाविषयी सामान्यपणे आढळून येतो. परंतु राजकारण हे मनुष्य जीवनाच्या दैनंदिन क्रियेशी जुडलेला आहे. याचा संबंध प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मनुष्य जीवनाशी येतो. लोकशाही युगात राजकारणापासून कोणीही अलिप्त राहू शकत नाही. जर कोणी राजकारणापासून अलिप्त राहण्याचा दावा करीत असेल तर अशांना देव किंवा हिंसपशु संबोधने योग्य राहील. राजकारणाचा संबंध प्रत्येक व्यक्तीशी कसा येतो व तो बहुस्पर्शी कसा आहे ? याची कल्पना 'राजकारणाविषयीच्या पुढील काही महत्वपूर्ण व्याख्यांवरून समजवण्यास मदत होईल'. राजकारण म्हणजे काय ?

**डेव्हिड ई. एक्टर,** यांच्या मते, 'समग्र दृष्टीकोनातून राजकारणाचा विचार केल्यास त्याचा संबंध शासक व शासित यांच्यातील संबंधाशी येतो. राजकारण हे साधन व साध्य देखील आहे. त्यामुळे यात प्रत्येक घटकांचा समावेश होतो'. **बर्ट रेन्ड डी. जुविनेल,** यांच्या व्याख्येनुसार, 'अशा सर्व दबावांचा समावेश राजकारणात करण्यात येतो ज्याचा संबंध खाजगी हिताशी नसून सार्वजनिक हितांशी आहे. जेव्हा राजकीय पक्ष लोकप्रियता प्राप्त करण्याकरीता, सत्ता मिळविण्याकरीता, मिळालेली सत्ता टिकविण्याकरीता घडणाऱ्या घटना आणि घडामोडींच्या भांडवलीकरणाचा राजकारणाच्या परिभाषेत समावेश करता येईल'.[3]

**लासवेल,** यांच्या मते, 'राजकीय शक्ती, सर्वांचा राजकीय सहभाग, अनुभववादी अध्ययन या समग्र घटकांचा संबंध राजकारणाशी येतो'.[4] **पिटर हैरिस,** यांच्या व्याख्येनुसार, 'राजकीय तज्ञांद्वारे लोकांच्या मतभेदाचे झालेल्या संस्थानिकरणास राजकारण संबोधावे'.[5]

**राजकीय उदासिनता म्हणजे काय? :–** ॲरिस्टाटलने सुमारे 2500 वर्षापूर्वी नगर राज्यातील जनतेला राजकीय प्राणी संबोधले होते या परिभाषेचा सर्वसामान्यपणे वर्तमान स्थितीला अनुसरून विचार केल्यास 'मी राजकारणी आहे' असे म्हणणाऱ्याच्या संख्येची कमी नाही परंतु बहुतांश जनता राजकारणाकडे दुषित नजरेने बघतात. विशेषतः महिला तर राजकारणापासून सामान्यपणे अलिप्त राहणे पसंत करतात. राजकीय उदासिनतेचा संबंध मतदानाच्या प्रमाणाशी जोडले जाते यात सत्यांश देखील आहे. इतर विकसित पाश्चात्य देशाच्या तुलनेत भारतामध्ये मतदानाची टक्केवारी समाधानकारक नाही अद्यापही सुमारे 35 ते 40 टक्के लोक आपल्या मतदानाचा अधिकार बजावत नाही.

राजकारणाकडे स्वातंत्र्यापूर्वी सेवाभावी वृत्तीने बघीतले जात होते. स्वातंत्र्योत्तर राजकारणाकडे बघण्याच्या दृष्टिकोणात उत्तरोत्तर आमुलाग्र बदल होत आहे. वर्तमान स्थितीत राजकारणाला 'घाण' समजल्या जाते. अशी स्थिती होण्याचे प्रमुख कारण सर्वसामान्य मतदाराच्या मनात निर्माण झालेला राजकीय असंतोष होय. 'राजकीय उदासिनता ही संकल्पना राजकीय सहभागीताच्या विपरीत आहे'.[6] कुणी जर अस म्हणत असेल 'माझा राजकारणांशी तिळ मात्र सबंध नाही'. तर तो सबंधिताचा गोड गैरसमज आहे. एस. एम. लिप्सेट नुसार सामाजिक शास्त्रातील कोणत्याही शाखेवर इतर शाखांचा प्रभाव निश्चितपणे पडतो. अगदी त्याचप्रमाणे राजकीय उदासिनता रूपी ग्रहणाचे कारण सामाजिक, आर्थिक, धार्मिक, भौगोलिक, मनोवैज्ञानिक इत्यादी कारक आहेत. राजकीय उदासिनतेचा आंतर विद्याशाखीय सबंध कसा आहे याची कल्पना पुढील निवडक मुद्यांचा थोडक्यात विचार करून येईल.

**1. सामाजिक घटक :–** धर्म, जात, पोटजात, पंथ अशा जाळयांनी विणुन भारतीय समाज व्यवस्था निर्माण झाली आहे. असे असून देखील '325 व्या कलम अन्वये धर्म, जात, पंथ हे घटक कुणालाही मतदानाच्या अधिकारापासून वंचित करू शकत नाही'.[7] अनुसूचित जाती, जमाती इतर मागासवर्ग, अल्पसंख्यांक पुढारलेला वर्ग या सर्वांमध्ये असंख्य प्रमाणात जात आणि पोट जाती आहे. या जातीय संरचनेत जात व पोट जात निहाय स्पष्टीकरण आहे. यामुळे भारतात सामाजिक विषमतेचे प्रमाण इतर पाश्चात्य देशाच्या तुलनेत अतिशय जास्त आढळते. जात व लिंग भेद या मानसिक रोगाने भारतीय समाज व्यवस्था ग्रसित आहे. शिक्षण, वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या इत्यादी प्रसार माध्यमामुळे जाती भेदाचे प्रमाण वरपांगी कमी झाल्याचे जाणवत असले तरी देखील जातीभेद सुप्त स्वरूपात पद्धतीने अस्तित्वात आहे. आजही व्यक्तीच्या गुणवत्तेला जातीच्या आधारावर मापले जाते. 'ब्रिटिशाच्या काळात हिंदु–मुस्लिम यांच्यात असलेला सांप्रदायिक सद्भाव'.[8] स्वातंत्र्योत्तर काळात कमी–कमी होत गेला. याचा पाया ब्रिटिश शासनाच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात रचला गेला. राष्ट्रीय स्तरावरील विभाजनवादी प्रवृत्तीचे वन राज्य व स्थानिक स्तरावर अद्यापही कायम आहे. त्याचे पर्यावसन भंयकर हिंसाचारी घटनांमध्ये झाले आहे. उदा. '27 फेब्रुवारी 2002 ला गुजरात मधील गोदरा कांड'.[9]

**2. मनोवैज्ञानिक घटक –** सुदृढ व सकारात्मक मानसिकता कोणत्याही क्षेत्रातील विकासाचा आधारस्तंभ असतो. भारतातील लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव व परंपरा, रूढी याचा प्रभाव असल्यामुळे कोणत्याही नव प्रयोगास भारतीय लवकर तयार होत नाही. भारताला तरूणांचा देश संबोधले जाते परंतु अशा युवकांमध्ये सामाजिक दृष्टिकोनाचा रुहास दिवसेंदिवस होत चालला आहे. शिवाय राजकारणाला भारतीय युवक चांगल्या दृष्टिकोनातून बघत नाहीत. निवडणूकाच्या संदर्भात भारतीय युवकांची मानसिकता व्यापारी स्वरूपाची आहे असे जाणवते. याची पावती 'दौलतराम थानवी यांच्या अध्ययनाने दिलेली आहे'.[10]

भारत हा श्रीमंताचा गरीब देश आहे. निम्न स्तरातील घटकांमध्ये न्युनगडांची मानसिकता आढळून येते. आजही उच्च वर्णियाचे अनुकरण करण्यात कनिष्ठ वर्गातील लोक भाग्य समजतात. त्यामुळे एखाद्या बाबतीत उच्च वर्णियांच्या मतांना कनिष्ठ वर्गातील मतापेक्षा वरचढ महत्व प्राप्त झाल्याचे जाणवते. राजकीय निर्णयाच्या बाबतीत देखील मेंढरांच्या मागे मेंढर चालणे अशीच प्रवृत्ती आढळून येते. सर्वसामान्य भारतीय व्यक्ती आपराधिक पार्श्वभूमी पासून अलिप्त राहणेच पसंत करतो. हल्लीचे राजकारण आपराधिक पृष्ठभुमीनी रंगलेले आहे याची प्रचिती आपणास पुढील तक्त्यावरून येईल.

**तक्ता क्र.1**

| अ. क्र. | राजकीय दल | अपराधिक पृष्ठभुमी असणाऱ्या संसद सदस्यांची टक्केवारी (न्यायालयात प्रलंबित खटले असणारे) |
|---|---|---|
| 1 | भारतीय जनता पार्टी | 35 % |
| 2 | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | 18 % |
| 3 | अखिल भारतीय अन्ना द्रमुक | 16 % |
| 4 | शिवसेना | 83 % |
| 5 | तेलगु देशम पार्टी | 38 % |
| 6 | तेलंगाना राष्ट्र समिती | 47 % |
| 7 | सि.पी.आय. (एम) | 57 %: |
| 8 | वाई.एस.आर. कॉंग्रेस पार्टी | 57 % |
| 9 | लोक जनशक्ती पार्टी | 67 % |
| 10 | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी | 80 % |
| 11 | आर.जे.डी. | 100 % |
| 12 | पी.डी.पी. | 33 % |
| 13 | जनता दल (यु) | 50 % |
| 14 | आम आदमी पार्टी | 0 % |
| स्त्रोत – प्रतियोगिता दर्पण[11] | | |

**3. आर्थिक घटक :–** वर्तमान काळातील निवडणूकांमध्ये जे अनेक गैर प्रकार होतात त्यापैकी 'धनबल' हा प्रमुख प्रकार आहे. निवडणूकांच्या दरम्यान जो उमेदवार जास्तीत जास्त पैसा खर्च करतो तो इतर आवश्यक गुणांचा अभाव असून देखील निवडणूका जिंकण्याचे अनेक उदाहरणे आहेत. निवडणूकात पैशाच्या वाढत्या प्रभावामुळे उमेदवाराची जात, धर्म, शैक्षणिक पात्रता, अपराधिक पृष्ठभूमी इत्यादींकडे बहुतांश मतदार दुर्लक्ष करतांना आढळतात. 'मॉर्डन डेमोक्रोसी मध्ये लॉर्ड ब्राईस यांनी राजकारणातील धनबलाचा प्रवेश लोकशाहीचा सर्वांत मोठा शत्रू आहे'.[12] असा इशारा सुमारे दीड शतका आधी दिला होता. लोकप्रतिनिधीकरीता आवश्यक असलेल्या पात्रता असून देखील बहुतांश नागरीक प्रचंड धनबलाच्या अभावी निवडणूका पासून अलिप्त राहणेच पसंत करतात. राजकारणाला विकृत करण्यात आर्थिक घटक कसा कारणीभूत ठरतोय याचा दुजोरा 'जून 2000 मध्ये इंद्रजित गुप्त समितीने प्रस्तूत केलेल्या निवडणूक सुधारणा सबंधिच्या अहवालाने येतो'.[13]

**4. शैक्षणिक घटक :–** शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगिण विकासाचे उत्तम साधन आहे. शिक्षणामुळे मानसिक विकारावर विजय मिळतो. मनुष्याच्या विचार करणाच्या कक्षा रूंदावतात. यामुळेच सुमारे अडीच हजार वर्षापूर्वी प्राचिन ग्रीक तत्वज्ञ प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनी शिक्षणाला महत्वाचे स्थान दिले. शिक्षण हे जनजागृती करण्याचे उत्तम साधन आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात साक्षरतेचे प्रमाण सुमारे 12 टक्के होते. पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीत घटना समितीतील बहुतांश सदस्यांना मतदारांनी लोकसभेत निवडुन पाठविले. स्वातंत्र्यानंतर पहिली दोन शतके जनसेवेच्या भावनेनी ओतप्रोत असलेल्या लोकप्रतिनिधीचा भरणा केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये आढळून येत होता. साक्षरतेचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत गेले. पण निवडुन दिलेल्या लोकप्रतिनिधीच्या गुणवत्तेत घसरण होत गेली याची खापर भारतीय मतदारावर फोडणे येथे गैर नाही. अशा प्रसंगी मतदानाचा अधिकार सरसकट सर्वांना द्यावा की नाही असा प्रश्न उभा राहतो. लोकशाहीत सर्वांना समान वागणुक मिळणे अनिवार्य आहे. यामुळेच घटनाकारांनी सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराची तरतुद केल्याचे आढळते. अशा तरतुदीचा प्रमुख उद्देश्य जास्तीत जास्त लोकांचा सहभाग वाढावा हेच होते. परंतु असा सहभाग वाढविण्याच्या नादात लोकशाहीचा संख्यात्मक विकास झाला व लोकशाहीच्या गुणात्मक प्रगतीला उतरती कळा लागली. 'जॉन स्टुअर्ड मिल यांनी सुमारे 200 वर्षापूर्वी ज्यांना लिहिता वाचता येत नाही व गणिताचे सर्व सामान्य ज्ञान नाही अशांना मतदाराच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याचे सुचविले'.[14] मिल ने मतदानाच्या अधिकारासंबंधी जो विचार प्रस्तुत केला त्याचा प्रमुख उद्देश योग्य लोकप्रतिनिधीची निवड करण्याची पात्रता मतदारात निर्माण करणे हाच होता.

**5. अन्य घटक :–** आतापर्यंत केलेल्या चर्चेवरून राजकीय उदासिनतेची पार्श्वभुमी तयार होण्यास सामाजिक, मनोवैज्ञानिक, आर्थिक व शैक्षणिक घटक कसे कारणीभुत आहेत याची कल्पना येण्यास बरीच मदत होते. राजकीय उदासिनता हा भारतीय राजकारणाला लागलेला महाभंयकर रोग आहे. या रोगाला वाढविण्यास व खत पाणी घालण्यास इतर कोणते घटक कारणीभुत असू शकतात याचाही थोडक्यात विचार करणे आवश्यक आहे.

1. न्यायव्यवस्था ही कोणत्याही देशातील राजकीय व्यवस्थेचा आधार स्तंभ आहे. निवडणूकीच्या दरम्यान होणाऱ्या गैरप्रकारावर नियंत्रण ठेवण्याकरीता न्यायालय समोर येवू शकते. अशा बाबतीत न्यायालयीन सक्रीयतेचे अनेक उदाहरण आढळून येतात. न्यायालया समोर प्रचंड दाव्याचा ढिग आहे परंतु यात निवडणूकीत उधळपणे होणाऱ्या गैरप्रकाराबाबतीतले खटले इतर दाव्याच्या तुलनेत कमी आढळतात. 'निवडणूकीत होणाऱ्या बेकायदेशीर कृत्याविरूद्ध व्यक्ती व सामाजिक संस्था न्यायालयात दाद मागु शकतात'[15] परंतु अशाप्रकारचे खटले फक्त राजकीय पक्षच पक्षपाती दृष्टीकोनातून दाखल करीत असल्याचे आढळते. व्यक्ती व सामाजिक संस्थाकडून निवडणूकी संबंधीचे खटले न्यायालया समोर प्रस्तुत करण्याचे प्रमाण भारतात फारसे आढळून येत नाही.

2. 'दारिद्रय निरक्षरता व जातीय पृथगात्मता हे बाबासाहेबांच्या मते भारतीय लोकशाहीच्या वाटचालीतील अडथळे आहेत'.[16] या अडथळयातुन अद्यापही भारतीय समाज व्यवस्थेची सुटका झालेली नाही. कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा स्विकार केल्यामुळे दरिद्रयाच्या प्रमाणावर बऱ्याच प्रमाणात नियंत्रण प्रस्थापित झाले असले तरी गरिबीच्या रेषेखाली अद्यापही सुमारे 30 टक्के लोक जगत आहेत. निरक्षरता व जातीयता याची तिव्रता कमी झाल्याचे जाणवत असले तरी सामाजिक विषमतेचे जनक म्हणून जातीयता अद्यापही राजकीय उदासिनतारूपी रोग वाढण्यास खत पाणी घालीत आहे.

3. विनोबा भावेच्या मते, 'सत्तेची खुर्चीच अशी मंतरलेली असते की त्यावर कोणीही जो बसेल तो भ्रष्ट झाल्यावाचून राहत नाही'.[17] येथे सत्तेचा उल्लेख राजकीय सत्तेशी करावा लागेल. भारताने प्रतिनिधीक शासन प्रणालीचा स्विकार केल्यामुळे निवडणूका हया आल्याच!. लोकशाहीरूपी डोलारा स्वच्छ, निष्पक्षपाती निवडणूकांवर अवलंबून असते. परंतु भारतातील निवडणूका हया भ्रष्ट मार्गानी लढविल्या जातात व जिंकल्या देखील जातात. अशाच्या हातात सत्ता हस्तांतरीत झाल्यास जी सत्ता चांगल्या चांगल्याचे ईमान गहान ठेवते ती सत्ता भ्रष्ट मार्गाद्वारे मिळाली तर त्याचा उपयोग कसा होईल ? याचा राजकीय सहभागावर अतिशय विपरीत परिणाम होतो.

4. इलेक्ट्रॉनिक व प्रिंट मिडीया हे लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. प्रसार माध्यमावर उद्योगपतींनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे त्यामुळे जनजागृती ऐवजी प्रसार माध्यमांनी व्यापारी करणाचे रूप धारण केले आहे. प्रसार माध्यम देखील सामंतवादी, वर्गवादी व जातीवादी वृत्तीने ग्रसित आहेत. राजकीय जागृती वाढविण्याऐवजी जनसामान्यात राजकीय उदासिनता पसरविण्यात प्रसार माध्यमाचा सिंहाचा वाटा आहे.

5. निवडणूका व्यक्तिगत मुद्याऐवजी सामुहिक हिताच्या मुद्यावर लढविल्या गेल्या पाहीजे. विकासाचे व मुलभूत मुद्दे कोणते आहेत या

बाबतीत जनजागृती राजकीय पक्षाव्दारे करणे हे लोकशाहीच्या आरोग्यासाठी हितावह असते. परंतू निवडणूकीच्या दरम्यान व्यक्तिगत चिखल फेक याच्या भवऱ्यात फसून भारतीय मतदार आपल्या मतदानाच्या विवेकपूर्ण अधिकारापासून वंचित झाल्याचे अनुभवास येते.

6. निवडणूकीचा खर्च वाढण्याचे प्रमुख कारण मतदारांना वाटण्यात येणाऱ्या भेटवस्तू व पैसा आहे. राजकीय पक्षाकडून अशा आमिशांचा वर्षाव केला जातो तरीदेखील त्या पक्षाच्या उमेदवाराला मतदार मत देईलच याची श्वास्वती नसते. वरील प्रकारामुळे सर्व सामान्य नागरीक निवडणूकापासून अलिप्त राहणे पसंद करतो.

7. निवडणूकीच्या दरम्यान अनेक जनमत संग्रह जाहीर केले जातात. मिडीया व्दारे निष्पक्षपाती जनमताच्या भावना व्यक्त होण्याऐवजी श्रेष्ठजन प्रवृत्तीच्या भावनेने व्यक्तिगत पूर्वग्रह ठेवून प्रचार केला जातो. ज्यांच्या विषयी जनमत पूर्णपणे विरूध्द आहे अशाच्या त्या निवडणूकीत धक्कादायक विजय होतो. जनमत पूर्व नियोजीत काही नमुन्याच्या आधारे प्रदर्शित केले जाते. जनमताच्या खऱ्या भावनांचा वेद घेण्याचे कष्ट वर्तमान कालीन प्रसार माध्यम घेत नाही. भारतात अशी उदाहरणे असंख्य दिसून येतात. याचा अर्थ विदेशी मिडीया सर्व गुणांनी युक्त आहे असा समज बाळगणे गैर आहे. उदा. 'हफीगटन पोस्ट ने डोनाल्ड ट्रम्प ला दृष्ट राक्षस या अलंकारांनी सुशोभित केले होते. यांचा अमेरिकन मतदारांवर काहीही परिणाम झाला नाही व हिलेरी क्लिंटन चा धक्कादायक पराभव होवून डोनाल्ड ट्रम्प चा दणदणीत विजय झाला'.[18] भारतात देखील प्रसार माध्यम अशाच व्यक्तिगत पूर्वग्रहाला ग्रसित होवून प्रसार करतात. निवडणूकीच्या दरम्यान अशा प्रसार प्रचाराला उत येतो यामुळे ज्यांच्या विरूध्द असा प्रचार होतो त्यांच्यावर सहिष्णु व सहानुभूतीच्या मताचा वर्षाव होतो. अमेरीकन वृत्तवाहिन्यांनी राष्ट्राध्यक्षाच्या निवडणूकीत ज्या चुका केल्या त्यापासून भारतीय प्रसार माध्यमांनी धडा शिकून निवडणूकांच्या दरम्यान योग्य भूमिका वठविणे आवश्यक आहे. परंतू या उलट चित्र दिसून येत असल्यामुळे जनजागृती ऐवजी राजकीय उदासिनतेला पसरविण्याचे काम प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे भारतीय मिडीया व्दारे केले जाते.

8. बदलत्या काळानुसार निवडणूकात पैसाचे महत्व जरी वाढत असले तरी निवडणूका पूर्वी व निवडणूकातील विजया नंतर देखील जात या घटकांचा प्रभाव अबाधित आहे. बहुमत प्राप्त झाल्यावर शासनाची धुरा कोणत्या व्यक्तिकडे सोपवावे असा प्रश्न जेव्हा समोर येतो तेव्हा जातीच्या राजकारणाला महत्वाचे स्थान प्राप्त होते. उदा. 'महाराष्ट्रातील राजकारणामध्ये आतापर्यंत झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या यादीचा विचार केल्यास 17 पैकी 10 मुख्यमंत्री हे मराठा समाजाचे होते'.[19] जात या घटकाला सत्ता प्राप्त झाल्यानंतर व सत्ता प्राप्त करण्याकरीता प्राप्त झालेले मध्यवर्ती स्थान हे भारतीय लोकशाहीला शुभ संकेत नाहीत. जात या घटकापेक्षा लोकप्रतिनिधीच्या गुणांना महत्व देणे लोकशाहीच्या निकोप यशासाठी हितावह आहे.

निवडणूकात वाढते पैशाचे महत्व व राजकारणाचे झालेले अपराधिकरण या प्रमुख दोन कारणांनी भारतीय महिलांना केन्द्र व राज्य स्तरीय विधीमंडळाच्या राजकीय सहभागापासून दूर लोटले आहे. भारतीय स्त्रियांना अद्यापही समाजात समानतेची वागणुक मिळत नाही. जीव वैज्ञानिक फरकाची धाक दाखवून तिच्या मनोबल खच्चीकरणाचे असंख्य उदाहरण प्रत्ययास येतात. '1996 मध्ये लोकसभा व विधानसभा मध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण देण्यासंबंधीचे विधेयक प्रस्तुत करण्यात आले होते'.[20] सुमारे 20 वर्षाचा कालावधी होवून सुद्धा महिला आरक्षण संबंधीचे विधेयक पारित होवू शकले नाही. भविष्यात जरी महिलांच्या केंद्र व राज्य स्तरातील विधान मंडळातील आरक्षणाचे विधेयक जरी पारित झाले तरी याचा लाभ उच्च व मध्यम वर्गीय महिलांना व राजकरणाचा वारसा असणाऱ्यांनाच मिळण्याची शक्यता जास्त आहे. आरक्षणात जाती निहाय आरक्षण देण्यात आले तर त्या–त्या जातीतील पोटजात व उत्तम सांपतिक स्थिती या घटकांना महत्व प्राप्त होवून सर्व सामान्य गुणवान महिला निवडणूकीच्या शर्यतीतून बाहेर हाकलल्या जातील अशा परिस्थितीमुळे भारतीय स्त्रियांमध्ये राजकारणाविषयी मोठा निरूत्साह निर्माण होणे स्वाभाविक आहे.

**निष्कर्ष व उपाययोजना :–** आतापर्यंत केलेल्या चर्चेवरून राजकारण म्हणजे काय ? राजकीय उदासिनता कशाला म्हणतात व राजकीय उदासिनतेचा सामाजिक पर्यावरणातील सामाजिक, आर्थिक, मानसिक व शैक्षणिक घटकांशी कसा संबंध आहे याची कल्पना येण्यास मोलाची मदत झाली असेल. उपरोक्त विवेचनावरून पुढील निष्कर्षापर्यंत पोहचता येते व काही आवश्यक उपाययोजना सुचविता येतील त्या पुढील प्रमाणे –

**अ) निष्कर्ष** : 1. राजकीय उदासिनता वाढविण्यास सामाजिक विषमता कारणीभूत आहे. 2. निर्माण झालेल्या राजकीय उदासिनतारूपी भस्मासुराचे प्रमुख कारक साक्षरतेचे कमी प्रमाण व गुणवत्ता पूर्ण शिक्षणाचा अभाव हे आहे. 3. निवडणूका लढविणे व जिंकने यावर श्रीमंताची मक्तेदारी झाली आहे. 4. भारतातील ऐतिहासिक पार्श्वभूमीचा भारतीय मतदारांवर प्रभाव पडल्याचे आढळून आले.

**ब) उपायोजना** : 1. सामाजिक क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी समाजामध्ये जनजागृती वाढविण्याकरिता जनतेला प्रोत्साहित करणे. 2. मतदारांनी संघटितपणे निर्णय घेवून गुणवान व कर्तृत्वान आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना निवडणूक लढविण्यास प्रोत्साहित केले पाहिजे. 3. महिलांचा सक्रिय, राजकीय सहभाग वाढविण्याकरिता समाजामध्ये जनजागृती घडवून आणावी व अशी जनजागृती घडवून आणण्यासाठी शासनाने पुढाकार घेवून युद्धपातळीवर प्रयत्न करावे. 4. जनशक्तीचे महात्म्य पटवून देण्यासाठी सामाजिक संघटना, नागरिक समाज व गैर शासकीय संघटनांनी सभा, सम्मेलने व मेळावे भरवावे. 5. उच्च शिक्षित व विशेष तज्ञ नागरिकांना निवडणूक लढविण्यासाठी शासनानेद्वारे अनेक सोयी व सवलती बहाल कराव्या.

**संदर्भ :**

1. त्रिपाठी विनायक व त्रिपाठी पतंजली, लोकतंत्र और चुनाव सुधार, ओमेगा पब्लिकेशन 2014, पान क्र. 2
2. शर्मा उर्मिला व शर्मा एस. के. पाश्चात्य राजनैतिक चिंतन, एंटलांटिक पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नई दिल्ली, 2001, पान क्र. 222
3. कित्ता, पान क्र.17
4. सिंग पंकज, राजनिती विज्ञान के सिद्धांत, ज्ञानदा प्रकाशन, 2006, पान. क्र.10
5. कित्ता, पान क्र. 12
6. बघेल डी.एस. व सिंह कर्चुली टी.पी., राजनैतिक समाजशास्त्र, विवके प्रकाशन नई दिल्ली, 2012 पान क्र. 222.
7. पाटील बी.बी., भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापुर, 2010, पान क्र. 288
8. शर्मा एच.सी., भारतीय राजनिती की वर्तमान प्रवृत्तीया, ओमेगा पब्लिकेशन्स नई दिल्ली, 2009, पान क्र. 3
9. पाटील बी.बी., भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापुर, 2010, पान क्र. 435
10. मानचंद खंडेला, भारतीय राजनिती का भविष्य, अरिहंत पब्लिशिंग हाऊस, जयपुर, 2009, पान क्र. 113.
11. प्रतियोगिता दर्पण, जुलै 2014, पान. क्र. 77.
12. त्रिपाठी विनायक व त्रिपाठी पतंजली, लोकतंत्र और चुनाव सुधार, ओमेगा पब्लिकेशन नई दिल्ली 2014, पान क्र. 31
13. त्रिपाठी ममता मणी, भारत की लोकतांत्रीक यात्रा एवं चुनाव, राधा पब्लिकेशन नई दिल्ली 2012, पान. क्र. 128
14. पाटील बी.बी., पाश्चात्य राजकीय विचार, फडके प्रकाशन, कोल्हापुर, 2009, पान क्र. 166
15. त्रिपाठी विनायक व त्रिपाठी पतंजली, लोकतंत्र और चुनाव सुधार, ओमेगा पब्लिकेशन नई दिल्ली 2014, पान क्र. 101
16. भोळे भास्कर लक्ष्मण, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, 2003, पान. क्र. 831.
17. भोळे भास्कर लक्ष्मण, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, 2003, पान. क्र. 502.
18. दैनिक भास्कर, दि. 15 नोव्हेंबर 2016 पान क्र. 4 (अभिव्यक्ती)
19. दैनिक लोकमत, दि. 1 नोव्हेंबर 2014, पान क्र. 8 (संपादकीय)
20. सिंह निशांत, महिला राजनिती और आरक्षण, ओमेगा पब्लिकेशन्स नई दिल्ली, 2010 पान क्र. 121

# भारतीय समाजातील आदिवासींची शैक्षणिक स्थिती

**प्रा. डॉ. मिनाक्षी श्रीहरी बेसेकर**, समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्रीमती गोपीकाबाई भुरे महिला महाविद्यालय तुमसर,

मानवाच्या साधन संपत्तीच्या विकासाचा दृष्टीने अंत्यत महत्वाचा घटक म्हणजे शिक्षण होय. व्यक्तीच्या सर्वांगिन विकासाच्या दृष्टीने देखिल शिक्षण अत्यंत महत्वाचे आहे. कोणत्याही देशातील नागरिकांची जडणघडण वैज्ञानिक, तांत्रिक व आर्थिक प्रगती आणि त्यासाठी आवश्यक कुशल मन्युष्यबळाची निर्मिती या दृष्टिने शिक्षण व्यवस्था मध्यवर्ती ठरते आणि म्हणूनच स्वतंत्र भारतात शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी विविध प्रकारचे प्रयत्न होत आहेत.

आज भरताला स्वातंत्र मिळून जवळ जवळ 70 वर्षे होत आहेत. भरतीय राज्य घटनेतील 45 व्या कलमानूसार जरी बालकांना सक्तीचे व मोफत शिक्षणाची तरतूद होती तरी त्यांचे फलीत पूर्णपणे दिसत नाही. प्राथमिक शिक्षणाचा समावेश मुलभूत हक्कामध्ये केला असून प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होण्याच्या दृष्टिने विविध कार्यक्रम राबविले जात आहेत. अनेक केंद्र पुरस्कृत योजना शिक्षणाच्या विकासासाठी व सार्वत्रिकीकरणासाठी चालवल्या जात आहेत. हे समाजातील न्यायाच्या दृष्टीने विचार करता शिक्षण हा संमाजातील प्रत्येक घटकांचा अधिकार आहे, हे सत्य असले तरी अदिवासी शैक्षणिक विकासापासून दुर का? हा प्रश्न निर्माण होतो.

भारतीय समाज मुख्यतः तिन सुमहात विभाजित झालेला आहे. शहरी समुदाय, ग्रामिण समुदाय व आदिवासी समुदाय. आदिवासी समुदाय भारतीय समाजाचा अविभाज्य भाग आहे. भारताच्या विविध राज्यात आदिवासींचे वास्तव्य आहे. 1950 मध्ये एकूण 14 राज्यात 210 आदिवासी जमाती अनुसुचित जमातीच्या यादी अंतर्गत समाविष्ट करण्यात आल्या आहेत. 2001 च्या जनगणनेनूसार आदिवासी जमातींची संख्या वाढून ती 550 झाली. ती 2001 ते 2011 या दहा वर्षाच्या काळात देशातील आदिवासींची एकूण लोकसंख्या 23.7 टक्क्याने वाढली.

भारतीय संविधानात आदिवासींना अनुसुचित जमाती असे संबोधले जाते. भारतीय संविधानातील कलम 342(1) नुसार ज्यांचा समावेश अनुसुचित जमातींच्या यादीत केलेला आहे त्यांना आदिवासी म्हणतात.

**व्याख्या – गिलीन आणि गिलीन –** आदिवासी समाज हा विशिष्ट भुप्रदेशांवर वास्तव्य करणारा, एक समान बोली बोलणारा, समान सांस्कृतीक जिवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटाचे एकत्रीकरण आहे.

**आदिवासींच्या निरक्षरतेची कारणे** : इतर देशाच्या तुलनेत इंग्लंड, कॅनेडा, जर्मनी मध्ये व संयुक्त राष्ट्र अमेरीका व आशिया मध्ये साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. भारतात 2001 च्या जनगणनेनुसार केवळ 65.38 टक्के लोक साक्षर होते आणि देशातील आदिवासी मध्ये केवळ 47.10 टक्के लोक साक्षर होते. आदिवासी समाजात निरक्षरतेचे प्रमाण इतर लोकांपेक्षा अधिक आहे. 1961 मध्ये आपल्या देशात साक्षरतेचे प्रमाण 28. 30 टक्के होते. त्यावेळी आदिवासी लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण केवळ 8. 53 टक्के होते हळूहळु यामध्ये बदल होत गेला परंतू पाहीजे त्या प्रमाणात अजुनही शिक्षणाचा विकास झालेला दिसुन येत नाही.

**आदिवासींच्या निरक्षरतेची कारणे :**

1. दुर्गम भागात शिक्षणाचा अभाव
2. शैक्षणिक वातावरणाच्या अभाव
3. आदिवासींची शिक्षणाविषयी उदासिनता
4. गैर आदिवासी शिक्षकांची प्रतिकुल मानसीकता
5. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी गैरसमज 6. गरीबी

आदिवासींचा शैक्षणिक विकास व्हावा म्हणून केंद्र आणि राज्य शासनाने विविध उपयोजना केल्या आहेत. यासाठी 1986 च्या शैक्षणिक धोरणात आदिवासी क्षेत्रांमध्ये शाळा उघडण्यास विशेष प्राध्यान देण्यात आले. पूर्वी शाळा म्हणजेच यूवागृह होय. या युवागृह मध्ये सामाजीक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, मनोरंजनात्मक, ऐकात्मक, सांस्कृतीक, संरक्षणात्मक अशा सर्वच प्रकारचे शिक्षण दिले जाते. या युवागृहाच्या माध्यमातून युवक आणि युवती मध्ये सहकार्याची भावना अधिक दृढ होते, त्यांच्यात एक्यता आढळून येते संस्कृतीचे जतन होते. संस्कृती इथूनच शिकली व शिकवली जाते. युवागृहे संपूष्टात आल्यामुळे सर्वांगीन शिक्षण देणारी ही संस्था देखील बंद झाली.

**शिक्षणाची आवश्यकता व महत्व :–** मानवाची शरिराची स्वप्न, त्यांची मर्यादा व अलौकीक बूध्दी या सर्व गोष्टी समजून घेण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. विश्वाच्या निर्मीतीपासून तर आजतागायत जी प्रगती झालेली आहे त्याप्रमाणे शिक्षण हे मुल्य जास्तित जास्त प्रभावी होते. शिक्षणाचा उपयोग वास्तविक प्रक्रियेपासून तर अमुर्त प्रक्रिया समजून घेण्यासाठी होतो.

**भारतीय शिक्षणाचा ऐतीहासीक आढावा :–** भारतीय शिक्षण पध्दती अती प्राचिन शिक्षण पध्दती आहे. भारतीय शिक्षण पध्दतीचा विचार करतांना ही शिक्षण पध्दती चार खंडात बघता येते. 1. प्राचीन कालखंडातील शिक्षण 2. मध्यकालीन भारतीय शिक्षण 3. ब्रिटीशकालीन भारतीय शिक्षण 4. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शिक्षण.

भारतीय शिक्षणाची आवश्यकता लक्षात घेउन भारत सरकारने 1948 मध्ये डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला. यालाच विद्यापीठ आयोग किंवा राधाकृष्णन आयोग असे म्हटले जाते. स्वतंत्र भारतात शिक्षणाची पूनर्रचना करण्यासाठी नेमलेला हा पहिला आोग आहे. या आयोगाचा मुख्य उद्देश म्हणजे वर्तमानकालीन व भाविष्यकालीन गरजा भागविन्यासाठी शिक्षणात सुधारना सुचविणे.

**आदिवासी समाजाची शैक्षणिक स्थिती :–** आदिवासी समाजाच्या शिक्षणाच्या विकासाचा आढावा घेत असतांना त्यांच्या अनौपचारीक व औपचारीक मार्गाचा आढावा घेतांनाच त्यांच्या शिक्षणाच्या शिकण्याच्या पध्दतीची जाणीव होते.

**आदिवासी शिक्षणाचा आनौपचारीक मार्ग –** राज्यघटनेने दूर्लक्षीत अशा अनुसुचित जमाती व अनुसुचित जाती यांना विशेष दर्जा दिला. कारण ऐतीहासीक बाबी ज्या त्यांच्या मागासलेपणास कारणीभुत आहेत. जीवनाच्या अनुभवातून, परिसरातून, स्वतःच्या अनुभवातून निसर्गाकडून जे काही शिकले जात होते तेच एका पिढीकडून दुस–या पीढीकडे हस्तांतरीत होत होते. अशा प्रकारचे शिक्षण हे आदिवासीना तिन प्रकारातून मिळत होते.

1. पालकांव्दारे मुलांना
2. पालक व मुले त्यांच्या समवयस्कांकडून शिकत होते
3. पालक सुध्दा मुला कडून ब–याच गोष्टी शिकत होते.

**आदिवासी शिक्षणाचा औपचारीक मार्ग –** भूतकालीन आदिवासींच्या परंपरागत शिक्षणाच्या पध्दती वेगळया प्रकारच्या होत्या. शिक्षणाची सुरवात लहान पणापासूनच संस्कृतीचे सामाजिकरण व ज्ञान मिळविणे हे कुटुंबाकडून समुहाने व समवयस्क गटांपासून मिळत होते. गोटूल नावाची शिक्षण संस्था युवक युवतींना जीवनोपयोगी शिक्षण देत होती परंतू अशा प्रकारच्या संस्था कालांतराने लुप्त होत गेल्या. त्यांचे कारण सामाजिक बदल जो औद्योगीकरण आणि नागरीकरणामुळे झाला. स्वातंत्र प्राप्ती नंतर आदिवासी समुहाच्या शिक्षणाकरीता विविध प्रकरच्या सोयीसवलती उपलब्ध करून देण्यात आल्या. विविध राज्यांच्या आदिवासी समुहाच्या साक्षरतेची इतर समाजाशी तुलना होउ लागली. सर्वच राज्यातील आदिवासी समुहाच्या साक्षरतेची माहिति, तसेच तुलनात्मक अभ्यास होउ लागला. भारतीय संविधानात अनुसुचित जमाती म्हणून उल्लेख झाल्यामुळे स्वतंत्र लक्ष देण्यात येउ लागले. शासकिय यंत्रणेकडून सामुदायीक विकास योजना कार्यक्रमाची माहिति आदिवासी पर्यंत पोचते की नाही? त्याच प्रमाणे विविध योजनांचा लाभ आदिवासिंना मिळाला किवां नाही? याची माहिती प्राप्त करण्यात येत आहे.

एकंदरीत आदिवासी मधील सर्वांना सुधारण्यासाठी शासनाने केलेले प्रयत्न यशस्वी झाले. हे मात्र सांगता येत नाही सामुदायीक विकास योजनापूर्विच्या व सामुदायीक विकास योजनानंतरच्या स्थीती वरून आदिवासी आर्थीक, समाजिक, शैक्षणिक व राजकिय व सांस्कृतीक प्रगतीत फारसे बदल घडून यायला पाहीजे होते, त्या प्रमाणात अजुनही योजना यशस्वी झालेल्या नाहीत.

आदिवासींची शैक्षणिक स्थीति सुधारावयाची असल्यास आदिवासी भागात शिक्षण देण्याकरीता त्याच समुहातील (आदिवासी) शिक्षकांची नियुक्ती करावी व अभ्यासक्रम त्यांच्या पुरताच मर्यादीत नसावा. प्राथमिक शिक्षणातून असे धडे द्यावे की जगाच्या कोणत्याही क्षेत्रात जावून शिक्षण घेण्याची जीदद त्या आदिवासी मुला–मुलींमध्ये निर्माण व्हावी. तेंव्हाच त्यांची शैक्षणिक स्थीती सुधारेल व त्यांचे जीवन परिवर्तीत होईल.

**संदर्भ ग्रंथसुची**


1. आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, डॉ. प्रदिप आगलावे, साईनाथ प्रकाशन, धरमपेठ, नागपूर.
2. आदिवासांची शैक्षणिक स्थीती, डॉ. विनोद ए.रायपुरे, डॉ. संभाजी एन. देसाई, प्रशांत पब्लीकेशन्स.
3. आदिवासी आणि सामुदायीक विकास योजना, डॉ. बी. एन. आकरे, पिंपळापुरे प्रकाशन नागपूर.

# अनुसूचित जातीच्या सामाजिक समस्या व उपाय, एक अभ्यास

**डॉ. प्रकाश सुर्यभान सोनक,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, यशोदा गर्ल्स आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर.

भारत ह्या खंडप्राय देशात अनेक जाती, धर्म, पंथ आणि संप्रदायाचे लोक राहतात. या देशात हिंदू धर्म फार मोठया प्रमाणात आहे आणि स्वातंत्र्यपूर्व काळापासून या देशात अनेक जातींवर अन्याय आणि अत्याचार होत आलेले आहेत. ते अत्याचार स्वातंत्र्यानंतरही सुरू असलेले दिसून येतात. आजही जाती–जातीमध्ये अनेक प्रकारचे वाद होतांना दिसतात. सर्वच राज्यामध्ये आजही अनुसूचित जातीच्या लोकांवर फार मोठया प्रमाणात अत्याचार केले जात आहेत. अशा बातम्या रोजच्या वर्तमानपत्रातून येत असतात. अनेक राज्यांमध्ये तर अशा प्रकारे झालेल्या अत्याचाराची साधी नोंदही घेतली जात नाही. हा अत्याचार सहन करण्याकरिता केवळ या देशामध्ये अनुसूचित जातीचीच लोक यांना दिसून येतात काय असा प्रश्न आज उभा राहतो.

महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इंग्रजी सत्तेसोबत अनेक प्रकारचे विचार विनिमय करून अनुसूचित जाती, जमाती आणि बहूजन समाजाला आपल्या समाजसुधारणेच्या माध्यमातून चळवळ करून त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. देशाच्या स्वातंत्र्यानंतर तर या देशाचे महत्वपूर्ण कार्य करण्याचे संविधान लेखन करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दिल्यानंतर त्यांनी या देशाची राज्यघटना तयार करतांना अनेक जाती जमाती आणि इतर मागासवर्गीय लोकांना त्यांचे न्यायीक अधिकार देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. आज देश स्वतंत्र होऊन सत्तर वर्षाचा कालखंड पूर्ण झालेला आहे. तरी आजही खेडयांमध्ये आणि शहरी भागात अनुसुचित जातीच्या समस्या आहेत.

अनुसूचित जातींवर होत जाणारे हे हल्ले याचे खरे कारण काय? असा प्रश्न निर्माण होतो. यांना जे न्यायीक अधिकार मिळाले किंवा हा समाज इतर समाजाच्या बरोबरीने पुढे येत असल्यामुळे किंवा या समाजामध्ये बुध्दीजीवी वर्ग वाढत असल्यामुळे, या समाजात स्पर्धा करण्याची ताकद आहे. या समाजाने आपली प्रगती अधिक केली आहे. हे सर्व इतर समाजाला बरोबर वाटत नसल्यामुळे तर या आणि केवळ याच समाजाला लक्ष करण्याचा हेतू असावा असे मानण्यास हरकत नाही, असा प्रश्न निर्माण होतो.

अनुसूचित जातीमध्ये अनेक जाती येतात यामध्ये महार, मांग, चांभार, सूदर्शन अशा कितीतरी जाती मोडतात तरी यातील महार दलीत समाजाला आज प्रत्येक क्षेत्रात लक्ष करण्याचा प्रयत्न अधिक प्रमाणात केला जातो. मुद्दाम या एकमेव जातीला अनेक गाव–खेडयामध्ये एकटे पाडून या जातीतील महिलांवर आणि पुरूषांवर अनेक प्रकारचे अतीप्रसंग केले जातात. गावात याचांच बहिष्कार केला जातो. त्यांची धिंड काढली जाते. त्यांना जाळले जाते, मारले जाते असे कोणतेही राज्य नाही की ज्या राज्यामध्ये दलित महिला आणि पुरूषांवर अत्याचार होत नाही. याला त्या–त्या राज्यातील सरकार जबाबदार आहे. स्वतःला उच्चभ्रू समजणारे लोक राजरोसपणे अत्याचार करतात तरी देखील या अल्पसंख्याक समाजाबद्दल बोलायला यांची तोंड बांधली जातात काय? किंवा त्या राज्यातील वरच्या वर्गानी असे करावे अशी त्यांना मान्यता दिली गेली की काय? असाही प्रश्न उपस्थित होताना दिसतो.

अनुसूचित जातींवर या पुढे अत्याचार होणार नाही असे सरकार सांगत असते हा केवळ कांगावा असतो. परंतु सारखे वाढणारे प्रमाण हे कमी होण्यापेक्षा दिवसेदिवस वाढत जात आहे. याला कोण जबाबदार आहेत. याची मात्र कधीही माहिती घेतली जात नाही. यावरून हेच लक्षात येते की सरकारी यंत्रणेवर कोणाचे तरी नियंत्रण असावे असे एकंदरीत चित्र दिसून येते असे अनेक उदाहरणे गेल्या काही वर्षामध्ये अनेकदा घडलेली आहेत. आणि लोकांच्या समोर आलेली असून त्यावर केवळ चर्चा होतात. कोणतेही उत्तर मात्र मिळत नाही.

आज मोठया प्रमाणात नक्षलवाद्यांकडून दलितांच्या हत्या करण्यात आलेल्या आहेत. मागील वर्षी 14 एप्रिल रोजी छल्लेवाडा येथे डॉ. आंबेडकर जयंती कार्यक्रमात नक्षलवाद्यांनी एका व्यक्तीची अगदी बुध्दविहार परिसरातच हत्या केली. आजवर किमान किती बौध्द बांधवांना नक्षलवाद्यांनी ठार केले आहे. अशा हत्या काय नक्षलवादी स्वतः करीत आहेत किंवा काही उच्च समाजाच्या लोकांचे बाहुले बनून घडवून आणत आहेत काय असे दिसून येते.

नुकत्याच दिनांक 2 डिसेंबर 2017 च्या महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रातून गुन्हेगारीच्या संदर्भातील वृत्तसंस्था, नवी दिल्ली येथून एक लेख प्रसिध्द झालेला आहे. देशात घडणाऱ्या गुन्हेगारीत उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र अशा काही राज्यामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दाखविले आहे. राष्ट्रीय गुन्हे विभागाने 2016 चा अहवाल प्रकाशित केला या अहवालात देशातील 19 शहरांचे सर्वेक्षण करण्यात आले. असून त्यामध्ये राजधानी दिल्ली सर्वात असुरक्षित शहर असल्याचे सिध्द झाले आहे. तर देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचा या यादीत दुसरा क्रमांक आहे. देशभरातील सुमारे 40 टक्के बलात्कार आणि महिलांवरील 30 टक्के अत्याचार दिल्लीत होत असल्याचे उघड झाले आहे. त्या खालोखाल मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि केरळचा क्रमांक आहे.

आज देशामध्ये बलात्काराचे 38,947 प्रकरणे घडलेली असून पतीकडून अत्याचार 10,378, विनयभंग 84,746 तर अपहरण 64,519 असलेले दिसून येते. आज देशामध्ये महिलांवरील अत्याचाराच्या 3,98,954 प्रकरणाची नोंद करण्यात आली आहे. 2015 च्या तुलनेत हे आकडेवारी 2.9 टक्क्यांनी वाढली आहे. यामध्ये अत्याचार पिडीत स्त्रियांचे जातीनिहाय विश्लेषण देण्यात आलेले नाही. परंतु यामध्ये अनुसुचित स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे असे म्हटल्यास चूक होणार नाही. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार विरोधी अधिनियम 1989 नुसार प्रत्येक गुन्हेगारावर कार्यवाही व्हायला हवी परंतु

असे होतांना दिसत नाही. त्यामुळेच कायद्यावर पाहिजे असे नियंत्रण नाही म्हणूनच प्रमाण सारखे वाढलेले आहे.

देशांमध्ये अनेक प्रकरणे गेल्या काही वर्षात घडलेले आहेत. त्यामध्ये दिल्लीतील निर्भया प्रकरण, भंडारा जिल्हयातील भोतमांगे प्रकरण, हैद्राबाद येथील वेमूला प्रकरण, दिल्लीतील जे.एन.यु. मधील कन्हैया कुमार प्रकरण, दाभोळकर हत्या, गोविंद पानसरे ची हत्या, कुलबर्गी यांची हत्या, गौरी लंकेश यांची हत्या करण्यामागे अनुसूचित जातीवर अन्यायच मानला जातो.

नुकतेच कोपर्डी मधील प्रकरण आज ताजे उदाहरण समोर आलेले आहे. दिड महिन्यामध्ये कोपर्डी हत्याकांडातील लोकांना फासावर चढविण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले आहे तर दूसरीकडे खैरलांजी भोतमांगे हत्याकांडातील सर्व पूरावे असून देखील अत्याचार करणारे मोकळे सुटतात. न्यायव्यवस्था तीच सरकारी वकील तेच तरी देखील असा निर्णय होतो. हा अनुसूचित जातीवर झालेला अन्यायच आहे यावरून न्याय व्यवस्था देखील अनुसूचित जातीवर अन्याय करीत आहे, असे दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला संविधान दिले त्या संविधानात सर्व कलमांचा विचार केला, प्रत्येकाला समान न्याय मिळावा असा संदेश संविधानात असतांना देखील एका अनुसूचित जातीच्या संविधान लिहिणाऱ्या भारतीय राज्यघटनेच्या शिल्पकाराचे महत्व कमी दाखविण्याचे काम सरकार आणि इतर यंत्रणा करीत आहेत, हेच यावरून दिसून येते.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची योजना सरकारकडून चालविली जाते. या आरक्षणाचा उल्लेख देखील संविधानात आहे. परंतु गेल्या चार–पाच वर्षापासून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती देखील वेळेवर दिली जात नाही. त्यामुळे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. हे देखील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षण घेवू नये असेच षडयंत्र रचन्याचे प्रकार सरकारकडून घडविण्याचा प्रयत्न सुरू आहे हा देखील अनुसूचित जातीवर एक प्रकारचा अन्यायचा आहे. त्यातूनच अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

**निष्कर्ष** : राज्यघटनेमध्ये सर्व तरतूदी असतांना विविध प्रकारचे कायदे असतांनाही दिवसेंदिवस अत्याचाराचे प्रमाण वाढतच आहे, हे एक प्रकारचे षडयंत्र असल्याचे लक्षात येते.

**सूचना** : 1) देशातील सर्व मानवाकरीता एकसारखे नियम असावे. 2) कोणत्याही जातीवर अन्याय होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. 3) आरक्षणाची योग्य प्रकारे अंमलबजावणी व्हावी. 4) दलितांवरचे अत्याचार कमी करण्याकरीता प्रयत्न करावेत. 5) विविध कायद्याची योग्य अंमलबजावणी करण्यात यावी.

**संदर्भग्रंथ :**

1. महाराष्ट्र टाईम्स, नागपूर, शनिवार, 2 डिसेंबर 2017, पृ.12
2. महाराष्ट्र टाईम्स, नागपूर, गुरूवार, 7 डिसेंबर 2017, पृ. 9
3. डॉ. आगलावे प्रदिप, भारतीय समाजः प्रश्न आणि समस्या, साईनाथ प्रकाशन, नागपूर, दुसरी आवृत्ती, जुलै, 2015.
4. लोटे रा. ज., भारतीय समाज आव्हाने आणि समस्या, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जुन 2015.
5. गजभिये संजय, अन्य पिछडा वर्ग और डॉ. अम्बेडकर, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, 2010.
6. डॉ. आंबेडकर भी. रा., भारतातील जाती, अशोक प्रकाशन, बेझनबाग, नागपूर.

# 'ऊनपाऊस' : सामाजिक बांधिलकी जोपासणारा कवितासंग्रह

**डॉ. विजया जि. राऊत,** मराठी विभाग प्रमुख, विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स नंदनवन, नागपूर–9

कवी जर डोळस असेल आणि त्याच्याजवळ जर थोडा विवेक असेल तर त्याच्या भोवती चालणा–या सामाजिक चळवळीमुळे त्याची दृष्टी सुध्दा अधिक प्रबोधनपर व व्यापक होत असते. प्रा. आदिनाथ पवार हे सुध्दा ह्याच थाटणीतले मराठी साहित्य जगातील ख्यातनाम कवी, लेखक आहेत. त्यांची डोळस जीवनदृष्टी विशाल आणि व्यापक असून समाजास हितकारक ठरणारी आहे. यावरून त्यांचा सामाजिक मूल्यांचा व्यासंगी दृष्टिकोन लक्षात घेता येतो.

प्रा. आदिनाथ पवार हे मुळचे जामखेड येथील असून तेथील दुष्काळ पिडीत असलेले सभोवतालचे समाजजीवन मोठया धीरगंभीर वृत्तीने मांडण्याची त्यांची जिज्ञासा अंतर्मुख स्वरूपात त्यांचे काव्यात उतरते. ह्याच धर्तीवरील त्यांचे 'ऊनपाऊस' हा नव्याने प्रकाशित झालेला काव्यसंग्रह आहे. यापूर्वी त्यांनी 'रानमाती' व 'सीनाकाठच्या कविता' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन केलेलं आहे व त्यांचे समीक्षापर लेखांचे संकलन सुध्दा 'रानगंध' या पुस्तकाव्दारे प्रसिध्द झालेले आहे.

'ऊनपाऊस' हा कवितासंग्रह माझे हाती पडल्यावर यावर समीक्षेच्या अंगाने लेखन करावे हा दृष्टिकोन ठेवून त्यातील एक्कावन कवितांचे वाचन केल्यावर त्यातील ब–याच कविता हया समाजिक, भ्रष्टाचार, स्त्री अत्याचार, दुष्काळ, शेतक–यांचे हाल, व्याभिचारी राजकारणी इ. संवेदनशील विषयावर आधारलेले जाणवले. समाजात घडणाऱ्या प्रत्येक जाणिवांचे वर्णन मार्मिकपणे केलेले दिसते. खरं पहाता हे प्रबोधनपर लेखन म्हणावे असे मला वाटते. कारण ह्या कवितेतील आशय हा मानवी जीवनमूल्य व विचारांचा ऱ्हास तसेच समाजातील किड व वाईट चालीरितीचे प्रतिबिंब ठसविणा–या आहेत. प्रत्येक कवितेतील आशय व अभिव्यक्ती हे सुध्दा परस्परभिन्न आहे. अत्यंत जाणीवपूर्वक व मूल्यदृष्टीने वेध घेवून प्रा. आदिनाथ पवार ह्यांनी प्रत्येक काव्याची गुंफन केलेली आहे. ह्यातील काही मोजक्याच कवितेवर समीक्षा करण्याचा माझा प्रयत्न येथे केलेला आहे.

प्रा. आदिनाथ पवार ह्यांची ''बळीराजा'' ही कविता मनाला सुन्न करणारी अशीच आहे. अति पाऊस आणि अति दुष्काळ हया दोन्हींचा समन्वय या कवितेत कवीने शब्दांद्वारे मांडलेला आहे. समाजातील महत्वाचा घटक म्हणजेशेतकरी वर्ग आणि या वर्गावर ओढवलेली दुष्काळाची सावट आणि या दुष्काळामुळे त्यांच्यावर आलेले दारिद्रय ह्याचे मार्मिक वर्णन यात केलेले आहे. हा शेतकरी सावकाराकडून कर्ज घेतो आणि शेतात पाहिजे तसे पीक न मिळाल्यामुळे पुन्हा कर्ज घेतो आणि कर्जाचा डोंगर आपल्या भोवती उभा करतो. त्या दयनीय, गरीब, शेतकऱ्याची दया कुणालाही येत नाही. समाजाला पिळवून खाणारे लुच्चे सावकार आपले पोट शेतक–यांच्या जमीनी हडपून भरतात आणि शेतकरी कुटूंबाला धड पांघरायला सुध्दा मिळत नाही, ही दयनीय अवस्था समाजात आहे. त्यावर कवी म्हणतात,

''कोटिकोटी खाती लुच्चे आम्ही ऐकतो पाहतो
कोट फाटका मिळेना आम्ही थंडीत गोठतो''

''ऊनपाऊस'' ह्या संग्रहातील प्रत्येक कवीता हृदयाला स्पर्श करुन जाणा–या आहेत. समाजातील सत्याचा आरसा कवीने या संग्रहाच्या कवितेतून दाखविलेला आहे. त्यांची ''दारुबंदीची ओवी'' ही कविता व्यसनाधीन समाजातील आजच्या स्थितीची ओळख करुन देणारी आहे. दारुसाठी माणूस कोणत्याही स्तराला जाऊन पोहोचतो. त्या माणसाच्या तोंडाला दारु सारख्या अमृतांची चव लागली की एका पेल्यानेही त्याचे मन शांत होत नाही. त्या दारुसाठी तो पैशाने हवालदिल होतो आणि ह्याला त्याला उधारी मागत फिरतो त्यासंदर्भात कवी म्हणतात,

''संसारात गोता खाई दारुडया बेपारी
खिशात छदाम गेली रांगत उधारी''

दारूडया व्यक्तीला दारु पिल्याशिवाय काम करणे अवघड झााल्यासारखे होते. म्हणूनच दारु पिल्यावरच न्हावी याची कैची समोर चालते. दारु पिऊनच तलाठी पानमळा पाहू शकतो. दारुने तर्रर झालेला ड्रायव्हर सुसाट गाडी चालवितो तसेच दारु पिऊन कुणबी हा तीफन चालवितो. या दारुमूळे समाजातील कुटुंबावर जे संकट कोसळते तसेच हा जो भोंगळ कारभार समाजात चालला आहे त्यासाठी कवी सुंदर ओवी लिहितात,

''दारु पिला राजा आली देशाला चक्कर
मिठाच्या पोत्यावरी छापले शक्कर''

दारूमुळे समाजावर होणारे दुष्परिणाम आपल्या डोळयासमोर आज दिसत आहे ह्याचे ज्वलंत व मार्मिक वास्तवतेचे दर्शन कवीने ह्या कवितेतून घडवून आणले आहे.

'कित्ता' या कवितेत समाजाला लागलेली भ्रष्टाचाराची कीड समाजाला कशी पोखरत चाललेली आहे. प्रत्येक वस्तुच्या भेसळीमुळे मानवालाच मानवाच्या हातून होणारा भ्रष्टाचार सहन करावा लागत आहे. एखाद्या सच्चा समाजप्रेमी खोटेपणा व भ्रष्टाचाराविषयी आवाज उठवतो परंतु त्याचा आवाज हा भ्रष्टाचारी समाज दाबून नितीमूल्यांचा कसा ऱ्हास करतात ह्याचे वर्णन करतांना कवी सुंदर ओळी लिहितो,

''जरी अण्णा हजारे हजर करिती सत्याला,
ढळती नच वाटा निढविल्या कित्त्याला''

दारादारात, गल्लीगल्लीत हे भ्रष्टाचारी लोक तोंड उघडून बसलेली आहेत. या भ्रष्टाचाराच्या काळया करतुदी मुळे कायदा सुद्धा मोडायला हा समाज मागे पुढे पाहत नाही हे वास्तव आहे.

औद्योगिकीकरणामुळे, खाजगीकरणामुळे मजुरांवर होणारा अन्याय कवीने ''आम्ही मजूर मजूर'' या कवितेतून स्पष्ट केलेला आहे. मजूर हा कधी ताठ मानेने जगूचशकला नाही. आपल्या मुलांबाळाला त्याने

तळहाताच्या फोडाप्रमाणे मोठे केले आणि शिकविले परंतु जेव्हा नोकरीची वेळ आली तर ...

''शिकविले पोरांबाळा आडवी वशिल्याची जात
नाही नौकरीत जागा आणा पैशाची वरात''

शेवटी पैसा मोठा, अशी वेळ या गरीब मजूरांवर आलेली दिसते. शिवाजी राजे आणि महात्मा गांधी ह्यांनी देशाला संपन्न बनिवण्याचा प्रयत्न केला यावर कवी म्हणतो,

''अरे शेतकरी राजा दीस इपरित आलं
द्युत खेळता खेळता राज पांडवाचं गेलं''

कवीने त्यांच्या 'दुष्काळ' या कवितेत शेतकऱ्याला अगदी जीवाला भोवणारा दुष्काळ कसा शेतकऱ्यासाठी जीवघेणा आहे तसेच यामुळे होणा–या वेदना कशा त्रासदायक आहे आणि त्यामुळे शेतकरी वर्ग कसा होरपळून निघत आहे ह्याचे विवेचन अत्यंत सुक्ष्मतेने सादर केलेले आहे. हे सादर करतांना कवी म्हणतात,

''रान उजाड जाहलं नाही कुठं हिर्वा मळा
खेडयां पाडयांच्या नशिबी मुक्या सोसायच्या कळा.''

'पाणलोट' या कवितेत कवीने दुष्काळी भागात होत असलेल्या शासकीय विकास कामात येणाऱ्या शासकीय व्यवस्थेचे व अडचणीचे वास्तव चित्रण रेखाटलेले आहे. हा शासकीय वर्ग भ्रष्टाचाराने माजून गेलेला आहे. ह्याकडे लक्ष वेधतांना कवी म्हणतात,

''फुगवा छाती ओढा माती, हाफिसातच जुळवा नाती
मनी गुळणी दाबून धरा, जरा इकडे कान करा
हलक्या हाती मारा शेरा ...(कागदोपत्री) कामे केली
पावसाने वाहून गेली !''

'लोखंडया' व 'कहाणी' या कवितेत हस्त नक्षत्रात शेतक–यांचे दैनंदिन व्यवहार व कामकाजावर पाऊस कसा घाला घालतो, हाताशी आलेले पीक कसे एका क्षणात उद्ध्वस्त करतो व ह्यामुळे तो कसा कर्जबाजारी होतो ह्यांचे अत्यंत गंभीर वर्णन स्तब्धतेने करतात. अत्यंत वेदनादायी व हलाखीचे जीवन शेतकरी मित्र जगतो आहे. त्यावर शासन मुग गिळून फक्त बघत असतो कोणतीही मदत पूरवित नाही ही फार मोठी शोकांतिकाच म्हणावी लागेल. कवीला ह्याची जाणीव असल्याचे याव्दारे स्पष्ट होते.

'खेडयाची उदासी' या कवितेत कवीने खेडेगावातील शासकीय सेवकांच्या कामकाजावर निशाना साधला आहे. हा शासकीय कर्मचारी खेडयात न राहता बाहेर राहून दुर्बिणीच्या सहाय्याने त्या खेडयाची कशी राखण व सेवा करतात याचे टिकादर्शक वास्तव चित्र ह्या कवितेत कवीने उभे केलेले आहे.

''ग्रामसेवक, तलाठी,नर्स, डॉक्टर गावाला
शेतीखातं नि गुरुजी,दोन डझन पेवाला
जिथं नेमिली नोकरी,तिथं निवास करावा,
गांधीबाबांचा संदेश,जरा ध्यानात धरावा''

'पैसा' या कवितेत कवीने पैसा हा सर्वस्वी प्रिय कसा आहे ह्या संदर्भात भाष्य केलेले आहे. कवितेच्या सुरुवातीलाच कवी म्हणतात,

''आज पैसा हसरा माणसांस प्रिय झाला
मंदिरही म्हणते– नाचवावे पैशाला''

पैशामुळे माणूस माणसाला विसरलेला आहे. नाती–गोती अधिक लोप पावत चाललेली आहे. पैशामुळे समाजात व्यभिचार अधिक वाढलेला असुन भ्रष्टाचाराचा सुरूंगही जोडीला लागलेला आहे आणि समाज या सुरूंगामुळे होरपळून गेलेला आहे. याच पार्श्वभूमीवर कवी समाजाला आव्हान करतात की,

''चला मने उजळुया .... माणूसकीने आता
अन् सत्य–शिवाची हवी उद्याची सत्ता !''

'सुगरण' या कवितेत कवीने सुगरण पक्षी आपले घरटं तयार करीत असतांना किती रानीवनी फिरत जाऊन गवताची काडी शोधून शोधून घरटे बनवित असते आणि आपल्या पिल्याचे सरंक्षण करण्यासाठी किती तत्पर असते व एका पिलासाठी चिमणीचा जीव कसा कासाविस होतो ह्याचे अत्यंत मार्मिकतेने वर्णन केलेले आहे. घरटं विणण्यासाठी या पक्षाला परमेश्वर कशी बुद्धी देते त्या संदर्भात कवी म्हणतात,

''गूढगढी विणायास । काय बुद्धी देतो देव
वसे चोचीमंधी कला। जरी चिमणीचा जीव''

'विज्ञानयुग' ह्या कवितेत कवीने जुने गेले आणि नवीन बदल उदयास आले त्यासंबंधी पेढे घ्या पेढे द्या असे संबोधन करतांना जग कसे झटपट पालटत आहे हयाचे चित्रण करतात.

''पेठे घ्या पेठे द्या, आता जुने पाढे गेले
भले ! विज्ञान पुढे गेले, नवे नवे धडे आले''

संगणकाप्रमाणे मानवी मेंदू अविरत काम करून तो नवीनवीन शोध लावत जगास प्रगतीकडे नेत आहे, स्पर्धा वाढल्या आहेत व प्रत्येक जण विज्ञानमय झालेला आहे. जग झपाटयाने समोर जात आहे हयावर कवी आवर्जुन म्हणतात,

''पेशी आणि रक्तसुद्धा
प्रयोगशाळेत बनणार आहे
माणसाचा चेहरा म्हणे
हवा तसा मिळणार आहे''

या विज्ञानयुगात खाऊन पिऊन मौज करा कारण क्षणार्धात जग नष्ट होवू शकते हया भाकड संकेतांना कवी खोडत जावून नवनविन आव्हानांना विज्ञानाच्या सहाय्याने तोंड देण्यास या पिढीने तयार असावयास हवे अशा संदेश या कवितेव्दारे देतात.

''सोळा डिसेंबर बारा''या कवितेत कवीने 16 डिसेंबर 2012 रोजी दिल्लीत एका बसमध्ये मुलीवर झालेल्या अत्याचाराचे वर्णन केलेले आहे. समाजातील वासनांध लोक गिधाडाप्रमाणे वागतात. अशा प्रवृत्तीच्या नराधमांनी या मुलीला एकटे बघून तिच्यावर घाला घातला परंतु तिनेही या गिधाडांना वाघिणीसारखीच झुंज देत शेवटी प्राण सोडले. त्या संदर्भात कवी म्हणतात.

"झुंजझुंजली वाघिण, झाला आखरिला घात
जरा दूर ओसाडीला, भिर्कावली झुडुपात"

अशी त्या नारीची स्थिती या गिधाडांनी केली. त्यावर कवी रोषाने म्हणतात की या गिधाडांचे एक हात व एक पाय कापून जीवनभराची शिक्षा देवून पुढे अशी चूक हे करणार नाही व स्त्रीवर अन्याय होणार नाही अशी शिवशाही स्थापन करण्याची आजची गरज आहे.

"सजा ठोका चौरंग्याची, जसा शिवशाही न्याय
राखा नारिची इज्जत, कुठे घडो न अन्याय"

"ऊनपाऊस" ह्या कवितासंग्रहातील 'महाकाळ' या शेवटच्या कवितेत पसरलेल्या भयाण दुष्काळाचे वर्णन कवीने केलेले आहे. हिवाळयात सुद्धा उन्हाळयासारखा रानमाळ ओसाडलेला आहे. त्यावर दुष्काळ स्थिती अनुभवतांना कवी म्हणतात,

"हाबकला बळीराजा चिमणा संसार घायाळ
म्हणे "काय गुन्हा देवा असा धाडाया दुष्काळ?"

ग्रामीण परिसरातील दुष्काळी परिस्थितीने झालेल्या शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेचे वर्णन या कवितेत आलेले आहे.

कवी आदिनाथ पवार ह्यांच्या कवितेतून समाजजीवनाची विषमता अनुभवाला मिळते. त्यांची लेखनशैली धारदार स्वरुपाची आहे. समाजातील ज्वलंत प्रश्नांना आपल्या कवीतेतून कवीने बोलके केलेले दिसते. त्यांच्या कविता हया एक विलक्षण, स्पंदन पावत राहणाऱ्या, अर्थदृष्टया सखोल, भावनेच्या चक्राकार गतीने कधी लहान तर कधी विस्तीर्ण होत जाणाऱ्या वाङ्‌मयप्रकारात मोडतात. कवितेचा आकार लहान असूनही प्रवाहात एक खडा टाकताच अनेक वर्तुळे निर्माण होत असतात, त्याप्रमाणे प्रसरण पावणाऱ्या तसेच शब्दांच्या मोजक्याच नादातून अर्थ विस्तीर्ण करीत जाणाऱ्या त्यांच्या कविता आहेत.

कवींची अभ्यासवृत्ती सखोल असल्याने समाजव्यवस्थेत निर्माण झालेल्या मूल्यदृष्टीतून जीवनाकडे कवी पाहतात. ग्रामीण जीवन समाजातील नितीमूल्यांची तसेच बांधिलकीची जाणीव ठेवणारे संवेदनशिल मूल्यसरणीचे व व्यासंगी अभिवृत्तीचे प्रा. आदिनाथ य. पवार हे कवीलेखक आहेत.

सामाजिक बांधिलकी व जाणीव हयांचा सुरेख मेळ "ऊनपाऊस" या कवितासंग्रहातून प्रकट केलेला आहे. समाजातील भ्रष्टाचार, स्त्री अत्याचार, गरीबी, दारुबंदी, दुष्काळ परिस्थिती, शेतकऱ्यांचे हाल, विषम राजकरण, विज्ञानयुग तसेच निर्सगाचे वर्णन इत्यादी सर्व बाबींवर प्रकाश टाकून समाजाचा आरसा कवितेच्या माध्यमातून वाचकांपुढे मोठया सहज व मार्मिकतेने समाज प्रबोधनासाठी हा काव्यसंग्रह ठेवेलेला आहे याचा आनंद आहे.

एक प्रबोधनकार व अनुभवी वास्तववादी विचारवंत म्हणून आजच्या नव्या पिढीने त्यांचेकडे बघितल्यास काहीही वावगे ठरणार नाही अशी त्यांची स्थाननिश्चिती करता येईल असे मला वाटते.

---

**संदर्भ सुचीः–**


1. प्रा. अनुराधा गुरव – अक्षरवाङ्‌मय दिवाळी अंक 2014
2. प्रा. डॉ. दत्ता पाटिल –रिसरेक्शन इंटरनॅशनल जर्नल कर्नाटक नोव्हे. 2013
3. प्रा. द. ता. भोसले –प्रस्तावना – पोशिंद्याची कविता, प्र. आ. 2010, पृ क.19
4. प्रा आ. य. पवार – ऊनपाऊस (काव्यसंग्रह), रानजाई प्रकाशन पुणे.

# सामाजिक विकासाची संकल्पना व महिला विकास

**डॉ. राहुल भगत,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा

विकासाच्या संकल्पनेचा अत्यंत महत्वपूर्ण पैलू म्हणजे सामाजिक विकास होय. सामाजिक विकासाची संकल्पना महत्वपूर्णच नाही तर व्यापकही आहे. त्यामुळेच समाजशास्त्रीय अध्ययनात सामाजिक विकासाची संकल्पना वांरवांर येत असते.

**सामाजिक विकासाचा अर्थ व व्याख्या** :– 1940 मध्ये हॉब हाऊस यांनी शैवबपंस कमअमसवचउमदजश या ग्रंथात सामाजिक विकासाच्या संकल्पनेवर भर दिला. हॉब हाऊस यांनी सामाजिक विकासाचा अर्थ मानसिक विकासाशी जोडला. त्यांच्या मते जेव्हां मनुष्याचा मानसिक विकास होतो तेंव्हा त्याचा सामाजिक विकास आपोआप होत असतो.

हॉब हाऊस यांच्यामते, 'विकास म्हणजे मानवाच्या जिवनात घडून येणारी कोणत्याही प्रकारची प्रगती होय.' किम यांच्यामते, 'सामाजिक विकासाचा अर्थ त्या उद्देशांना प्राप्त करणे होय. ज्यामध्ये समाजाच्या अभावामुळे एकटे जिवन व्यतीत करणाऱ्या अधिकांश व्यक्ती उपलब्ध असलेल्या सामाजिक संसाधनामधुन आपला वाटा मागू शकतील'. वार्नर यांच्यामते, 'समाजात राहणाऱ्या लोकांच्या जिवन स्तरांमध्ये वृध्दी हाच सामाजिक विकास होय.' (डॉ. जी.आर. मदन 2011–156)

वरिल व्याख्यावरून हे स्पष्ट होते की, समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिक जिवन स्तरात वृध्दी होणे म्हणजे सामाजिक विकास होय. विकासाच्या मिश्रीत व बहुआयामी प्रकृतीमुळे विकासाची सर्व समावेशक परिभाषा करणे कठीण आहे. इतिहासात प्रगतीचे स्वरूपावरून त्या समाजाचा विकास कसा झाला ते सांगता येईल. समाजात होणारे भौतिक आणि अभौतिक परिवर्तन व त्यांच्या इतर शाखांचे प्रसंग म्हणजेच विकास असे म्हणता येईल. (शिवबहाल सिंग, 2010–15)

**महिला विकास** :– पारंपारिक भारतीय समाजाच्या संस्कृतीला हजारो वर्षाचा इतिहास असून एवढया प्रदीर्घ काळात स्त्रीचा दर्जा दोलायमान स्थितीतच होता असे दिसते. मानवी समाजाच्या विकासाच्या सुरुवातीला स्त्रीचा दर्जा अगदी कनिष्ठ होता. पौर्वात्य समाजात तो शेतीप्रधान अवस्थेत काहीसा सुधारला व मध्ययुगीन काळातही त्याची पातळी फारशी वर गेली नाही. आणि आधुनिक काळातही स्त्रियांचा सामाजिक दर्जा फार उंचावलेला आहे असे ठामपणे म्हणता येत नाही. महिलांना केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगातच कमीजास्त प्रमाणात कनिष्ठ दर्जाची वागणूक दिली जाते हे सर्वमान्य सत्य आहे. तथापी राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासासाठी महिलांना समान संधी देऊन त्यांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय समता प्रदान करणे आवश्यक आहे. महिलांच्या सबलीकरणाच्या प्रक्रियेतील हा सर्वात मोठा घटक आहे. महिलांची उपेक्षा व संधीवंचितता ही त्यांना पुरुषांपेक्षा जास्त नव्हे पण समान दर्जा देण्यास असमर्थ ठरत आहे. त्यासाठी महिलांना पुरुषांच्या तुलनेत समान स्तरावर आणण्यासाठी त्यांच्या सबलीकरणाची नवी संरक्षक शक्ती व सामर्थ्य देणे गरजेचे व न्याय्य आहे.

भारतीय समाजात वैदिक काळापासून हिदूं संस्कृतीने स्त्रीला शक्तिचे प्रतिक मानले आहे. आपल्या समाजात स्त्री ची दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती या रुपात आराधना केली जाते. स्त्री अभावी पूरुष अपुर्ण मानला असून तिला अर्धांगींनी म्हणून बरोबरीचा दर्जा दिलेला दिसतो. वैदिक व उत्तर वैदिक काळात स्त्रिचा सामाजिक दर्जा बराच वरचा होता. त्याकाळी मुलींना शिक्षणासाठी गुरुगृही पाठवीत असत. स्वतःच्या पतीची निवड स्वतः करणारी सावित्री त्या काळात होती. सती प्रथा, पडदा पध्दती नव्हती. स्त्री मोकळेपणाने वावरत असे. कालांतराने तिचे अनेक अधिकार हिराऊन घेतले गेले व मध्ययुगात तिची स्थिती अत्यंत दयनीय झाली. 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रियांचा सामाजिक दर्जा सुधारण्याचे अनेक प्रयत्न झालेत. स्त्रियांवर लादलेल्या अनेक अव्यावहारीक बंधनांची जाणीव समाजसुधारकांना याच काळात झाली. याच काळात प्रगतीशिल लोकांच्या विचारात अनेक कारणांनी बदल झाला. पाश्चात्य समाजातील स्वातंत्र्य व समानतेच्या तत्वाने प्रभावित होऊन सामाजिक परिस्थितीचा विचार होऊ लागला. राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेल्या ब्राम्हो समाजाच्या प्रयत्नांनी सती प्रथा कायद्याने बंद केली व पुनःर्विवाहाचे प्रयत्न केले. याच शतकात भारतात महात्मा फुंले व सावित्रीबाई फुले यांच्या विशेष प्रयत्नामुळे स्त्री शिक्षणाचा प्रसार झाला. शाळा, महाविद्यालये स्थापन झाली व त्यामधून स्त्रियां शिक्षण घेऊ लागल्या. तथापी स्त्रियांच्या बाबतीतला हा बदल फक्त शहरी क्षेत्रातच दिसून येऊ लागला. ग्रामीण क्षेत्रातील स्त्रियांच्या बाबतीत मात्र या काळात कोणताही बदल झाला नाही. स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी पंडीता रमाबाईचा काळ उल्लेखनीय आहे. तर 20 व्या शतकात सिस्टर निवेदीता, ॲनी बेझंट, मार्गरिट या पाश्चात्य महिलांनी भारतातील स्त्री मुक्ती आंदोलनास गती दिली व स्त्रियांचा सामाजिक दर्जा उन्नत करण्यास पूरुषांच्या बरोबरीने प्रयत्न केलेत.

भारतीय समाजात स्त्रियांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्वपूर्ण कार्य महात्मा गांधी यांनी केले. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीच्या माध्यमातून स्त्रियांना समाजकारणात व राजकारणात प्रवेश करण्याची संधी प्राप्त करुन दिली. महात्मा गांधीनी भारतीय समाजातील अनिष्ट प्रथांना विरोध करुन व स्त्रियांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करुन त्यांना प्रतिष्ठा व पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा मिळऊन देण्यासाठी अनेक प्रयत्न केलेत. या प्रयत्नामुळे भारतीय स्त्रियांच्या स्थितीत थोडी सुधारणा घडून आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महिला उध्दाराच्या कार्यांचा उल्लेख केल्याशिवाय भारतीय स्त्रियांच्या मुक्तिलढयाचा इतिहास पूर्णच होऊ शकत नाही. बाबासाहेबांनी स्त्रियांच्या अधोगतीसाठी मनुला

जबाबदार धरले आणि धर्माच्या नावावर स्त्रियांना गुलामापेक्षाही हीन दर्जावर नेणा–या अनिष्ट प्रथा परंपरावर जोरदार आघात केला. दलित स्त्रियांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे असंभव कार्य बाबासाहेबांनी केले. स्त्रियांना हजारो वर्ष गुलामीत ठेऊ पाहणा–या प्रथा–परंपराना दूर करण्यासाठी त्यांनी संसदेत हिन्दु कोड बिल सादर केले. सनातनी लोकांनी त्याचा विरोध केला. पण कालांतराने हेच बिल विविध अधिनियमांच्या स्वरुपात पारित करण्यात आले आणि बाबासाहेबांनी देशातील सर्व स्त्रियांच्या प्रगतीचा सनदशीर मार्ग प्रशस्त करुन दिला.

स्वातंत्र्य प्राप्ती नंतर मात्र स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न झालेत. स्त्रियांच्या मुक्तीसाठी अखिल भारतीय महिला परिषद, स्त्रियांवरील अन्याय दूर करण्यासाठी निर्माण झाली. मात्र स्वातंत्र्य चळवळीने स्त्रियांची सामाजिक व धार्मिक बंधनातून सुटका केली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांनी सुध्दा पूरुषांच्या बरोबरीने सहभाग घेतला. भारतातील स्त्रियांची ही चळवळ स्त्री जाणिवेच्या दृष्टीकोणातून महत्वाचा टप्पा होता.

1991 च्या जनगणनेनुसार भारतात महिलांची संख्या संपूर्ण लोकसंख्येच्या 48.1 टक्के आहे. स्वातंत्र्यानंतर महिलांची उन्नती, विकास योजनांचे केंद्रबिंदू राहिले आहे. मागील 50 वर्षात या संबंधात नीती–निर्माणामध्ये कित्येक परिवर्तन झाले. 70 च्या दशकात कल्याण ही संकल्पना होती. 80 पर्यंत 'विकास' मध्ये बदलली. 90 व्या शतकात ती 'अधिकार' पर्यंत पोहचली. (डॉ. जी.आर. मदन, 2011–369). महिला व बालविकास विभाग प्रारंभापासूनच महिलांचे सामाजिक, आर्थिक स्तर उंचविण्यासाठी विशेष प्रकारचे कार्यक्रम बनवित आहे. या विभागाव्दारे महिलांना अधिकार संपन्न बनविण्यासाठी केले गेलेले प्रयत्न खालील प्रमाणे–

1) **कल्याण आणि सहाय्यता सेवा** :– 1992–93 मध्ये कामकाजी महिलांसाठी आवास योजना निर्माण करतांना 23 अतिरिक्त वसतिगृहांना मान्यता दिली गेली आहे अशा प्रकारे स्वस्त व सोयीयुक्त असे 811 वसतिगृह 56,974 कामकाजी महिलांना आपली सेवा देत आहेत.

2) **रोजगार आणि प्रशिक्षण** :– 1987 मध्ये महिलांना रोजगार व प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम सुरू करण्यात आला. याचा उद्देश कृषी, रेशम किटक पालन अशा महिलांना प्राधान्य असलेल्या उद्योगांमध्ये त्यांना कौशल्य व सुधारणा करून दारिद्रयरेषेच्या वर आणणे हा आहे. आतापर्यंत 3.86 लक्ष स्त्रियांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला आहे.

3) **प्रशिक्षण, रोजगार आणि उत्पादन केंद्र योजना** :– नार्वेची विकास एजेंसी (नोराड) च्या सहाय्याने महिलांना सार्वजनिक क्षेत्रात, उपक्रमात, स्वायत्त संस्था, स्वंयसेवी संघटन व परंपरागत व्यवसायात प्रशिक्षण, उत्पादन करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. 1983 मध्ये या कार्यक्रमाला लागू करून 1.56 लक्ष महिला व मुलींना याचा फायदा झाला आहे.

4) **वयस्क महिलांसाठी शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करण्याची सधन योजना** :– ही योजना 1958 मध्ये सुरू करण्यात आली. हिला केंद्रिय समाज कल्याण बोर्डाव्दारे लागु करण्यात आले आहे. ज्यांनी शाळेचे शिक्षण अर्धवट सोडलेले आहे अशा स्त्रिया व मुलींना व्यावसायिक प्रशिक्षण देवून रोजगाराची नवी संधी मिळवून देणे हा उद्देश आहे. 2000 अभ्यासक्रम 2010 मध्ये सामील करण्यात आले त्याचा 50,000 महिला व बालीकांनी लाभ घेतला.

5) **सामाजिक, आर्थिक कार्यक्रम** :–या कार्यक्रमाअंतर्गत केंद्रिय समाज कल्याण बोर्ड फंड प्रदान करणाऱ्या विविध प्रकारच्या कार्याकरिता असलेल्या स्वंयसेवी संघटनांना सहाय्यता प्रदान करतो. या कार्यामध्ये लघु उद्योग जसे पशुपालन, रेशिम किटक पालन, हस्तशिल्प, कृषी, मत्स्य पालन इ. महिला व विकलांग महिला संघटन, सहकारी संस्था, तुरूंग, नारी निकेतन अशा सारख्या संस्था अनुदानास पात्र असतात. 85 टक्के अनुदान सरकार देतो व उर्वरित 15 टक्के प्राप्त करता संस्थेला द्यावे लागते.

6) **महिला समृध्दि योजना** :– 2 आक्टों. 1993 ला देश भरातील 1. 32 लक्ष ग्रामीण डाकघरांच्या माध्यमातून ही योजना कार्यान्वित करण्यात आली. ही योजना ग्रामीण महिलांना बचत करण्याची सवय लागावी म्हणून सुरू करण्यात आली. पुढील पांच वर्ष या योजनेला जवळपास 885 विभागात लागू करण्यात आले ज्यामध्ये 20 लक्ष महिलांना लाभान्वित केले गेले.

7) **इंदिरा महिला योजना** :– 20 ऑगष्ट, 1995 ला 200 विकास खंडात या योजनेची सुरूवात करण्यात आली या योजनेची ताकत तिच्या अंतर्गत गठीत केल्या जाणाऱ्या समूहात आहे. ग्रामिण क्षेत्र व शहरातील झोपडपट्टीतील महिलांना जागरूक बनविणे आणि आर्थिक दृष्टया अधिक संपन्न बनविण्याचा प्रयत्न या योजने मार्फत केला जातो.

8) **बालीका समृध्दी योजना** :– 2 ऑक्टोबर 1997 ला प्रथम सुरूवात झाली या अंतर्गत 15 ऑगष्ट 1997 ला किंवा त्यानंतर जन्माला येणाऱ्या मुलीच्या आईला 500रू. ची अनुदान राशी देण्यात येऊ लागली. ही योजना गरिबी रेषेच्याखाली असणाऱ्या लोकांवर लागु होते. 1997–98 ला राज्य व संघशासीत प्रदेशात एकुण 60 करोड रूपयांची मदत या योजनेअंतर्गत करण्यात आली.

9) **महिला व मुलांच्या यौन शोषणविरूध्द कार्यवाही योजना** :– 9 जुलै 1997 ला एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला की, वेश्यावृत्ती समस्या, वेश्यांच्या मुलांच्या समस्या, बाल वेश्यावृत्ती अशा गंभीर विषयांवर अध्ययन करण्यासाठी एक समिती चे गठन करण्यात यावे. त्यानुसार अशी समिती गठीत करण्यात आली. या योजनेला केंद्र सरकार, मंत्रालय, गैर सरकारी संघटन, सार्वजनिक तथा निजी क्षेत्र आणि समाजातील अन्य वर्ग मार्गदर्शन करतील. या योजनेत समाविष्ट विषय – अवैद्य व्यापार, जागृती आणणे, आरोग्य विषयक सेवा, शिक्षण, मुलांची देखभाल, आवास, आश्रम गृहाची निर्मिती, कायद्याची अमंलबजावणी इत्यादी विषय समाविष्ट होते.

10) **राष्ट्रीय महिला आयोग** :– 31 जानेवारी 1992 ला राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम 1990 च्या अंतर्गत स्थापन करण्यात आली आयोगात एक अध्यक्ष, पाच सदस्य, एक सचिव व सर्व पदाधिकारी केंद्र सरकारव्दारे निवड केलेले असतील. या आयोगाने स्त्रियांना न्याय देण्यास प्राथमिकता दिली. या उद्देशाकरिता आयोग कौटुबिंक महिला लोक अदालत लावणे, कौटुबिंक विवाहात परामर्श देणे तसेच स्त्रियांना कायद्याच्याप्रति जागरूक बनविण्यासाठी प्रशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित करीत असतो. देशात महिला उत्पीडन घडल्यास त्याची बातमी मिडीया व लोकापर्यंत पोहचविण्याची कार्यवाही आयोग करतो.

11) **राष्ट्रीय महिला कोष** :– 1992–93 मध्ये 31 करोड रकमेपासून राष्ट्रीय महिला कोष गठीत करण्यात आला. मुख्य उद्देश निर्धन महिला किंवा अनौपचारिक क्षेत्रातील गरीब महीलांना कर्ज देवून त्यांच्या आवश्यकतांना पूर्ण करणे आहे. याचे गठन 1860 च्या सोसायटी पंजीकरण अधिनियमाच्या तहत करण्यात आले आहे. या अधिकोषाच्या संचालनासाठी एक संचालक मंडळ बनविल्या गेला आहे. महिला व बालविकास मंत्री कोष चे अध्यक्ष असतात. आतापर्यंत 47.85 करोड रू. चे कर्ज या कोषाने मंजूर केलेले आहेत. स्वंय सहायता समुहाला सुध्दा व्याज मुक्त कर्ज देण्याची योजना देखील बनविली आहे. 1775 नवीन स्वंय सहायता समूहाच्या गठनासाठी 256 गैर सरकारी संघटनापैकी 59 च्या 47.85 करोड रूपया पैकी 71 लक्ष रूपयांच्या राशीं मंजूर केली आहे.

सरकारने महिलांच्या विकासाकरिता त्यांना उच्च सामाजिक दर्जा प्राप्त व्हावा म्हणून काही कायदे ही बनविले आहेत. ते खालीलप्रमाणे –

1) पृथक निवास व निर्वाह व्यय अधिनियम 1949 ला हा कायदा बनविण्यात आला. या कायद्यानुसार पति पासून विलग राहणाऱ्या स्त्रिला सुध्दा विशिष्ट स्थितीत निर्वाह करण्यासाठी आवश्यक धनप्राप्त करता येतो.

2) हिंदू विवाह अधिनियम – 1955 या कायद्याने स्त्रि पुरूष हा भेद मिटवून बहुविवाहास मान्यता नाकारली आहे.

3) हिंदू उत्तराधिकार अधिनियम 1956 – वडीलोपार्जित संपत्तीत मुलगा–मुलगी असा भेद न करता मुलीलाही समान वाटा मिळेल अशी तरतुद या कायद्यात केलेली आहे.

4) हिंदू दत्तक पुत्र ग्रहण व निर्वाह व्यय अधिनियम – आता दत्तक घेतांना पत्नीची सहमती आवश्यक आहे. स्त्री स्वतःही मुल दत्तक घेवू शकते. परित्यक्ता, असहाय, विधवा स्त्रियांना निर्वाह खर्च प्राप्त करण्याची अधिकारीणी या कायद्याने बनविले आहे.

याशिवाय महिलांच्या सामाजिक विकासास शासनच नव्हे तर निमसरकारी, गैरसरकारी संघटना, संस्था सुध्दा कार्यरत आहेत. जनवादी महिला समिती (भाकपा) प्रगतीशील महिला संघटन, भाजप व कांग्रेस महिला संघटन इत्यादी राष्ट्रीय पक्षांची महिला संघटना स्त्रिला तिचे अधिकार व स्थान मिळवून देण्यासाठी कार्यरत आहेत.

**निष्कर्ष** : असे म्हणता येईल की, स्वातंत्र्यानंतर भारत विकासात अग्रसेर आहे. येथील महिला आपल्या अधिकाराप्रती जागृत झाल्या आहेत. निरक्षरता, दरिद्रय, लिंगभेद इत्यादी अडचणी पार करीत महिला आता सक्षम आणि आत्मनिर्भर बनत आहेत.

**संदर्भ ग्रंथ** :–

1. मदन, जी. आर., (2011), 'परिवर्तन एवं विकास का समाजशास्त्र', जवाहर नगर दिल्ली, विवेक प्रकाशन.
2. शिवबहाल सिंह, (2010) 'विकास का समाजशास्त्र', दिल्ली, रावत पब्लिकेशन.
3. सवलीया बिहारी वर्मा, एम.एल. सोनी, संजिव गुप्ता, (2005), महिला जागृती और सशक्तीकरण, जयपूर, अविष्कार पब्लिकेशर्स.
4. मदन, जी. आर., (2011), 'विकास का समाजशास्त्र', दिल्ली, विवेक प्रकाशन.
5. वी.एन. सिंह, जनमेजय सिंह, (2013), 'नारीवाद', दिल्ली, रावत पब्लिकेशन.

# भारतीय कामगारांची वर्तमान स्थिती आणि सरकारी धोरणे

**अर्चना एस. देशमुख,** संशोधक विद्यार्थिनी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
संशोधन केंद्र – कॉमर्स विभाग, तायवाडे महाविद्यालय, महादुला, कोराडी, नागपूर (महा.)

अर्थव्यवस्थेचा विकास हा श्रमीकांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतो व श्रमीकांची कार्यक्षमता ही त्यांना मिळणाऱ्या सोयीसवलतींवर अवलंबून असते. ज्यावेळी श्रमीक आपल्या कार्याचे योगदान देत असतो त्यावेळी त्याला काही शारीरिक व मानसिक सुखसोयी देणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढत जाते व त्याचा प्रभाव उत्पादनावर पडतो. औद्योगिक क्रांती ही समाधानी श्रमशक्तीवर अवलंबून असते.

श्रमीकांना कामाच्या वेळी अनेक समस्या येतात. त्यांना कामापेक्षा कमी मजुरी मिळते. त्यांची एकप्रकारे मालकवर्गाकडून पिळवणूक होत असते. श्रमीक हया घटकांमुळेच मालकवर्गाला नफा प्राप्त होतो. ज्यांच्या कतृत्वावर मालकवर्ग ऐशोआरामाचे जीवन जगतात ते श्रमीक मात्र काहीसा मोबदला मिळविण्यासाठी रात्रंदिवस राबत असतात. त्यामुळे त्यांचा उद्धार व्हावा व त्यांना कामानुसार योग्य मजुरी मिळावी या बाबतीत मालकवर्ग जागृत झाला आहे. त्यामुळे त्यांना आवश्यक सोयी सवलती मिळतात. त्यांच्या कल्याणासाठी अनेक कार्य राबविले जातात.

कोणत्याही उत्पादन क्षेत्रांतील उत्पादन काढण्याकरीता ज्या अनेक घटकांची आवश्यकता असते. त्यापैकी एक घटक म्हणजे श्रम होय. इतर घटक कमी जास्त प्रमाणात उपलब्ध असले तरी एकवेळ चालेल. परंतु श्रम कमी पडलेला चालणार नाही. उत्पादन कार्यात श्रमाची जेवढी गरज असेल, जितकी आवश्यकता असेल तेवढे श्रम उपलब्ध असणे आवश्यक आहे. श्रमाशिवाय कोणत्याही वस्तुचे उत्पादन शक्य नाही. त्यामुळे कोणत्याही देशाच्या, अर्थव्यवस्थेत श्रमाला जेवढे स्थान प्राप्त झाले आहे तेवढे उत्पादनाच्या इतर घटकाला प्राप्त झालेले नाही. म्हणजेच उत्पादनाच्या इतर घटकांना गौण स्थान असून श्रमाला मात्र अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. उत्पादनाच्या इतर घटकांप्रमाणे श्रम स्थायी स्वरूपात राहणारे नाही. तर ते नाशवंत आहे. ज्या प्रमाणे वस्तुंचा साठा, पैशाचा साठा करून त्याचा आवश्यक तेव्हा उपभोग घेतल्या जातो. उपयोग केल्या जातो. तसे श्रमाचे नाही. रोजचे श्रम रोजच व्हावयास पाहिजे. एखाद्या दिवशी श्रमिकांने जर श्रम केले नाही तर त्या दिवशीचे व दुसऱ्या दिवशीचे असे दोन दिवसांचे श्रम. एकाच दिवशी करू शकत नाही. म्हणजेच गेलेल्या दिवसाप्रमाणे श्रमही नष्ट होतात. याचाच अर्थ असा की इतर वस्तु किंवा संपत्तीप्रमाणे श्रम संग्रहीत केल्या जाऊ शकत नाही. संग्रहनाचे दृष्टीने श्रमाला काहीही मूल्य नाही. श्रम हा उत्पादन कार्यातील सजीव घटक आहे. त्यामुळे तो उत्पादनाच्या इतर घटकांप्रमाणे वाटेल तेव्हा आणि वाटेल तेथे स्थलांतरित केल्या जाऊ शकत नाही. सजीव असल्यामुळे श्रमिकाला कौटूबिक प्रेम, आकर्षण, उद्योगाबद्दल, कार्यस्थळाबद्दल, आस्था, आपल्या राहत्या स्थान, गाव, शहराविषयी आत्यंतिक प्रेम, वडीलोपार्जीत वस्तु, संपत्तीविषयी आत्मियता इत्यादीमूळे तो इतरत्र जाण्यास नाखूश, असतो. इतरत्र गेल्यामूळे निर्माण होणाऱ्या अनेक समस्या त्यांचे समोर दत्त म्हणून उभ्या राहतात. त्यामुळे तो प्राप्त आणि उपलब्ध परिस्थितीतच राहू इच्छितो. त्यामुळेच श्रमिकांची गतीशिलता अत्यंत कमी असते. श्रमाची मागणी कमी झाल्याबरोबर मोठया प्रमाणात श्रमिक बेकार होतात. त्यांच्या रोजीचा प्रश्न निर्माण होतो. अशावेळी श्रमिक कमी परिश्रमिक, रोजंदारी किंवा मजुरीवर कार्य करण्यास तयार असतो. कारण तसे केले नाही तर त्याच्या उदरनिर्वाहाची समस्या निर्माण होते. म्हणून श्रमाची मागणी कमी झाल्याबरोबर श्रमाचा पुरवठा कमी होऊ शकत नाही. त्याकरीता बराच काळ लागतो. यामुळेच श्रमाची मागणी आणि पुरवठा यांच्यात संतुलन आढळून येत नाही. इतर वस्तुंच्या मागणी आणि पुरवठयाबाबत असे म्हणता येणार नाही. मागणी पुरवठयातील संतुलन म्हणजे मागणी वाढताच पुरवठा वाढणे आणि मागणी घटताच पुरवठा घटणे होय.

श्रम उत्पादनाचे प्रभावी साधन आहे. हे निर्विवाद आहे. परंतु ते केवळ साधनच नव्हे तर उत्पादनाचे साध्यही आहे. उत्पादन हे समाजाची मागणी पूर्ण करण्याकरीता त्यांच्या उपभोगाकरीता असते. म्हणजेच उत्पादनांचे साध्य समाजाला वस्तू पुरविण्याचे आहे. श्रमिक हा समाजाचाच एक घटक आहे. म्हणजेच करण्यात आलेले उत्पादन श्रमिकांकरीता सुद्धा असते. त्यामुळेच श्रम हे साध्य ठरते.

जेथे श्रमाचा पुरवठा आवश्यकतेपेक्षा जास्त असेल तर तेथे श्रमिकांची सौदाशक्ती कमी पडते. अशा ठिकाणी श्रमिकांचे परिश्रमिक सर्वस्वी मालक वर्गावर अवलंबून असते. तेथे श्रमिक आणि मालक यांच्यात होणाऱ्या सौदेबाजीला महत्वच नसते. मिळेल त्या दराने श्रमिक काम करण्यास तयार असतात. ते परिश्रमिक जास्त मिळावे म्हणून अडवणूकीचे धोरण स्विकारू शकत नाही.

मानवी जीवनाच्या सामान्य आर्थिक व्यवहारात गुंतलेल्या मानव समाजाचा अभ्यास हा अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आहे. त्यामध्ये मानवी कल्याणाच्या भौतिक साधनांची प्राप्ती आणि त्यांचा उपयोग यांचेशी निगडीत असलेल्या व्यक्तीगत आणि सामाजिक प्रयत्नांचे विवेचन केले जाते. 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात अर्थशास्त्र हे एक विकसीत आणि समृद्ध शास्त्र म्हणून प्रस्थापित झाले आहे. त्यामध्ये उत्पादनाच्या कार्यात श्रमाला वठवावी लागणारी भूमिका तपासणे, श्रमिकांच्या बाबींची दखल घेणे, श्रमिकांची कार्यक्षमता कमी असण्याची कारणमीमांसा करणे, श्रम समस्यांचे विश्लेषण आणि विवेचन करणे, श्रमिकांच्या कार्यांवर आणि जीवनावर परिणाम करणाऱ्या सर्व आर्थिक आणि सामाजिक बाबींचा अभ्यास करणे, श्रमिकांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना सुचविणे इत्यादी बाबींचा अभ्यास केल्या जातो. म्हणून सर्व प्रकारच्या अर्थव्यवस्थेत "श्रम" हा एक महत्वाचा उत्पादनाचा घटक

आहे. म्हणूनच कार्यक्षम श्रमाची आर्थिक विकासात असणारी महत्वाची भूमिका उत्पादकतेशी जोडली गेली आहे. अशा परिस्थितीत श्रमिकांची गुणवत्ता वाढवून त्यांच्या एकूण कार्यक्षमतेत वाढ घडवून आणणे आवश्यक असते. श्रमिकांची भूमिका ही देशाच्या एकूण आर्थिक विकासासाठी त्यांच्या उत्पादकतेवर अवलंबून असते. त्यामुळे देशातील श्रमिक वर्गांची कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढविणे हाच एक प्रभावी उपाय मानला जातो. त्यातूनच आधुनिक उद्योग, व्यापार आणि दळणवळण या सर्व क्षेत्रांमध्ये श्रमाची प्रभावी भूमिका वाढविणे हीच श्रम शक्तीची खरी उत्पादकता मानली जाते.

श्रम समस्या शेती, उद्योगांत तेंव्हाच निर्माण होतात जेंव्हा उत्पादनाची वेगवेगळी साधने, घटक वेगवेगळया व्यक्तींद्वारे पुरविली जातात. म्हणजे श्रमाचा पुरवठा श्रमिक करतात. तर भांडवलाचा पुरवठा उद्योगपती वा भांडवलदार करतो. भूमीचा पुरवठा आणखी दुसरी कोणी व्यक्ती करते. आवश्यक साधन सामुग्री इतर कोणीतरी पुरविते. आणि अशावेळी त्या स्थानी समस्या निर्माण होतात याचाच अर्थ असा की श्रम जेव्हा बाजारात विक्रीकरता येते आणि विक्रेता म्हणून भांडवलदार, कारखानदार उभा राहतो. त्यानुसार काम करणारे आणि ते करवून घेणारे वेगवेगळे असतात. प्रत्येकाचे हितसंबंध वेगवेगळे, भिन्न असतात. तेव्हाच खऱ्या अर्थाने श्रम समस्या मोठया प्रमाणावर निर्माण होतात.

औद्योगिक क्षेत्रात श्रमाचा क्रय विक्रय होतो. त्यामुळे औद्योगिक संबंध निर्माण होतात. श्रमिक मजूरीने दुसऱ्याकरीता काम करतो. कामाच्या बदल्यात त्याला मजूरी मिळते. आणि मग तेथे वेगवेगळया कारणांमुळे समस्या निर्माण होतात. त्या काम करणाऱ्यांशी म्हणजेच श्रमिकाशी संबंधीत असतात. आणि म्हणूनच त्या समस्यांना श्रम समस्या म्हणतात. श्रमिकांच्या अनेकविध समस्या आहेत. त्या प्रत्येकीचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे कठीण जाते. म्हणून श्रम समस्यांचा योग्य अभ्यास करण्याच्या दृष्टीने त्यांचे वर्गीकरण करून अभ्यास करावा लागेल.

श्रमिकांला जास्तीत जास्त मजूरी, पगार मिळावा असे वाटते तर मालकाला कमीत कमी मजूरी, वेतन देऊन जास्तीत जास्त बचत कशी होईल. नफा कसा मिळेल ही चिंता असते. अशा प्रकारे दोघांचे आर्थिक हित (स्वार्थ) वेगवेगळया दिशेला, परस्पर विरोधी असतात. आणि येथेच समस्या निर्माण होतात. स्वार्थापोटी निर्माण होणारे संघर्षच श्रम समस्यांना जन्म देतात. या समस्यांमध्ये परिश्रमिक (वेतन) बोनस, कामाचे तास, सुट्या इत्यादीचा समावेश होतो. औद्योगिक संबंधात निर्माण होणा–या सर्वच समस्या ह्या आर्थिक नसतात. तर अर्थाशी (पैशाशी) संबंधीत नसलेल्याही अनेक समस्या असतात. श्रमिकाला काम करण्यालायक योग्य वातावरण तसेच चांगली, माणूसकीच्या वागणूकीची मालकाकडून अपेक्षा असते.

श्रमिकांशी संबंधीत असलेल्या वरील समस्या एक दुसऱ्याशी इतक्या घनिष्ठ आणि संबंधीत आहेत. की एकीचा परिणाम दुसरीवर होतो. किंवा एका समस्येमुळे दुसरी निर्माण होते. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. जसे– श्रमिकांचे राहणीमान घसरल्यास औद्योगिक संबंध बिघडू शकतात. औद्योगिक संबंध बिघडल्यास काम करण्यात श्रमिकाद्वारे कुचराई होऊ शकते. हळू काम करण्याची प्रवृत्ती राहू शकते. श्रमिकांची गैरहजेरी वाढू शकते व अशा अनेक समस्यांची मालीका तयार होते.

आधुनिक आणि विशाल उद्योगांच्या आणि विकासामुळे, गुतांगुतीच्या औद्योगिक पद्धतीमुळे बऱ्याच देशामध्ये मोठया प्रमाणावर श्रमसमस्या निर्माण झाल्या आहेत. प्रत्येक उद्योगप्रधान राष्ट्रामध्ये श्रमाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. आणि त्या दृष्टीनेच श्रमिकांचे हित, सुरक्षा लक्षात घेऊन त्यांच्याकरीता निरनिराळे श्रम कायदे करण्यात आले आहेत. त्यामुळे त्या त्या देशांतील श्रम कायद्यांना तेथील राजकीय जीवनात, वर्तुळात अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. ज्या गोष्टी सहजा सहजी मिळावयास पाहिजे. त्या त्यांना मिळत नाही. मिळू शकत नाही. किंवा संबंधित लोक मिळू देत नाही. अशा श्रम–कायद्यांमुळे त्या त्या देशांतील श्रमिकांना मिळू लागल्या आहेत. या कायद्यांमुळे बऱ्याच श्रम–समस्या यशस्वीरित्या सोडविण्यात येत आहे. त्यामुळे श्रम आणि भांडवल म्हणजेच श्रमिक आणि मालक यांच्यात सलोख्याचे संबंध राहतात. सामाजिक सुरक्षितता, श्रम, कल्याण इत्यादी गोष्टींकरीता प्रयत्न केले जातात. आपला देश लोकशाही राज्यव्यवस्था आणि भिन्न अर्थव्यवस्था स्विकारलेला देश आहे. आपल्या येथे जसे सार्वजनिक उद्योगाला महत्व आहे. तेवढेच खाजगी आणि त्यापेक्षा जास्त सहकारी उद्योगाला आहे. तीनही क्षेत्रांतील श्रम समस्या काही प्रमाणात वेगवेगळया आहेत. त्या दृष्टीने वरील समस्यांच्या संदर्भात भारतीय श्रमसमस्यांचा आपल्याला अभ्यास करावयाचा आहे.

भारतीय श्रमिक अकार्यक्षम आहे. तो करीत असलेले काम इतर देशातील श्रमिकांच्या तुलनेत कमी असते. तो जास्त काम करण्यास अक्षम आहे. तो वारंवार गैरहजर असतो. शिस्त त्याला माहित नाही. आणि तो ती पाळू शकत नाही. त्याला वाईट सवयी जडलेल्या आहेत. वेतन, मजुरी जास्त मिळाल्यास तो त्याचा उपयोग आपले राहणीमान उंचावण्याकरीता करण्यापेक्षा इतरत्र खर्च करतो. नव्हे तो पैसा उडवितो. असे आणि अशाप्रकारचे अनेक गलिच्छ आरोप त्यांच्यावर करण्यात येतात.

भारतातील श्रमिक अशा गर्दीच्या ठिकाणी आणि स्थितीत राहत असल्यामुळे त्या भागात आजार, त्यामुळे अशक्त होण्याऱ्यांची संख्या आणि आजारामुळे मरणाऱ्यांची संख्या ही खूप असते. तसेच जन्मदर देखील जास्त असतो. वरील सर्व परिस्थिताचा परिणाम प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या श्रमिकांच्या कार्यक्षमतेवर होतो. बऱ्याचशा ठिकाणी काम करण्यास अयोग्य अशी स्थिती असते. काही कारखान्यावर योग्य छप्पर नाहीत. तर कोठे सुरक्षिततेच्या दृष्टीने यंत्राना कव्हर नाहीत. तर काही कारखान्यांच्या इमारतीची उभारणीच चुकीच्या पद्धतीने झालेली आहेत. बऱ्याचशा इमारती इंग्लडमधील कारखान्यांच्या धर्तीवर बांधण्यात आल्या आहेत. ह्या इमारती बांधताना भारतातील आणि इंग्लडमधील एकंदर वातावरणाचा अभ्सास करण्यात आला नाही. बऱ्याच कारखान्यांत पुरेसा

नैसर्गिक प्रकाश व हवेचा अभाव आहे. काही कारखान्यांत श्रमिकांना आवश्यक असलेल्या स्वच्छतेच्या दृष्टीने स्नानगृह, हातपाय धुण्याची व्यवस्था, संडासाची पुरेशी व्यवस्थाच नाही. या प्राथमिक स्वरूपाच्या व्यवस्था सुद्धा अपूऱ्या असल्यामुळे यांचाही विपरीत परिणाम श्रमिकांच्या कार्यक्षमतेवर पडतो. तरीही नफा कमविण्याच्या हव्यासापायी कित्येक कारखानदार या प्राथमिक गरजाकडे दुर्लक्ष करतात. यांच्या अहवालानुसार ''स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक अशा साधनाचा अनियंत्रित कारखान्यांत फार मोठया प्रमाणावर अभाव आहे. असे कारखाने गळत्या छपराखाली, मातीचे तळ असलेली आणि कमीत कमी हवा आणि प्रकाश असलेल्या ठिकाणी सुरू आहेत''.

**संदर्भ :–**


1. डॉ. मुकूंद महाजन, भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, निराली प्रकाशन, पुणे (2007)
2. डॉ. कायंदे पाटील, भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक (2001)
3. डॉ. सौ. इंदूरकर, भारतीय अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर (2000)
4. प्रा. एन. एल. चव्हाण, भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास भाग 1, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव (2003)
5. प्रा. एन. एल. चव्हाण, भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास भाग 2, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव (2004)
6. देसाई–भालेराव, भारताची आर्थिक समस्या 1 व 2, निराली प्रकाशन.

# लोकमान्य टिळकांचे राष्ट्रीय चळवळीतील योगदान : एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. प्रमिला डी. भोयर,** इतिहास विभाग प्रमुख, स्व. निर्धन पाटील वाघाये कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,लाखनी

इ.स. 1857 च्या स्वातंत्र्य संग्रामानंतर इंग्रजांनी भारतीयामध्ये परस्पर अविश्वास निर्माण केला. इंग्रजाच्या स्वार्थी हेतुने भारतीयामध्ये राष्ट्रीय जागृती निर्माण होण्यास सुरूवात झाली या राष्ट्रीय भावनेला व्यवस्थित स्वरूप देण्यासाठी सेवानिवृत्त, ब्रिटीश अधिकारी हयुमच्या पुढाकाराने इ.स. 1885 मध्ये राष्ट्रीय कॉग्रेसची स्थापना झाली. जीने नंतरच्या काळात टिळक आणि गांधीजींच्या नेतृत्वात अतीशय विशाल रूप धारण केले. आणि इंग्रजामध्ये असा विश्वास निर्माण केला की, त्यांनी भारतीय शासनाची सुत्रे भारतीयाकडे देवून त्यांनी स्वदेशी परतावे.

सुरूवातीच्या कालखंडामध्ये राष्ट्रीय आंदोलनाचे प्रमुख नावाडी लोकमान्य टिळक होते त्यांनी इ.स. 1889 पासून तर इ.स. 1919 पर्यंत काही काळ वगळता भारताच्या स्वातंत्र्यासाठी उभारलेल्या चळवळीचे नेतृत्व केले. नंतर टिळकाच्या मृत्युनंतर राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व गांधीजीकडे आले. अशा प्रकारे भारतीयांना स्वातंत्र्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या कार्यात हया दोघांचे योगदान अतीशय महत्वपूर्ण समजल्या जाते.

**लोकमान्य टिळक :–** महाराष्ट्रात लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वात जहालवादांचा उदय झाला त्यामुळेच लोकमान्य टिळक जहालवादाचे कट्टर पुरस्कर्ते समजले जातात. त्यांनी आपल्या संपूर्ण कारकीर्दीत भारताच्या स्वातंत्र्यासाठी जहाल विचारसरणीचा पुरस्कार करून त्यांचा संपूर्ण भारतामध्ये प्रचार करण्याचा प्रयत्न केला. टिळक कॉग्रेसमध्ये सम्मीलीत होण्यापूर्वी कॉग्रेसवर उदारमतवादी नेत्यांचे राज्य होते परंतू स्वातंत्र्य मिळविण्यासाठी टिळकांना कॉग्रेसची मवाळ विचारसरणी मान्य नव्हती त्यामुळे टिळक सुरवातीपासूनच मवाळवाद्यांचे विरोधक बनले.

त्यानंतर लोकमान्य टिळकांनी प्रत्यक्ष कॉग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर कॉग्रेसमधील एका वर्णामध्ये आपल्या विचारसरणीचा प्रचार करून त्यांना जहालवादासाठी प्रेरीत केले आणि त्याव्दारे संपूर्ण भारतात फार मोठया प्रमाणात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. लोकमान्य टिळकांनी सर्वसामान्य जनतेचा पाठींबा घेतल्याने त्यांना बहूसंख्य भारतीय जनतेनी स्वखुशीने पाठींबा सुध्दा दिला.

**टिळकांचे चरित्र (पुर्वजिवन) :–** अशा या महान आणि यशस्वी नेत्यांचा जन्म 23 जुलै 1856 रोजी रत्नागीरी येथे एका ब्राम्हण कुटुंबात झाला. शिक्षण आटोपल्या नंतर देशसेवा हेतुने टिळकांनी इ.स. 1880 मध्ये पुण्याला न्यु इंग्लीश हॉयस्कुलची स्थापना केली आणि येथुनच खऱ्या अर्थाने टिळकांनी आपल्या सामाजिक कार्याला सुरूवात केली. त्यानंतर टिळकांनी लवकरच मराठी भाषेत ''केसरी'' तर इंग्रजी भाषेत ''मराठा'' या वृत्तपत्राची स्वतः निर्मिती केली या कामी त्यांना त्यांचे मित्र आगरकरांचे बहुमोल सहाय्य लाभले.

लोकमान्य टिळकांनी आपल्या वृत्तपत्राव्दारे आपले जहाल विचारसरणी सर्वसामान्य जनतेमध्ये पटवून देण्याचा प्रयत्न केला त्याचबरोबर आपल्या स्वातंत्र्यासाठी आपण ब्रिटीश सरकारच्या विरोधी अशाप्रकारे संघटीत झाले पाहीजे अशी जागृतीची भावना निर्माण करण्याचे कार्ये टिळकांनी या वृत्तपत्राव्दारे केले. याच दरम्यान टिळकांनी कोल्हापूर राज्यातील ब्रिटीश सरकारच्या काही धोरणावर आपल्या वृत्तपत्रातुन काही टिका केली त्यामुळे सरकारला टिळकांची टिका पसंत न पडल्यामुळे त्यांनी टिळकांना 101 दिवसाची कारावासाची शिक्षा ठोठावली, टिळकांना कारावासाची शिक्षा झाली असली तरी त्यांच्या प्रतीष्ठेत कसल्याही प्रकारची कमतरता निर्माण झाली नाही. उलट टिळकांना भारतीय जनता नेता या नावांनी संबोधल्या गेले.

**टिळकांचा कॉग्रेमसमध्ये प्रवेश आणि महाराष्ट्रात राष्ट्रीय आंदोलन सुसंघटीत करण्याचे प्रयत्न :–**इ.स. 1889 मध्ये लोकमान्य टिळकांनी कॉग्रेसमध्ये प्रवेश केला त्यावेळी कॉग्रेसवर मवाळवादी नेत्यांचे वर्चस्व असुन काही मुठभर सुशिक्षीत वर्गाची कॉग्रेस ही मिरासदारी होती. त्यामुळे लोकमान्य टिळक सुरूवातीपासूनच मवाळवाद्यांचे विरोधक बनले त्यांनी कॉग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर कॉग्रेसच्या स्वरूपात बदल करण्याचा प्रयत्न केला. लोकमान्य टिळकांना माहीत होते की, जोपर्यंत कॉग्रेसच्या मागण्या मागे सर्वसामान्य भारतीय जनतेचे सहकार्य मिळत नाही तो पर्यंत कॉग्रेसच्या मागण्यांना विशेष अर्थ उरणार नाही त्यामुळेच लोकमान्य टिळकांना सर्वप्रथम स्वातंत्र्यासाठी सर्वसामान्य जनतेला जागृत करण्याचा प्रयत्न केला.

लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रात राष्ट्रीय आंदोलन संघटीत करण्याचे अतीशय मोलाचे कार्ये केले. भारतीय तरूणांमध्ये राष्ट्रीय वीरता आणि जागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात गोवध विरोध समीत्या आखाडे आणि लाठी क्लब स्थापना केली. लोकमान्य टिळकांनी आपल्या नेतृत्वाद्वारे भारतीय तरूणामध्ये उत्साह निर्माण केला. त्यामुळेच भारतीय जे स्वातंत्र्य प्राप्त करतील ते कोणाच्या कृपेवर अवलंबून नसून स्वसामार्थ्याच्या बळावर मिळवलेल स्वातंत्र्य राहील, अशी साहसाची भावना तत्कालीन तरूणांमध्ये टिळकांनी निर्माण केली. त्याचबरोबर ब्रिटीशांच्या विरोधी महाराष्ट्रात राष्ट्रीय जागृती फार मोठया प्रमाणात चालना देण्यासाठी टिळकांना काही धार्मीक उत्सवांचे सुध्दा आयोजन केले. त्यामध्ये खालील उत्सवांचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो.

**गणपती उत्सव (1893) :–** लो. टिळकांनी इ.स. 1893 मध्ये महाराष्ट्रात गणपती उत्सवाला सुरूवात केली कारण की राष्ट्रीय उत्सवांच्या माध्यमाने बहुसंख्य जनता एकत्रीत येते आणि त्यामुळे या

बहुसंख्य जनतेमध्ये राष्ट्रीय जागृती निर्माण करणे विशेष कठीण काम नव्हते. त्यामुळे लोकमान्य टिळकांनी धार्मीक उत्सवाच्या माध्यमातून आपल्या राजनैतीक उद्देश सफल करण्याचा प्रयत्न केला आणि त्यामध्ये टिळक बऱ्याच अंशी सफलसुध्दा झाले. ज्याप्रकारे गणपतीने राक्षशी प्रवृत्तीचा नाश केला असे म्हटले जाते, त्याचप्रकारे गणपतीचा आदर्श डोळयासमोर ठेवून भारतीयांनी संघटीतपणे इंग्रजांचा प्रतीकार करावा आणि स्वातंत्र्य प्राप्त करावे असे टिळकांना या उत्सवाच्या द्वारे सुचवायचे होते.

**शिवाजी उत्सव (1895) :–** गणपती उत्सव पाठोपाठच लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रात इ.स. 1895 मध्ये शिवाजी उत्सव साजरे करण्यास सुरूवात केली. ज्याप्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कर्तबगारीमुळे बलाढय अशा मोगल सत्तेशी प्रतीकार करून महाराष्ट्रात स्वतंत्र अशा स्वराज्यांची स्थापना केली. त्याच प्रकारे भारतीय जनतेनी संघटीत होऊन शिवाजींचा आदर्श डोळयांसमोर ठेवून संघटीत रितीने इंग्रजांचा प्रतीकार करावा आणि आपले स्वातंत्र्याचे हक्क इंग्रजाकडून मिळवावे असा लोकमान्य टिळकांचा हा उत्सव भरविण्यामागे उद्देश होता. संगीत, लाठी प्रदर्शन आणि जूलूस या उत्सवाची अनिवार्य साधने होती. या उत्सवाच्या माध्यमातून टिळकांनी महाराष्ट्रामध्ये फार मोठया प्रमाणात जागृती निर्माण केली आणि इंग्रजांच्या विरोधी महाराष्ट्रात जनआंदोलन सुसंघटीत आणि बळकट करण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे डॉ. तारांचद म्हणतात, ''लोकमान्य टिळकांनी या धार्मीक उत्सवाच्या माध्यमातून जनतेत राष्ट्रीय वीरता आणि उत्साह जागृत केला तसेच मराठी राज्याची स्मृती सुध्दा जागृत केली''.

**रॅंड आणि आयर्स्टची हत्या आणि टिळकांचा कारावास (इ.स. 1897) :–** इ.स. 1896–97 मध्ये भारतातील बऱ्याच प्रांतात भयानाक दुष्काळ पडला होता आणि दुष्काळ पाठोपाठच प्लेगसारख्या साथीच्या रोगांनी प्रचंड थैमान घातल्यामुळे भारतातील लाखो लोक मरत असून अनेक कुटुंब उध्वस्त सुध्दा झालीत परंतू राज्यकर्ता या नात्याने इंग्रजांनी याकडे विशेष लक्ष दिले नाही. आणि जी काही मदत केली ती मदत जनतेपर्यंत सुध्दा पोहचू शकली नाही. अशा संकटकालीन परिस्थितीमध्ये जनतेला सहानुभूती, दाखविण्याऐवजी काही ब्रिटीश अधिकाऱ्यानी उलट त्यांच्यावर अत्याचार करण्यास सुरवात केली. अशा प्रसंगी लोकमान्य टिळकांनी आपल्या वृत्तपत्राद्वारे ब्रिटीश सरकारवर कठोर टिका करून तत्कालीन सर्वसामान्य जनतेला इंग्रजांच्या विरोधामध्ये संघटीत करण्याचे प्रयत्न केलेत. यावेळी इंग्रजानी कठोर धोरणांचा अवलंब केला असला तरी लोकमान्य टिळकांनी हिंसेला कधीही उत्तेजन दिले नाही परंतु ब्रिटीश सरकारच्या कठोर कार्यवाहीमध्ये यावेळी वाढ झाल्यामुळे चाफेकर बंधुसारख्या भारतीय क्रांतीकारकांनी कमीश्नर रॅंड आणि इंग्रज अधिकारी आयर्स्टचा इ.स. 1897 मध्ये वध केला. यासाठी ब्रिटीश सरकारने लोकमान्य टिळकांना जबाबदार धरले तसचे ''सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय? राज्य करणे म्हणजे सुड घेणे नव्हे.'' अशा प्रकारची कठोर टिका टिळकांनी ब्रिटीश सरकारवर केल्यामुळे नंतर ब्रिटीश सरकारने हिंसा आणि राजद्रोहाच्या आरोपाखाली लोकमान्य टिळकांना दिड वर्षाची कारावासाची शिक्षा ठोठावली. लोकमान्य टिळकांच्या अटकेमुळे केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर, संपूर्ण भारतात प्रचंड वादळ निर्माण झाले. टिळकांनी हिंसेला कधीही चालना दिली नाही, तरी सुध्दा विनाकारण ब्रिटीशांनी टिळकांना जेलमध्ये घातले त्यामुळे भारतीय जनतेत ब्रिटीशांविषयी प्रचंड असंतोष निर्माण झाला. टिळकांच्या अटकेनंतर भारतीय परिस्थितीचे वर्णन करतांना सर व्हॅलेटॉइन चीरोल म्हणतात, 'टिळकांच्या अटकेनंतर भारतात अनेक ठिकाणी दंगे झाले आणि जन साधारण व्यक्तिंनी ब्रिटीश सरकारच्या विरोधी रोश प्रगट केला''. यावरून टिळकांचा सर्वसामान्य जनतेवर किमी प्रभाव होता हे दिसते.

**टिळकांची राष्ट्रीय चतु:सुत्री (इ.स. 1905) :–** ब्रिटीश साम्राज्यवादी लॉर्ड कर्झनने इ.स. 1905 मध्ये बंगालची फाळणी केली त्यामुळे या फाळणीचा विरोधी अगोदर बंगालमध्ये आणि त्यानंतर संपूर्ण भारतामध्ये स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीला फार मोठया प्रमाणात सुरवात झाली. त्यामुळे लोकमान्य टिळकांनीसुध्दा बंगाल फाळणीच्या विरोधात इ.स. 1905 मध्ये स्वराज्य, स्वदेशी बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सुत्रीव्दारे महाराष्ट्रामध्ये इंग्रज विरोधी जनआंदोलन बळकट करण्याचा टिळकांनी प्रयत्न केला.

स्वराज्य म्हणजे स्वातंत्र्य प्राप्त करणे, स्वदेशीचा पुरस्कार करणे, परकीय मालावर बहिष्कार घालणे तसेच राष्ट्रीय शाळा, महाविद्यालयाची निर्मिती करणे. टिळकांनी आपल्या चतु:सुत्रीचा महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेमध्ये प्रसार करण्याचा प्रयत्न केला त्यामुळे महाराष्ट्रातील बहुसंख्य जनतेनी सुध्दा टिळकांना पाठींबा दिल्यामुळे राष्ट्रीय चतु:सुत्रीव्दारे महाराष्ट्रात जनजागृती फारमोठया प्रमाणात घडून आली. म्हणूनच लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, ''भारतात राष्ट्रीय शिक्षणाची सुरूवात टिळकांच्या नेतृत्वात सुरू झाली''.

**टिळकांना राष्ट्रीय आंदोलनात गती देण्यास प्रतीबंध आणि 1907 ची सुरत फुट :–** इ.स. 1905 पासुन लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रामध्ये आपल्या राष्ट्रीय चतु:सुत्रीव्दारे जनतेत फारमोठया प्रमाणात जागृती आणि त्यांना संघटीत करण्याचे प्रयत्न केलेत त्यामुळे नंतर ब्रिटीश सरकारने लोकमान्य टिळकांवर प्रतीबंद घालण्यास सुरूवात केली परंतू याचा विशेष प्रभाव टिळकांवर झाला नाही कारण की, यावेळी बहुसंख्य सर्वसामान्य जनतेचा पाठींबा टिळकांना होता. त्यामुळे टिळकांने उलट राष्ट्रीय आंदोलन इंग्रज विरोधी संघटीत करण्याचा प्रयत्न केला.

इ.स. 1897 मध्ये टिळकांना विनाकारण ब्रिटीश सरकारने कारावासाची शिक्षा ठोठावली होती. त्यामुळे याबाबत सुरेंद्रनाथ बॅनर्जी म्हणतात, ''मी आपल्या कडून आणि संपुर्ण भारतीय जनतेकडुन टिळकांना निर्दोष मानतो''. ज्यावेळी साम्राज्यवादी कर्झनने बंगालची फाळणी केली. त्यावेळी भारतात जागृती घडविण्यासाठी टिळकांच्या राष्ट्रीय चतु:सुत्रीचा भारतीयांना उपयोग झाला.

टिळकांच्या जहालवादामुळे कॉंग्रेसने मवाळवादी धोरणाचा त्याग करून राष्ट्रीय चतु:सुत्री व्दारे ब्रिटीश सरकारच्या विरोधी प्रखर आंदोलन

उभारावे. असा विचार टिळकांचा होता. इ.स. 1906 मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या कॉग्रेसच्या अधिवेशनात लोकमान्यांनी आपले विचार मवाळांना पटवून देण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचा विशेष फायदा टिळकांना झाला नाही. त्यानंतर इ.स. 1907 मध्ये सुरत येथे कॉग्रेसचे अधिवेशन भरविण्यात आले त्यावेळी सुध्दा लोकमान्यांनी मवाळवादी नेत्यानी आपल्या भिक्षावृत्तीचा त्याग करून कोणत्याही शासकाला खंबीरपणा दाखवावा आणि त्याचबरोबर राष्ट्रीय चतु:सुत्रीचा अवलंब करून कॉग्रेसने जनआंदोलन बळकट करावे असे जहालवादी विचार टिळकांनी सुरत अधिवेशनात मवाळांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. शेवटी मवाळ आणि जहाल यांच्यात तीव्र वैचारीक मतभेद झाल्यामुळे कॉग्रेसमध्ये फुट पडून जहाल आणि मवाळ असे दोन गट निर्माण झाले. त्यानंतर जहालांना कॉग्रेसचा त्याग करावा लागला, तरी सुध्दा टिळक कॉग्रेसच्या बाहेर राहून ते राष्ट्रीय आंदोलनाला प्रेरणा देत होते.

इ.स. 1908 मध्ये वंगभंग चळवळीने उग्ररूप धारण केल्यानंतर आणि बंगाल फाळणीच्या निमित्ताने लोकमान्यांनी केसरीमध्ये केलेल्या लिखानावरून त्यांनी जुलै 1908 मध्ये ब्रम्हदेशातील मंडालेच्या तुरूंगात 6 वर्षाची काळया पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. टिळक कारावासात असले तरी जनतेला मार्गदर्शन करण्यासाठी त्यांनी 'गितारहस्य' आणि 'आर्टिक होम इन द वेदाज' या दोन प्रसिध्द ग्रंथाची निर्मिती केली.

**टिळकांची मंडालेतून सुटका व (1914) आणि होमरूल आंदोलन :–** इ.स. 1914 मध्ये टिळकांची मंडालेच्या तुरूंगातून सुटका करण्यात आली त्यानंतर पुन्हः टिळकांनी आपल्या राष्ट्रीय कार्यास सुरूवात केली, ब्रिटीश सरकार टिळकांच्या कार्यामुळे पुन्हा बेचैन झालेत. टिळकांवर वारंवार संकट येवून सुध्दा त्यांच्यामध्ये असलेली स्वातंत्र्याची जिज्ञासा अजिबात कमी झाली नाही. त्यानंतर टिळकांनी भारतीय स्वातंत्र्य योध्यांना एक अविस्मरणीय असा नारा दिला तो म्हणजे ''स्वराज्य हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे आणि तो मी मिळविणारचं!''

अशा प्रकारे लोकमान्य टिळक राष्ट्रीय कार्ये करीत असतांना याच दरम्यान ॲनी बेझंट या ब्रिटीश महिलेचे भारतीय राजकारणात आगमन झाले. ॲनी बेझंटने इंग्रजांच्या विरोधी भारतीयांना संघटीत करण्यासाठी अतीशय मोलाचे कार्ये केले. ॲनी बेझंटच्या प्रयत्नामुळे 1916 च्या लखनौ कॉग्रेसमध्ये टिळकांना त्याच्या सहकार्यांना प्रवेश देण्यात आला. त्यानंतर टिळकांच्या अध्यक्षतेखाली लखनऊ येथे इ.स. 1916 मध्ये कॉग्रेसचे अधिवेशन भरविण्यात येवून त्या अधिवेशनाचे अध्यक्ष लोकमान्य टिळक होते. या अधिवेशनात जहाल आणि मवाळ तसेच काही काळ का होईना हिंदु आणि मुस्लीम यांच्यात ऐक्य प्रस्थापीत झाले. त्या दृष्टीने इ. स. 1916 चे कॉग्रेसचे अधिवेशन अतीशय महत्वपुर्ण समजले जाते.

त्यानंतर सप्टें. 1916 मध्ये भारतीय होमरूल संघटनेची स्थापना केल्या गेली नंतर या संघटनेच्या माध्यमातुन ब्रिटीश सरकारच्या विरोधात राष्ट्रीय चळवळी आखाव्यात असे ठरविण्यात आलेत आणि यास मवाळ आणि मुस्लीमांनी सुध्दा सहकार्य देण्याचे जाहिर केलेत.

**लोकमान्य टिळक आणि ॲनी बेझंटच्या नेतृत्वात होमरूल चळवळीचे कार्ये इ.स. 1916 :–** ज्यावेळी भारतात होमरूल संघटनेची स्थापना झाली त्यावेळी जागतीक राजकारणात पहिल्या महायुध्दाची सुरूवात झाली होती. सुरूवातीच्या काळामध्ये इंग्रजांनी सुध्दा पहिल्या महायुध्दात प्रवेश केल्याने सर्व भारतीयांना इंग्रजांना सहकार्य द्यावे आणि त्या बदल्यात त्यांच्याकडुन काही आपले स्वातंत्र्याचे हक्क मिळवून घ्यावे. असा टिळकांचा विचार होता. आणि त्यामुळेच त्यांनी पहिल्या महायुध्दात ब्रिटीशांना सहकार्य करन्याचे भारतीयांना आव्हान केले. परंतु भारतीयांनी इंग्रजांना सहकार्य करूनसुध्दा भारतीयांच्या पदरात विशेष असे काहीच पडले नाही त्यामुळे लोकमान्य टिळकांनी ॲनी बेझंटच्या सहकार्याने इंग्रजांच्या विरोधी फारमोठया प्रमाणात होमरूल चळवळ उभारण्याचे ठरले.

होमरूल चळवळीचा संपूर्ण भारतात प्रसार होण्यासाठी होमरूलच्या अनेक शाखा भारतातील अनेक प्रांतामध्ये उघडण्यात आल्यात ब्रिटीशांच्या अडचणीचा फायदा घेऊन होमरूल चळवळ अतीशय तीव्र करावी अशा प्रकारचे आव्हान लोकमान्य टिळकांनी आपल्या वृत्तपत्रातून भारतीय जनतेला केले. टिळकांच्या होमरूल चळवळीत सर्व सामान्य जनतेकडुन व्यवस्थीत प्रतीसाद मिळाल्यामुळे या चळवळींना लवकरच अतीशय विशाल रूप प्राप्त झाले. होमरूल चळवळीमुळे भारतात राष्ट्रवादाचा फार मोठया प्रमाणात उदय होत आहे. असे इंग्रजांना समजताच त्यांनी होमरूल चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला.

ऐवढेच नव्हे तर टिळकांनी जवळपास 1 वर्षपर्यंत राजकारणात आणि राष्ट्रीय आंदोलनामध्ये भाग घेवु नये असा प्रतीबंध टिळकांवर लावण्यात आला त्यानंतर ॲनी बेझंटला सुध्दा कैद करण्यात आले. होमरूल चळवळीच्या हया दोन प्रमुख नेत्यांना ब्रिटीश सरकारने चळवळीपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला परंतू जे नेते पूर्वी चळवळीत सामील झाले नव्हते त्यांनी होमरूल चळवळीचे नेतृत्व पत्करल्यामुळे दिवसेंदिवस ही चळवळ वाढतच गेली परंतू याच दरम्यान भारतीयांना काही सोयी सवलती तसेच सुधारणा देण्याच्या निमीत्याने ऑगस्ट 1917 मध्ये ब्रिटीश सरकारने एक मांटेग्यू घोषणा जाहीर केली त्यामुळे लवकरच भारतीय राजकारणाची दिशा बदलून होमरूल चळवळीचा जोर कमी झाला.

**अमृतसर अधिवेशनात टिळकांचे शेवटचे भाषण आणि गांधीजींकडे नेतृत्व (राष्ट्रीय) इ.स. 1919 :–** याच दरम्यान रौलेट कायद्यांच्या विरोधी गांधीजींनी इंग्रजांच्या विरोधात सत्याग्रहाच्या चळवळीला सुरूवात केली होती. तसेच एप्रील 1919 मध्ये अमृतसर येथील जालीयनवाला बागेत भरलेल्या सभेवर ब्रिटीशांनी अचानक गोळीबार केला आणि त्यामध्ये बरेच लोक मारल्या गेलेत हेच 'जालीयनवाला बाग हत्याकांड' होय. अशा परिस्थितीत 1919 मध्ये अमृतसर येथे कॉग्रेसचे अधिवेशन भरविण्यात आले या अधिवेशनात भाषण देतेवेळी लोकमान्य टिळकांनी रौलेट कायदा आणि जालीयनवाला बाग हत्याकांड याबाबद त्यांनी ब्रिटीशांचा निषेध व्यक्त केला आणि यानंतर आपण गांधीच्या असहकार

चळवळीला पाठींबा देवू असे त्यांनी म्हटले. परंतु लवकरच 1 ऑगस्ट 1920 मध्ये मुंबईच्या सरदार गृहात टिळकांचा वयाच्या 64 व्या वर्षी मृत्यु होउन भारतीय राजकारणातील एका वादळी युगाचा अंत घडून आला.

**मुल्यमापन :–** इ.स. 1920 सालच्या टिळकांच्या मृत्युने एका युगाचा अंत झाला असे म्हटले जाते. एकंदरीत भारतीय राष्ट्रीय चळवळीतील त्याच्या कार्याचा आढावा घेता वरिल विधानात बरीच सत्यता दिसून येते. लोकमान्य टिळकांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर कॉंग्रेसच्या ध्येयधोरणात आणि स्वरूपामध्ये बदल करण्याचा प्रयत्न केला. कारण की, त्यावेळी कॉंग्रेसवर मवाळवाद्यांचे वर्चस्व असून ब्रिटीशांच्या न्याय बुध्दीवर पुर्ण विश्वास होता तसेच कॉंग्रेस ही फक्त मुठभर सुशिक्षित वर्गाची मीरासदारी होती. जोपर्यंत कॉंग्रेसला सर्वसामान्य जनतेचे पाठबळ मिळणार नाही तोपर्यंत कॉंग्रेसच्या मागण्यांना काहीच मिळणार नाही. लोकमान्य टिळकांना माहीत होते की, विदेशी शासन कितीही चांगले का असेना परंतू स्वशासनाचे हक्क ते सहजा सहजी देवू शकनार नाही. त्यामुळे ते स्वातंत्र्याचे हक्क ब्रिटीशांकडून प्रखर आंदोलनाच्या द्वारे हिसकावून घ्यावे लागेल असे त्यांचे विचार होते. परंतू मवाळांनी त्यांच्या विचाराला पाठींबा दिला नाही तरीसुध्दा लोकमान्यांनी इतर जनतेच्या भरोसावर राष्ट्रीय आंदोलन बळकट करण्याचा प्रयत्न केला.

लोकमान्य टिळकांनी आपल्या मराठा आणि केसरी या दोन वृत्तपत्राद्वारे भारतीयांमध्ये राष्ट्रीय चेतना आणि जागृती निर्माण केली. ब्रिटीश सरकारच्या विरोधी भारतीय जनतेला संघटीत करण्यासाठी गणपती आणि शिवाजी उत्सवासारखे धार्मीक उत्सव साजरे करून टिळकांनी जनआंदोलन बळकट करण्याचा प्रयत्न केला. तसेच आपल्या राष्ट्रीय चतु:सुत्रीद्वारे सुध्दा टिळकांनी महाराष्ट्रात फारमोठया प्रमाणात जनजागृती घडवून आणली. टिळकांचे सर्वात महत्वाचे कार्ये म्हणजे त्यांनी भारतीय जनतेला ब्रिटीशांना उघडपणे संघर्ष करण्याचे शिक्षण दिले. त्यामुळेच अमेरीकन इतीहासकार थिओंडर पॅलेस म्हणतात, ''ज्यावेळी भारतात वास्तविक जागृतीला प्रारंभ झाला त्याचवेळी टिळकांनी स्वातंत्र्याची आवश्यकता प्रतीपादन केली आणि आपल्या चतु:सुत्रीद्वारे सरकारविरोधी जनजागृती फारमोठया प्रमाणात घडवून आणली''.

टिळकांचे राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक, शैक्षणिक इ. क्षेत्रातील कार्यसुध्दा अतिशय महत्वाचे समजले जाते. मंडालेच्या तुरूंगात सुध्दा 'गीतारहस्य' आणि 'आर्टिक होम इन द वेदाज' या दोन ग्रंथाची निर्मिती केली. आपल्या गीतारहस्य ग्रंथाद्वारे भारतीय जनतेला फळाची आशा न धरता सतत कार्ये करीत राहण्याचा संदेश त्यांनी दिला, त्यांनी जिवनाच्या अंतापर्यंत शरीर थकलेले असतांना सुध्दा त्यांना स्वातंत्र्याची जास्त कळकळ असल्याने त्यासाठी ते शेवटपर्यंत कार्यरत होते. म्हणूनच आचार्य जावळेकर म्हणतात, ''क्रांतीकारी होते म्हणून लोकनायक झाले आणि ते लोकांना घेऊन चालले. म्हणून लोकमान्य झाले.'' त्यांची लोकमान्यता त्यांच्या लोकनायकावर अवलंबून होती. त्यांना मिळालेली पदवी ही एक भिकारडी वस्तु नसून स्वकर्तबगारीने मिळवलेली ही एक बहुमोल देणगी होती.

त्यावेळी ब्रिटीश सरकारला बहुतेक भारतीय अतीशय घाबरत असत. परंतू टिळकांच्या कार्यामुळे त्यांना इंग्रज भारतातील सर्वात धोकादाय व्यक्ती म्हणून ओळखत असत टिळकांच्या कार्याची छाप तत्कालीन भारतीय जनतेवर एवढया मोठया प्रमाणात पडली होती. टिळकच इंग्रजांना भारतातून हाकलतील असा विश्वास जनतेचा होता. म्हणूनच रामगोपाल म्हणतात, ''टिळकांच्या मृत्युनंतर गांधीजींनी जे आंदोलन केले त्यांची पार्श्वभुमी टिळकांनी आधीच करून ठेवली होती''.

परंतू सर व्हॅलेंटाईन चीरोल हया इंग्रज व्यक्तींनी टिळकांना भारतीय असंतोषाचे जनक तसेच भारतीय अशांतीचा जन्मदाता अशी टिका केली आहे. पण एकंदरीत टिळकांच्या कार्याचा आढावा लक्षात घेता चीरोलाच्या विधानात फारसी सत्यता दिसून येत नाही कारण की, टिळकांनी हिंसेच्या मार्गाचा अवलंब करून भारतात जनजागृती केली नाही. फक्त आपल्या स्वातंत्र्याच्या हक्कासाठी टिळकांनी भारतीय जनतेला जागृत व प्रेरीत केले. आपल्या हक्कांसाठी जनतेला जागृत करणे हा जर अपराध असेल तर जगाच्या इतीहासामध्ये अशा उदाहरणांची कमतरता नाही.

वास्तविक पाहता लोकमान्य टिळक भारतीय असंतोष आणि अशांतीचा जन्मदाता नव्हते तर स्वतः इंग्रज होते कारण की त्यांनी भारतीयांचे स्वातंत्र्य हिरावून घेवून ते टिकवून ठेवण्यासाठी भारतात कठोर, अशा दडपशाही धोरणाचा अवलंब केला आणि त्यांनीच सरकारप्रती भारतीय जनतेमध्ये जास्तीत जास्त असंतोष निर्माण केला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ सूची :–**


1. डॉ. वि. भा. आठल्ये : 'आधुनिक भारताचा इतिहास'.
2. डॉ. अनिल कठारे : 'आधुनिक भारताचा इतिहास', सन 1858 ते 1947.
3. डॉ. बि. एल. ग्रोवर आणि डॉ. एन. के. बेल्हेकर : आधुनिक भारताचा इतिहास.
4. प्रा. नि. सि. दिक्षीत : भारताचा इतिहास.
5. धनंजय आचार्य : भारताचा इतिहास, सन 1761 ते 1971.
6. डॉ. सुमन वैद्य आणि शांता कोठेकर : आधुनिक भारताचा इतिहास.
7. डॉ. जी. बी.शहा व डॉ. आर. पी. भामरे आणि प्रा. एम. डी. पवार : आधुनिक भारताचा इतिहास, सन 1857 ते 1950.

# शेतकऱ्यांची स्थिती आणि बारोमास

**प्रा. संजय जीवनलाल सिंगनजुडे,** विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स, 310–ब, नवीन नंदनवन, नागपूर.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. देशातल्या लोकसंख्येच्या निम्म्यापेक्षा अधिक जनतेचा व्यवसाय शेती हा आहे. शेतकरी हा घटक सर्वांचे पोट भरणारा असून भारत देशात त्याचे स्थान केंद्रस्थानी आहे. असे असले तरी ह्या पोशिंद्या घटकाची स्थिती तेवढी काही चांगली म्हणता येणार नाही. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी इंग्रजांच्या कालखंडात आणि स्वातंत्र्यप्राप्ती नंतरही शेतकऱ्यांची स्थिती सुधारलेली दिसत नाही. 'काय खावे आता, कोणीकडे जावे गावात रहावे कोण्याबळे' अशी 16 व्या शतकात पडलेल्या दुष्काळाचे चित्र आणि शेतकऱ्यांची दुर्दशेचे वर्णन तुकारामांनी केलेले आहे. ब्रिटिश कालखंडात रयतवारी, महालवारी, कायमधारा या सारखी कर प्रणाली शेतकऱ्यांना जाचक ठरली. याचे वर्णन महात्मा फुले यांच्या विविध लेखांतून जाणवते. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही त्यांची परिस्थिती जैसे थे अशीच आहे. 'बारोमास' या कादंबरीत प्रा. सदानंद देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या स्थितीचे वर्णन, त्यांचे विविध प्रश्न, समस्या यावर चर्चा केलेली आहे. त्यातून शेतीविषयक प्रश्नांची थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न या लेखाद्वारे केलेला आहे. तसेच सरकारने वेळोवेळी घेतलेले शेतीविषयक धोरण व इतर निर्णय याचाही सुरुवातीला संक्षिप्त असा उल्लेख केलेला आहे.

भारताचा मुख्य व्यवसाय शेती आहे. 1950–51 मध्ये भारतातील 70 ते 77 टक्के लोकांचा मुख्य व्यवसाय शेंती होता. आणि देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा 59 टक्के होता. परंतु 1950 ते 2016 या 66 वर्षाच्या कालावधीत कृषिवर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या प्रमाणात दिवसेंदिवस घट झालेली दिसते. 1991 पासून विकसनशिलतेकडून महासत्तेकडे पादाक्रांत करू पाहणाऱ्या या देशात आधारभूत संरचना विकास आणि औद्योगिक क्षेत्रात उदयास येत असलेल्या नवनवीन संकल्पनेमुळे भारतीय शेतीचे क्षेत्रफळ दिवसेंदिवस कमी कमी होताना दिसत आहे. तसेच शासनानी वेळोवेळी घेतलेला जागतिकिकरणाचा निर्णय असो वा नोव्हेंबर 2016 मध्ये घेतलेला नोटाबंदीचा निर्णय असो. जो या भारताचा पोशिंदा वर्ग आहे, त्याचीच स्थिती फारच हलाखीची आहे.याला अस्मानी–सुलतानी हे दोन्ही घटक कारणीभूत आहेत, असे म्हणता येईल.

अस्मानी सुलतानी पैकी अस्मानी संकट कोणाच्या हातचे नाही. हे आपण समजू शकतो. परंतु जे सुलतानी संकट शासनाच्या हातचे आहे, तरी येथे शेतकऱ्यांची परिस्थिती उत्तरोत्तर खालावत चाललेली दिसते. शासन शेतकरी वर्गाच्या या दैन्य स्थितीकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करताना दिसते, असे म्हणता येईल. शेतकऱ्यांच्या स्थितीबद्दल एकोणिसाव्या शतकात क्रांतीबा महात्मा फुले यांनी सांप्रत सरकारला टिकेवर धरले आणि शेतकऱ्यांची स्थिती सुधारली नाहीतर त्याचे वाईट परिणाम होतील असाही इशाराही ते देतात. त्यांच्या 'शेतकऱ्याचे असुड' या ग्रंथात ते लिहितात, '' ... अज्ञानाने गाजलेल्या दुबळ्या शुद्र शेतकऱ्यांस विद्यादान देऊन त्यांच्या बोकड्यावरील शेतसारा, टोल वगैरे पट्या कमी न केल्यास थोड्याच काळात या जुलमाचा परिणाम फार भयंकर होणार आहे.'' ('महात्मा फुले–समग्र वाङ्मय' पृ. क्र. 306) हा त्यावेळेस दिलेला इशारा आज खरा ठरताना दिसतो आहे. दै. महाराष्ट्र टाईम्सच्या दि. 7 मार्च 2017 ला दिलेल्या आकडेवारीनुसार शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. इ.स. 2001 पासून इ.स. 2016 पर्यतची विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्यांची आकडेवारी वर्षानुसार अशी इ.स. 2001 मध्ये 62, इ.स. 2002 मध्ये 122, इ.स. 2003 मध्ये 180, इ.स. 2004 मध्ये 640, इ.स. 2005 मध्ये 609, इ.स. 2006 मध्ये 2376, इ.स. 2007 मध्ये 2067, इ.स. 2008 मध्ये 1966, इ.स. 2009 मध्ये 1605, इ.स. 2010 मध्ये 1741, इ.स. 2011 मध्ये 1518, इ.स. 2012 मध्ये 1473, इ.स.2013 मध्ये 1297, इ.स. 2014 मध्ये 1811, इ.स. 2015 मध्ये 3228, इ.स. 2016 मध्ये 3052.

वरील आकडेवारी पाहिल्यावर शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे विदारक चित्र दृष्टिस पडते. याचे प्रमुख कारण म्हणजे दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, अवकाळी पाऊस, रोगराई आदीमुळे उद्भवणारी, सततची नापिकी, वाढते उत्पादन खर्च, शेतमालाच्या दरातील अभाव आणि घटत्या उत्पन्नातील विरोधाभास होय. परिणामी बॅंका तसेच सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न करू शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा आणि संबंधितांकडून मागे लागलेला कर्ज परतफेडीचा तगादा, इ. कारणामुळे शेतकरी आत्महत्या करण्यापर्यंत पोहचलेले आहेत. साने गुरुजी यांनी 'गोड निबंध' या ग्रंथात 'शेतकऱ्याची दुर्दशा' या लेखात लिहिले आहे, की ''कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळासाठी ही गोष्ट अजून शक्य करता आली नाही बाकी इतर शेकडो गोष्टींच्या आधी सारावाद ताबडतोब कमी करण्यात आली पाहिजे होती, असे आमचे मत आहे. महाराष्ट्रात शेकडो ठिकाणी भरलेल्या शेतकऱ्यांच्या सभातून असे ठराव झाले. परंतु ते ठराव हवेत नाहीसे झाले. जिल्हा कॉंग्रेस कमिट्या, प्रांतिक कॉंग्रेस कमिटी यांनी या प्रश्नांचा सारखा पिच्छा पुरविला पाहिजे होता. शेतकऱ्यांची फार विपन्न दशा आहे. थोडीशी सारावाढ कमी केल्यानेश्शेतकऱ्यांचे प्रश्न थोडेच सुटणार आहेत. असे म्हणून तो काडीचाही आधार त्या बुडणाऱ्यास न देणे म्हणजे असह्य कठोरता आहे.' ('गोड निबंध भाग 1,2,3' पृ. क्र. 23) यावरून असा निष्कर्ष काढता येईल की शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी कोणतीही सरकार हिरिरीने कार्य करत नाही. जे काल होते त्याचे चित्र आजही अधिक विदारक होत चाललेले दिसते. आजही विकासाच्या वाटेवर वाटचाल करणाऱ्या ह्या देशात शेतकऱ्यांची सुरू असलेली आत्महत्या हा प्रश्न कोणत्याही सरकारला पडलेलं एक न उलगडणार कोडचं म्हणाव लागेल.

नियोजनाच्या कालखंडापासून तर आजतागयत भारतीय शेतीच्या बदलत्या स्वरुपाचे काही टप्पे पाडणे संभव आहे. कृषीक्षेत्र विकास

धोरणाच्या पहिल्या टप्प्यात (1950–60) अन्नधान्य निर्भरतेवर भर दिला गेला. दुसरा टप्प्यात (1960–70) हरितक्रांती योजनेद्वारे कृषीची उत्पादकता व शेतमालाच्या उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टीने संशोधित बि–बियाने, आधुनिक कृषीतंत्रज्ञान, रासायनिक खते या सारख्या गोष्टींवर अधिक भर देण्यात आला. तिसऱ्या टप्प्यात 1991 नंतर अर्थातच जागतिकिकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर कृषीक्षेत्रापेक्षा इतर आधारभूत गोष्टींचा विकास व औद्योगिक विकास यांच्यावर भर देऊन भारताला महासत्ता बनविण्याच्या दृष्टीने धोरणाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली. त्याचा विपरीत परिणाम कृषीक्षेत्रावर झाला. शेतजमीनीचे क्षेत्र कमी झाले, प्रदुषणात वाढ, पाणी आणि विज टंचाईत वाढ झाली. कृषी साहित्याच्या उदा. बि–बियाणे, खते, आधुनिक तंत्रज्ञान, मजुरी इत्यादीच्या किंमती वाढून कृषी उत्पादनाचा खर्च वाढला. त्यामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचे डोंगरही वाढले. यात आणखी भरीस भर घालणारा निर्णय, जो अलीकडेच घेण्यात आला तो म्हणजे नोटाबंदीचा. नोटाबंदीचा निर्णय सामान्य जनतेला भेडसावणारा होता. त्यामुळे छोटे व्यापारी त्रस्त झाले. तसाच तो शेतकऱ्यांनाही छळणारा ठरला. या निर्णयामुळे शेतमालाचा भाव प्रचंड खाली आला. हातात रक्कम नसलेल्या शेतकरी आणि इतर वर्गाला सरकार 'कॅशलेस'चा डोज पाजायला निघाली आहे. याकाळात शेतकऱ्यांजवळ पैसा नव्हता. मजुरांची मजुरी द्यायला शिल्लक तोकडी पडली. शेतमालाला योग्य तो भाव न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे दिवाळे निघाले.

भारतीय शासनाचा कृषी अनुदानाबद्दल विचार केला असता तो दोषयुक्त असल्याचे दिसते. भारत सरकारने 1 जानेवारी 1995 रोजी केलेल्या जागतिकिकरणाच्या कराराचे भारतीय कृषीक्षेत्रावर नकारात्मक परिणाम दिसून येतो. विकसीत श्रीमंत देशांनी जागतिकिकरणाच्या लाटे नंतर देखील कृषी उत्पादनावरील सबसीडी व घरगुती सोयी सुविधा यावरील मदतीत कोणत्याही प्रकारची कपात केलेली नाही या करारानुसार दहा वर्षाच्या आत श्रीमंत राष्ट्रांनी कृषी अनुदानात 21 टक्के व निर्यात सबसीडी 24 टक्क्यांनी कमी करणे ही प्रमुख अट होती. परंतु आतापर्यंत तरी श्रीमंत राष्ट्रांनी या कराराची अंमलबजावणी केलेली नाही.

विविध राष्ट्रांतील कृषीवर एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी भारतात मिळणाऱ्या अनुदानाची टक्केवारी फारच कमी आहे. ही आकडेवारी अशी जपान 82.5 टक्के, कोरीया 62 टक्के, चिन 34 टक्के, अमेरीकेत 28 टक्के तर भारतात ती केवळ 2.34 टक्के अनुदान कृषीक्षेत्रावर खर्चली जाते. ऐवढी तफावत आपल्याला दिसते.

जागतिकिकरणाच्या कृषी धोरणांचा सर्वाधिक नफा हा भांडवलदारानाच झाल्याचे दिसून येते. याचे मुख्य कारण म्हणजे कृषी संबंधीत बि–बियाने, रासायनिक खते, ट्रॅक्टर या सारखी आधुनिक अवजारांच्या मागणीत वाढ झाल्याने उत्पादन खर्च वाढला. त्यामुळे कृषी मालाचे उत्पादन वाढले. परिणामतः कृषीमालाच्या किमती मात्र घटल्या. त्यामुळे कृषीच्या उत्पादनाचा खर्च अधिक वाढला. त्याप्रमाणात प्राप्ती कमी अशा दृष्ट चक्रात भारताचा शेतकरी भरडला जात असल्याचे चित्र दिसून येते. वाढता खर्च आणि कमी प्राप्ती यामुळे शेतकऱ्यावरील कर्जात वाढ होत आहे. कर्जबाजारीपणामुळे शेतकरी कर्जाच्या पेच्यातून सूटण्यासाठी आत्महत्येसारख्या कारणाला बळी पडू लागले.

वरील सर्व कारणांची कारण मीमांसा (नोटाबंदी वगळता) सूप्रसिद्ध कादंबरी 'बारोमास' यात आलेली दिसते. 'कटू सत्य' यात सदानंद देशमुख लिहितात 'भारतीय कृषी व्यवस्थेची रोगट अवस्था सनातन आहे. पुढे ते म्हणतात निवडणूकीपूर्वी शेतकऱ्यासंबंधी कळवळा दाखवणारे उमेदवार निवडून घेऊन आमदार–खासदार आणि मंत्री झाल्यावर शेतकऱ्याच्या हितासाठी काय करतात? हा प्रश्न आता प्रत्येक ग्रामीण माणूस विचारू लागला आहे. अशी प्रतारणा वाट्याला आलेल्या, कर्जबाजारी झालेल्या व अवकळा येऊन भयभीत झालेल्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर, आत्महत्या करणे हे भ्याडपणाचे लक्षण आहे, असे बोलणे खरे असले तरी आत्मगौरव हरवलेला भूमीपुत्र काही अचानक आत्महत्या करीत नसतो. खरे म्हणजे ह्या अशाश्वत, आतबट्ट्याच्या व्यवसायात उत्पादन खर्च उत्पन्नापेक्षा अधिक होतो. तेव्हा कर्जाच्या ओझ्याखाली चिंताग्रस्त होऊन दडपून चालताना आधी त्याच्या आत्म्याची हत्या केली जाते आणि सगळाच भोगवटा असह्य झाल्यावर दृश्य स्वरुपात तो देहहत्या करीत असतो. (बारोमास–कटूसत्य) हें कटू सत्य सदानंद देशमुख वाचकांसमोर मांडतात.

कादंबरीच्या सुरुवातीला नानू आजाचे आलेले वर्णन हृदयस्पर्शी आहे. त्यातून पारंपरिक शेती विरूद्ध आधुनिक शेती असा आलेला संघर्ष रेखाटलेला आहे. नानू आजा म्हणतो 'आरे, आशी कशी ही आधुनिक शेती? तुमच्या घरात काईच माल नाई. हे त घर खंदून आंगण भरणं चाललं तुमच्या खड्ड्यातली माती खड्ड्यातच आटून राह्यली.' (बारोमास–पृष्ठ क्र. 1) नानू आजा हायब्रीड–संकरित बियाणे आल्याने आपण अस्सल गावरान बियाणाचा बळी देतो. आधुनिक शेतीमुळे आपण आपली पारंपरिक शेती गमावतो. अर्थातच त्यारूपाने आपण आपले भारतीय मुल्यच गमावून बसलेलो आहेत, असे वाटते.

एम्. एस्. सी. ची कृषी विषयातली पदवी घेऊन नोकरीच्या मागे न लागता नरूभाऊ आपली आधुनिक शेती करताना आपल्याप्रमाणेच गावातील इतर शेतकऱ्यांनीही काळाची गरज ओळखून नवे विषय, नवे तंत्रज्ञान आत्मसात करावे, असा त्यांचा आग्रह असतो. राजकारणापासून दूर राहून केवळ शेती विषयाशी त्यांनी स्वतः जोडून घेतलं या कारणाने त्याच्याशी अनेक शेतकरी जूळलेले होते. त्यामुळेच त्यांना शेतीनिष्ठ शेतकरी, कृषीभूषण पुरस्कार मिळाले होते. एकनाथच्या डोळ्यापुढे नरूभाऊंचा आदर्श होता. आपणही नरूभाऊप्रमाणे शेतीत नवनवे प्रयोग करावे, असे त्याला वाटायचे त्यामुळे अधूनमधून तो नरूभाऊच्या संपर्कात असतो. नरूभाऊची दुष्काळामुळे दुरावस्था झाल्याचे दिसते.

शेतीमालाला योग्य भाव मिळावा म्हणून गावोगावी जोरदार चक्का जाम आंदोलन केली जातात. पण ते आंदोलन भंगले नंतर गावोगावच्या हजारो शेतकऱ्यांवर कोर्टात खटले भरण्यात आले. सुनावणी नाही. न्याय

नाही. तारखांवर तारखा त्यांना मिळतात. उगवता–मावळता शेतरानांत राबणारा शेतकरी दिवस दिवसभर कोर्टाच्या आवारात तारखेच्या नावाखाली बांधून ठेवला जाऊ लागतो. शेतमालाच्या रास्त भावाची चिंता जाऊन आपण आता कोर्टाच्या मगरमिठीतून मोकळें होऊन आपल्या शेतशिवारात अर्धीकोर खाऊन सुखानं कसं राहू शकू, या धास्तीने गावागावांतील साध्याभोळ्या शेतकऱ्यांची झोपमोड झाली. न्याय न मिळता केवळ तारखांवर तारखा मिळत असल्याने काही शेतकरी याला कंटाळून आत्महत्या करतात. आत्महत्या केलेल्या आणि मेलेल्या लोकांना कोर्टातून सुटका होते. या कोर्टावारीचे भोग एकनाथच्या नशिबात येतात. 'आंदोलनानंतरच्या ह्या तारखा म्हणजे ढोराच्या पायात बांधलेल्या पायखुट्या गळ्यात अडकवलेले लोढणे. त्यामुळे आता मोर्चा किंवा आंदोलनाचं नाव निघालं की शेतकरी बिचारे मागवाटा शोधतात.' (बारोमास–पृ.क्र. 135) आणि काही बोटांवर मोजणारे लोक संघटनेच्या कामात गुरफटलेले असतात. आणि मोर्चा म्हटला की कोणीच पुढे धजावत नाही. अशाप्रकारे शेतकऱ्यांची दैनावस्था 'इकडे आड तिकडे विहीर' अशी झालेली असते.

अशीच शेतकरी व त्यांच्या परिस्थिती बद्दलची चर्चा एकनाथ, दिनकर दाभाडे, शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते तेजराव खपके, समाधान चांदणे यांच्यात होते. तेजराव तात्या सतत फिरतीवर असतात त्यावर दिनकर त्यांना फिरून फिरून कंटाळा येत नाही का? असे विचारते तेव्हा ते सांगतात की, 'शेतकऱ्याच्या जातीले कुठी कंटाळा आस्ते का? अन् कंटाळा केला की आटपलाच त्याचा खेळ. शेतकऱ्याची बाजू घेऊन गावागावात कोणी त लढणारा पाह्यजे नं? नाईत ही नवकरशाही अन् बेपारी आपल्या आंगावरचे कपडे फाडून घेतील. अन् आपल्याले भोंगळ फिरावं लागीन' (बारोमास–पृ.क्र. 185) यावरून शेतकऱ्याने सतत राबत राहणे हे त्याच्या जन्मी लिहिलेले असते. 'कंटाळा म्हणजे शेतकऱ्याचे मरण' हे समीकरण शेतकऱ्यांना लागू पडणारे आहे. एकनाथ सुशिक्षित असल्यामुळे त्याच्या कविता वर्तमान पत्रात छापून येतात. त्यामुळे तेजराव तात्या त्याला त्या कविता न कविता जरा बाजूले फेका. अन् हे शेतकऱ्याचं दुखणं छापा.' (बारोमास–पृ.क्र. 186) असा सल्ला देतात. लोकांना गैरसमज होतो की शेतकऱ्यांना सबसिडी मिळते म्हणून ते हरामाचं खातात, परंतु सबसिडीचे खरं गणित (कथा) सांगताना तात्या म्हणतात, 'एक म्हन्जे ज्या अवजारावर सबसिडी भेटती ती आधीच वसूल केल्या जाती. जसं की दीड लाखाचं लवा–लोखंड वापरून जे ट्यॉक्टर तयार व्हते ते आमाले तीन लाखाले देतात. मंग सबसिडीचा फायदा काय? तसेच ते स्पिंकलर पाचशे रुपयाचे वायर पाइप पाच हजारात. सबसिडी तीस टक्के तरी नफ्यात व्यापारीच. अन् इच्यात खरा फायदा व्हते व्यापाऱ्यायचाच. राजकारणी लोकायचाच. कावून की सबसिडीचा फायदा घ्यायसाठी आधी आर्धे म्हणा, पाव हिस्सा म्हणा पैसे नकदी भरावं लागतात. अन् शेतकऱ्याजवळ त कधीच नगदी पैसे नस्तात. मग हे दुकानदार शेतकऱ्याच्या नावाचे पैसे भरतात. बिलं भरतात. त्याह्यले अवजारं, जिनसा इकल्या आसं पावतीवर दाखवतात अन् मग दणादण बिलं वसूल करून शेतकऱ्याच्या हातावर शे–दोनशे ठेवून मस्त मजा मारतात. त्याले म्हन्लं, दिसणाराले दिसते शेतकऱ्यानं सबसिडी घेतली, पण त्याच्या मांगची गोम अशी हाये' (बारोमास–पृ.क्र. 186)

तात्याच्या म्हणण्यानुसार आज शेतकऱ्यांपेक्षा शेतमजूर सुखी आहेत कारण शेतमजूरांना रोजी मिळते परंतु शेतकरी मालक असूनही त्याची वर्षाची बचत शुन्यच राहते. त्यामानाने कारखानदार, दुकानदार गड्याले शंभर रुपये मजुरी देत असतील तर त्यांना हजार रुपये रोज पडते. आणि शेतकरी असे मालक आहेत, की त्यांना काहीच रोज पडत नाही. यावरून शेतकरी सुखी की मजूर सुखी याचा अंदाज येणे शक्य आहे. त्याप्रमाणे 'आमचा बाप कापूस न्यायचा खामगावले त एका किंटलात बरोबर एक तोळा सोनं आणायचा. आता त आमच्या लक्ष्मुमायच्या आंगावरचं सम्द सोनं गेलं. गेलं ते आजुनबी नाई आलं...माल चांगला झाला त भाव नस्ते. अन् भाव आस्ते तवा माल व्हत नाई. पिकवायचं आपल्या हाती हाये पण भावाचं नाई.'(बारोमास–पृ.क्र. 189) शेतकरी माल पिकवतो खरा परंतु स्वतःच्या मालाची किंमत त्याला ठरवता येत नाही. मध्यस्थी दलाल राहतो आणि शेतकऱ्याच्या मालाचा भाव ठरवून जास्तीत जास्त पैसा स्वतःच्या खिशात घालतो. हे सत्य येथे उजागर होते. आणखी एक कटू सत्य या चर्चेतून पुढे येते. ते म्हणजे कोणत्याही पिकाचं उत्पादन अधिक झाले तर त्याला भाव नस्ते कांद्याचे विक्रमी उत्पादन झाले, तर कांद्याला कमी भावात कोणी विचारत नाही. त्यापेक्षा पडक्या तो माल मागितला जातो. यातून शेतकऱ्यांच्या लागवडीचा खर्चही निघत नाही. हीच गत टमाटे, मेथी, गोबी, दोडके, कारले असो की कोणतेही भाजीपाला असो सगळ्यांचा किस्सा तसाच. 'शेतकऱ्याले जवा व्हत नाई तवा भाव आभाळाले टेकतात. अन् व्हते तव्हा कुत्रंबी हुंगाळत नाई. सरकारलेबी शेतकऱ्याचा कळवळा नाई. अमेरिकेचं सरकार आसं हाये म्हन्तात की शेतकऱ्याचा माल किती जास्त होवो, ते उधारीनं वाटतात. पण भाव टवू देत नाई. म्हणून त्या देशातला शेतकरी सुखी हाये' हे सांगताना तात्या पुढे म्हणतात, 'मले हे एक समजत नाई की एखादं दुसरा मुख्यमंत्री सोल्डा त सम्दे मुख्यमंत्री शेतकऱ्याचेच पोरं असतात. खेड्यापाड्यांतून जातात. मंग ते शेतकऱ्यासाठी कावून काई करत नाई?'(बारोमास–पृ.क्र. 190) असा प्रश्न या चर्चेत येतो. शेतकऱ्याचे पोरं मुख्यमंत्री असले तरी तो शेतकऱ्याचे हित साधू सकत नाही त्याचे कारण ग्रामीण भागाचे राजकारण शहरी लोकांच्या हातात आहे. असे या चर्चेतून निष्पन्न होते.

'सुपातले अन् जात्यातले हाये आपून सम्दे.' असे तात्या म्हणतात तेव्हा दिनकर दाभाडे त्याचा अर्थ विचारतात. तेव्हा तात्या म्हणतात, 'शेतकरी म्हन्जे जात्यातले. अन् बाकीचे सम्दे म्हन्जे सुपातले... परदेशी कंपन्या इथं सस्तात माल इका लागल्यावर आपल्या मालाले हुंगाळतो का कोणी? इंग्रज व्यापारी म्हणून आले व्हते तेव्हा किती बदल झाला व्हता आपल्या देशात. बारके चिरके कुठीर उद्योग करणारे बोंबला लागले व्हते न भुईवर हात आपटून? ... आता जसा शेतकरी डबघाईला आला, तसे उद्या आपल्या देशातले कारखानदार डबघाईले येतील.

कावून की पैसा सम्दा परदेशात जाईल. मंग आता जसे शेतकरी आत्महत्या करून राह्यले. तसे उद्या व्यापारी फाशी घेतील' (बारोमास–पृ.क्र. 193) अशाप्रकारे अगदी साध्या शब्दात इंग्रजांचे धोरण आणि जागतिकिकरणाचे सुत्र तेजराव तात्या मांडतात.

शेती व्यवसाय करणे तोट्याचे आहे कारण शेतमालाला पाहिजे तसा मात्र भाव मात्र मिळत नाही. 'एक लाख लागले आस्तील त पन्नास हजाराचं. काय पूरी पडणार हाये. पन्नास हजाराचं तोंड भरायसाठी मंग इका दरसाली दोनचार एक्कर ... आधी क्रॉप लोन काऐल आसायचं. ते फिटयचं नाई. म्हणून मंग बँकचे डिफाल्टर ... मग पुन्हा तीन टक्क्याचं ... दहा टक्क्यांचं. अन् लयेच संगळा झाला की इका पुन्ना पाच एक्कर. असा इतिहास हाये आमचा. व्याजानं लंब केलं सम्दं कावून की व्याज थांबत नाई. दुनियेत एकच गोष्ट अशी हाये की जिले आराम माईत नाई. अन् ती हाये व्याज ... त्याच्या पायीच बरबाद झालो मी.'(बारोमास–पृ.क्र. 194) मग बहिणीचे लग्न, मुलीचे–मुलाचे लग्न यामुळे शेतकरी अधिकाधिक कर्जाच्या डोहात डुंबतो यातून बाहेर येण्याचा मार्गच त्यांना सुचत नाही. आणि शेवटी आत्महत्या करून सर्व समस्या मागे टाकण्या शिवाय कोणताच मार्ग त्याला दिसत नाही. ही शेतकऱ्याची व्यथा लेखक सदानंद देशमुख 'बारोमास' कादंबरीत तेजराव तात्याच्या तोंडून उद्‌गृत करतात. वरील चर्चेतील 'मी' हा शब्द शेतकऱ्यांचे प्रातिनिधिक रूप वाटते. ही व्यथा केवळ तात्या ह्या पात्राची नसून ती महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील शेतकऱ्यांची कैफियत आहे, असे म्हणता येईल. याला बळी म्हणून किनखेडचा एकनाथच्या बहिणीचा नवरा रावसाहेब फाशी लावतो. तसेच सुभानराव देखील आत्महत्येचा मार्ग निवडतात.

शेतीत काही उरलेले नाही शेतकरी नामधारी लखपती आहे. 'लखपती आसून भिकाऱ्यावाणी' जगणे त्याच्या वाट्याला येते. त्यामुळे शेती विकून तो पैसा बँकेत टाकून व्याज दरमहिने घेऊन नोकरीवाल्या प्रमाणे जगावे असे वाटते. असे विचार समाधान चांदणेच्या भावाचे आहे. त्यामुळे तो शेतीची वाटणी करावी याबद्दल सुचवतो. अशीच परिस्थिती एकनाथच्या घरी देखील आहे. मधू नोकरी करिता शेत गहाण ठेवतो आणि फसतो. त्याला नोकरी तर लागत नाही पण गहाण ठेवलेला 'कल्याणीचा मळा' मात्र दगडू महाकाळ अटी टाकून दाबून बसतो. 'बारोमास' मध्ये एका गोष्टीकडे तेजराव तात्या लक्ष वेधतात. शेतकऱ्यांकडून शेती विकत घेणारा हा नंबर दोनची कमाई करणारा असतो. ज्याचे अनेक प्रकारचे कारोबार असतात. रॉकेल एजन्सी, गॅस एजन्सी, ढाबे, दारूचे दुकान इत्यादी काबरा शेट, दगडू महाकाळ यासारखे धंदेवाईक नंबर दोनचा काळा पैसा पांढरा करण्यासाठी, इन्कम टॅक्स चुकवण्यासाठी निमित्ताने कारण म्हणून वावरं विकत घेतात. आणि जो वावरं विकत नाही त्यावर अनेक प्रकारे दबाव टाकले जातात, आमिष दाखवले जातात. असेच एकनाथचा मामा बळीराम याच्याबद्दल घडते. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी झटणाऱ्या शेतकरी संघटनाही आता एकसंघ राहलेली नाही, ही देखील खंत तेजराव तात्यांच्या विचारातून व्यक्त होते. तेथेही दोन गट निर्माण होतात, एक गट कोणत्याही राजकारणात न पडता निरपेक्षपणे शेतकऱ्यांचा लढा लढवतांना दिसतो. तर दुसरा गट राजकीय पक्षांचे सहकार्य घेऊन शेतकऱ्यांचा हितासाठी राजकारणात येऊ पाहतात. त्यामुळे तात्यांपुढे संघटनेचा विचार आहे. ते त्यावर मौन धारण करतात. हे मौन म्हणजे शेतकऱ्याच्या हितासाठी लढणाऱ्यामध्ये फुट पडणे म्हणजे शेतकऱ्यांच्या हितापासून दूर जाणे होय.

शेतातून पिकं बाहेर आल्यावर शेतकऱ्यांची चिंता अधिक वाढते. याचे चित्र लेखक सदानंद देशमुख 'बारोमास' मध्ये मांडतात. एखाद्या मालाला चांगला भाव मिळाला की अधिकाधिक शेतमाल शेतकरी बाजारपेठेत आणतात. असेच एकनाथ मूंगाला पंधराशे रुपये क्विंटल भाव आल्याचे माहिती झाल्यावर तो आपला माल विक्रीसाठी उतराद पेठच्या बाजारपेठेत आणतो. एकनाथ प्रमाणेच सांजोळचे तेजराव खपके, बळीराम मामा, देवीदास तनपुरे, समाधान चांदणे, केशव तनपुरे हे देखील आपला शेतमाल बाजारपेठेत आणतात. मुंग, उडीद, सोयाबीन या धान्यांची आवक सुरू असताना टिनशेडमध्ये जागा नसल्यामुळे मग नंतर येणाऱ्या मालाची पोती बाजारपेठेतल्या आवारात उघड्यावर उतरवली जायला लागते. त्यामुळे व्यापाऱ्यांची खरेदीची गती मंदावते. आणि घर सोडून पारखा झालेला शेतकरी दोन–दोन, तीन–तीन दिवस शिळे तुकडे चावून आपल्या पोत्यांजवळ राखण करत बसतात. मालाची बोली बोलण्याची वाट पाहू लागतात. परंतु दलाल–व्यापारी सर्व आलेल्या मालाची पाहणी करून आपसात चर्चा करू लागतात. सांजोळचे लोक बुधवारच्या बोलीत आपला माल विकला जाईल या आशेने पोती आणली होती. बुधवार, गुरूवार जातो, शुक्रवारी सणा निमित्त सुटी आणि शनिवार, रविवार मार्केट बंद. अशा परिस्थितही शेतकरी आपला माल सोडून जाऊ शकत नाही. दुसरीकडे शेतकामाची चिंता त्याला सतावते. केवळ आपल्या मालाला चांगला भाव यईल या आशेने तेथे येतात. परंतु मनासारखा भाव मात्र त्यांच्या मालाला येत नाही. पंधराशेचा भाव ऐकून ते तेथे येतात. पण सगळीकडे हजाराच्या आतच सर्वांना कापणं सुरू असते. तेव्हा तेजराव खपके एकनाथला पाखराची कथा सांगतात. शेतकरी आपल्या मालाची साठवण करून ठेवू शकत नाही. त्याला कारण म्हणजे शेतकऱ्यांनी बँकेतून, सावकाराकडून घेतलेले कर्ज तसेच मजूरांना द्यायची मजूरी ही टांगती तलवार असल्यामुळे शेतकऱ्यांना आपला माल साठवून ठेवता येत नाही. त्यामुळे पिकवणारा वर्ग दलाल–व्यापाऱ्यांच्या हातची कटपूतली बनून राहतात. तेजराव तात्या म्हणतात, 'शेतकरी हाच एक इक्रेता हाये की त्यो त्याच्या मालाचा भाव ठरवू शकत नाई. दुसरा कोन्ताबी माल घ्यायले जा. भाव इकणारा ठरवते. आपल्या घामाचं दाम इथं घेणारा ठरवते.'(बारोमास–पृ.क्र. 274) याप्रकारे आपुले मरण पाहिले म्या डोळा' अशी शेतकऱ्यांची गत होताना दिसते.

अशाप्रकारे शेतकऱ्यांची स्थितीगतीचे चित्र येथे सदानंद देशमुख 'बारोमास' कादंबरीत रेखाटतात. सदान्‌कदा दुःखच त्याच्या पाठीशी असते. ब्रिटिश कालखंडातही शेतकऱ्यांची स्थिती नव्हती, रयतवारी, महालवारी, कायमधारा या सारखी कर प्रणाली शेतकऱ्यांनी मुकाटपणे सहन केली. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आला दिवस गोड होईल अशी आशा बाळगणारा शेतकरी मात्र हवालदिलं झाला. आणि त्याच्या वाट्याला बारोमास दुःखच आले. ही सत्य परिस्थिती मांडण्याच्या प्रयत्न सदानंद देशमुख यांनी केला.

**संदर्भ**


1. 'भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्याः समस्या आणि उपाय' – संपा. डॉ. वर्षा वैद्य, प्रा. सुनिल घुगल
2. 'महात्मा फुले–समग्र वाङ्‌मय'– संपा. –महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
3. 'गोड निबंध 1,2,3' साने गुरुजी – रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, व्दितीय आवृत्ती 2012.
4. 'बारोमास' – सदानंद देशमुख, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, व्दितीय आवृत्ती 2005.
5. दैनिक महाराष्ट्र टाईम्स (7 मार्च 2017)

# ग्रामीण शेतकऱ्यांच्या समस्या व उपाय

**डॉ. अश्रु पुंजाजी जाधव,** प्राचार्य, जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा जि. यवतमाळ मो. 9850857503

**प्रस्तावनाः–** आधुनिक समाजव्यवस्थेवर दृष्टीक्षेप टाकल्यास असे निदर्शनास येते की, वर्तमान स्थितीमध्ये जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, औद्योगिकरण, नागरीकरण, पाश्चिमात्यीकरण, शैक्षणिक प्रसार, व्यक्तीवादी विचारसरणी भौतिकवादी, चंगळवाद आणि आधुनिक मूल्य इत्यादी प्रक्रिया आजच्या काळात शिघ्र गतीने गतिशील होत आहेत आणि त्यातूनच मानवी समाजात असंख्य सामाजिक समस्या निर्माण होत आहेत. अशापैकीच एक महत्त्वाची समस्या म्हणजे ग्रामीण शेतकऱ्यांच्या समस्या आणि उपाय ही होय.

भारत हा कृषीप्रधान देश असून ग्रामीण भागातील बहुतेक लोक शेती व शेती व्यवसायाच्या माध्यमातून आपला उदरनिर्वाह करतात. शेती हे त्यांच्या उदरनिर्वाहाचे एकमेव साधन आहे. आपल्या शेतातून अनेक प्रकारचे पीक घेतात. परंतु ते ग्रामीण भागात राहत असल्यामुळे आणि त्यांना नवीन तंत्रज्ञान आणि संशोधित बि–बियांणाची माहिती नसल्यामुळे त्यांची शेती बे भरवशाची झाली आहे. त्यामुळे स्थिती अत्यंत वाईट झाली आहे.

आज शेतकरी, कष्टकरी यांची परिस्थिती अत्यंत कठीण अशी आहे. कष्ट करणारा माणूस मरत नाही म्हणून जगतो. असे म्हटले तरीही अतिशयोक्ती होणार नाही. असा प्रचार होत नाही की, जग जवळ येत आहे परंतु देशातील राजकीय नेते बुद्धीजीवी मंडळी शेती–शेतकरी तथाकथित मुक्त अर्थव्यवस्थेचे परिणाम आता जाणवू लागले आहेत. जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था, बाजारव्यवस्था या शब्दाचा प्रचार व प्रसार जोरात सुरू आहे. स्वातंत्र्य मिळून अर्धशतक होऊनही दारीद्रयरेषेखाली जीवन जगणाऱ्यांची संख्या सतत वाढत आहे.

**अध्ययनाचे उद्देशः–** 1. ग्रामीण शेतकऱ्यांच्या वर्तमान स्थितीचे आकलन करणे. 2. ग्रामीण शेतकऱ्यांमध्ये नवीन शेतीपद्धती करण्याच्या उदासीनतेचा अभ्यास करणे. 3. ग्रामीण शेतीत नवीन यंत्र–तंत्राचा वापर करण्याची ग्रामीण शेतकऱ्यांच्या अभिवृत्तीत झालेल्या बदलांचा विचार करणे. 4. ग्रामीण शेतकऱ्यांच्या समस्यांवर विचार करून उपाय सुचविणे.

**गृहीत कृत्यः–** 'ग्रामीण शेतकऱ्याचे उत्पादन वाढूनही त्यांचे उत्पन्न वाढले नसून त्यांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व आरोग्यविषयक समस्या वृद्धींगत होत आहेत'

**अध्ययन पद्धती :–** प्रस्तुत शोध निबंधासाठी निदानात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे. तसेच दुय्यम तथ्यसामुग्रीच्या उपलब्धतेसाठी ग्रंथ, शोधग्रंथ, वर्तमानपत्रे, क्रमिक पुस्तके, लेख इत्यादींचा आधार घेतला आहे.

**ग्रामीण शेतकऱ्यांची स्थिती :–** आज भारतातील शेतकरी व शेतमजुरांची स्थिती अत्यंत विदारक आहे. देशातील शेतीविषयक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या सोडविण्यासाठी शेतकऱ्यांचा नेता कुणीही राहिला नाही. आज शेती करायची म्हटली. तर भांडवल उभे करणे ही महत्त्वाची समस्या आहे. आजमितीस राष्ट्रीयकृत बँकाचे धोरण कृषीविषयक उदासीन आहे. राष्ट्राचे धोरण सुद्धा यास कारणीभूत आहे. अन्न सुरक्षा विधेयकांतर्गत भारतातील 63 टक्के लोकांना अन्नसुरक्षेचा लाभ मिळणार आहे. यामुळे दोन रूपयात गहू, तांदूळ मिळणार असल्यामुळे शेतकऱ्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम पडण्याची शक्यता आहे. शेत मजूर लोकांना शेतीमध्ये काम असतांना सुद्धा गावांत रिकामे फिरतात. परंतु शेतकऱ्यांच्या कामाकरिता मजुर मिळणे दुरापास्त झाले आहे. त्यामुळे शेतीतून कशाचे उत्पादन घेणे शेतकऱ्यांना जिकरीचे होईल. परिणामी शेतकरी, शेतमजूर हे क्षेत्रात आळशी वृत्तीचे निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच उत्पादन खर्चावर शेतकऱ्यांना शासनाचा हमीभाव नसल्यामुळे शेतकऱ्यांना आपला माल पडेल भावाने विकावा लागतो. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झालेला आहे. व यामुळेच महाराष्ट्रात शेतकऱ्यांचे आत्महत्याचे सत्र सुरू आहे. या संदर्भात 1918 मध्ये इंडियन एकॉनामिक सोसायटीच्या जर्नल खंड 1 मध्ये 'सम्राट होल्डींग इन इंडिया अँड देअर रिमेडिज' यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असा प्रदिर्घ शोध निबंध लिहिला त्यात त्यांनी भारतीय शेतीचे आकारमान लहान आहे. कुटुंबात मुलांची संख्या जास्त असल्यामुळे भाऊ हिस्से वाढत जातात तसे जमीनीचे तुकडे वाढत जातात. परिणामी शेती परवडत नाही. लहान लहान तुकड्यांमध्ये शेतीचे एकत्र करणे (तुकडे बंदी) हा त्यावर उपाय असला तरी एकमात्र उपाय नाही. मुळात शेती एकटी कधीच कुठेही परवडत नसते म्हणून जोपर्यंत शेतकरी शेतीवरील बोजा कमी करीत नाही. म्हणजे शेतीवर अवलंबून असलेल्या काही मुलांना दुसऱ्या क्षेत्रात पाठवत नाही तोवर शेती ही किफायतशीर होणारच नाही. म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांनी उद्योग, व्यापार, रोजगार, स्वयंरोजगार, शिक्षण अशा अन्य क्षेत्रात गेले पाहिजे अन्यथा त्यांना हलाखीचे दिवस आल्यावाचून राहणार नाहीत. असा इशारा 92 वर्षापूर्वीच डॉ. आंबेडकरानी दिला होता. डॉ. आंबेडकराचे द्रष्टेपण 1998 साली सुध्दा आपणास कळले नाही. जातीय मानसिकतेमुळे शेतमजुर शेतकऱ्यांना आजही बाबासाहेब जवळचे वाटत नाही. आम्हीही बाबासाहेबांच्या योगदानाची फारशी चर्चा केलेली नाही ही शोकांतिका आहे. ज्या काळी या देशात सोन्याचा धूर निघत होता. त्याकाळात उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी हे सुत्र प्रचलित होते. शेतीला सर्वोच्च दर्जा दिल्याने या देशात सोन्याचा धूर निघण्याइतपत समृद्धी होती मात्र आता सर्वोच्च दर्जा नसल्याने सुत्राची सर्वत्र उलथापालथ झाली. आता शेती ही कनिष्ठ व्यवसाय झाल्याने समृद्ध शेती कंगाल झाली. आज शेतीचा मालक एक–एका पैशासाठी मौताज झाला. त्याची मुलेबाळे कोरभर भाकरीसाठी आणि घोटभर दुधासाठी तडफडू लागली आहेत. आज शेतकरी शेतमजुरांच्या जीवनात अंधकार आहे. आजपर्यंत शेतकऱ्यांच्या

मालाला भाव मिळाला नाही. मध्यस्थ दलाल त्याचा मलिंदा खाऊन गब्बर झाले आहेत. हे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही.

**भांडवलशाही धोरण :–** शेतमालाच्या उत्पादनात वाढ झाल्यावर अशी परिस्थिती का? शेतकऱ्यांनी उत्पादन वाढविले पण त्यांचे उत्पन्न मात्र वाढले नाही. आज अनेक संस्था, तज्ञ, राजकीय पक्ष, उत्पादन वाढविण्यासाठी अनेक चर्चासत्र, संमेलने, सभा आयोजित करीत आहेत. त्यासाठी अनेक प्रकारच्या तंत्रज्ञानाविषयी माहिती शेतकऱ्यांना दिली जाते. शासकीय कृषी अधिकारी व तज्ञ याविषयी मार्गदर्शन करून उत्पादनाची वाढ कशा पद्धतीने करता येईल या विषयीची माहिती देत असतात. त्यानुसार शेतकरी नवनवीन तंत्राचा वापर करून आपल्या शेतीमधून कमाल उत्पादन घेत असतात. परंतु ज्याप्रमाणे उत्पादनासाठी व वाढविण्यासाठी जशी प्रेरणा देतात. शेतकऱ्यांचे उत्पादन वाढल्यानंतरही त्याचे उत्पन्न वाढले की शेतकरी दलालामार्फत व्यापार वर्गाकडे आपला उत्पादीत माल घेऊन जातो व व्यापारी पडेल भावाने शेतकऱ्यांचा माल खरेदी करतो. अशाप्रकारे मध्यस्त, अडत्या, दलाल, व्यापारी हा वर्ग शेतकऱ्यांचे शोषण करीत असतो. शेवटी शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच येत असते. म्हणून वास्तवः हे आहे की, शेतकऱ्यांचे उत्पादन वाढले परंतु उत्पन्न मात्र वाढले नाही. म्हणूनच एकीकडे धान्याची गोदामे भरलेली आहेत. माल ठेवायला जागा नाही म्हणून रस्त्यावर माल ठेवतात तर दुसरीकडे शेतकऱ्यावर कर्जाचे डोंगर वाढत आहेत. सरकार मालाला उत्पादनाच्या प्रमाणात हमी भाव देत नसल्यामुळे शेतकऱ्यांवर ही पाळी येत आहे. जगातील गरीबी दूर करण्याचा दावा करणाऱ्या जागतिक आर्थिक संस्थांचे धोरण गरीब देशाला लुटनारेच आहे. जागतिक बँक आंतरराष्ट्रीय बँक गरीब, अविकसित विकसनशील देशाचे शोषण वाढविणारे नवनवीन धोरणे गरीबाची गरीबी वाढविणारे आहे. व श्रीमंतांना श्रीमंत करणारे भांडवलशाही धोरण आहे हेच सत्य आहे.

**डोळसपणे शेती पद्धतीची गरज :–** आज शेतकऱ्यांनी अतिशय डोळसपणे शेती करणे गरजेचे आहे. बाजारात कोणत्या मालाची मागणी आहे व असु शकते याचा अभ्यास करून कोणत्या मालाला कोणत्या हंगामामध्ये चांगला भाव मिळू शकतो याचा अंदाज करून शेतात त्या मालाचे उत्पादन घेतले पाहिजे आज शेतकरी बांधवानी मागणी पुरवठ्याच्या नियमानुसार शेती केली पाहिजे. शेतकरी शेतमजुराच्या अपेक्षा पूर्ण व्हायच्या असतील तर पारंपारिक शेतीत बदल घडवून आणणे महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने आधुनिक सुधारित तंत्र, वैज्ञानिक बदलाचा वापर, योग्य बी–बियानाचा वापर, शेती व्यवस्थापना विषयीची जाण असणाऱ्या शेतकरी वर्गाची अत्यंत आवश्यकता आहे. शेतीशी संबंधित लहान शेतकरी या दृष्टीने जागरूक राहीला पाहिजे. तरच शासनाच्या बहुविध उपयुक्त सेवा, योजना व धोरणे यांचा उपयोग घेऊन आपली उद्दिष्ट्ये सफल करू शकतात. गरज ही आहे की शेतकऱ्यांना उत्पादन वाढीची प्रेरणा मिळणे व आपल्या उत्पादनातून जास्तीत जास्त उत्पन्न मिळविणे अत्यंत चौकस व चतुरतेने दक्ष राहणे व त्यानुसार कार्य करणे त्यासाठी शासनाने शेतकरी कसत असलेली जमीन आहे ती त्यांच्या मालकीची करणे अत्यंत गरजेचे आहे. त्याच्या मालाला योग्य ती किंमत याची यासाठी त्यांना शिक्षणाची आवश्यकता खाजगी सावकारी पाशातून सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. कारण सततच्या नापिकीमुळे शेतकरी अडचणीत आला आहे. कर्जबाजारी झाला आहे. त्याला सोडविण्यासाठी शासन पॅकेज तयार करीत आहे. त्यात सदोष वितरणव्यवस्था महत्त्वाची आहे.

**सारांश :–** ग्रामीण भागातील शेतकरी जागतिकीकरण, आधुनिकीकरण, खुली अर्थव्यवस्था इत्यादींच्या कचाट्यात अडकला आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांत आर्थिक, सामाजिक आरोग्य विषयक नैराश्य पसरले आहे. श्रीमंत शेतकऱ्यांचे वर्चस्व वाढले आहे. शेतीविषयक सोई मोठ्या शेतकऱ्यांना होत आहे. ग्रामीण भागातील शेतकरी दिवसेंदिवस कंगाल होत आहे. बँकांची शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्याची उदासिनता, शासन दरबारातील उच्चवर्गीयांचे वर्चस्व, महागडी, खते, बि–बियाणे खरेदी करून नव्या तंत्रज्ञानासाठी खर्च करून प्रसंगी कर्ज काढून उत्पादन वाढविले जाते परंतु विदेशी शेतकरी व श्रीमंत शेतकरी, व्यापारी दलाल यांचे स्पर्धेत ग्रामीण शेतकरी टिकाव धरू न शकल्यामुळे कर्जाच्या दबावाने हतबल होऊन शेतकरी आत्महत्या करीत आहेत. दिवसेंदिवस याचे प्रमाण वाढत आहे. त्याकडे वेळीच लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे.

**उपाय :–** 1. कृषीविषयक किंवा आर्थिक धोरण ठरवितांना ारतीय शेतकऱ्यांना वैचारिक आर्थिक दृष्टीने सशक्त बनविणे आवश्यक आहे. 2. यंत्र तंत्राची ग्रामीण शेतकऱ्यांना योग्य माहिती देण्याची व्यवस्था करावी. 3. सरकारने सहकार शेती पद्धतीला प्रोत्साहन द्यावे. 4. शासकीय आणि खाजगी बँकांनी सुटीवर अल्पदरात शेतकऱ्यांना कर्ज द्यावे. 5. पाश्चिमात्य देशांप्रमाणे ग्रामीण शेतकऱ्यांना सबसीडीवर अनुदान द्यावे.

**संदर्भ ग्रंथ सूची :–**


1. बोबडे डॉ. प्रकाश, ''भारतीय समाजरचना– पारंपारिक आधुनिक'', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 2010.
2. शर्मा ओमप्रकाश, ''ग्रामीण समाज में नियोजित सामाजिक परिवर्तन'' रावत पब्लिकेशन, जयपूर
3. कराडे, डॉ. जगन, ''जागतिकीकरण व भारतसंबंधी आव्हाने'' डायमंड प्रकाशन, पुणे.
4. शर्मा प्रज्ञा, नाटाणी प्रकाश, ''भारत में सामाजिक समस्याएँ'', पोइन्टर पब्लिशर्स, जयपूर.
5. कविमंडन डॉ. विजय, ''कृषी आणि ग्रामीणअर्थशास्त्र'' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 2012.
6. नाटानी प्रकाश नारायण, ''भारत मे सामाजिक समस्याएँ'', पोइन्टर पब्लिशर्स, जयपूर, 2007.
7. महाजन डॉ. सजीव, ''ग्रामीण समाजशास्त्र,'' अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.
8. देसाई ए. आर, ''भारतीय ग्रामीण समाजशास्त्र'', रावत पब्लिकेशन, नई दिल्ली, 2009.
9. देशमुख प्रभाकर, ''भारतीय अर्थशास्त्र'', पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर.

# "मराठीतील अभिजात परंपरेचे स्वरूप"

**डॉ. संजय पाखमोडे,** मराठी विभाग प्रमुख, राजीव गांधी महाविद्यालय, सडक अर्जुनी जि. गोंदिया

प्राचीन मराठी साहित्याचे विशाल व समृद्ध स्वरूप आजवरच्या अनेक अभ्यासकांनी दाखवून दिले आहे. त्यातून हे साहित्य कशाप्रकारे वेगवेगळ्या कालखंडात हाताळल्या जात असत याचेही दर्शन होते. विशेष लक्षणीय म्हणजे प्राचीन मराठी ग्रंथकारांच्या रचनांचा अभ्यासही पद्धतशीर होत असे. या अभ्यास व अध्ययनाच्या क्षेत्रात समाजातील वेगवेगळ्या स्तरातील लोक असत. महानुभाव, वारकरी, दत्त, रामदासी आणि नाथ या संप्रदायांचे अभ्यासक प्राचीन मराठी साहित्याच्या अध्ययनात अग्रेसर होते. या अभ्यासकांनी निर्माण झालेल्या साहित्याचे वर्गीकरणही केले होते. हे वर्गीकरण तीन प्रकारचे होते :– 1) प्रासादिक 2) धीट 3) धीटपाठ. यापैकी 'प्रासादिक' म्हणजे संतांच्या रचना, तर 'धीट' म्हणजे शाहिरांच्या रचना आणि 'धीटपाठ' म्हणजे पंडितांच्या रचना. समर्थ रामदासांनी दासबोधाच्या 14 व्या दशकातील तिसऱ्या समासात कवित्वविचार सादर करतांना या तीनही प्रकारांचे विवेचन केलेले आहे :–

"धीट पाठ प्रासादिक।
एसें बोलती अनेक।
तरी हा त्रिविध विवेक।
बोलिजेल।। 7।।
धीट म्हणिजे धीटपणें केलें।
जें जें आपुल्या मनास आलें।
बळेंचि कवित्व रचिलें।
या नांव धीट बोलिजे ।। 8।।
पाठ म्हणिजे पाठांतर।
बहुत पाहिलें ग्रंथांतर।
तयासारिखा उतार।
आपणहि केला ।। 9 ।।
सीघ्रचि कवित्व जोडिलें।
दृष्टीं पडिलें तेचि वर्णिलें।
भक्तीवांचून जें केलें।
त्या नाव धीटपाठ ।। 10 ।।
कामिक रसिक शृंगारिक।
वीर हास्य प्रस्ताविक।
कौतुक विनोद अनेक।
या नांव धीटपाठ ।। 11।।"[1]

समर्थांसारखा संत–सत्पुरुष निर्माण झालेल्या साहित्याची दखल घेऊन त्याचे तीन प्रकारे वर्गीकरण करतो, ही बाब लक्षणीय आहे. या वर्गीकरणात समर्थांनी 'धीटपाठ' नावाचे काव्य सांगितले आहे. हे काव्य शृंगारिक व लौकिक पद्धतीचे आहे हे ते आवर्जून सांगतात. समर्थांचा समय शके 1530 ते शके 1603 ( इ.स. 1608 ते इ.स. 1681 ) असा आहे. त्या वेळी व त्यांच्याही अगोदर निर्माण झालेल्या मराठी साहित्यात 'धीटपाठ' नावाचे काव्य होते असे समर्थ म्हणतात. 'धीटपाठ' ही संज्ञा समर्थांनी वापरली ती प्रामुख्याने 'धीट' या काव्याच्या संदर्भात. त्यांच्या मते 'धीट' आणि 'धीटपाठ' असे दोन प्रकारचे काव्य आहेत. यापैकी 'धीट' म्हणजे शाहिरीकाव्य असून 'धीटपाठ' म्हणजे पंडितीकाव्य होय. हे दोन्ही काव्यप्रकार निखळ लौकिक असून नवरसपूर्ण असत. त्यामध्ये अलंकारही असत. तथापि शाहिरांचे काव्य तात्कालिक असून नरस्तुतीप्रधान असे व मनोरंजन हा त्यांचा उद्देश असे. लावणी आणि पोवाडा या दोन प्रकारातून शाहिरांनी आपले साहित्य सादर केले. तर धीटपाठ काव्य, शाहिरी काव्यापेक्षा भिन्न व वेगळ्या प्रकारचे होते. ते प्रामुख्याने नवरसयुक्त व अलंकारप्रचुर असे. व्युत्पत्ती आणि तऱ्हेतऱ्हेचे वृत्त त्यामध्ये असत. 'धीटपाठ' काव्यात आख्यान, चंपू, नाटक, महाकाव्य, नैसर्गिक वर्णने, कथाकाव्य या रचनाप्रकारांना प्राधान्य असे. त्यामध्ये कथानक, संघर्ष, व्यक्तिचित्रण, वातावरणनिर्मिती आणि निसर्ग यांना प्रधान स्थान असून 'धीटपाठ' काव्य हे शैलीप्रधान असत. अर्थात 'धीटपाठ' काव्य हे निखळ लौकिक पद्धतीचे शृंगाररस–वीररसप्रधान साहित्य असे. याउलट 'प्रासादिक' काव्य हे ईश्वरस्तवनपर असून परतत्त्वस्पर्श हा त्याचा निकष असे. 'धीटपाठ' काव्याचे समर्थांनी केलेले वर्णन पाहता धीटपाठ काव्यामधून त्यांना 'पंडितीकाव्य' अभिप्रेत होते हे सुस्पष्ट होते.

हे पंडितीकाव्य रचणारी एक प्रदीर्घ व श्रेष्ठ कवींची परंपरा असून त्यामध्ये प्राचीन मराठी साहित्यात नरींद्र, भास्करभट्ट बोरीकर, दामोदरपंडित, ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, कृष्णदयार्णव, वामनपंडित, सामराज, विठ्ठलकवी, मोरोपंत, आनंदतनय, रघुनाथपंडित या कवींचा समावेश होतो. यांच्या पावलांवर पाऊल टाकून काव्य करणारे अनेक कवी व ग्रंथकार प्राचीन मराठी साहित्यात आढळतात. यांनी निर्माण केलेल्या काव्याला 'पंडितीकाव्य' असे नाव असले तरी हे काव्य मूळात अभिजात परंपरेचे आहे. या परंपरेत दोन गट आहेत. एक साहित्य निर्माण करणाऱ्या कवींचा गट तर दुसरा साहित्याचा आस्वाद घेणाऱ्या रसिकांचा गट. अशाप्रकारे निर्माण झालेले साहित्य व त्याचा आस्वाद घेणारे रसिक हे दोन घटक अभिजात परंपरेत प्रामुख्याने दिसून येतात.

साहित्य आणि साहित्याचा आस्वाद घेणारे आस्वादक यांचे रसभरित वर्णन ज्ञानदेवांनी तसेच सर्व संत व पंडितकवींनी केलेले आहे. साहित्य आणि साहित्याचा आस्वाद घेणाऱ्या रसिकांचे संबंध हे वक्ता आणि श्रोता यांच्या संवाद पद्धतीचे असतात असे अभिजात परंपरेतील काव्यमीमांसक सांगतात. संस्कृत साहित्यात याचे विपुल विवेचन आहे. याला अभिनवगुप्ताने 'सामाजिक' असा शब्द वापरला आहे. निर्माण झालेले साहित्य आणि त्याची आवड असणारे श्रोते यांचा संवाद अखंड चालू असतो. ग्रंथकार ग्रंथ निर्माण करतो तेव्हा ग्रंथाच्या

प्रारंभापासून तर ग्रंथाच्या अखेरपर्यंत लेखक ग्रंथनिर्मितीप्रक्रियेत गुंतलेला असतो. ग्रंथनिर्मितीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ग्रंथाचा आस्वाद घेणारा श्रोता म्हणजेच रसिक हा पुढे सरसावतो. हा श्रोता कसा असावा याचे काही संकेत अभिजात परंपरेत आढळून येतात. किंबहुना ग्रंथ, ग्रंथकार, रसिक यांचे परस्पर संबंध स्पष्ट करणारी 'अभिजात' ही समीक्षाक्षेत्रातील पहिली परंपरा आहे.

अभिजात परंपरेतील ग्रंथाचा वाचक हा केवळ साधा वाचक नसतो तर अभिरुचिसंपन्न असा वाचक असतो. 'रुचि' म्हणजे आवड. 'अभिरुची' म्हणजे विशेष आवड. हा 'अभि' उपसर्ग 'अभिजात' या संज्ञेतही आलेला आहे. येथे 'अभि' म्हणजे विशेषत्वाने किंवा वैशिष्ट्यपूर्णतेने असा अर्थ अभिप्रेत आहे. काव्यवाचकाची वैशिष्ट्यता किंवा विशेष आवड ही त्या वाचकावर झालेल्या संस्काराने स्पष्ट होत असते. ही विशेष आवड उर्फ अभिरुची सौंदर्याने संस्कारित झालेली असते. शब्दार्थामधील सौंदर्य ओळखणे, त्याची प्रतीती घेणे हे अभिरुचीमध्ये आढळून येते. थोडक्यात अभिजात परंपरा ही साहित्यातील सौंदर्यधर्मी परंपरा आहे.

शब्दार्थ साहित्यामध्ये असतात, किंबहुना कोणतेही साहित्य हे शब्दार्थानेच सयुक्तिक असते. शब्दार्थाने आपला व्यवहारही पूर्ण होत असतो. अशाप्रकारे मानवी जीवनाचा व्यवहार आणि साहित्यप्रक्रिया या दोन्ही क्षेत्रात शब्दार्थ असतात. किंबहुना शब्दार्थाच्या माध्यमाने आपला व्यवहार व साहित्यप्रक्रिया पूर्ण होत असते. परंतु आपला जो व्यवहार असतो तो निखळ लौकिक असतो. उपयुक्तता हे त्या व्यवहाराचे वैशिष्ट्यपूर्ण अंग असते. व्यवहारातील कोणतीही क्रिया ही उद्देशपूर्ण असते. म्हणून व्यवहार हा लौकिक असतो, पण तसे साहित्याचे नसते. साहित्य ही अलौकिक प्रक्रिया आहे. यामध्ये सौंदर्यनिर्मिती ही प्रधान असते. म्हणजेच व्यवहारातील शब्दार्थ वेगळे आणि साहित्यातील शब्दार्थ हे वेगळे. साहित्यातील शब्दार्थांचे वेगळेपण त्यावर झालेल्या सौंदर्याच्या संस्कारातून प्रगट होत असतात. याचाच विचार जी परंपरा करते तिला 'अभिजात परंपरा' असे नाव आहे. अभिजात परंपरा ही श्रेष्ठ, उच्च आणि प्रभावी जीवनधारणेतून उत्पन्न झालेली असते. मानवाचा उच्च आदर्शवाद हा अभिजात परंपरेचा महत्त्वपूर्ण विशेष आहे.

ही अभिजात परंपरा इहलोकनिष्ठ, चारही पुरुषार्थप्रधान आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे जे जीवनाचे असामान्य वैशिष्ट्य आणि पैलू प्राचीनांनी दाखवून दिले ते सर्व इहलोकनिष्ठप्रधान जीवनाशी संबंधित होते व आहेत. इहलोकनिष्ठ जीवन म्हणजे जन्मापासून मृत्यूपर्यंतचे जीवन. यामध्ये जे जे काही होत असते ते ते सर्व जीवनाषी संबंधित असते. म्हणून भारतीय अभिजात परंपरेचा प्रधान विशेष पुरुषार्थप्रधान साहित्य असा आहे.

मानवी जीवनातील श्रेष्ठ जीवनमूल्ये, त्यांचा आविष्कार, आदर्श आणि धारणा ज्यामध्ये चित्रित असतात किंवा वर्णन केलेले असतात ती अभिजात परंपरा होय. मानवी जीवन हे कसे आहे त्याचे स्वरूप आणि मानवी जीवनाची उद्दिष्ट या सर्व प्रश्नांचा उहापोह व चर्चा वेगवेगळ्या तत्त्वविशारदांनी केलेली आहे. काहींनी ते आनंदमय आहे, काहींनी ते दुःखमय आहे तर काहींनी ते सुखदुःखात्मक आहे असे सांगितले. यामधून मानवी जीवनमूल्यांचा विचार सुरू झाला. तो होत असताना इहलोकनिष्ठ जीवनाबरोबरच मानवाचे गूढ आणि गुंतागुंतीचे भावरम्य जीवन हाही प्रश्न धसास लागला. सहसा सुखी आणि दुःखी असे जीवनाचे वर्गीकरण करून सुखदुःखाच्या कल्पना जो तो सांगू लागला. हे सर्व मान्य करूनही काही मानवी जीवनाची प्रश्नचिन्हे अखंडपणे मानवाला व विचारवंताला सतावित होते. मानवाचा संघर्षमय जीवनप्रवास आणि नियतितत्त्व हे दोन प्रश्न विचारवंतांना भेडसावित असत. शिवाय स्त्री आणि पुरुष यांचे प्रश्न असत व आहेत. सीताहरणामधून राम–रावण युद्ध निर्माण झाले तर द्रौपदीच्या वस्त्रहरणातून महाभारत निर्माण झाले. याचबरोबर सत्ता आणि आसक्ती जी मानवाला आहे ती काही कमी नाही. या सर्वांमधून जी जीवनमूल्ये, संघर्ष, नीतिमूल्ये आणि आचारधर्म नामरूपाला आले. त्यापैकी काही जीवनमूल्ये अतिशय उदात्त होती. राष्ट्र या संकल्पनेमुळे अनेकांनी आपले बलिदान केले. न्याय, नीती, धर्मजीवन आणि सर्वात प्रधान म्हणजे सत्याचा शोध. एकीकडे सत्तेची अनिवार लालसा, स्त्री–पुरुष यांचे प्रीतीसंबंध आणि भोग्यवस्तूचे आकर्षण तर दुसऱ्याबाजूला हे सर्व असताना ईश्वर आणि सत्याच्या शोधासाठी या सर्वस्वाचा त्याग. यामधून जी उच्च प्रकारची जीवनमूल्ये नामरूपाला आली ती डोळ्यासमोर ठेवून जे साहित्य निर्माण झाले ते अभिजात साहित्य होते व आहे. याशिवाय सर्वप्रकारची सुखे असताना अकस्मात व योगायोगाने जीवनात जी उलथापालथ होते आणि सुखाचे रूपांतर दुःखात होते हे सर्व नियतीतत्त्वामुळे होते. हे केवळ भारतीयच नव्हे तर पाश्चिमात्य साहित्यातही दिसून येते. या नियतीतत्त्वाचा जीवनावरील प्रभाव आणि त्यामधून निर्माण होणाऱ्या षोकांतिकेचे स्वरूपही अभिजात साहित्यात आढळून येते. ही षोकांतिका प्राधान्याने श्रेष्ठ आणि वीर पुरुषांच्या जीवनात दिसून येते. शृंगार, वीर आणि करुण हे नवरसातील प्रधान रस आहेत. या तीन रसांशी संबंधित असणारे साहित्य पराक्रमी पुरुषांच्या वीरगाथा सांगणारे असते. हा पराक्रम ज्यासाठी ते करतात त्यात ते कधी यशस्वी होतात तर ते कधी अयशस्वी होतात. राणाप्रताप, छत्रपती संभाजी यांची उदाहरणे उल्लेखनीय आहेत. पराक्रम करूनही पराजय, सत्य असूनही दुःख आणि न्यायी असूनही उपेक्षितपणा हे सर्व शोकांतिकेचे नानाविध पैलू आहेत. नायक, नायिका आणि प्रतिनायक या तीन घटकांभोवती फिरणारे साहित्य अभिजात परंपरेने निर्माण केले आहे. शोकांतिकेचे हे एक कारण आहे. म्हणून अभिजात परंपरा ही केवळ सुखान्तिकच आहे असे नव्हे तर दुःखाचे वर्णन करणारी आहे. सुख आणि दुःख किंवा सुखदुःखात्मकता हे जीवनाचे रूप आहे आणि नवरस हे सुखरूप आहे असा एक अभिनवगुप्ताचा अलौकिकवादी पक्ष आहे; तर नवरस हे सुखदुःखात्मक आहे असा सांख्यांचा एक पक्ष आहे. रसचर्चा ही भारतीय अभिजात परंपरेचे काव्यशास्त्रच असल्यामुळे जीवनाची सुखदुःखता त्यात आली आहे. आणि सुखाच्या शोधातून धर्म, परमेश्वर,

ईश्वराविषयीचे मानवाचे अनुभव हे सर्व अभिजात परंपरेत आढळून येते. अशी ही अभिजात परंपरा मानवाचे संपूर्ण जीवन व्यापणारी असून जीवनाच्या भव्य आणि गुढतेलाही स्पर्श करणारी असल्यामुळे ती व्यापक, मूलभूत आणि अतिसुक्ष्म अशी चैतन्याचा आविष्कार घडवून देणारी आदर्श जीवनाचे रूप सांगणारी साहित्यनिर्मितीची उज्ज्वल परंपरा आहे.

'अभिजात' हा संस्कृत शब्द आहे. अभिजात परंपरेला इंग्रजीमध्ये ब्सेंपबंस ही संज्ञा आहे. अभिजात साहित्य म्हणजे श्रेष्ठ प्रतीचे साहित्य होय. असे साहित्य सातत्याने जेथे निर्माण होते त्याला 'अभिजात परंपरा' असे नाव आहे. अभिजात ही संज्ञा महाकवी कालिदासानेही वापरली आहे. त्यासाठी कालिदासाने 'अभिरूप' असा शब्द योजिला. नाटक पाहायला येणाऱ्या रसिकांचा गौरव करताना कालिदास लिहितो,[2]

"आर्य अभिरूपभूयिष्ठा परिषदियम्।" या वाक्याचे स्पष्टीकरण करताना शाकुंतलचा सुप्रसिद्ध टीकाकार राघोभट्ट लिहितो, "अभिरूपाः पण्डिता मनोज्ञाश्च भूयिष्ठा बहवो यस्यामेतादृशी परिषत्सभा।"

म्हणून अभिजात साहित्य हे प्रगल्भ व अभिरुचीसंपन्न रसिकांच्या आवडीचे साहित्य असते.

यासंदर्भात दुसरी एक संज्ञा विपुलतेने वापरण्यात येते, ती म्हणजे 'विदग्ध' ही होय. 'विदग्ध' हा संस्कृत शब्द आहे. 'विदग्ध' म्हणजे काळजीपूर्वक शिजविलेले, विशेषत्वाने शिजविलेले. लक्षणेने याचा अर्थ उत्तम प्रकारची अभिरुची ज्यांची आहे अशा लोकांचे आवडते साहित्य. तसेच ज्या साहित्याच्या निर्मितीत लेखकाने किंवा ग्रंथकाराने विशेष श्रम घेऊन ते उत्तम प्रकारे सादर केलेले आहे असे. शिजविलेल्या किंवा परिपक्व झालेल्या अन्नाला जसा सुवास असतो तसा सुवास परिपक्व झालेल्या प्रतिभेतून निर्माण झालेल्या साहित्याला येतो. थोडक्यात अभिजात आणि विदग्ध या दोन्ही संज्ञा एकाच प्रकारच्या साहित्याला लावलेल्या असतात. त्यामधून उत्तम संस्काराने सिद्ध केलेले जे साहित्य ते अभिजात किंवा विदग्ध साहित्य होय असे म्हणता येते.

याविषयी डॉ. के. ना. वाटवे यांनी मराठी समीक्षाक्षेत्रात प्रथमतः विवेचन केले. त्यांनी आपले विचार 'प्राचीन मराठी पंडिती काव्य' या ग्रंथात सादर केले आहेत. याग्रंथानंतर म्हणजे इ.स. 1964 नंतर प्राचीन मराठी साहित्याचे संशोधन मोठ्याप्रमाणात होऊन अनेक ग्रंथ व रचना उजेडात आल्या. शिवाय प्राचीन ग्रंथकारांच्या जुन्या संहिताही उपलब्ध झाल्या व त्यांची संपादणे मोठमोठ्या संशोधकांनी सिद्ध केले. त्यामुळे डॉ. के. ना. वाटवे यांच्या विवेचनाच्या मर्यादा आज आपल्याला दिसून येत असल्या तरी त्यांच्या खांद्यावर आजचे अभ्यासक उभे आहेत. त्यांचे ऋण कोणत्याही अभ्यासकाला कधीही विसरता येत नाही. म्हणून त्यांनी केलेले विवेचन आजही लक्षणीय ठरते. आर्ष आणि विदग्ध या संज्ञांची फोड करताना डॉ. के. ना. वाटवे लिहितात :–

"पंडित कवीस 'कलाकवी' म्हणतात ते केवळ एका अर्थानेच खरे आहे. म्हणजे आपल्या काव्यात त्यांनी कला वापरली आहे हे सत्यच आहे. पण त्यात कलाच होती व पांडित्य नव्हते असे नाही. त्यापेक्षा मग पांडित्य, कलात्मकता, नागरपणा, चातुर्य इत्यादी अनेक अर्थ सुचविणारा 'विदग्ध' शब्द बरा. म्हणून वामन पंडित, सामराजादी कवींस विदग्ध कवी व त्यांच्या काव्यास 'विदग्ध काव्य' म्हणावे हे मला पसंत आहे.

पण 'पंडिती कवी' हा शब्द इतका रूढ झाला की, त्याचा काहीतरी अवशेष नावात शिल्लक ठेवावा म्हणून मी मराठी विदग्ध काव्यास 'पंडिती काव्य' म्हटले आहे. खरे म्हणजे विदग्ध शब्दच अधिक बरा. म्हणून विदग्ध शब्दाची थोडी फोड करतो. 'विदग्ध' शब्दाचा यौगिक किंवा धात्वर्थ विशेष प्रकारे भाजलेले (वि+दह्) असा आहे. मुळची कच्ची वस्तू भाजून मग ती उपयोगात आणतात. म्हणजे नैसर्गिकअन्नावर सुधारलेल्या नागर मानसाने काही विशिष्ट संस्कार करून म्हणजे शिजवून, भाजून, वाळवूनसुद्धा उपयोगिलेले सुसंस्कृत अन्न असा याचा अर्थ आहे. या मूळ धात्वर्थावरून लक्षणेने 'विदग्ध' याचा अर्थ सुसंस्कृत, चतुर, निपुण, नागर, पंडित असा झाला. म्हणजे निसर्गदत्त वस्तूवर मानवाने बुद्धिपूर्वक केलेल्या संस्कारांनी येणारी कोणत्याही वस्तूची अवस्था 'विदग्ध' शब्दाने सूचित होते.

अगदी आरंभी साधेसुधे, जोमदार स्वयंस्फूर्त असे जे काव्य झाले ते आर्षकाव्य. म्हणून रामायण–महाभारतास आर्षकाव्य म्हणतात. पण त्याच रामायण–महाभारताच्या काही प्रसंगांवर उत्तरकालीन कालिदास, भारवी इत्यादींनी जी काव्ये रचली त्यांना विदग्धकाव्ये म्हणतात. कारण ती रचतांना या उत्तरकालीन कवींनी आपल्या काळातील पांडित्य, कला, संस्कृती, नागरपणा, अभिरूची इत्यादी गोष्टींचा संस्कार करून ती अधिक कलासंपन्न आणि हृद्य बनविली. संस्कृतातील ही आर्ष–विदग्धाची प्रक्रिया थोड्याफार अर्थाने मराठीतही झाली आहे.[3]

विदग्ध संज्ञेवरील डॉ. के. ना. वाटवे यांचे हे स्पष्टीकरण मार्मिक असून अभिजात परंपरचे भरणपोषण आणि याचबरोबर ती परंपरा नामरूपाला कशी येत गेली हे स्पष्ट करणारे आहे.

संदर्भ :–

1 ल. रा. पांगारकर (संपा), 'सार्थ श्रीदासबोध', पा. आ. (विसावे पुनर्मुद्रण), श्री समर्थ ग्रंथ भवन, पुणे, 1995. दशक 14, समास 3, ओवी क्र. 7 ते 10.

2 Late M. R. Kale (Edit.), ABHIJNANASAKUNTALAM of KALIDASA, Eighth Edition, Booksellers publishing Co, Bombay, 1957. संहिता पृ. क्र. 7.

3 डॉ. के. ना. वाटवे, 'प्राचीन मराठी पंडिती काव्य', प्र. आ., जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, 1964. पृ. 22 ते 23.

# 'गडचिरोली जिल्हयातील जलसाधनसंपत्ती'

**डॉ. ए. एस. बावनकर,** भूगोल विभाग प्रमुख, एस. एन. मोर कॉलेज, तुमसर, जि. भंडारा.

**प्रस्तावना :–** प्रस्तुत शोध निबंधात गडचिरोली जिल्हयातील सिंचन समस्येचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या जिल्हयातील क्षेत्रीय अभ्यासातून जलसिंचन ही प्रमुख समस्या मानवी विकासाच्या दृष्टीकोनातून आढळून आली. सिंचनाच्या अभावाची कारणे कोणती व त्याचा काय परिणाम या जिल्हयावर होत आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्राच्या अतिपूर्वेकडील अतिदुर्गम, जंगलव्याप्त, आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हयात एकून 12 तालुके असून हा जिल्हा दोन नैसर्गिक विभागात विभागला जातो.

1) उत्तर पूर्वेकडील उंचवटयाचा प्रदेश.

2) नदीखोऱ्याचा सपाट मैदानी प्रदेश

**1) उत्तर पूर्वेकडील उंचवट्याचा प्रदेश :–** या प्रदेशाची उंची 450 ते 500 मी. आहे. तर दक्षिणेकडील गोदावरी काठावरील भाग हा 200 मी. पर्यंत आहे.

**2) नदीखोऱ्याचा सपाट मैदानी प्रदेश :–** या जिल्हयातील 63 टक्के भाग पूर्णतः वैनगंगा, प्राणहिता खोऱ्यात येत असून 35 टक्के भाग इंद्रावती खोऱ्यात येतो. जिल्हयातील प्रमुख नद्या वैनगंगा, इंद्रावती, प्राणहिता, गोदावरी असून तिच्या उपनद्या गाढवी, खोब्रागडी, कठाणी, दिना या आहेत. पावसाचे प्रमाण या जिल्हयात पश्चिम भागात 1400 मीमी व पूर्वेकडील भागात 1700 मी.मी. असे प्रमाण वाढत जाते. जिल्हयात दुष्काळग्रस्तभाग आढळत नाही. गडचिरोली, जिल्हा नदीखोऱ्यांनी व्यापलेला असून सुद्धा जलसिंचनाचा विकास झालेला नाही. त्यामुळे कृषी क्षेत्र औद्योगिकीकरण, जलविद्युतिकरणाचा विकास आढळत नाही. त्यामुळे मानवी जीवनाचा सर्वांगिण विकास झालेला नाही ही समस्या दूर करण्यासाठी जलसिंचनाचा विकास करणे अतिशय महत्वाचे आहे.

**व्याख्या :–** 'ठराविक वेळी योग्य प्रमाणात कृषीस पाणी पुरवठा, उपलब्ध करून घेणे म्हणजे जलसिंचन होय'

**अभ्यासक्षेत्र :–** गडचिरोली हा जिल्हा महाराष्ट्राच्या पूर्व सिमेवरील जिल्हा असून त्याच्या उत्तरेस गोंदिया जिल्हा पूर्वेस छत्तीसगड राज्य, दक्षिण व नैऋत्येस आंध्र प्रदेश, पश्चिमेस चंद्रपूर जिल्हा आहे. गडचिरोली जिल्हयाचा अक्षांशिय विस्तार $18^0$ 43′ ते $21^0$ 45′ उत्तर अक्षांस व रेखांशिय विस्तार $79^0$ 45′ ते $80^0$ 53′ पूर्व रेखांशाच्या दरम्यान आहे. या जिल्हयाचे भौगोलीक क्षेत्रफळ 14915 चौकीमी आहे. एकूण शेतीलायक क्षेत्र 2 लाख 69 हजार 700 हेक्टर असून एकूण क्षेत्राच्या 18.61 टक्के आहे.

गडचिरोली जिल्हयात 1675 गावापैकी 1449 गावे आदिवासी क्षेत्रात समाविष्ट केले आहे. जिल्हयाची लोकसंख्या 2001 च्या जनगणनेनुसार 9 लाख 96 हजार 907 इतकी आहे. त्यापैकी आदीवासींची लोकसंख्या 304535 इतकी आहे. त्याचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण 31.40 टक्के आहे. एकंदरीत संपूर्ण गडचिरोली जिल्हयाचा विचार केल्यास संपूर्ण जिल्हा नदीखोऱ्यांनी व्यापलेला आहे. परंतू जलसिंचनाच्या सुविधा नसल्याने आणि जंगलव्याप्त क्षेत्रामुळे नदीच्या पाण्याचा वापर केला जात नाही. त्यामुळे गडचिरोली जिल्हा आर्थिक दृष्टया मागासलेला आहे.

**उद्दीष्टये :–** गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम भागात वसल्याने खुप मोठया प्रमाणात जलसिंचनाची समस्या निर्माण झाली आहे. त्यादृष्टीने वर्तमान स्थिती, भविष्यकालीन स्थिती यांच्यावर जलसिंचनाचा काय परिणाम होतो, हे उद्दीष्टये समोर ठेऊन गडचिरोली जिल्हयातील जलसाधन संपदा हा विषय घेण्यात आला.

**जलसिंचनाची उद्दीष्ट्ये :–**

1. गडचिरोली जिल्हयातील जलसिंचनाचा मानवी जीवनावर काय परिणाम होतो हे अभ्यासने.
2. जलसिंचन क्षमतेने वाढ करणे.
3. जलसिंचन प्रकल्पाचा कृषी क्षेत्राषी असणारा संबंध अभ्यासणे.
4. जलसिंचन व त्यावर आधारित पर्यायी बहुउद्देषिय योजनाबाबत अभ्यास करणे.
5. मान्सून च्या अनियमिततेमुळे निर्माण होणारी पाण्याची उणिव भरून काढणे.

**अभ्यासपद्धती :–** प्रस्तुत लघु संषोधन दुय्यम आकडेवारीवर आधारीत आहे. अभ्यासार्थ निवडलेल्या गडचिरोली जिल्हयातील जलसिंचन विषयक कारणांची माहिती विचारात घेउन सांख्यिकीय माहीतीचे सारणीकरण करून माहीतीच्या सादरिकरणासाठी छाया पद्धती नकाषाचा वापर केला आहे.

**विवेचन आणि विश्लेषण :–** प्रस्तुत लघुषोध निबंधात गडचिरोली जिल्हयातील मोठे सिंचन प्रकल्पांचा अभ्यास हा तालुका निहाय लक्षात घेऊन केले आहे.

**गडचिरोली जिल्हयातील मोठे सिंचन प्रकल्प**

| सिंचन प्रकल्प | नदी खोरे | तालुकानिहाय सिंचन क्षमता (हेक्टर) | एकुण पाणीसाठा (दलघमी) | उपयुक्त पाणीसाठा (दलघमी) |
|---|---|---|---|---|
| इटियाडोह | गोदावरी | आरमोरी–6458<br>वडसा–5414 | .... | .... |
| दिना | गोदावरी | चार्मोर्शी 12656 | 72.75 | 67.54 |
| तुलतुली | गोदावरी | गडचिरोली 12363 | 225 | .... |
| सती | गोदवरी | आरमोरी 15590<br>कुरखेडा 6650 | .... | 215.123 |
| भिमकुंड | गोदावरी | चार्मोर्शी 28000 | 167.57 | 148.07 |
| कठाणी | गोदावरी | धानोरा 13025<br>गडचिरोली16015 | 228.47<br>19.87 | 179.29<br>... |

गडचिरोली जिल्हयातील नकाशावर दृष्टीक्षेप टाकल्यास असे स्पष्ट होते की, गोदावरी नदी खोरे क्षेत्रात येणाऱ्या आरमोरी, चामोर्शी, वडसा, गडचिरोली, कुरखेडा, धानोरा या मोठया सिंचन प्रकल्पापैकी इटियाडोह सिंचन प्रकल्पात आरमोरी तालुक्याचे 6458 हेक्टर क्षेत्र तर वडसा तालुक्याचे 5417 हेक्टर क्षेत्रात सिंचन क्षमता आहे तसेच चामोर्षी तालुक्यात 12656 हेक्टर सिंचन क्षमता आहे. त्यामुळे आरमोरी, वडसा, चामोर्शी या तालुक्यात या सिंचन प्रकल्पांचा उपयोग कृषीसाठी घेण्यात येत असल्याने तेथे मोठया प्रमाणात भाताचे उत्पादन घेण्यात येते. त्यामुळे येथील मानवी जीवन उंचावल्याचे आढळते.

तुलतुली प्रकल्पा अंतर्गत गडचिरोली 14363 हेक्टर आणि आरमोरी तालुक्यात 16227 हेक्टर सिंचन क्षमता असून वनजमिन कायद्यामुळे या प्रकल्पास मान्यता मिळाली नसल्याने हा प्रकल्प ठप्प आहे. त्यामुळे या क्षेत्रात येणाऱ्या गावांचा विकास झाला नाही. तसेच सती प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या आरमोरी, कुरखेडा तालुक्यातील गावांचा वनकायदा व प्रशासकीय आर्थिक तरतुद नसल्यामुळे विकास झालेला नाही. चामोर्शी तालुक्यातील भिमकुंड प्रकल्प आणि धानोरा, गडचिरोली तालुक्यातील कठाणी प्रकल्प यामुळे सरासरी 57040 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणून या क्षेत्राचा सर्वांगिण विकास करता येतो. गडचिरोली जिल्हा नदीखोऱ्याचा प्रदेश असल्याने मोठे प्रकल्प तयार करून जिल्हयातील आर्थिक व मानवी विकास साधता येतो. गडचिरोली जिल्हयातील इंद्रावती नदी खोऱ्यात सिंचन प्रकल्प स्थापून भामरागड तालुका व एटापल्ली तालुक्याचा काही भाग कृषीक्षेत्राखाली आणता येतो.

**सिंचनाच्या अभावाची कारणे :–**

1) वनकायदा

2) आर्थिक तरतुदीचा अभाव

3) सरकारी धोरण

4) नक्षलवाद.

**निष्कर्ष :–**

1) सिंचनाच्या अभावाने मानवी जीवन खालावलेला आहे.

2) निसर्गावर शेती अवलंबून आहे.

3) औद्योगिक विकासास चालना मिळेल.

4) विद्युत निर्मिती शक्य होईल.

5) जमिनीची धूप कमी करण्यास मदत होईल.

6) पूर नियंत्रण.

**उपाययोजना :–**

1) जिल्हयात नद्यांचे जाळे मोठया प्रमाणात असून त्यावर आधारीत विविध स्तरावरील प्रकल्प उभारणे.

2) अत्याधिक कृषीक्षेत्रास जलसिंचनाचा लाभ व्हावा यादृष्टीने प्रयत्न करणे.

3) कृषी पद्धतीत बदल करणे.

4) जलसिंचनावर आधारीत इतर उद्योग स्थापन करणे.

**संदर्भ ग्रंथ :–**


1. Deccan Geographical Society 2006 भूगोल संशोधक.
2. Ahuja Ram 2006 Research Method, Rawat Publication Jaipur.
3. Director 1991 District censes Handbook Gadchiroli.
4. Dr. K.M.L. Agrawal and Dr. Nivendra kumar Sharma (Geography of natural resources)
5. जलसंपदा विभाग 2009 गडचिरोली.

UGC Approved Journal

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

UGC

JOURNAL No. 45230

ISSN 2278-3199

Published By

DEPARTMENT OF SOCIOLOGY

**SETH NARSINGDAS MOR ARTS, COMMERCE & SMT. GODAVARI DEVI SARAF SCIENCE COLLEGE**

TUMSAR, DIST. BHANDARA - 441912.

Email-principalsnmorcollege@rediffmail.com / rjbhagat1968@yahoo.co.in
Website - www.snmorcollege.org.in
Phone No. - 07183-233300 / 07183-233301 Mobile - 09422113067 / 09420359657